ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI Issue - II April - June - 2022

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.306
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **“AJANTA”**.
Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, Ph. No. : (0240) 2400877
E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.306** **(www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | पेशवेकालीन स्त्रीचा दर्जा : ऐतिहासिक अभ्यास<br>**प्रा. अश्विनी रामचंद्र खवळे** | १-७ |
| २ | हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन संस्थेचे पुणे जिल्ह्यातील कार्य<br>**प्रा. बोत्रे अमोल पोपट** | ८-१२ |
| ३ | पर्यटनाचे बदलते स्वरूप किल्ले सिंधुदुर्ग : एक अभ्यास<br>**प्रा. एस. टी. साळुंखे**<br>**डॉ. दिपक शंकरराव जाधव** | १३-१७ |
| ४ | स्वातंत्र्यपूर्व काळातील कोल्हापूरच्या वृत्तपत्रामधील स्थित्यंतरे<br>**Dr. Dhiraj Suresh Shinde** | १८-२५ |
| ५ | इसवी सन १७ वे शतक ते २० वे शतक या कालावधीत मराठी भाषेवर फारसी व इंग्रजी भाषेचा परिणाम<br>**प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा** | २६-३१ |
| ६ | राजर्षी शाहू पूर्वकाळातील कोल्हापूर राज्यामधील स्थितंतरे<br>**डॉ. खंडेराव शिंदे** | ३२-३६ |
| ७ | दलित चळवळीतील दीक्षाभूमी चे योगदान एक अभ्यास<br>**अमितकुमार शंकरराव गागरे** | ३७-४१ |
| ८ | वाईतील सार्वजनिक गणेशोत्सव किंवा द्वार सोहळा<br>**प्रा. डॉ. कोरडे दत्तात्रय ज्ञानदेव** | ४२-४४ |
| ९ | सेझ (SEZ) विरोधी आंदोलन आणि प्रा. डॉ. एन. डी. पाटील<br>**प्रा. डॉ. गाढवे किशोर गुलाब** | ४५-५० |
| १० | दिल्लीच्या तख्ता विषयी मराठ्यांचे धोरण<br>**डॉ. प्रमोद कोंडाजी चव्हाण** | ५१-५४ |
| ११ | संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण: एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. सुमित संभाजी यादव** | ५५-५९ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | जागतिकीकरण आणि महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था<br>**डॉ. भोसले एस.एम.**<br>**प्रा. जी. सी. खामकर** | ६०-६६ |
| १३ | कान्होजी जेधे यांचे स्वराज्य निर्मितीतील योगदान<br>**प्रा. डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत** | ६७-७० |
| १४ | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील शंकरराव देव यांचे योगदान<br>**प्रा. डॉ. काशिलिंग रघुनाथ गावडे** | ७१-७८ |
| १५ | पंढरपूर तालुक्याच्या सहकार चळवळीतील स्थित्यंतरे<br>**डॉ. लोखंडे नारायण सोपान** | ७९-८२ |
| १६ | महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतदादा पाटील यांचे सहकार धोरण<br>**Dr. Madhukar Vithoba Jadhav** | ८३-८६ |
| १७ | महाराष्ट्रातील रयतवारी पद्धतीचा अभ्यास<br>**प्रा. डॉ. महादेव शामराव थोरात** | ८७-९० |
| १८ | जगेन तर देशासाठी, मरेल तर देशासाठी'' या लहुजी साळवे यांच्या घोषणेचा मतितार्थ<br>**डॉ. माणिक सोनावणे** | ९१-९५ |
| १९ | महाराष्ट्राच्या सहकार चळवळीत मा. यशवंतराव चव्हाण यांचे योगदान एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव** | ९६-९८ |
| २० | सातारा जिल्ह्यातील क्रांतिवीरांगणांचे योगदान<br>**डॉ. निकम राजश्री दिलीप** | ९९-१०२ |
| २१ | भारतातील सहकारी पतपुरवठा चळवळीचा अभ्यास<br>**डॉ. प्रकाश कृष्णा टोणे**<br>**निलेशकुमार गुरव** | १०३-११० |
| २२ | महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची विकासात्मक भूमिका : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा<br>**राजेश मधुकर बाराते** | १११-११४ |

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २३ | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भटक्या विमुक्त जमातीचे साहित्यातून जीवन चित्रण : एक ऐतिहासिक अभ्यास<br>**डॉ. राजू लोखंडे** | ११५-११९ |
| २४ | माणदेशातील किल्ले : ऐतिहासिक अभ्यास<br>**डॉ. एस.एन. गायकवाड** | १२०-१२६ |
| २५ | स्वांतत्र्यपूर्व महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास<br>**प्रा. संदिप भैरू जाधव** | १२७-१३२ |
| २६ | शिवकालीन किल्ल्यावरील संरक्षण व जलव्यवस्थापन<br>**डॉ. बोडखे संजीव सुखलाल** | १३३-१३७ |
| २७ | महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान<br>**प्रा. डॉ. कदम संतोष तुकाराम** | १३८-१४२ |
| २८ | पर्यटन व्यवसायातील स्थित्यंतरे आणि कृषी-पर्यटन<br>**डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले** | १४३-१४७ |
| २९ | महाराष्ट्राचा ग्रामीण विकास आणि सहकारी चळवळ<br>**डॉ. विकास येलमार**<br>**डॉ. आर. बी. सातपुते** | १४८-१५१ |

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# १. पेशवेकालीन स्त्रीचा दर्जा : ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. अश्विनी रामचंद्र खवळे**
विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर.

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासूनच हिंदू संस्कृतीमध्ये स्त्रीयांना अत्यंत आदराचे स्थान दिले गेले आहे. अगदी वैदिकाळापासून ते महाकाव्य काळापर्यंत स्त्री शिक्षणाची पध्दत सुरु होती. वैदिक कालखंड तर स्त्रीच्या सर्वांगीण विकासाचा काळ समजला जातो. परंतु स्मृतिकाळापासून मात्र स्त्रीयांच्या स्थितीमध्ये बदल घडून आलेला दिसून येतो. स्मृतीकाळापासूनच स्त्रीयांचा उपनयन संस्कार बंद करण्यात आला आणि त्यांच्या स्वातंत्र्यावर अनेक जाचक बंधने लादण्यात आली. स्मृतीकाळापासूनच स्त्रीयांच्या स्थितीमध्ये सुरु झालेली घसरण काळानुरूप पेशवेकाळापर्यंत आपल्याला पहावयास मिळते.

कोणत्याही सभ्येतेचा आत्मा जाणून घेण्यासाठी त्याची श्रेष्ठता किंवा संस्कृती मोजण्यासाठी आपल्याला तेथील स्त्रीयांच्या स्थितीचा किंवा दशेचा अभ्यास करणे महत्वपुर्ण ठरते. मध्ययुगीन काळातील अभ्यास करत असताना आपण अनेक बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. मध्ययुगीन काळामध्ये झालेली परकीय आक्रमणे, सत्ता हस्तातरंण याचा त्या काळातील समाज जीवनावर परिणाम झालेला दिसून येतो. स्मृतीकारांनी स्त्रीयांना जो दर्जा ठरवून दिला होता तोच दर्जा थोडयाफार फरकाने याही काळामध्ये आपल्याला दिसून येतो. ती स्वावलंबी होऊ नये अशीच व्यवस्था मध्ययुगीन पुरुष प्रधान समाज व्यवस्थेत दिसून येते.

पेशवेकाळाचा अभ्यास करताना आपल्याला असे दिसते की, पेशवेकाळामध्ये स्त्रीयांच्या स्थितीमध्ये बदल करण्यासाठी कोणतेही प्रयत्न झाले नाही. उलट धर्मशास्त्र व स्मृतीग्रंथाचा आधार घेऊन स्त्रीयांवर अनेक कडक निर्बंध लादले गेले. स्त्रियांना शिक्षण घेण्यास बंदी, बालविवाह, बालजरठ विवाह, विधवा विवाहास बंदी, सती प्रथा, केशवपन, पडदापध्दत, बालिका हत्या, दासीप्रथा, बहुपत्नीत्व अशा अनिष्ठ चालीरिती पाळल्या जात होत्या. त्यामुळे पेशवेकाळातील स्त्रियांचे जीवन अधिक दु:खमय किंवा कष्टमय असल्याचे आपणास पहावयास मिळते.

**उद्देश**

पेशवे काळातील स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचा अभ्यास करणे, पेशवेकाळातील स्त्रियांच्या आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक, वैवाहिक, सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे हा माझ्या शोधनिंबधाचा मुख्य उद्देश आहे.

**पेशवेकाळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती**

मुलीचा जन्म ही भारतीय समाजामध्ये अशुभ घटना मानली जात होती. मुलीच्या जन्माचे कधीही खुल्या मनाने स्वागत केले जात नव्हते. स्त्री जातीबद्दल अनादर किंवा अविश्वास या भारतीय संस्कृतीतील हया भयानक गोष्टींना इतर कुठेही तोड सापडणे अशक्यच. पेशवेकाळामध्ये सुद्धा हया समजुती तशाच पक्कया होत्या याउलट मुलाच्या जन्माच्या वेळी मात्र पेशवेकाळामध्ये आनंदोत्सव साजरा केला जात होता. मुलाच्या जन्मानंतर दिमाखात सोहळा पार पाडताना अगदी हतीवरून साखर वाटल्याची ही उदाहरणे पेशवेकाळात असल्याची आपल्याला माहिती पहावयास मिळते. एकीकडे मुलीचा जन्म अपशकूनी मानला जात होता आणि दुसरीकडे मुलाच्या जन्माचे स्वागत केले जात होते. यावरून पेशवे काळातील सामाजिक विषमतेची स्थिती दिसून येते.

**पेशवेकालीन स्त्रियांचे शिक्षण**

स्मृतीकाळापासून स्त्रियांचा उपनयन संस्कार बंद करण्यात आला. मनुस्मृतीमध्ये म्हटले आहे की, विवाह हाच स्त्रीचा उपनयन संस्कार होय. आणि तेव्हापासून स्त्रियांच्या शिक्षणाचे दरवाजे बंद करण्यात आले आणि पेशवेकाळात सुद्धा यात काही फारसा बदल झालेला आपल्याला दिसून येत नाही. पेशवेकाळामध्ये राजघराण्यातील स्त्रियांना मात्र अक्षर ओळख होती. पेशवेकाळामध्ये पेशवे, शिंदे, होळकर, पटवर्धन, दाभाडे, गायकवाड यांच्यासारख्या प्रतिष्ठित घराण्यातील स्त्रियांना परपरांगत पध्दतीने शिक्षण मिळत होते.

आता 'वा.कृ. भावे' यांनी आपल्या "पेशवेकालीन महाराष्ट्र" या पुस्तकात पेशवेकाळातील स्त्रियांच्या शिक्षणाविषयी माहिती दिलेली आहे की, स्त्रिया पैलवानी वेशात कधी कधी पुरुषांची बरोबरी करीत तसेच युद्धकलेत सुद्धा त्या पारंगत होत्या. यशवंतराव होळकरांची कन्या भिमाबाई ही घोडयावर बसण्यात व भाला फेकण्यात फार पटाईत असून त्या नैपुण्याबद्दल तिची 'सर जॉन मालकम' यानेही शिफारस केली होती. 'बायजाबाई शिंदे' हिने एक स्त्रियांची पलटण उभी केली होती. अहिल्याबाई, उमाबाई (खंडेराव दाभाडेंची पत्नी), लक्ष्मीबाई व इतर स्त्रियांनी प्रशासन अथवा युद्धकलेत नाव मिळवले होते तसेच त्याकाळातील साक्षर ब्राम्हण महिलांचा मोठया प्रमाणावर सहभाग होता त्यात राधाबाई - बाळाजी विश्वनाथाची भार्या, काशीबाई - पहिल्या बाजीरावाची पत्नी, सगुणाबाई - बाजीरावाचा पुत्र जनार्दनपंत याची पत्नी, आनंदीबाई - राघोबादादाची पत्नी, भिऊबाई - बाळाजी विश्वनाथांची कन्या, गंगाबाई - सवाई माधवरावाची आई, भवानीबाई - चिमणाजी शंकर सचिव यांची पत्नी अर्थात ही उदाहरणे अपवादात्मक आहेत. बहूजन अथवा सामान्य वर्गातील स्त्री किंवा शुद्र जातीतील स्त्रियांना मात्र शिक्षणाचे दरवाजे बंद होते. खरे तर स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारणे हेच त्यांच्या अधोगतीचे मुख्य कारण ठरले होते. आणि पेशवेकाळसुद्धा त्यास अपवाद नव्हता.

**पेशवाकालीन स्त्रियांची वैवाहिक स्थिती**

हिंदू विवाह संस्था एक संस्कार मानला जातो. पेशव्यांच्या काळामध्ये आपल्याला अनेक प्रकारच्या विवाहविषयी माहीती मिळते. त्यामध्ये प्रामुख्याने बालविवाहाची प्रथा सर्वत्र रुढ होती. तसेच बाल-जरठ विवाह, राक्षस विवाह, विजोड विवाह, असूर विवाह, विधवाविवाह, बहुपत्नीत्व अशा अनेक प्रकारच्या विवाहाची उदाहरणे आपल्याला पेशवेकाळामध्ये पहावयास मिळतात. पेशव्यांमध्ये एकापेक्षा जास्त विवाह केल्या गेल्याची माहिती मिळते. सामाजातील सर्व थरातील लोक यात सामील होती. तसेच हुंडा, सोडचिठ्ठी, जातीय बंधने सुद्धा समाविष्ट होती.

पेशवेकाळमध्ये आपल्याला असे दिसून येते की, याकाळामध्ये बालविवाहाची प्रथा सर्वमान्य होती. अशा प्रकारच्या विवाहामध्ये मुलीचे सरासरी वय जास्तीत जास्त ८ किंवा ९ वर्षाचे असायचे व मुलाचे वय १२/१३ वर्षाचे असायचे. मुलीचे जर ८ व्या वर्षात लग्न झाले नाही तर अधर्म समजला जात होता. किंवा तो थट्टेचा विषय बनत होता. पेशवेकाळामध्ये बालविवाहाचे प्रमाण जास्त होते. यामुळे त्याचे फायदे कमी तोटेच जास्त झाल्याचे दिसून येतात. पेशवेकाळाचा अभ्यास करताना आपल्याला असे दिसून येते की, याकाळात अनेक युद्धे होत होती आणि याचा परिणाम म्हणजे युद्धात जर पती मारला गेला तर त्या बालवधूला वैधव्य प्राप्त होत असे. किंवा पती आजारी पडून त्याचा मृत्यू झाला तर पती निधनानंतर तिच्याजवळ दोनच पर्याय असत  यापैकी एक म्हणजे सती जाणे किंवा जीवंतपणी विधवेचे आयुष्य जगताना मरणयातना भोगणे त्यामुळे बरेचदा अनेक स्त्रिया जीवंतपणी नरकयातना भोगण्यापेक्षा सती जाणे पसंत करत होत्या. इतकी दयनीय अवस्था आपल्याला पेशवेकाळामध्ये स्त्रीयांची झालेली पहावयास मिळते. लहान वयात लग्न आणि लहान वयातच वैधव्य आल्यास पुर्नविवाह करण्याची परवानगी क्वचितच अपवादात्मक असेल.

**विधवाविवाह किंवा विधवेचे सामाजातील स्थान**

पेशवे काळामधील विधवांची स्थिती किंवा विधवा पुर्नविवाहाची माहिती घेत असताना आपल्याला असे दिसून येते की, पेशवेकाळात उच्चवर्णीय ब्राम्हण समाज व ९६ कुळी मराठा समाजात विधवांच्या पुर्नविवाहास परवानगी नव्हती. स्मृतीकारकांनी स्त्रियावर अनेक बंधने लादली आहेत. त्यापैकी एक विधवांच्या पुर्नविवाहास परवानगी नाकारली गेली. त्यामुळे पुन्हा नव्याने संसार करण्याची संधी त्यांना मिळत नव्हती. आणि लहान वयातच जर वैधव्य प्राप्त झाले असेल तर त्या विधवेला संपुर्ण आयुष्य दु:खी, कष्टी, अपमानित तसेच संघर्षमय खडतर पद्धतीने जगण्यास भाग पाडले जात होते. शुद्र किंवा हलक्या जातीत जन्माला आलेल्या स्त्रियांना किंवा विधवांना पुर्नविवाहाची परवानगी होती. परंतु त्याकाळातील बहुसंख्य समाज उच्चवर्णीय समाजाचेच अनुकरण करीत होता.

यासंदर्भात आपणास 'डॉ. पी. ए. गवळी' यांनी "पेशवेकालीन महाराष्ट्र" या पुस्तकात म्हटले आहे की, पेशवेकाळामध्ये विधवा विवाहास दोन संदर्भ प्राप्त झालेले आहे. पहिला संदर्भ जो आहे तो ब्राम्हण

जातीपुरताच मर्यादीत होता व दुसरा संदर्भ ब्राम्हणेत्तर जातीशी संबधित होता. विधवांचा पुर्नविवाह हा ब्राम्हण जातीत निषिद्ध मानला जात होता. उदाहरणासाठी परशुराम भाऊ यांच्या मोठया मुलीचे लग्न सातव्या वर्षी झाले होते. परंतु दुर्देवाने चौथ्या रात्रीच तिच्या पतीचा मृत्यू झाला. त्यामुळे बयाबाईला आयुष्यभर विधवेचे आयुष्य जगावे लागले.

ब्राम्हणेत्तर समाजामध्ये मात्र विधवांच्या पुर्नविवाहाची प्रथा होती. त्याचे २ प्रकार होते १-पाट व २-मुहुर्त यापैकी पाठ हा प्रकार सर्रास रुढ होता या प्रकारात फक्त पुरुषच नाही तर स्त्रीसुद्धा दुसरे लग्न करु शकत होती. "निबांजी वल्लद येसू झगडा सिन्नरकर याने धोडंजी माळी सिन्नरकर याच्या बायकोशी पाट लाविला. धोंडजी मजकूर विदेशात गेला म्हणून बापुजी माळी निंबाजी मजकूर याने धाडजी मजकूर मेला अगर जिवंत आहे अशी तहकीकत न करीत पाठ लाविला.

पेशवेकाळामध्ये वैधव्यास दैवी आपत्ती समजून विधवेने व्रतस्थ किंवा सन्यांशी जीवन जगावे अशी धारणा होती. पेशवेकाळात विधवेचे आयुष्य अतिशय खडतर होते. समाजात तिला गौण स्थान दिले गेले होते. तिला शुभकार्यात किंवा लग्नसंमारभांत सहभाग घेता येत नसे. तिला पांढरी साडी नेसणे, कोणताही अलंकार न वापरणे, केशवपन करणे अशी अनेक बंधने पाळावी लागत होती. संपुर्ण आयुष्य व्रतवैकल्ये, पुजापाठ करण्यात घालवावे असे तिच्या मनावर बिबंवण्यात येत होते. धर्माच्या किंवा शास्त्राच्या नावाखाली तिचे माणूस म्हणून मिळणारे स्वातंत्र्य नाकारले गेले होते.

**केशवपन**

हिंदु संस्कृतीमध्ये पतीच्या मृत्युनंतर विधवा स्त्रीने केशवपन करावे अशी प्रथा होती. हया प्रथेचा इ.स.१० व्या शतकानंतर झपाटयाने प्रसार झालेला दिसून येतो. महाराष्ट्रातसुद्धा प्रामुख्याने ब्राम्हण समाजाने विधवा स्त्रीयांचे केशवपन किंवा मुंडण करण्याची अघोरी प्रथा होती. केशवपन प्रथेचा मुख्य उद्देश विधवा झालेली स्त्री कुरुप दिसावी हा होता. ती सुद्धा लोकांच्या समोर यायला लाजत असत. तरुण स्त्रियांना तर केशवपन करण्यासाठी न्हाव्यासमोर बसण्याच्या विचाराने सुद्धा अंगावर काटा येत होता. आधीच पती निधनाचे दु:ख त्यात या प्रथेमुळे दु:खात भरच पडत होती. यासाठी स्त्रिया नवरा कितीही निर्दयी, जुलमी असला तरी त्याच्या जीवनासाठी देवाजवळ नवस करीत होत्या.

यापैकी काही स्त्रिया जबरदस्तीने लादल्या गेलेल्या संन्यासाला कंटाळून किंवा नटण्यामुरडण्याची हौस पुर्ण न झाल्यामुळे वाममर्गाला जात असत. उदाहरण दयायचे झाल्यास राजारामभट बिन सदाशिवभट हा ब्राम्हण पुणेतांबी येथील रहिवासी होता. त्याचा मृत्यू झाला त्याच्या मृत्युनंतर त्याची पत्नी जान्हवीबाई हीचे क्षौर करण्यात आले. पुढे ती अंताजी मुंकद गोळक राजेवाडीकर यांच्याजवळ रहायला लागली. दोघामध्ये प्रेमसंबध निर्माण झाले त्यानंतर तिला केस वाढवणे किंवा कांकणे घालण्याची आवड निर्माण झाली. तिला गोळकापासून पुत्रसुद्धा झाला. तो सात-आठ वर्षाचा झाल्यानंतर ही गोष्ट सरकारला समजली त्यांनी जान्हवी व तिचा मुलगा यांना किल्ले पुरदंरमध्ये अटकेत ठेवण्यात आले व त्यांना सक्तमुजुरीची

शिक्षा ही झाली. यावरुनच आपल्या लक्षात येते की, पेशवेकाळामध्ये स्त्रियांवर किती जाचक बंधने लादण्यात आली होती.

**बहुपत्नीत्वाची प्रथा**

पेशवेकाळामध्ये बहुपत्नीत्वाची प्रथा अस्तित्वात होती आणि हे सुद्धा एक प्रतिष्ठेचे लक्षण समजले जात होते. या प्रथेप्रमाणे पुरुष कितीही वेळा व कोणत्याही वयात लग्न करू शकत होता. ह्या प्रथेला धर्माचा आधार दिला गेला तसेच समाजाने सुद्धा मान्य केल्यामुळे आपल्याला दिसून येते की, सरकार दरबारी प्रतिष्ठीत अशी असामी तसेच राजे, छत्रपती, पेशवे व त्यांचे सरदार यांनी एका पेक्षा जास्त विवाह केल्याची माहिती आपल्याला मिळते. स्वतः पेशवे व त्यांचे नातेवाईक यांच्या कमीत कमी दोन बायका व त्याहून अधिक बायका होत्या.

छत्रपती शाहू महाराज यांच्या ४ पत्नी होत्या, चिमणाजी बल्लाळ यांना २ पत्नी, बालाजी बाजीराव(नानासाहेब) यांना ९ पत्नी होत्या, रघुनाथराव यांना ६, नाना फडनवीस ६, सदाशिवराव(भाऊसाहेब) २, नारायणराव २, सवाई माधवराव यांना २, दुसरा बाजीराव यांना ११, महादजी शिंदे यांना ९ पत्नी होत्या. एवढेच नाही एका ठिकाणी तपशील आहे - "आमचे धन्यास १६० बायका होत्या त्या चौघी खाशा, गोविंदराव गायकवाड यांनी बायका दहोबस्त काढून दिल्या आणि आमची चौघींची हि गते केली."

**स्त्रियांचा कौटुंबिक मालमत्तेसंबंधीचा हक्क**

पेशवेकाळातील तत्कालीन कागदपत्रांतून असे दिसून येते की, स्त्रिया समाजामध्ये दुर्लक्षित घटक होत्या तसेच त्यांना दुय्यम स्थान दिले गेले होते. स्त्रीला आपल्या वडिलांच्या मालमत्तेत कोणताही हक्क दिला गेला नव्हता. जरी तिला भाऊ नसला तरीसुद्धा लग्नकार्याच्या खर्चामुळे ती वडिलांच्या संपत्तीची वारस ठरू शकत नव्हती. तिच्या नवऱ्याच्या मालमत्तेत मात्र तिला अधिकार मिळाला होता परंतु तो मर्यादित स्वरूपाचा होता त्याच्यामध्येही काही अटी होत्या. जसे की नवऱ्याचा मृत्यू झाला असेल, त्याला कोणी वारस नसेल किंवा तो विभक्त राहत असेल तर मात्र त्याच्या पत्नीला मालमत्तेसंबंधीचे हक्क मिळत होते. पती जर मूल बाळ असताना मरण पावला तर त्याच्या जंगम मालमत्तेतील दोन तृतीयांश किंवा अर्धा हिस्सा सरकारला दिला जात होता. एकत्र कुटुंब पद्धती मध्ये आपल्याला असे दिसून येते की, विधवेला फक्त उदरनिर्वाह पुरते धन दिले जात होते मात्र तिला मालमत्तेची वाटणी दिली जात नव्हती. एकत्र कुटुंबातील विधवेला पोटगीचा अधिकार दिला गेला होता. अशा प्रकारे पेशवे काळामध्ये स्त्रियांचे मालमत्तेसंबंधी चे अधिकार नसल्याप्रमाणेच होते.

**समाजात निकृष्ट स्थान असलेला स्त्री वर्ग**

पेशवे काळामध्ये गणिकांचा ही वर्ग अस्तित्वात होता. महाराष्ट्रामध्ये रखेल यांना रक्षा, उपस्त्री, अंगवस्त्र, नाटकशाळा अशी अनेक नावे देण्यात आली होती. या काळातील राज्यकर्ते, सरदार, देशमुख, वतनदार, यांचे जनानखाने होते. यापैकी काही गणिका राज्यकर्त्यांच्या किंवा सरदारांच्या जनानखान्यात

प्रवेश मिळवून आपले स्थान बळकट करीत व काही जणी तमाशासारखे कार्यक्रम करून लोकांचे मनोरंजन करीत असत.

तसेच पेशवेकाळात मुरळी यांचे सुद्धा अस्तित्व होते. ज्यांना मूल होत नाही ते यासाठी देवाजवळ नवस करत असत की, पहिले मूल झाले की तुला वाहीन. अशाप्रकारे मुलगी झाल्या नंतर तिला मुरळी म्हणून सोडली जाई. पण त्यांची ही स्थिती फारशी चांगली नव्हती. ह्या मुरळ्या खंडोबा देवाशी सलंग्न होत्या.

तसेच पेशवे काळामध्ये गुलामगिरी पद्धत अस्तित्वात होती व गुलाम स्त्रियांना या काळात कुणबीनी म्हटले जात होते. तसेच बटीक म्हणजे वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया होत्या. ह्या कुणबिनीना किंवा बटकीनीना घरकाम, शेतीकाम त्याचबरोबर मालकाची शय्यासोबत करावी लागत होती. या काळात गुलाम स्त्रीयांचा कुणबीनी वर्गात जास्त प्रमाणात भरणा होता. त्यांना उपभोग्य वस्तू प्रमाणे पाहिले जात होते. कुणबीनी बाळगणे ही तत्कालीन समाजाची लोकप्रिय पद्धत समजली जात होती.

युद्धात पराभूत झाल्यास, कर्ज बाजारातून, दुष्काळामुळे, व्यभिचारामुळे, बक्षिस देण्याची पद्धत, शारीरिक व्यंग, फूस लावण्याने कुणबीनी बटकिनी तयार होत होत्या. वेळप्रसंगी कुणबिनीना तारण ठेवून कर्ज घेतले जात होते. यावरून आपल्या लक्षात येते की पेशवेकाळातील स्त्रियांचा दर्जा किती खालावलेला होता.

**निष्कर्ष**

पेशवे काळातील स्त्रीयांच्या विषयीचा अभ्यास करत असताना आपल्याला त्यांच्या अनेक पैलूंचा अभ्यास करणे गरजेचे आहे. यामध्ये आपल्याला नमूद करावे लागेल की, पेशवे काळामध्ये स्त्रियांच्या स्थितीमध्ये कमालीची घसरण झाल्याचे दिसून येते. याची अनेक कारणे आपण पाहिली आहेत. धर्मशास्त्राचा किंवा स्मृतीग्रंथांचा आधार घेऊन त्याचे काटेकोर पालन करणाऱ्या पेशवे काळातील समाजात स्त्रियांना मात्र जाचक अटी लादून बंधनात ठेवण्यात आले होते.

बालविवाह, वैधव्य, बहुपत्नीत्व, पुनर्विवाहास बंदी, स्त्रीशिक्षणास बंदी, मालमत्तेवरील अल्प अधिकार, सतीप्रथा, केशवपन, बालिका हत्या अशा अनेक कुरीती या काळात असल्याचे आपल्याला पहावयास मिळते. स्त्रियांच्यावर या काळात अनेक अत्याचार झालेले दिसून येतात. स्त्रियांकडे उपभोग्य वस्तू म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. अशा प्रकारे पेशवे काळात स्त्रियांच्या स्थितीमध्ये कमालीची घसरण झाल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची**

१. डॉ.सरदेसाई बी.एन, मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. प्रथमावृत्ती २००१, पृष्ठ क्र.५६.

२. डॉ.गवळी पी. ए. पेशवेकालीन महाराष्ट्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती २०००, पृष्ठ क्र.८९.

३. भावे वा. कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. दुसरी आवृत्ती १९९८, पृष्ठ क्र.७४.

४. प्रा. सावंत बी.एस., प्रा.जाधव, मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक विकास. पृष्ठ क्र.१६३.

५. भावे वा. कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. दुसरी आवृत्ती १९९८, पृष्ठ क्र.२३०.

६. डॉ. गवळी पी. ए. पेशवेकालीन महाराष्ट्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती २०००, पृष्ठ क्र.९६.

७. भावे वा. कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे. दुसरी आवृत्ती १९९८, पृष्ठ क्र.२३९.

८. डॉ. गवळी पी. ए. पेशवेकालीन महाराष्ट्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती २०००, पृष्ठ क्र.९५

९. प्रा. सावंत बी.एस., प्रा.जाधव, मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक विकास. पृष्ठ क्र.१६५.

१०. डॉ. गवळी पी. ए. पेशवेकालीन महाराष्ट्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती २०००, पृष्ठ क्र. १०६.

११. डॉ.गवळी पी. ए. पेशवेकालीन महाराष्ट्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती २०००, पृष्ठ क्र.१०७.

१२. प्रा. मार्डीकर मदन, भारताचा इतिहास व संस्कृती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद. १९९७. पृष्ठ.क्र.३३८.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# २. हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन संस्थेचे पुणे जिल्ह्यातील कार्य

**प्रा. बोत्रे अमोल पोपट**
पदमश्री मणिभाई देसाई, महाविद्यालय, उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे.

## १. पार्श्वभूमी

१९६५-६६ च्या सुमारास तात्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी हरितक्रांतीची घोषणा केली. वसंतराव नाईक व यशवंतराव चव्हाण यांची यवत परिसरात द्राक्षाची बाग होती. बागेला भेट देण्यासाठी हे दोघे ही उरूळी कांचन परिसरात येत असत. त्यामुळे वसंतराव नाईक व यशवंतराव चव्हाण आणि मणिभाई देसाई यांचे जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झाले होते.[१] मणिभाई देसाईंनी सर्व हवेली तालुका हिरवागार करण्याचा प्रस्ताव मांडला. मुख्यमंत्र्यांनी या प्रस्तावाला तात्काळ संमती दर्शविली. मी तुम्हाला मदत करण्यास तयार आहे. हे आश्वासन मिळाल्यानंतर मणिभाई देसाईंनी 'हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन'ची योजना हाती घेतली. मामलेदार कचेरीच्या माध्यमातून कर्ज घेतले होते. यावेळी संपूर्ण हवेली तालुका रखरखीत व उजाड होता. योजना यशस्वी करण्यासाठी मणिभाई देसाईंनी प्रत्येक शेतकऱ्याचे कर्ज प्रकरण तयार करून 'बँक ऑफ इंडिया'कडे सादर केले; पण कर्ज घेणारा आणि कर्जाला जामीनदार असणारा शेतकरी दोघेही उजाड व रखरखीत परिसरातील असल्यामुळे बँकेने कर्ज देण्यास नकार दिला. मणिभाई देसाईं समोर कर्जाचा यक्ष प्रश्न उभा राहिला. या कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी त्यांनी तात्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची भेट घेतली. 'हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन'साठी सक्षम जामीनदार मिळवून देण्याची विनंती केली. वसंतराव नाईक यांनी मणिभाईंना काही दिवस विचार करण्यासाठी मागितले. मणिभाईंच्या आग्रहाखातर वसंतराव नाईक यांनी या हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशनसाठी 'महाराष्ट्र शासन' जामीनदार राहील असे सांगितले. कर्ज मंजूर होईपर्यंत मणिभाईंनी ३२ गावांसाठी ४२ पाणीपुरवठा योजनांचा आराखडा तयार केला.[२] पाणी पुरवठा योजनेसाठी जागा निश्चित करण्यात आल्या. नदीकाठचा सर्व शेतीचा परिसर हिरवागार करण्याची योजना तयार झाली.

## २. स्थापना

'हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन'ची स्थापना इ.स.१९६७ च्या सुमारास वसंतराव नाईक, यशवंतराव चव्हाण, मणिभाई देसाई आणि तात्कालीन हवेलीचे आमदार अण्णासाहेब मगर यांच्या प्रयत्नातून झाली. या योजनेसाठी मणिभाईंना अण्णासाहेब मगर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.[३] त्यांनाच मणिभाईंनी चेअरमनपद स्वीकारण्याची विनंती केली. या फेडरेशनचे मुख्य कार्यालय सुरुवातीस उरुळी कांचन या ठिकाणी होते. कालांतराने हे कार्यालय पुणे (कोरेगाव पार्क) याठिकाणी स्थलांतरित झाले. काही दिवसानंतर हे कार्यालय स्वारगेट याठिकाणी स्थलांतरित झाले. ही संस्था स्थापन झाल्यानंतर हवेली तालुक्यातील प्रत्येक गावातील तरुणांनी ग्रामविकासासाठी झोकून देऊन काम केले.

**३. उद्देश**

१. हवेली तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना हक्काचे पाणी उपलब्ध करून देणे.
२. हवेली तालुक्याचा परिसर 'सुजलम् सुफलम्' करणे.
३. हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभा करणे.
४. हवेली तालुक्यातील पावसावर अवलंबून असणारी शेती बारमाही करणे.
५. यशवंत सहकारी साखर कारखान्यासाठी ऊसाचे क्षेत्र वाढवणे.

**४. संचालक मंडळ**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. मार्तंड धोंडो तथा अण्णासाहेब मगर | - | चेअरमन |
| २. | मा. श्री. मणिभाई भीमभाई देसाई | - | व्यवस्थापक |
| ३. | मा. श्री. विठ्ठलराव विष्णुजी सातव | - | खजिनदार |
| ४. | मा. श्री. दत्तात्रय रामभाऊ खांदवे | - | संचाल |
| ५. | मा. श्री. सादबा कोंडीबा काटे | - | संचालक |

या संचालक मंडळाच्या माध्यमातून 'हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन' ही योजना कार्यान्वित झाली.[४] ही योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी फिल्ड अधिकारी म्हणून शिवाजीराव शितोळे काम पाहत होते. त्यांना सहकार्य करण्यासाठी संशोधन अधिकारी म्हणून पवार तर शेतकी अधिकारी म्हणून गायकवाड काम पाहत होते.

**५. कार्यक्षेत्र**

या संस्थेचे कार्यक्षेत्र मुळा-मुठा, भीमा, भामा, इंद्रायणी आणि पवना नदीच्या परिसरात पसरलेले होते. 'हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन' ही योजना खामगाव टेक, हिंगणगाव, भवरापूर, अष्टापूर, कोरेगाव मूळ, नायगाव, कोलवडी, थेऊर, मांजरी, आव्हाळवाडी, साष्ट, लोहगाव, सांगवी-सांडस, नाव्ही-सांडस, डोंगरगाव, बुरकेगाव, किवळ, रावेत पुनावळ, रावेत म्हसोबा, मिरवडी, खेड शिवापूर, राहटणी, साठे पिंपळे, फुलगाव आपटी यासारख्या ३२ गावांमध्ये ४२ योजनांचा आराखडा बनविण्यात आला; पण प्रत्यक्षात मात्र जवळ-पास २५ योजना कार्यान्वित झाल्याचे दिसते.[५]

**६. योजनेची अंमलबजावणी**

'हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन' योजना यशस्वी करण्यासाठी सिमेंट पाईप लाईनची आवश्यकता होती. ही गरज पूर्ण करण्यासाठी मणिभाई देसाईंनी आस-पासच्या परिसरात पाईपची चौकशी केली. सांगलीच्या 'इगल स्पन पाईप' कंपनीचे नाव सुचविण्यात आले; परंतू पाईप विकत घेऊन पाईपलाईनचे काम पूर्ण करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात वेळ व पैसा लागणार होता. त्यामुळे मणिभाईंनी विकत घेण्याऐवजी स्वतः पाईप कंपनी सुरू करण्याचा विचार मांडला. या कंपनीत पाईप तयार करण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान

मिळवण्यासाठी त्यांनी योजनेचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक गावातील काही निवडक १६ लोक एकत्र करून त्यांना गुजरातमधील 'अंकलेश्वर' या ठिकाणी पाठवले. १६ लोकांना योग्य प्रकारचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या सहकाऱ्यांने 'मेघदूत' कारखान्यात एक वर्ष सिमेंट पाईप तयार केले. पाईपनिर्मितीचे प्रशिक्षण घेण्यासाठी 'अंकलेश्वर' या ठिकाणी गेलेल्या लोकांमध्ये प्रेमजी बाजीराव थोरात, सुरेश यशवंत काळे, परशुराम गेनबा थोरात, दशरथ हरिभाऊ टिळेकर, चंद्रकांत सीनाभाऊ टिळेकर, हरिभाऊ ढवळे, यादव शिंदे, निवृत्ती शितोळे यांचा समावेश होता. या लोकानां लोकानां एक महिन्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणा दरम्यान मणिभाई देसाई स्वतः या लोकांना भेटण्यासाठी गुजरातमधील 'अंकलेश्वर' या ठिकाणी गेले होते. मणिभाईंनी लोकांना प्रोत्साहन देऊन उरुळी कांचनमध्ये 'मेघदूत' नावाची पाईप कंपनी सुरू करण्याची घोषणा केली.[६] या कंपनीमध्ये ९ इंचापासून ते २४ इंचापर्यंत रुंदी असणारे पाईप तयार करण्यात येत होते. योजनेसाठी निवडलेल्या गावांमधील नदीच्या किनारी नदीच्या पातळीपासून ४०-५० फुट खोल अशा ठिकाणी मोटार बसविण्यासाठी जॅकवेल बसविण्यात आले होते. ४० एच.पी.च्या किर्लोस्कर कंपनीच्या मोटारी बसविण्यात आल्या होत्या. तांत्रिक दुरुस्तीच्या काळात कोणतीही पाणीपुरवठा योजना बंद राहू नये म्हणून प्रत्येक ठिकाणी एक आगाऊ मोटार ठेवण्यात आली होती. मोटारीचे वॉल सात इंची, पुढे दहा इंची अशापद्धतीने २०-२५ फुट नदीमध्ये होते. नदीमध्ये पाणी उपशासाठी एक विहीर खोदण्यात येऊन तिचे पक्के दगडी बांधकाम केलेले होते. विहिरीत एक पाईपच्या साह्याने पाणी सोडले जात असे, त्याठिकाणी त्याठिकाणी एक जॅकवेल तयार करण्यात आला होता. प्रत्येक पाणी पुरवठा योजनेसाठी २०० एच.पी.चा स्वतंत्र ट्रान्सफार्मर होता. मोटर चालू करण्यासाठी विहिरीपासून १०० फुटावर ऑईल स्टार्टर बसविण्यात आला होता.[७] मोटार चालू करण्यासाठी प्रत्येक योजनेसाठी एक स्वतंत्र ऑपरेटर नेमण्यात आला होता. तो सर्व दुरुस्तीचे काम पाहत असत. मोटारीच्या साह्याने सिमेंट पाईपद्वारे पाणी गावातील उंच ठिकाणी नेले जात असे व नंतर हे पाणी पाट पाट चारीच्या माध्यमातून शेतापर्यंत नेले जात असत. या योजनेच्या सर्व पाईपलाईनचे काम कंत्राटदार एन.के.जगताप यांनी पूर्ण केले होते. मणिभाईंनी ही पाणीपुरवठा योजना यशस्वी करण्यासाठी नाव्ही सांडस या ठिकाणी सेमिनार घेतले होते. शेतकऱ्यांना पाणी व्यवस्थित मिळावे यासाठी प्रत्येक गावात पाटकरी नेमले हे पाटकरी संपूर्ण परिसरातील शेतीची मोजणी करत. शेतीमध्ये असणाऱ्या पिकांचे स्वरूप पाहत असत. त्यानुसार प्रत्येक सभासद शेतकऱ्याला योग्य वेळी योजनेचे पाणी उपलब्ध करून देत असत. या पाटकऱ्याला निश्चित अशा स्वरूपाचे वेतन दिले जात. पाणीपट्टी आकारणी ही एकरानुसार केली जात होती. सरासरी ज्वारी या पिकांसाठी ६० रूपये, हरभरा पिकासाठी ६० रुपये, गहू पीकासाठी १५० रुपये, कांदा व मिरची पिकासाठी ३०० रूपये, ऊसासाठी १००० रूपये तेवढी पाणीपट्टी आकारली जात होती.[८] पाणीपट्टी न भरणाऱ्या शेतकऱ्यांना दंड केला जात असत. प्रसंगी त्यांना दिले जाणारे पाणी ही बंद केले जात होते. पाणीपट्टी भरल्यानंतर प्रत्येक शेतकऱ्याला त्याची पावती दिली जात होती. पाणीपट्टीच्या माध्यमातून जमा झालेल्या पैशाचा उपयोग पाटकरी व मशीन ऑपरेटरचा पगार, मोटारीचे वीजबिल देण्यासाठी तसेच योजना सुरू असताना येणाऱ्या देखभालीसाठी केला जात होता. ही योजना साधारणपणे २०-२५ वर्षापर्यंत सुरु राहिली. जवळ-पास ६५०० हेक्टर क्षेत्र या योजनेमुळे ओलिताखाली आले.

**७. योजना बंद पडण्याची कारणे**

१. काही शेतकऱ्यांनी कर्जाचे हप्ते भरले नाहीत;

२. सुरुवातीच्या काळामध्ये योजनेसाठी घेतलेल्या वस्तू कालांतराने नादुरुस्त होऊ लागल्या. या

३. मिशनरीचे सुट्टे भाग बाजारात उपलब्ध होत नव्हते. या मिशनरीचे ज्ञान असणारी व्यक्ती सहज उपलब्ध होत नव्हती.

४. सुरुवातीच्या काळामध्ये येणारे ६६० वीजबिल कालांतराने ६६६० रुपयापर्यंत वाढत गेले.

५. गावातील काही शेतकऱ्यांनी स्वतंत्र 'पाणी उपसा योजना' सुरू केल्या. त्यामुळे सभासदांची संख्या दिवसें-दिवस कमी होत गेली.

६. ज्या गावातील पाणी पुरवठा योजना सुरू झालेल्या नव्हत्या, अशा शेतकऱ्यांनी कर्ज भरण्यास नकार दिला.

**८. शरद पवारांची भूमिका**

काही शेतकऱ्यांनी एकत्र येऊन बाबा आढाव व शांताराम दिवेकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन उभे केले. हवेली मामलेदार कचेरी, पंचायत समिती, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे नेण्यात आले. हवेली तालुक्यातील लिफ्टग्रस्त शेतकऱ्यांच्या आंदोलनाची बातमी शरद पवार यांच्यापर्यंत पोहचली. मुख्यमंत्री शरद पवार पुणे दौऱ्यावर असताना त्यांनी पुण्याच्या कौन्सिल हॉलवर लिफ्टग्रस्त शेतकऱ्यांची बैठक बोलावली. सर्व शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. इ.स.१९८४-८५ साली शरद पवारांनी लिफ्टग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचे आश्वासन दिले. त्यानुसार सत्य परिस्थिती जाणून घेऊन महाराष्ट्रातील सर्व पाणीपुरवठा योजनांसाठी देण्यात आलेले जवळ-पास ३२० कोटी रुपये कर्ज माफ केले. ही कर्जमाफी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठीची पहिली कर्जमाफी होती असे मत लिफ्टग्रस्त शेतकरी प्रेमजी थोरात यांनी मांडले. [९]

**९. हवेली तालुक्याच्या विकासावर झालेला परिणाम**

१. गावाच्या शेजारून वाहणाऱ्या नदीतून आपणही पाणी शेतीसाठी उचलू शकतो हा आत्मविश्वास शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला.

२. या पाणीपुरवठा संस्थेच्या कार्यामुळे हवेली तालुका परिसरातील जे क्षेत्र जिरायती होते ते क्षेत्र बागायती झाले. या संस्थेच्या स्थापनेमुळे जवळ-पास ६५०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले.

३. ज्या शेतामध्ये केवळ पावसाच्या पाण्यावर ज्वारी, बाजरी, कडधान्ये अशी पावसाळी पिके घेतली. जात होती, त्या शेतामध्ये भाजीपाला, ऊस, गहू, फळे, कांदा व इतर अन्नधान्य अशी नगदी पिके घेण्यास सुरुवात झाली.

४. शेतकऱ्याला आर्थिक संपन्नता प्राप्त झाली. जो शेतकरी नैसर्गिक संकटांमुळे खचून गेलेला होता, त्या शेतकऱ्याला मणिभाईनी स्वतःच्या पायावर उभे केले.

५. ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले. त्यामुळे १९६६ मणिभाई देसाई आणि अण्णासाहेब मगर यांनी शेतकऱ्यांसाठी 'यशवंत सहकारी साखर कारखाना' स्थापन केला. या कारखान्याच्या माध्यमातून कृषी विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली.

६. आर्थिक संपन्नता आल्यामुळे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या दिवसें-दिवस वाढत गेली. राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन चांगला बनला. लोकांची बौद्धिक क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. मुळे अंजली, माणूस उभा केला, डायमंड प्रकाशन, पुणे, २०१०.

२. काळभोर सीमा, कर्मयोगी अण्णासाहेब मगर, प्रथमावृत्ती, अमेय प्रकाशन, पुणे, २०१६.

३. शिंदे ज्ञानेश्वर गणपत यांची मुलाखत, नाव्ही-सांडस, १४ मार्च २०२०.

४. मांगूरकर बाळकृष्ण, मांगूरकर सुनिता, दूधगंगेचा भगीरथ मणिभाई देसाई, अमेय प्रकाशन, पुणे, १९९४.

५. खिरे अरविंद, धवलक्रांतीचे अग्रणी डॉ.मणिभाई देसाई, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०२०.

६. थोरात प्रेमजी यांची मुलाखत, खामगाव टेक, ११ मार्च २०२०.

७. प्रत्यक्ष पाहणी, हवेली तालुका लिफ्ट एरीकेशन प्लांट, खामगाव टेक, नाव्ही-सांडस, १४ मार्च २०२०.

८. शितोळे उद्धव यांची मुलाखत, नाव्ही-सांडस, १४ मार्च २०२०.

९. लोले राजाराम यांची मुलाखत, सांगवी-सांडस, १४ मार्च २०२०.

१०. कोतवाल श्रीहरी सोपान यांची मुलाखत, अष्टापूर, १८ मार्च २०२०.

# ३. पर्यटनाचे बदलते स्वरूप किल्ले सिंधुदुर्ग : एक अभ्यास

**प्रा. एस. टी. साळुंखे**
**डॉ. दिपक शंकरराव जाधव**
मंगलताई रामचंद्र जगताप महिला लाल बहादुर शास्त्री कॉलेज ऑफ महाविद्यालय, आर्टस् सायन्स अ‍ॅन्ड कॉमर्स, महाविद्यालय, उंब्रज, जि. सातारा.

**प्रस्तावना**

पर्यटन म्हणजे प्रवास. पण प्रवास आणि पर्यटन या दोन संज्ञामधील हेतूमुळे यामध्ये फरक जाणवतो. प्रवास म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी काही कारणास्तव जाणे. पण पर्यटन म्हणजे ऐतिहासिक, भौगोलिक, नैसर्गिक, सांस्कृतिक, कलात्मक स्थळांना भेट देणे. ही भेट एक तर मनोरंजन, ज्ञानार्जन किंवा हौस म्हणून असते. पर्यटन म्हणजे एक तर सहल असते किंवा सफर असते. कामाच्या व्यापामुळे निर्माण झालेला थकवा घालवण्यासाठी, मनावरचे दडपण दूर करण्यासाठी प्रवास करून कोठेतरी जावून यायचे असते. मनोरंजन व विश्रांती हा मूळ हेतू पर्यटनाच्या पाठिशी असतो. पर्यटन ही आजकाल केवळ हौस राहिली नसून विकासाच्या वाटचालीतील ते एक महत्वाचे अंग बनले आहे. पर्यटन हा आधुनिक आणि अतिशय वेगाने विकसित होणारा मानवाचा आर्थिक व्यवसाय आहे. जगातील काही देशांची अर्थव्यवस्था पर्यटन उदयोगावर अवलंबून आहे. पर्यटनाचे आर्थिक महत्व लक्षात घेवून प्रत्येक देश या व्यवसायाच्या साधनसामग्री व मुलभूत सोयीसुविधांचा विकास करीत आहेत.

सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय समृध्द आणि ऐतिहासिक दृष्टया संपन्न असा जिल्हा असून या जिल्हयातील मालवणच्या किलयाने पर्यटनाच्या दृष्टीने आपला विकास साधण्याचा प्रयत्न ब्रिटीशपूर्व कालखंडापासून केल्याचे दिसून येते. सिंधुदुर्गाचा किल्ला हा पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय समृध्द असून तो नेहमी देश विदेशातील पर्यटकांना आकर्षित करत असतो.

**पर्यटनाचे बदलते स्वरूप**

पर्यटन हा मानवी जीवनाचा स्थायीभाव असून नवाश्मयुगामध्ये आपल्याला पर्यारवणाचे व पर्यटनाचे अनेक पुरावे सापडतात. 'धान्याचे अतिरिक्त उत्पादन झाल्यामुळे मानवाला रिकामा वेळ मिळू लागला.'[१] परिणामी उरलेल्या वेळामध्ये मानव भटकंती करू लागला. अतिरिक्त उत्पादन, संपत्ती, रिकामा वेळ याचा परिणाम पर्यटनात झाल्याचे दिसते. इ.स. ६ व्या शतकातील नाण्याच्या शोधाने तर पर्यटनास खूप मोठया प्रमाणात चालना मिळाली.[२]

प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत पर्यटनाचे स्वरूप बदलत गेले. पूर्वी आर्थिक सुबत्तेचा अभाव व दळणवळणाच्या साधनांची कमतरता यामुळे पर्यटनाचे स्वरूप धार्मिक व व्यापारापुरतेच मर्यादित होते. जसजशी आर्थिक सुबत्ता वाढत गेली व दळणवळण साधनांचा विकास झाला तसतसे पर्यटनाचे स्वरूपही बदलत गेले. पर्यटन हे आंनद व मनोरंजनासाठी होऊ लागले. १९ व्या शतकात रेल्वेमार्ग व जलमार्गाचा विकास झाल्यामुळे पर्यटक जगभरात वेगवेगळया ठिकाणी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी जावू लागले. त्यामुळे

पर्यटनाची व्याप्ती वाढली.[३] २० व्या शतकात पर्यटनाच्या स्वरूपात आमूलाग्र बदल झाले. साहस पर्यटन, वैद्यकिय पर्यटन, समुद्र किनाऱ्यावरील संचार, ऐतिहासिक पर्यटन, इत्यादींचा यामध्ये समावेश करता येईल. साहस पर्यटनामध्ये डोंगर चढाई, उंच ठिकाणी चढणे, खोल दरीत उतरणे, वैद्यकिय पर्यटनामध्ये ध्यानधारणा करण्यासाठी, आयुर्वेदिक मसाज करण्यासाठी तर ऐतिहासिक पर्यटनामध्ये जुन्या जतन केलेल्या वास्तूंचे निरीक्षण करणे, लष्करी ठिकाणे, युध्दस्थळे पाहणे तसेच विविध वास्तुशिल्पे व किल्ले पाहणे इत्यादींचा समावेश होतो.[४]

ऐतिहासिक पर्यटनामध्ये किल्यांना महत्व प्राप्त झाले आहे. किल्यांच्या अनुषंगाने घडलेल्या घटना, त्यावरील वास्तुशिल्पे पाहण्यासाठी पर्यटक येथे मोठया प्रमाणात भेटी देत असतात. प्रत्येक किल्याभोवती कोणता ना कोणता तरी इतिहास घडला आहे. प्रत्येक किल्ला हा इतिहासाचा साक्षीदार आहे. असे ऐतिहासिक किल्ले पाहण्याचे एक आकर्षण लोकांच्या मनात असते. शासनाने किल्यांचे पर्यटनातील महत्व ओळखून त्यांच्या विकासासाठी व संवर्धनासाठी विविध योजना आखलेल्या आहेत. पर्यटनाच्या बदलत्या स्वरूपामध्ये किल्यांचे महत्व लक्षात घेऊन सिंधुदुर्ग किल्याच्या विकासासाठी व संवर्धनासाठी तेथील स्थानिक प्रशासन व शासन यांनी विविध योजना राबविलेल्या आहेत.

पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी २० जानेवारी १९७५ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या महामंडळामार्फत राज्यातील पर्यटनास प्रोत्साहन देण्यासाठी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, औरंगाबाद या विविध ठिकाणी आपली विभागीय कार्यालये स्थापन केली.[५]

सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटनाचे मुख्य आकर्षण असलेला मालवण गावाजवळील सिंधुदुर्ग किल्ला हा ऐतिहासिक आणि पर्यटनाच्या दृष्टीकोनातून महत्वाचा किल्ला आहे. सिंधुदुर्ग जिल्हयाला निसर्गाचे वरदान लाभलेले आहे. तसाच मोठा इतिहासही लाभला आहे. अप्रतिम निसर्ग सौंदर्याची खाण म्हणजे कोकण. भुरळ घालणारे समुद्र किनारे, सहयाद्रीचे उत्तुंग कडे, नागमोडी वळणाचे घाट, भरगच्च आमराया, अनोख्या देवराया, पक्षी सौंदर्य, गड किल्ले, दुर्ग आणि भुईकोट, प्राचीन मंदिरे, दीपगृहे, बॅक वाटर्स, स्कूबाड्रायव्हिंग असे समुद्री क्रीडा प्रकार, आंबे, फणस, काजू आणि चविष्ट खादयपदार्थ, कलाग्राम, दशावतार आणि रसाळ तसेच इरसाल असा कोकणी माणूस अस सगळंच आहे कोकणात. खरे तर हा बारमाही पर्यटनाचा प्रदेश.

सिंधुदुर्ग जिल्हयाची स्थापना १ मे १९८१ रोजी रत्नागिरी जिल्हयाचे विभाजन करून झाली. येथील निसर्गाची संपन्नता, विविधता लक्षात घेऊन पर्यटन विकासाची संकल्पना सिंधुदुर्गात रूजू लागली. याचा महत्वाचा टप्पा म्हणजे ३० एप्रिल १९९७ ला देशातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून सिंधुदुर्गाची घोषणा झाली. पण बराच काळ हा पर्यटन जिल्हा केवळ कागदावरच राहिला.

गेल्या दहा वर्षात जिल्हयातील पर्यटन क्षेत्रातील चित्र मात्र बदलत आहे. देशभरातील पर्यटक सिंधुदुर्गातील देखण्या समुद्रकिनाऱ्याकडे आकर्षित होवू लागले आहेत. सिंधुदुर्ग किल्ला हा पर्यटनाचा केंद्रबिंदू ठरला आहे. एखादया विकास प्रक्रियेत स्थानिकांचा सहभाग वाढतो. तेव्हा एकूण प्रगतीचा वेगही कित्येक पटीने वाढत असतो. सिंधुदुर्गाच्या पर्यटनाबाबतही याची प्रचिती येत आहे. उदा.मालवणमध्ये पर्यटकांनी एकत्र येत

लाखो रूपये गुंतवून समुद्रातील वॉटर पार्क प्रकल्प साकारला आहे. ग्लासबॉटन पर्यटन बोटी स्थानिकांनी खरेदी केल्या आहेत. स्थानिकांनी हॉटेल्स, होम स्टे उभारले आहेत.

सिंधुदुर्गात भविष्यात पर्यटनाच्या माध्यमातून नवी समांतर अर्थव्यवस्था निर्माण होण्याच्या दुष्टीने काही बदल होणे अपेक्षित आहे. पर्यटनामुळे अर्थव्यवस्थेत खूप मोठी आर्थिक क्रांती घडविण्याची क्षमता आहे. मात्र पर्यटन रूजवण्यासाठी आवश्यक प्राथमिक क्षमता सिंधुदुर्गात निर्माण होणे आवश्यक आहे. सिंधुदुर्ग जिल्हयाची ओळख मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या सिंधुदुर्ग किल्यावरून निर्माण झाली आहे.[६] प्राचीन काळापासून ते ब्रिटीश सत्ता भारतात स्थिर होईपर्यंत किल्यांना संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे स्थान होते. परंतु हे महत्व नष्ट होताच अनेक किल्ले इतिहास जमा झाले. तथापि मालवणसारख्या फारच थोडया किल्यांना ऐतिहासिक महत्व असल्यामुळे त्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास होत गेला.

मालवण किल्यावरील विविध ऐतिहासिक वास्तु शिल्पामुळे येथील पर्यटन विकासाला चालना मिळाली आहे. या वास्तू शिल्पांमुळे इतिहास अभ्यासकांना व पर्यटकांना विविध काळातील सुंदर अशी वास्तुरचना व तत्कालीन राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीची मिळविण्यासाठी किल्ला पर्यटन महत्वाचे ठरते. आज सिंधुदुर्ग किल्याला मोठया प्रमाणात पर्यटक व अभ्यासक भेट देऊ लागले आहेत.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वाढलेले नागरीकरण, औद्योगिकरण, राहणीमानातील सुधारणा, शिक्षणाचा प्रसार, व्यापारातील वाढ यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळाली आहे. विविध सत्ताधिशांच्या काळात केलेल्या किल्यावरील सुधारणांमुळे येथील पर्यटनाला स्वातंत्र्योत्तर काळात मोठया प्रमाणात चालना मिळाली आहे. मालवण नगरपरिषदेने किल्यावरील पर्यटनाद्वारे मिळणारे आर्थिक उत्पन्नाचे महत्व ओळखून पर्यटकांना येथे येण्यास प्रोत्साहित करण्यासाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध केल्या आहेत. दळणवळणाच्या सोयी हे पर्यटन विकासातील महत्वाचा घटक आहे. पर्यटनस्थळी पोहचण्यासाठी दळणवळणाच्या सोयी उत्तम प्रकारच्या असतील तर पर्यटक त्या भागाला मोठया प्रमाणात भेट देतात. मालवण नगरपरिषदेने पर्यटन विकासातील दळणवळणाचे महत्व ओळखून किल्यावर ऐतिहासिक ठिकाणी जाण्यासाठी रस्ते विकसित केले. आधुनिक गोष्टी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. पर्यटन विकासाच्या महत्वाच्या घटकांपैकी एक घटक म्हणजे हॉटेल्स, पर्यटनस्थळी राहण्याच्या व जेवणाच्या सुविधावरून त्या पर्यटन स्थळी येणाऱ्या पर्यटकांचा ओघ अवलंबून असतो. या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मालवण नगरपरिषदेचे मोठे प्रयत्न केले आहेत.[७]

महाराष्ट्र शासनाने सिंधुदुर्गच्या पर्यटनास चालना व प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत विविध योजना राबविलेल्या आहेत. याशिवाय मालवणजवळ तारकर्ली येथे आंतरराष्ट्रीय स्कूबा ड्रायव्हिंग सेंटर बांधण्याचे काम अंतिम टप्यात आहे. तारकर्ली येथे दोन हाऊसबोट पर्यटकांसाठी उपलब्ध असून साहसी जलक्रीडेसाठी दोन हाऊसबोट कार्यान्वित आहेत. सदर हायस्पीड बोटीतून पर्यटकांना सिंधुदुर्ग किल्याची जलसफर करण्यात येते. यामध्ये डॉल्फीनवॉच व स्पोर्टस फिसिंग याचा समावेश आहे. स्कूबा ड्रायव्हिंग सेंटर हे भारतातील आंतरराष्ट्रीय सेंटर महाराष्ट्रात कार्यान्वित करण्यात येत आहे. कोकण किनारपट्टीवरील निसर्ग आणि भरपूर वनसंपत्ती, दळणवळणाची साधने, अतिप्राचीन किल्ले, मंदिरे, समुद्रकिनाऱ्यांवरीरल चौपाटया या सर्व ठिकाणी पर्यटक नेहमीच भेट देत असतात. यामध्ये सिंधुदुर्ग किल्याला भेट देणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण मोठे आहे. शासनाने सिंधुदुर्ग किल्याच्या जतन व संवर्धनासाठी तसेच किल्यावर

येणाऱ्या पर्यटकांना विविध सोयी—सुविधा निर्माण केलेल्या आहेत. यामुळे येथील पर्यटन विकासाला चालना मिळाली आहे.

जागतिक वारसास्थळांच्या यादीमध्ये भारतातील व महाराष्ट्रातील अनेक ऐतिहासिक स्थळांचा समावेश केला गेला आहे. त्यापैकी सर्व जलदुर्गांमध्ये महत्वपूर्ण असा जलदुर्ग म्हणजे सिंधुदुर्ग हा किल्ला दि. २१ जून २०१० रोजी 'महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक' म्हणून घोषित केला आहे.[८] या दुर्गाने कोकणाच्या पर्यटनाला कलाटनी दिलेली आहे. आज देशातील सर्वात स्वच्छ जिल्हा म्हणून सिंधुदुर्ग जिल्हयाची निवड झाली आहे. हिरवा निसर्ग आणि निळेशार समुद्रकिनारे हे या जिल्हयाचे वैशिष्टये, निर्मळ समुद्रकिनारे, धो धो पडणारा पाऊस, गणपती उत्सव, दशावतार, गावोगाव भरणाऱ्या जत्रा, प्राचीन देवळ आणि ऐतिहासिक सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग हे जलदुर्ग यांनी पर्यटनाला चालना दिली आहे.[९] कोकणाच्या पर्यटनाला ऐतिहासिक पर्यटनामध्ये संम्मिलित करण्यासाठी सिंधुदुर्ग हा जलदुर्ग अगदी निर्णायक आहे. कारण मध्ययुगाच्या इतिहासामध्ये परकीय वर्चस्वाच्या लाटांनी जो वेग हाती घेतला होता तो निष्कासित करण्याचे महत्वपूर्ण काम हे याच जलदुर्गाच्या माध्यमातून झाले.

भारतीय पर्यटनाच्या इतिहासामध्ये सिंधुदुर्गाच्या या जलदुर्गाचे महत्व अनन्यसाधारण आहे.धार्मिक, सांस्कृतीक पर्यटनामध्ये सिंधुदुर्गाने ३० एप्रिल १९९७ रोजी देशातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून मजल मारली.[१०] छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वत: पायाभरणी केलेला त्यांच्या हाताचे ठसे असलेला, मंदीर असलेला स्थापत्याच्या अद्भूत नमुना असलेला हा एकमेवा किल्ला पाहायला जगातील अनेक राष्ट्रातील पर्यटक मोठया प्रमाणात गर्दी करतात. हा जलदुर्ग ऐतिहासिक पर्यटनाचा उत्कृष्ट नमुना आहे. सिंधुदुर्ग हा जलदुर्ग हा धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाचे एक प्रमुख ठिकाण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडातील युरोपियन सत्ता व समकालीन भारतीय सत्ता व त्यांच्यातील संघर्ष आणि या गडावरील, छत्रपती शिवाजी महाराजांनी मूर्ति, गणपती मंदीर, मारूती मंदीर, रामजन्म, अष्टमी, नवरात्र, शिवजयंती उत्सव त्रिपुरारी पौर्णिमा, दिपोत्सव हे सर्व सन गडावर साजरे होतात.[११]

पर्यटनाचे महत्व दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. पर्यटन हा रोजगाराभिमुख उद्योग असल्यामुळे कुशल व अकुशल लोकांना रोजगार मिळतो. पर्यटन हा सेवा उद्योगात मोडत असल्यामुळे स्थानिक लोकांना रोजगाराची संधी मिळते. हॉटेल्स, रेस्टॉरंटस्, दुकानदार, गाईड, परिवहन इ. लोकांना रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध होतात.[१२]

किल्यांच्या जवळील जी मुक्कामाची ठिकाणे आहेत. त्यांच्या आर्थिक स्थित्यंतरामध्ये खूप मोठया प्रमाणात बदल पर्यटनामुळेच जाणवतो. सततची वर्दळ यातून परिवहनापासून ते विविध वस्तूची विक्री, खाद्य पदार्थाची विक्री, स्थानिक वस्तूंची विक्री पर्यटकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुखसुविधा या सर्वाशी कुठेतरी आर्थिक व्यवहार निघडीत असतात. सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटनाचे सामाजिक जीवनावरही परिणाम झालेले दिसून येतात. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराची निर्मिती होवून त्यांच्या राहणीमाचा दर्जा व सामाजिक स्तर उंचावण्यास मदत होते. आर्थिक गतिशीलतेमुळे सामाजिक गतिशीलता वृध्दिंगत होण्यात मदत होते. पर्यटकांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण झाल्यामुळे सामाजिक स्तरामध्ये मोठया प्रमाणात वृध्दी होताना दिसून येते. मात्र याबरोबरच काही हौशी पर्यटकांनी सामाजिक शांतता भंग केल्याची उदाहरणेही

सापडतात व त्यातून स्थानिक व पर्यटक यांच्यातही संघर्ष अनुभवयास मिळतो. याचा परिणाम सामाजिक जीवनावर झालेला आहे.[१३]

मानवी जीवनाचा अविभाज्य घटक म्हणजे पर्यटन होय. या क्षेत्राशी मानवी संस्कृतीचे सर्व अंग, सर्व घटक बांधील आहेत. विविध स्तरातील, विविध विचारांशी, भाषांची, संस्कृतीची माणसे एकमेकांना भेटत असतात. त्यातून सांस्कृतिक विचारांची देवाणघेवाण, राहणीमाणाची, चालीरितीची देवाणघेवाण होत असते. सिंधुदुर्गाच्या नैसर्गिक, ऐतिहासिक स्थळाने सांस्कृतिक देवाणघेवाणीची एक विस्तृत परंपरा निर्माण केली आहे. भारतच नाही तर देश विदेशातील लाखो पर्यटक सिंधुदुर्गाला भेट देत असतात. त्यामुळे त्याचे आचार विचार, राहणीमान, भाषा यांच्याशी सहसंबंध येतो. आहार, विहार, विविध कलाकुसरिच्या वस्तू यामुळे सांस्कृतिक आदान प्रदान होते आणि त्याबरोबरच सांस्कृतिक वारश्याचे जतन व संवर्धन होते.

**संदर्भ**


१. Clough S.B. The Rise and fall of civilizabion, Columbia University Press, New yark and londan 1957, P

२. King C.H. and other History and Civilization the story of Heeitage, New Yark, 1966, P.43

३. नागतोडे (डॉ.) पी.एस., दिगंबर पारधी, पर्यटन भूगोल, विद्या प्रकाशन, नागपूर, २००६, पृ.६

४. दैनिक लोकसत्ता, ४ जून २००७, पृ.१०

५. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अहवाल, १९९३, पृ.१

६. देसाई शिवप्रसाद, देखणा सिंधुदुर्ग, गडपासे राहूल मोनीकुमार (संपा), सकाळ साप्ताहिक, ७ एप्रिल, २०१८, पुणे, पृ.६०

७. मुलाखत, सुधाकर गावडे, मालवण, दि. ०९ मार्च २०२२

८. मुलाकत, गणेश मिटबावकर, मालवण, दि. १० मार्च २०२२

९. लोकप्रभा पर्यटन विशेष, १ मार्च २०१९, पृ.५३, वर्ष ४५

१०. सकाळ साप्ताहिक, कोल्हापूर, कोकण विशेष, १ एप्रिल, २०१८, पृ.९)

११. दुर्गाच्या देशातून, दिवाळी अंक २०१२, संपादक संदिप तापकीर व गणेश खंडाळ

१२. Raiha Alhinar and other, Tourism Destination management principal and practices, Kaniska Publishers, New Delhi, 2010, P-१ दैनिक पुढारी, सिंधुदुर्ग आवृत्ती, ५ जुलै २०१७, पृ.०४

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# ४. स्वातंत्र्यपूर्व काळातील कोल्हापूरच्या वृत्तपत्रामधील स्थित्यंतरे

**Dr. Dhiraj Suresh Shinde**
Head, Department of History Smt. Akkatai Ramgonda Patil Kanya, Mahavidyalaya,
Ichalkaranji, Dist. Kolhapur.

**प्रस्तावना**

वृत्तपत्रे हि आजच्या २१ व्या शतकात एक प्रभावी प्रसारमाध्यम म्हणून ओळखली जातात. कारण वृत्तपत्रामधून प्रगट होणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या प्रतिबिंबामुळे होय. तसेच वृत्तपत्रे हि सरकार आणि जनता यांच्यात दुवा स्वरुपात कार्य करत असतात.आजच्या 'मल्टीमिडिया'च्या युगात 'प्रिंट मिडिया'ने आपले स्थान अबाधित राखले आहे. वृत्तपत्रांचा संबंध सर्वसामान्य जनतेच्या थेट प्रश्नांशी येत असतो. समाजातील अनेक घडामोडींविषयी वेगवेगळे दृष्टीकोन, विविध मांडणी, घटना, प्रसंग वृत्तपत्रांच्या बातम्या बनवून वृत्तपत्रामध्ये मांडत असतात.थोडक्यात "वृत्तपत्र म्हणजे एक दिवसाचा इतिहास ठरत असतो". त्यातून प्रसारमाध्यमे जीवनाचा अविभाज्य भाग बनलेली आहेत. या सर्वांमागे वृत्तपत्रांची सर्व टीम आणि त्याचा प्रमुख म्हणून संपादकाचे योगदान महत्वाचे ठरत असते. आणि त्याचा पाया हा स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांच्या संपादकांनी भारतात विविध प्रादेशिक भाषांमध्ये घातला आहे. त्यामध्ये मराठीमध्ये नामवंत संपादकांनी योगदान दिले आहे. त्यांची मोठी परंपरा निर्माण झाली आहे. विशेषत कोल्हापुरामध्ये संस्थांनी राजवट असूनही ब्रिटीशांच्या अनेक बंधनांची अंमलबजावणी करत वृत्तपत्रे विकसित झाली.

**कोल्हापुरातील वृत्तपत्रांची वाटचाल**

ब्रिटीश अंमल कोल्हापूरमध्ये निर्माण झाल्यानंतर नवीन राज्यकारभार व्यवस्था निर्माण झाली. नाममात्र सत्ता छत्रपतींची आणि प्रत्यक्ष कारभार 'पोलिटीकल सुपरिटेंडेड'कडे होता. पहिला सुपरिटेंडेड म्हणून इ.स १८४५ मध्ये कॅप्टन ग्रॅहमची नेमणूक झाली. पुढे या पदाचे नाव बदलून'पोलिटीकल एजंट' असे ठेवण्यात आले. इ.स १८६२-७४ या काळामध्ये कर्नल अँडरसन हा कोल्हापूरचा पोलिटीकल एजंट होता.त्याने आपल्या कालखंडात कोल्हापूर संस्थानामध्ये विविध खात्यामध्ये शिस्त निर्माण केली. त्याच्या काळात इ.स १८६७ मध्ये कोल्हापुरामध्ये हायस्कूलची स्थापना झाली. इ. स १८७० मध्ये राजाराम हायस्कूलची पायाभरणी झाली.इ.स १८७२ मध्ये कोल्हापूर राज्याची जनगणनाही झाली. याशिवाय अँडरसनच्या काळामध्ये टाऊन हॉल व त्याजवळील बागा, हतीमहाल, रेकॉर्ड ऑफिस या इमारती बांधण्यात आल्या, कोल्हापूर संस्थानाच्या कारभारात शिस्त आणली. त्याने घालून दिलेल्या धोरणानुसार पुढील अनेक पोलिटीकल एजंटांनी कारभार चालू ठेवला.त्याचा कार्यकाल कोल्हापूरच्या इतिहासामधील 'एजंट कारकीर्द' म्हणून ओळखली जातो[१]. त्याच्या धोरणातून कोल्हापूर दरबार प्रेसची निर्मिती झाली. दरबारासाठीची कागदपत्रे मुंबईमधून छापून घेतली जात. त्यात कष्ट, वेळ, पैसा याचा प्रचंड अपव्यय होत

असे. त्यामुळे दरबारी कामकाजाला वेळ लागत असे.हे सर्व टाळणेसाठी आणि दरबारचे अर्थप्राप्ती साधन म्हणून दरबार मालकीचा प्रेस सुरु करण्याची कल्पना एजंट अँडरसनने आखली व त्यासाठी एक शिळा छापखाना स्थापन केला. त्यामुळे दरबारी कागदपत्रांची छपाई उत्तम आणि वेळेत होऊ लागली.इतर छपाई कामाचे चार पैसेही दरबारी तिजोरीमध्ये जमा होऊ लागले.उत्पन्नाचे साधन म्हणून त्याला महत्व होतेच पण हा व्याप सांभाळून मुबलक वेळ राहू लागला.तेव्हा आणखी कार्य देण्याचा विचार सुरु झाला.तेव्हा दरबारच्या कामाची माहिती प्रजाजनांना व्हावी या उद्देशाने दरबारी मालकीचे एखादे वृत्तपत्र सुरु करण्याची कल्पना त्याला सुचली. त्यातून कोल्हापूरच्या वृत्तपत्राची वाटचाल सुरु झाली.त्यानुसार 'वर्तमानसंग्रह' हे पहिले वृत्तपत्रापासून कोल्हापूरच्या वृत्तपत्राची वाटचाल सुरु झाली[२].यानंतर पुढील २५-३० वर्षामध्ये विविध अंगाने वृत्तपत्रे विकसित झाली.त्यामध्ये प्रमुख वृत्तपत्रे आणि त्यांचे त्यांचे संपादकांची कामगिरी पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**'मराठा दीनबंधू'कार : भास्करराव जाधव**

कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू महाराज यांचे सुशिक्षित, कार्यक्षम तरुणांना संस्थानच्या सेवेत सामावून घेण्याचे धोरण होते. मराठा समाजातील एक तरुण भास्करराव जाधव हे प्रथम श्रेणीमध्ये BA, MA केलेले असून एल्फिन्स्टन कॉलेजच्या शिष्यवृत्तीवर शिकत होते. याची माहिती शाहूंना मिळताच त्यांनी हुजूर चिटणीस रघुनाथ सबनिसांच्या मार्फत भास्करराव जाधव यांच्याशी पत्रव्यवहार केला. त्यांच्याकडून काहीच उत्तर आले नाही. शेवटी "किमान भेटायला तरी या"असे पत्र त्यांना आल्यानंतर छत्रपतींचा अपमान नको म्हणून ते ऑगस्ट १८९५ मध्ये कोल्हापूर संस्थानामध्ये आले.शाहूंनी त्यांना संस्थानामध्ये सेवेची संधी दिली. परंतु LLB परीक्षेनंतर पाहू असे भास्कररावांनी उत्तर दिले. तेव्हा शाहूंनी त्यांना 'असिस्टंट सरसुभे'म्हणून १५० रुपयांवर नेमणूक करून परीक्षेसाठी तीन महिन्यांची रजाही मंजूर केली. त्यामुळे भास्करराव जाधव कोल्हापूर संस्थानच्या नोकरीस आले. त्यांनी १९१८ या काळात कोल्हापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी म्हणून उत्कृष्ट कार्य केले. वर्तमानपत्राशिवाय लोकजागृती लोकजागृती नाही हे ओळखून त्यांनी इ.स १९०१ मध्ये 'मराठा दीनबंधू'हे वर्तमानपत्र सुरु केले. तीन वर्ष नुकसान सोसून हे वर्तमानपत्र चालू ठेवले. परंतु संस्थानच्या, नगरपालिकेच्या कारभारामुळे त्यांनी हे पत्र बंद केले. इ.स १९२१ मध्ये रामदासनवमी वेळी सज्जनगडावर दंगल झाली. त्यावेळी 'सज्जनगडावर दंगल'हा लेख येऊन ब्राह्मनेत्तरानी ब्राह्मनेत्तरानी दंगल केल्याचा आरोप केला. तेव्हा १८ मार्च १९२१ च्या ज्ञानप्रकाशमध्ये 'ब्राहमनेतरांची बाजू' हा लेख लेख लिहून या कार्यक्रमास सत्यशोधकांपैकी कोणीही कार्यकर्ता नव्हता. हे अधिकाऱ्यांच्या चौकशीत निष्पन्न झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.इ.स १९२८ च्या 'गरीबांचा कैवारी' मधून त्यांनी 'सत्यशोधक समाज म्हणजे खरे हिंदू संघटन'ही लेखमाला लिहून त्यांनी स्पष्ट केले कि, 'सत्यशोधक समाज हा एक जात, एक धर्म, एक धर्मग्रंथ यांचा पुरस्कर्ता असून त्यातून हिंदू संघटन घडून येते'. असा विचार व्यक्त केला आहे. शाहूंच्या कार्याचे निष्ठावान अनुयायी अनुयायी असलेल्या जाधवांचे २६ जून १९५० रोजी निधन झाले.२८ जून १९५० च्या दै. पुढारीमध्ये असे स्पष्ट केले आहे की, "बहुजन समाजातीलच नव्हे तर अखिल भारतामधील एक थोर व्यक्ती नाहीशी झाली आहे. भास्कररावांचा

व्यासंग, तत्वनिष्ठा, अभ्यासूवृत्ती आदि गुण तरुणांना ,भावी पिढीला मार्गदर्शक ठरतील. "अशा शब्दात भाई माधवराव बागल यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे"[३].

**'विजयी मराठा'कर्ते श्रीपतराव शिंदे**

श्रीपतराव शिंदे हे शाहूंचे सहकारी, सच्चे अनुयायी, शाहूंच्या समाजकार्य, प्रशासनातही सहकार्याची भूमिका बाळगणारे कोल्हापूर संस्थान बाहेरील कार्यकर्ते होते. साताऱ्यानजीक कऱ्हाडमधील कासेगावला त्यांचा जन्म इ.स १८८३ ला झाला. कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये मॅट्रिकची परीक्षा इ.स १९०३ मध्ये पास झाले. त्यांना शिक्षणासाठी राजर्षी शाहूंनी सहाय्य केले.पुढे १२ वर्ष सब-इनस्पेक्टर म्हणून धुळे, नगर, पुणे येथे कार्यरत राहिले.यावेळी त्यांना लेखनाची आवड निर्माण झाली. वृत्तपत्रामध्ये लेख लिहीण्याची सरकारी नोकरांना बंदी नसली तरी त्याबाबतीत बंधने असल्यामुळे त्यांनी मार्मिक या टोपण नावाने 'दीनमित्र' आणि 'जागरुक'पत्रामधून लेखन केले.सत्यशोधक विचारामुळे त्यांना स्वतःच्या वर्तमानपत्राची आवश्यकता वाटू लागली. त्यासाठी त्यांनी सरकारी नोकरी सोडून १ डिसेंबर १९१९ रोजी 'विजयी मराठा'हे साप्ताहिक सचित्र स्वरुपात सत्यशोधक, ब्राह्मनेत्तर विचाराचे सुरु केले. आरंभापासूनच बहुजन समाजाची बाजू घेतल्यामुळे विजयी मराठा वृत्तपत्राचा प्रचार, प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. विजयी मराठामधून वेदोक्त प्रकरणामध्ये शाहूंची बाजू घेवून पुण्यामधील ब्राह्मणी वृत्तपत्रावर जोरदार टिका केली.[४] त्याचे शिर्षकही आक्रमक होते. त्यात

'जहालांचा सिद्धसाधकपणा' -१७ डिसेंबर १९२१

'गांधीशाही विरुद्ध भिक्षुकशाही' -१८ जानेवारी १९२२

अशा शीर्षकाचे प्रभावी अग्रलेख असत. श्रीपतरावांनी राजर्षी शाहूच्या निधनानंतर 'विजयी मराठा'या पत्रामध्ये १५ मे १९२२ रोजी 'दीन दुनियेचा वाली गेला'! असा अग्रलेख लिहून त्यात संक्षिप्त शाहूचरित्राचा आढावा घेण्यात आला आहे. या अंकामध्ये शाहूंची जन्मतारीख २६ जून १८७४ अशी आली आहे. शाहूंच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्य मे १९२३ मध्ये 'विजयी मराठा' चा खास अंक 'श्री शाहू खास अंक'प्रसिद्ध झाला. अत्यंत दुर्मिळ असा हा अंक झाला असून मुखपृष्ठासह सर्व छायाचित्रे ही त्यावेळच्या मुंबईमधील 'टाईम्स ऑफ इंडिया' प्रेसमधून आर्ट पेपरवर छपाई करण्यात आली. हा अंक ग्रंथाप्रमाणे बायंडिंग करून तयार करण्यात आला. इ.स १९२४ मध्ये आण्णासाहेब लट्ठे यांनी पहिले शाहू चरीत्र लिहिले. त्याअगोदर हा अंक स्वरुपात 'शाहूचरित्र' प्रकाशित झाला.[५]

**ब्राह्मणेत्तर पत्रे : विश्वबंधू, जागरुक, राष्ट्रवीर**

इ.स १९११ मध्ये शाहूच्या प्रोत्साहनामुळे बळवंत कृष्ण पिसाळ यांनी 'विश्वबंधु' हे पत्र काढले. या पत्राने ब्राह्मणांची मक्तेदारी,टिळकपंथाच्या स्वार्थी राजकारणावर कठोर टिका केली.त्यामुळे ब्राह्मणी संस्थांचा त्यावर रोष रोष होता. या पत्राचा खपही कमी होता. इ.स १९१५ पर्यंत केवळ ३५० प्रति निघत.शाहुंनी या पत्राचा एक अंक अवलोकनार्थ मुंबई प्रांताचे गृहसचिव रॉबर्टसनना पाठवून एक पत्र सोबत पाठवले.त्यात लिहिले," या पत्राचा संपादक एक सामान्य माणूस आहे. मात्र तो नेहमीच टिळकांच्या मताला विरोध करतो.त्यामुळे त्याचे पत्र चालत

नाही.त्याला मी मदत करणार आहे." त्यामुळे शाहूंच्या उत्तेजनामुळे पिसाळांनी इ.स १९१९ मध्ये 'गरीबांचा कैवारी' आणि 'भगवा झेंडा' ही दोन पत्रे काढली.[६]

पुण्यामध्ये वालचंद कोठारी यांनी १९ जुलै १९४७ ला 'जागरूक' पत्र काढले.शाहूंनी त्यांना तीन हजार रुपयाची मदत पाठवली.तरीही कोठारी यांनी स्वातंत्र्य बाण्याने हे पत्र चालविले.संस्थानशी त्यांचे वैचारिक मतभेद झाले. पुढे विजयी मराठा विरुद्ध जागरूक या दोन ब्राह्मणेतर पत्रामध्येच वैचारिक संघर्ष झाला. त्यावेळी शाहुंनी मध्यस्ताची भूमिका पार पाडली [७].

९ मे १९२१ ला बेळगावला 'राष्ट्रवीर' हे ब्राह्मणेतर पत्र सुरु केले.याचे पहिले संपादक शामराव संताजी भोसलेंनी या वृत्तपत्राचा महाराष्ट्रभर प्रसार केला. आरंभापासूनच हे एक आक्रमक वृत्तपत्र होते.त्याव्यतीरिक्त लोकोपयोगी कार्याचे कौतुकही यामधून होत असे. छत्रपती राजाराम महाराजांनी संस्थानात न्यायालय सुरु केले. त्यावर राष्ट्रवीरमध्ये प्रतिक्रिया दिली आहे कि," छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या राज्यरोहणाच्या दहाव्या वाढदिवसानिमित्त तीन न्यायाधीशांचे एक स्वतंत्र उच्च न्यायालय निर्माण केले असून ते १ जून पासून अंमलात आले आहे.महाराजांची ही योजना स्वागतपर आणि प्रशंसनीय आहे".[८]

**प्रबोधनकार: केशव सीताराम ठाकरे**

मुंबईमध्ये 'प्रबोधन' हे मासिक केशव सीताराम ठाकरे यांनी काढले.सत्यशोधक प्रवृत्तीच्या या मासिकामधून सडेतोड टिकाटिप्पणी होत असे. राजर्षी शाहूंचे या पत्रास सहाय्य असे.ठाकरे यांचा शाहूंशी स्नेहही होता.निर्भीड लिखाणामुळे हे अल्पकाळातच प्रसिद्ध झाले.ऑक्टोबर १९२२ मध्ये कोल्हापुरामध्ये एक घटना घडली..अंबाबाई मंदिरामध्ये घुसून काही मराठा तरूणांनी पूजा केली.उच्चवर्गीयांच्या अकांडतांडवामुळे शाहूंनी त्यांना तुरुंगात घातले.त्यावर प्रबोधन मासिकामधून 'अंबाबाईचा नायटा' हा लेख लिहून शाहूंवर टिका केली. त्यानंतर शाहू महाराज मुंबईमध्ये पन्हाळा लॉजवर मुक्कामी आले असता त्यांनी ठाकरे यांना बोलावून घेतले. दोघांमध्ये एकांतात चर्चा होऊन शाहू त्यांना म्हणाले," अरे एकदम साऱ्या गोष्टी साधत नाहीत, अस्ते अस्ते मी सगळाच बंदोबस्त करणार आहे"असे आश्वासन दिले. पुढे धर्मपिठावर पीठाधिकारी नेमण्याचा छत्रपतींना अधिकार असल्याचे प्रबोधनकारांनीच पुराव्यासहित शाहूंना सांगितले. शाहू मुंबईत असताना नित्यनियमाने ठाकरेंची भेट घेत. ५ मे ची १९२२ ची काळरात्र शाहू प्रचंड आजारी होते. मुंबईच्या खेतवाडीमधील 'पन्हाळा लॉज' येथे त्यांच्यावर औषधोपचार चालू होते. त्या रात्री ठाकरेंना शाहुनी बोलावून घेतले. तशा अवस्थेतही छत्रपती सातारा घराण्याचा इतिहास लिहण्याची त्यांना शपथ दिली.प्रभोधनकार म्हणतात, "त्या नंतर लगेच मी निघालो. बडोदेकरांनी मला त्यांच्या गाडीतून दादरला आणून पोहोचविले. रात्री अकराचा सुमार असेल,जेवलो नी झोपी गेलो. सकाळी सहा वाजता सौ. ने मला हलवून जागे केले. अहो उठा, लोक बाहेर काय बोलताहेत ते बघा. शाहू महाराज गेले! बाहेर येऊन चौकशी केली तर बातमी खरीच! तोंडातून एकच उद्गार निघाला – "अरेरे दिन दुबळ्यांचा भवितव्यावरचा सर्चलाईट विझला!"[९]

**राष्ट्रीय विचाराचे वृत्तपत्र: विद्याविलास**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मासिक ते दैनिक हा विद्याविलासचा प्रवास मागे पहिला आहे. शंकरशास्त्री गोखलेनंतर त्यांचे पुत्र रघुनाथ गणेश उर्फ बाबुराव गोखलेंनी हे कोल्हापूरच्या राजकीय लढ्याचे, राष्ट्रीय चळवळीचे मुखपत्र बनविले. १९३६ ते ४७ या काळातील राष्ट्रीय लढ्यात या पत्राचा प्रसार झाला. सरकारी गुप्त बातम्या अचूक मिळवून त्या प्रसिद्ध केल्या जात. त्यामुळे सरकारी रोषासही हे पत्र बळी पडले. रघुनाथराव यांच्या कारकिर्दीत '१२४ अ' कलमाखाली ५०० रुपयांचा जामीन भरावा लागला. इ.स. १९३९ च्या कोल्हापुरात झालेल्या संपात बातमी देणे व चिथावणी देणे या आरोपाखाली बाबुराव गोखलेना सव्वा वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली. पण रिजन्सी राजवटीत हा खटला मागे घेण्यात आला. इ.स. १९४२ च्या आंदोलनात त्यांना सव्वादोन वर्ष अटक झाली. इ.स.१९४६ ला सरकारी नोकरांच्या संपावेळीही सव्वा वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली. गोखलेंच्या दोन ते तीन पिढ्यांना सरकारी अवकृपेचा मोठा फटका बसला. संस्थांनी राजवटीत एक गाजलेले तेजस्वी पत्र म्हणून यांचा उल्लेख केला जातो. हे वृत्तपत्र दैनिक स्वरुपात चार पाणी प्रसिद्ध होत असे. शीर्षकस्थानी 'विद्याविलास' असे ठळक अक्षरात, त्याखाली 'सोमवारखेरीज दररोज प्रसिद्ध होतो' असा मजकूर त्याच्या शेजारी किंमत एक आणा, र.न. (रजिस्टर नंबर) ४८२९, त्याच्याखाली दिनांक वार इत्यादी मजकुर असे. प्रथम पानावर अनेक छोट्या बातम्या असत.पां क्र. दोनवर अग्रलेख एक स्तंभात असे. त्याशेजारीही छोटी वृत्ते असत. आतील पां क्र. तीन वर 'रघुनाथ उर्फ बाबुराव गोखले संपादक' विद्याविलास यांनी १४०७ वॉर्ड सी, लक्ष्मीपुरी कोल्हापूर येथे विद्याविलास प्रेसमध्ये छापून प्रसिद्ध केले असा मजकूर असे. प्रजापरिषदेच्या लढयासंबंधीचे अग्रलेख सातत्याने येत. त्यात

"जागृत प्रजेच्या कसोटीचा काळ" – २१ ऑक्टोबर १९४७

"भ्याड हल्ला" – २८ ऑक्टोबर १९४७

या दिवशीचे पहिल्या पानावरील शीर्षक, "भाई बागलांना फेटेवाले गुंडांचा ठार मारण्याचा प्रयत्न" त्या व्यतिरिक्त खालील शीर्षके, अग्रलेखांच्या शीर्षस्थानावर त्याचा आढावा घेत.

- "अ.भा. संस्थांनी परिषदेच्या कोल्हापूर परिषदेला पाठींबा" – २१ ऑक्टोबर १९४७
- "प्रजा परिषदेवर जनतेचा संपूर्ण विश्वास: राजवाड्यावर महिलांचा मोर्चा" – २३ ऑक्टोबर १९४७
- "इचलकरंजीत प्रजापरिषदेचा विजय" – १ नोव्हेंबर १९४७
- "कोणतीही तडजोड नाही : प्रजापरिषदेच्या लढ्याचा ठराव कायम" – ४ नोव्हेंबर १९४७

अशी सातत्याने वृत्ते प्रसिद्ध होऊन त्याव्यतिरिक्त फाळणी,इतर स्थानिक,राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय घडामोडींचीही या वृतपत्रातून मांडणी करण्यात आली.

- "पाकिस्तान म्हणजे नाझी राज्य" – १८ नोव्हेंबर१९४७
- "निजाम पाकिस्तानात जाणार नाही" सरदार पटेलांचे भाषण – ३० नोव्हेंबर १९४७

अशा विस्तृत मांडणीतून स्थानिक पासून आंतरराष्ट्रीय घडामोडींची उत्कृष्ट मांडणी विद्याविलासमध्ये करण्यात आलेली आहे. परंतु दुर्दैवाने महात्मा गांधींच्या हत्येनंतर झालेल्या जाळपोळीमध्ये या वृत्तपत्रांचा प्रेस

जाळण्यात आला. त्यानंतर परिस्थिती पूर्वपदावर आल्यानंतर 'विद्याविलासचे' प्रकाशन स्थगित ठेवून बाबुराव गोखलेंनी उर्वरीत आयुष्य अज्ञातवासात काढले.[१०]

**बागल घराणे : हंटर, अखंड भारत**

कोल्हापूर संस्थान काळातील प्रसिद्ध घराणे म्हणजे बागल घराणे होय. खंडेराव आणि माधवराव बागल या पिता-पुत्रांनी ब्रह्मणेत्तर चळवळ आणि कोल्हापूर संस्थानातही नेतृत्व केले. इ.स. १९१० मध्ये खंडेराव बागल यांनी स्वतंत्रपणे वकिली व्यवसाय सुरु केला. सत्यशोधक चळवळीचे आघाडीचे कार्यकर्ते हरिभाऊ चव्हाण यांनी 'हंटर' हे पत्र सुरु केले या पत्राचे दोन-तीन अंक काढल्यानंतर हे पत्र चव्हाणांनी खंडेराव बागलांकडे चालवण्यास दिले. त्यांनी संस्थानात फिरून पैसा गोळा केला स्वताचा प्रेस खरेदी करून छापखाना सुरु केला. उदार धोरणाने सर्व विषयांवर या पत्राने चौफेर लिखाण केले. संस्थानाशी एकनिष्ठ राहून संस्थांनची बाजू त्यांनी या पत्रामध्ये आरंभापासून मांडली.खंडेरावांचे जेष्ठ पुत्र माधवराव हे हंटरच्या कामकाजात त्यांना मदत करत.[११] अल्पावधीतच कोल्हापूर संस्थानाबाहेर सांगली,कराड,सातारा,पुणे,मुंबई,अकोला,अमरावती,नागपूर,निपाणी,रत्नागिरी या भागामध्ये हंटरचे वर्गणीदार वाढले. हंटर मधून सडेतोड भूमिका मांडताना कोल्हापूर दरबारचा कारभार बजेट सरंजामशाही,दारूवर टीकात्मक लिखाण सुरु केले. प्रजेचे मुलभूत हक्क,जबाबदार राज्य पद्धतीची त्यांनी मागणी सुरु केली. त्यामुळे संस्थानामधून त्यांना पाच हजार रुपयाची जामीनकी आणि माधवराव बागलांना हद्दपार केले. त्यामुळे हे पत्र बंद पडले. पुढे माधवरावांनी प्रजा परिषद आणि भारतीय स्वातंत्र चळवळीला पूरक 'अखंड भारत' हे साप्ताहिक प्रसिद्ध केले. हे पत्र दीर्घकाळ चालले.[१२] या पत्रांनी आरंभापासून पुरोगामी भूमिका घेतली.

**आर्य समाजाचे मुखपत्र : आर्य**

कोल्हापूरमध्ये शाहूंनी इ.स.१९१८ मध्ये आर्य समाजाची स्थापना केली व आपल्या शिक्षण संस्थातील काहींचे संचलन आर्य समाजाकडे दिले. या पूर्वीच आग्रा येथील स्वामी परमानंद यांच्या मार्गदर्शनाखाली आर्य समाजाचे कोल्हापुरात कार्य सुरु होते. परमानंदानी इ.स. १९१७ ला केर्ले या गावी प्राथमिक शाळा,गुरुकुलाची स्थापना केली. पुढे या समाजाचे मुखपत्र आर्य हे १ मार्च १९२६ रोजी सुरु केले. आर्यांचे प्राचीन वैभव,आचारविचार, कला, विज्ञान सामाजिक संघटन आणि आर्य संस्कृतिच्या पुनुरुज्जीवनासाठी हे पत्र कार्यरत होते. त्यासाठी आर्य समाजाने स्वताचा आर्यभानू नावाचा छापखाना काढला.तसेच वृत्तपत्रांबरोबरच वैदिक धर्मावर आधारित पुस्तकांची निर्मिती केली. पुढे आर्थिक अडचणींमुळे छापखाना बंद करावा लागला.तेव्हा राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांनी यात लक्ष घालून यंत्र सामुग्रीचे आधुनिकीकरण,कामगार वर्गात शिस्त निर्माण केली. त्यावेळी ६ हजार रुपये कर्ज काढून स्वतंत्र इमारत उभी केली. डॉ.बाळकृष्ण हे आर्य समाजाचे दीर्घ काळ अध्यक्षही होते.[१३]

**सत्यशोधकी पत्र : प्रजा**

सत्यशोधक कार्यकर्ते दासराम उर्फ रामचंद्र बाबाजी जाधव यांनी आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन बाबुजमाल दर्ग्याजवळ 'दासराम बुक डेपो' हे सत्यशोधकी साहित्य विक्रीचे दुकान काढले पुढे त्याचे महाद्वार रोडला स्थलांतर झाले त्यांनी २ जून १९४२ मध्ये 'प्रजा' हे साप्ताहिक काढले. १९४२ ते ५२ अशी १० वर्ष हे पत्र चालू

होते. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे चिरंजीव मोहन जाधव आणि त्यांचे सहकारी त्र्यं.स. कारखानीस यांनी हे पत्र सुरु ठेवले.[१४]

**दलितमित्र दादासाहेब शिर्के यांचे : गरुड**

कोल्हापूरामधील नागाव या ठिकाणी दादासाहेब शिर्के यांचा जन्म झाला. आरंभापासून सामाजिक कार्य आणि लिखाणाची आवड त्यांना होती. त्यांनी 'विश्वबंधु' या कोल्हापूरमधील साप्ताहिकामधून 'दलितांचा हंबरडा'नावाने लेख लिहिला. त्यांचे गुण पाहून शाहुनी त्यांना मुंबईस पुढील शिक्षणासाठी पाठवले.त्यानंतर तेथून परत आल्यानंतर वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी १९२६ मध्ये 'गरुड' हे साप्ताहिक काढले.हे पत्र १९२६ ते १९५४ या काळात चालले. हे पत्र आंबेडकर चळवळीस वाहिलेले, चतुरस्त्र, क्रांतीप्रणवभाषा, संदर्भयुक्तमांडणी, उपहास, उपरोध, सुभाषितवजा वाक्याने युक्त हा अंक असे. या साप्तहिकाचा वाचक वर्ग संपूर्ण महाराष्ट्रभर होता.[१५]

**दीर्घकाळ कार्यरत दैनिके : सत्यवादी,पुढारी**

त्याव्यतिरिक्त कोल्हापुरात दीर्घकाळ कार्यरत दैनिक पुढारी, सत्यवादी, समाज, गर्जना, जनसारथी अशी पत्रे अनेक मान्यवर संपादकांनी निर्माण केली.एकूणच कोल्हापुरामध्ये पुरोगामी संपादकांनी वृत्तपत्राचा पाया घातला.

**गोषवारा**

वृत्तपत्रे हि आजच्या २१ व्या शतकात एक प्रभावी प्रसारमाध्यम म्हणून ओळखली जातात. कारण वृत्तपत्रामधून प्रगट होणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या प्रतिबिंबामुळे होय. तसेच वृत्तपत्रे हि सरकार आणि जनता यांच्यात दुवा स्वरुपात कार्य करत असतात. आजच्या 'मल्टीमिडिया'च्या युगात 'प्रिंट मिडिया'ने आपले स्थान अबाधित राखले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये कोल्हापूरमध्ये संस्थांनी राजवट असताना कोल्हापूरमध्ये वृत्तपत्रांचा विकास झाला. त्यानंतर लोकराजा शाहूंच्या काळामध्ये तर ब्राहमण, ब्राम्हनेत्तर हा वाद विकोपाला गेला असताना राजर्षी शाहुंनी अनेक बहुजन समाजातील तरुणांना वृत्तपत्र काढण्यास प्रोत्साहन दिले.त्यामध्ये मराठा दीनबंधूकार भास्करराव जाधव, विजयी मराठाकर्ते श्रीपतराव शिंदे, प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे तसेच अनेक वृत्तपत्रे त्यामध्ये विश्वबंधु, जागरूक, राष्ट्रवीर, विद्याविलास, हंटर, अखंड भारत, आर्य, प्रजा, गरुड अशी वृत्तपत्रे होती.

**संदर्भ सूची**

१. भोसले नंदकुमार, कोल्हापूर राज्याची सामाजिक व आर्थिक परिस्थिती (१८०१-६०) Ph.D अप्रकाशित प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, नोव्हेंबर १९९०, पान क्र ३२

२. तेलवेकर आनंदराव,लेख-कोल्हापूरची वृत्तपत्रसृष्टी, पुढारीकार ग.गो जाधव गौरवग्रंथ,2008,पृष्ठ क्र.१११,११२

३. पोवार छाया,चरित्र ग्रंथमाला:भास्करराव जाधव,श्रमिक प्रतिष्ठान,कोल्हापूर 2012,पान.क्र २६,५६

४. मोरे संभाजी,विजयी मराठाकार श्रीपतराव शिंदे,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी,कोल्हापूर,३ मार्च २००५,पान क्र ७४

५. विजयी मराठा,राजर्षी शाहू:खास अंक १९२३,विजयी मराठा प्रकाशन,कोल्हापूर,२६ जून २००७,पान क्र १७,१८.

६. कोल्हापूर पुराभिलेखागर,जनरल फाईल क्र. २३५,पण क्र ८१.

७. फडके.य.दि,विसाव्या शतकातील महाराष्ट्र,(खंड दुसरा)१९१४-१९२०,के सागर पब्लिकेशन्स,पुणे१५ नोव्हे.२००५,पृष्ठ क्र.२०९.

८. राष्ट्रवीर अंक,८ ऑगस्ट १९३१.

९. ठाकरे प्रबोधनकार, माझी जीवनगाथा (आत्मचरित्र), सोमय्या पब्लिकेशन्स, मुंबई १७, सप्टे.१९७३, पान. नं २६६.

१०. विद्याविलास अंक,२१ ऑक्टो १९४७

११. संपादक भाई माधवराव बागल,हंटरकार खंडेराव बागल, यांचे निवडक लेख,दी.कोल्हापूर शुगर मिल्स लि. पब्लिकेशन्स,१९७४,पान.नं २३,२४.

१२. संपादक भाई माधवराव बागल,उपरोक्त पान.क्र १६,१७.

१३. मो.रा वाळिंबे (संपादक)डॉ.बाळकृष्ण-चरित्र,कार्य, आणि आठवणी,आर्य बुक डेपो,आर्यभानू प्रेस,कोल्हापूर १९४२,पान नं ७८.

१४. पोवार विलास,सत्यशोधक दासराम: जीवन व कार्य,स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे,एप्रिल २००८,पान.क्र ३९,४०.

१५. कुरणे चंद्रकांत, दलितमित्र दादासाहेब शिर्के,श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर,सप्टेंबर २०१२,पान क्र.१३,१४.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)** **CC-14**

# ५. इसवी सन १७ वे शतक ते २० वे शतक या कालावधीत मराठी भाषेवर फारसी व इंग्रजी भाषेचा परिणाम

**प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा.

**गोषवारा**

इसवी सन १७ व्या शतक ते २० व्या शतकात या कालावधीत मराठी भाषेवर फारसी व इंग्रजी भाषेचा मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला आहे. शिवरायांच्या पूर्वी बहमनी काळात मराठी भाषेवर फारसी भाषेचा लोकांच्या दैनंदिन जीवनात प्रभाव पडून फारसी-मराठी अशी भाषा रूढ झाली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत मराठी भाषेवर फारसी भाषेचा परिणाम होऊ नये म्हणून राज्यव्यवहार कोश आणि लेखन प्रशस्ति सारखे कायदे संहिता तथा नियमावली तयार करून घेतली होती. त्यानंतरच्या काळातील पेशव्यांनी थोड्याफार प्रमाणात मराठी-फारसी भाषेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला होता. पेशव्यांच्या नंतर इंग्रजांच्या काळात मराठी भाषेवर फारसी भाषेसह इंग्रजी भाषेचा परिणाम झाला आणि मराठी भाषा मराठी-फारसी-इंग्रजी अशी लोकांच्या दैनंदिन जीवनात रूढ झाली. त्यामुळे आजही आपण फारसी भाषेतील अर्ज, दस्त, दस्तऐवज आणि इंग्रजी भाषेतील नंबर, रिपोर्ट, ऑफिस, पोस्ट असे शब्द सरार्सपणे वापरतो.

**सूचनक शब्द किंवा महत्त्वाचे शब्द -** राज्यव्यवहारकोश, लेखन प्रशस्ति, पुरशीस

**प्रस्तावना**

आपण आपल्या दैनंदिन जीवनात मराठी भाषा बोलताना तसेच लिहिताना अर्ज, दस्त, दस्तऐवज, रोजमेळ, कचेरी अशा फारशी शब्दासह कोर्ट, पोस्ट, नंबर, रेल्वे, एस.टी., बस अशा इंग्रजी शब्दांचा वापर करतो. परंतु सदर फारशी व इंग्रजी शब्द मराठी भाषेत कधी आले आणि पूर्णपणे सर्व सामान्य माणसाच्या जीवनात कधी रूढ झाले याचा चिकित्सक संशोधन करणे आवश्यक आहे. संशोधक उपरोक्त शीर्षकानुसार इसवी सन १७ वे शतक ते २० वे शतक या कालावधीत मराठी भाषेवर फारसी व इंग्रजी भाषेचा परिणाम कसा झाला याबाबत संशोधनात्मक दृष्टीने संशोधन लेख सादर करत आहे.

**मराठी भाषेचा उदगम**

मराठी भाषेचा जन्माबाबत कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, संचालक-मराठी संशोधन मंदिर, यांनी 'मराठी भाषा उद्गम व विकास' ग्रंथात, "सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत ह्या भाषांनी आपापल्या परीने मराठीस जन्माला आणण्यास हातभार लावलेला दिसतो. निरनिराळ्या भाषा बोलणारे निरनिराळे समाज निरनिराळ्या भागातून अनेक कारणांमुळे महाराष्ट्रात उतरले आणि तेथे स्थायिक झाले. त्यांच्या संमिश्र बोलण्यानेच मराठी भाषा भाषा बनली. महाराष्ट्र देश ज्याप्रमाणे गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अश्मक, कुंतल, विदर्भ, कोकण इत्यादी लहान लहान

देशाविशेषांचा मिळून बनला व महाराष्ट्राची लोकवसाहत ज्याप्रमाणे निरनिराळ्या लोकघटकांनी मिळून झाली, त्याचप्रमाणे मराठी भाषा ही निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या-विशेषतः माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांच्या मिश्रणाने बनली. बनली. महाराष्ट्र देश, मराठा समाज व मराठी भाषा ह्यांची घटना वर दिलेल्या रीतीने ख्रिस्तोतर ६००-७०० च्या सुमारास झाली." असे मत व्यक्त केले आहे.[१]

**बहमनी काळापूर्वी मराठी भाषा**

देवगिरीच्या दोन्ही यादवांनी मराठीचा दरबारात उमोठ्या प्रमाणात उपयोग केला तसेच मराठी विद्वानांना राजाश्रय दिला. मराठीतून दोन धार्मिक संप्रदाय-महानुभाव पंथ व वारकरी पंथ निर्माण झाले. या दोन्ही संप्रदायांनी आपल्या भक्तीसंपद्रायाच्या प्रचाराचे मराठी हे माध्यम मानले. त्यामुळे मराठीला राजदरबारी मानाचे स्थान प्राप्त झाले होते.[२]

**शिवपूर्वकालीन मराठी भाषा**

यादवांच्या अस्तानंतर मराठी भाषिक प्रदेशावर इस्लामी सत्तेचे अंमल सुरु झाले. इस्लामांच्या या राजवटीत त्यांनी त्यांच्या मातुभूमीच्या व मातृभाषेच्या धरतीवर सोयीची राज्यभाषा म्हणून मराठी भाषिक जनतेचा विचार न करताच फारसी ही राज्यभाषा व प्रशासकीय भाषा म्हणून मराठी भाषिक प्रदेशावर जबरदस्तीने लादले असल्याचे दिसून येते. या काळात प्रशासकीय भाषा ही फारसी जरी असली तरी याकाळात धार्मिक दृष्टया अनेक साहित्याची निर्मिती मराठीतच झालेली होती म्हणजेच मराठीची चलती होती. याबाबत वि. का. राजवाडे यांनी आपल्या अभ्यास व संशोधनाअंती लिहिले आहे की, 'फारसी लिपी देवनागरी लिपीच्या मानाने गैरसोयीची वाटू लागली व दरबारी जाहीरनामे, पुरशीसा, चाकनामे इत्यादी लिहिताना वर फारसी व खाली मराठी असा वापर होऊ लागला. मात्र ही भाषा मराठी असली तरी राज्यकर्त्यांच्या अनुकरणाने प्रशासनिक पत्रांचे मायने, कालोल्लेख, शब्दयोजना व काही प्रमाणात वाक्यरचना देखील फारसी भाषेने प्रभावित झाल्याचे दिसते' राजवाडे यांनी उदाहरणे देऊन दाखवून दिले आहे की, मुसलमानांचे राज्य चालू असताना इ.स. १६२८ मध्ये दरबारी लिखानात शंभर शब्दांतून सरासरी १४ शब्द मराठीत येत.[३] दरबारी लिखाणातील फारसीच्या प्राधान्याबाबतच्या या त्यांच्या विधानाचा पडताळा त्या कालखंडातील कोणतेही पत्र घेतले तरी येतो. या शब्द योजनेत फारसी बरोबरच अरबी व तुर्की शब्दांचीही भर पडल्याचे दिसते. हे अरबी व तुर्की शब्द फारसीत रूढ होऊन तिच्यामार्फतच मराठीत आले असल्याने त्यांचा उल्लेख फारसी म्हणूनच केला जातो.

साधारणपणे सतराव्या शतकाच्या आसपास फारसी भाषेच्या संसर्गाने व प्रभावाने का होईना, पण विविध प्रकारचे दरबारी शब्द व लेखनपद्धती या बाबी प्रशासनिक मराठीत रूढ झाल्या होत्या. वि.का. राजवाडे संपादित 'मराठयांची इतिहासाची साधने, खंड २०' मधील सुपे-देशपांडे यांचे एक पत्र किंवा कागद आहे त्यावरून प्रशासनिक मराठी प्रशासन क्षेत्रविशिष्ट शब्दसंपत्तीने समृद्ध होत होती असे निदर्शनास येते. उदाहरणार्थ[४] :

१. प्रशासकीय विभागांची नांवे – परगणा, महाल
२. पत्रांचे विविध प्रकार – कौलनामा, खुर्दखत

३. वाक्यप्रयोग – आत्मसुखे लेहून देणे, उजूर ऐकणे, कळहो निवडणे, तालीक घेऊन असेली, फिराऊन देणे, अवलाद अफलाद चालविणे, सरफराजी करणे
४. पदनामे – हवालदार, देशमुख, रख्तवान, देसाई, मोकदम
५. इतर – फर्मान, सिका, मोर्तब

थोडक्यात, बहुसंख्य जनता ही मराठी भाषिक असल्यामुळे व मराठी भाषेचे देवनागरी लिपी लेखनास फारसीच्या लिपीपेक्षा अधिक सोयीस्कर असल्यामुळे, इस्लामी परकीय राज्यकर्त्यांची नसलेली अशी मराठी भाषा, प्रशासनाची सोय म्हणून का होईना, पण प्रशासनात वापरली गेली. मात्र परभाषी राज्यकर्त्यांना समजेल अशा रीतीने तिच्या रूपात आमूलाग्र बदल झाले व तिचे हे फारसी प्रभावित नवे रूप प्रशासनात रूढ झाले. राज्यकर्त्यांना साहाय्यकारी असलेल्या सर्व मराठीभाषी सेवकांनी प्रशासनाच्या वापरातील ही नवी मराठी, बहुधा परकीय सत्तेचा अनुनय करण्यासाठी व गत्यंतर नाही म्हणून पचवली व आत्मसात केल्याचे निदर्शनास येते.

**शिवकालीन मराठी भाषा**

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत स्वराजाच्या प्रशासनात मराठी भाषेचा जास्तीत जास्त व्हावा म्हणून रघुनाथपंत हणमंते यांच्या करवी 'राज्यव्यवहारकोश' आणि बाळाजी आवजी चिटणीस यांच्याकडून 'लेखन प्रशस्ति' हा ग्रंथ तथा नियमावली लिहून घेतला होता. यामुळे[५]

१. शिवकालीन प्रशासनक्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या भाषेमध्ये उत्तरोत्तर मराठी शब्दांचे प्रमाण अधिक होत गेले, पण फारसी शब्द पूर्णतः नाहीसे झाले असे मात्र झाले नव्हते; रूढ व प्रचलित फारसी शब्द कायम राहिले होते.
२. मायने व कालोल्लेख या बाबतीत फारसी व मराठी दोन्ही धर्तीवरील प्रकार आढळतात.
३. वाक्यरचना अधिक भारदस्त, डौलदार व परिणामकारक होऊ लागली. दीर्घ मिश्र वाक्ये व छोटी सुटसुटीत वाक्ये अशी दोन्ही प्रकारची रचना प्रशासनिक मराठीत होऊ लागली.
४. विविध स्तरांवरील व्यक्तींनी एकमेकांशी केलेला पत्रव्यवहार वा राजाने दिलेल्या सूचना यांतील भाषा व्यक्तीसापेक्ष असल्याचे दिसते. प्रशासनिक भाषा वापरणाऱ्या व्यक्तीचा व्यक्तिगत भाषा शैलीचा त्या भाषेवरील ठसा उठून दिसतो.

या काळातील प्रशासन यंत्रणेचा जनतेशी होणारा भाषिक व्यवहार लिखित स्वरूपात फारसा उपलब्ध असल्याचे आढळत नाही. प्रजेतील व्यक्तींना वा देवस्थानांना दिलेल्या सनदा किंवा अभयपत्रे यांना जनता संपर्काची भाषा संबोधता येईल. परंतु प्रशासनिक लिखित भाषा बव्हंशी प्रशासक राज्यकर्ता व प्रशासन यंत्रणेतील विविध स्तरांवरील सेवकवर्ग यांच्यापुरतीच मर्यादित होती.

प्रशासनात वापरल्या जाणाऱ्या भाषेचे स्वरूप विशिष्ट धोरणाने बदलण्याचे प्रयत्न या कालखंडात झाले. शब्द योजनादी वैशिष्टये, राज्यकर्त्यांच्या भाषिक धोरणानुसार काटेकोररित्या न बदलता अर्थाची समर्पकता व बरीच वर्षे रुळल्यामुळे आलेली पर्यायाची परिचितता यांनुसार व्यवहारास सोयीची वाटली त्या प्रमाणातच बदलली.

**पेशवेकालीन मराठी भाषा**

१. शिवोत्तरकालीन प्रशासनक्षेत्रात आढळणा-या मराठी भाषेने प्रशासनक्षेत्रातील शब्दयोजना व वाक्यप्रयोग या बाबतीत फारसीची वैशिष्ट्ये पचवून स्वत:चे वेगळेपण निर्माण केले होते.[६]

२. मायने व कालोल्लेख इत्यादीबाबत मराठीला साजेशा पद्धतीतीने आत्मसात केली होती.

३. अधिकाऱ्यांची पदनामे बहुतेक शिवपूर्वकाळातील फारसीच राहिली.

४. याकाळात शिवकाळाच्या तुलनेने पत्रांच्या प्रकारांची विविधता अधिक आढळते.

५. प्रशासनिक भाषेची वेगळी भाषासरणी निर्माण झाली होती असे मात्र या मराठी बद्दल म्हणता येत नाही; उलट प्रशासनक्षेत्रातील मराठी भाषेवर शब्दयोजना मांडणी या बाबतीत भाषा वापरणा-या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा आढळतो.[७]

शब्द योजना, पत्रांचे विविध प्रकार व त्यांचे विशिष्ट मायने या दृष्टींनी प्रशासनिक भाषा वैशिष्ट्यपूर्ण व सामान्य भाषिक व्यवहारातील स्वरूपापेक्षा वेगळी बनण्यास प्रारंभ झाला होता असे जाणवते.

**इंग्रज कालीन मराठी भाषा**

इंग्रजी अंमलाच्या कालखंडातील प्रशासनीक मराठीमध्ये तत्पूर्वकालीन प्रशासनीक मराठीपेक्षा बरेच बदल घडून आल्याचे वरील विवेचनावरून निदर्शनास येते.

१. शब्दयोजनेबाबत जुने प्रचलित शब्द कायम राहून त्याशिवाय बरेचसे इंग्रजी शब्दही – विशेषतः पदनामे व कार्यालयांची नांवे – देवनागरी लिपीत समाविष्ट झाल्याचे दिसते.[८]

२. मायने व कालोल्लेख यांच्या जुन्या पद्धती वापरात असलेल्या दिसतात. परंतु त्याबरोबरच इंग्रजी धर्तीनुसार लिहिलेले मायने व कालोल्लेखही आढळतात.

३. कागदपत्रांच्या प्रकाराचे नाव नमूद करण्याबाबतही नवीन पद्धत रूढ झाल्याचे दिसते.

४. वाक्यरचनेच्या संदर्भात इंग्रजांच्या भाषेचा प्रभाव मराठीवर पडल्याचे दिसते.[९]

५. याखेरीज शैलीच्या दृष्टीने फार मोठा फरक येथे दृष्टीस पडतो. लिहिणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिगत शैलीऐवजी व्यक्तीनिरपेक्ष लेखनपद्धती वापरली गेल्याचे दिसते व त्यामुळे भाषेच्या मांडणीतही फरक पडलेला दिसतो.[१०]

६. प्रशासनीक मराठीमधील शब्दयोजनेचे स्वरूप कसे आहे व कसे असावे याबाबत निश्चित धोरण ठरवून कोशनिर्मितीच्या साह्याने शब्द समृद्धीचे प्रयत्न झाल्याचे दिसते.

इंग्रजी अंमलामध्ये अस्तित्वात आलेल्या नवीन अधिकार पदांचे उल्लेख देवनागरीत जसेच्या तसे वा किंचित फरकाने आल्याचे दिसते. उदाहरणादाखल करनेल, गवरनर, कौंशल, पोष्ठ मास्तर जनराल, रेसिडेंट, असिस्टंट सिकरटरी, पोलिटीक्याल यजीट, बेलीफ, कलेक्टर शेरीफ, सिकर्टरी, शिकरटरी, सकत्री, पोलीस कमिशनर असे कित्येक शब्द देता येतील. पदनामांखेरीज कोर्ट ऑफ दिरक्टरस, गौरमेंट, जर्नेल, ट्रेजरी, रिपोर्ट, सर्क्युलर हुकूम, कंपनी, लेसने, कस्टम हौस, कोआपेरेटिव सोसायटीज आक्ट, फंड, मेंबर, हपीसाचा वेळ, नंबर,

पास स्टांडर्ड टाईम, सेक्शन, सी.आय.डी., प्लीडर असे कित्येक इंग्रजी शब्द या प्रशासनिक मराठीने आपल्यात सामावून घेतलेले दिसतात. त्याच बरोबर पूर्वकालीन प्रचलित फारसी शब्दही प्रशासनिक मराठीत कायम राहिलेले दिसतात. डाक, मक्ता, अर्जी, तर्फेने, लाखोटा, खबर, पाव कलाकाचा औकाश, बरसादीचे दिवसात, जलदीची डाक, जाबसाल, मालूम, इन्साफ करणे, दर्या, हुद्दा, हजर, मलिक मा आझमा असे काही शब्द उदाहरणादाखल देता येतील.[११]

या कालखंडात आपण वरील विवेचनावरून इंग्रजी राजवटीतील प्रशासकीय कामकाजातील मराठी आणि इंग्रजी संमिश्र भाषेचे परिणाम पाहिलेले आहे. असेच परिणाम अ-प्रशासकीय म्हणजे सामान्य जनतेच्या दररोजच्या जीवनातही झालेला दिसून येतो.

**संशोधन पद्धती**

उपरोक्त संशोधन लेखासाठी पुराभिलेख संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. याकरीता प्राथमिक व दुय्यम साधनांचा तसेच मूळ कायद्यांचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधन आणि चर्चा**

इसवी सन १७ व्या शतक ते २० व्या शतकात या कालावधीत मराठी भाषेवर फारसी व इंग्रजी भाषेचा परिणाम या विषयावर संशोधन लेख करण्याचा हेतू असा की, या कालावधीत आणि या कालावधीच्या आधी महाराष्ट्र प्रदेशावर जसजसे विविध सत्ताधीशांचे आक्रमण झाले त्यानुसार त्यांचे वर्चस्व प्राप्त झाले. तसे त्या त्या राजकर्त्यांनी त्यांची बोली व प्रशासकीय भाषा स्थानिक नागरिकांवरही लादला आहे. त्यामुळे येथील स्थानिक भाषा त्यांच्या परकीय भाषेत समरस होऊन सामान्य नागरिकांत रूढ झालेली होती आणि ती आजतागायत तसेच कार्यरत असल्याचे निदर्शनास येते.

**निष्कर्ष**

कोणत्याही भाषेचा उदगम त्या त्या विशिष्ट प्रदेशात तथा नागिरकांच्या सोयीसाठी निर्मिती झालेली असले तरी, कालांतराच्या ओघाने सदर मूळ भाषेवर इतर भाषेचा कोणत्या ना कोणत्या परिस्थितीत तथा त्यातील शब्दांचा प्रभाव प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पडत असतो. त्यामुळे मूळ भाषेचा अभ्यास करताना त्या समवेत त्या काळाचा ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, भौगोलिक घटनांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. अन्यथा भाषेचा अभ्यास निरर्थक ठरतो.

**संदर्भ**

१. कुलकर्णी पां. कृ., (१९९३), मराठी भाषा उद्गम व विकास, पृ. १६८
२. नाहटा विजय, (२०११) ऑक्टोबर, संपादक-मासिक लोकराज्य, अंक ७, पृ. १६
३. राजवाडे वि. का., (शके १८३७), राजवाडे लेख संग्रह भाग एक, खंड ८, पृ. ३८२-३८४
४. राजवाडे वि.का., (शके १८३७), मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड २०, पृ. २
५. मुजुमदार गं. ना., (१९३०), संपादित-शिव चरित्र साधने, खंड -२, ले.१३९, पृ. १७१

६. राजवाडे वि.का., (१९०३), मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड ८, ले.३१

७. पटवर्धन पां.न., (१९३०), संपादित-शिव चरित्र साधने, खंड -२, ले.१४५

८. बोबरेकर-शिंदे, (१९७१), संपादक-कोल्हापूर इतिहासाची साधने, ले.१

९. सरदेसाई ग. स., (१९३०), संपादक-ऐतिहासिक पत्रे, पुणे, ले. ४१७

१०. मालशे स.गं., संपादक-एस.एन.डी.टी., उपरोक्त, पृ. ६१-६७

११. दिकोंडा गोवर्धन, अप्रकाशित प्रबंध पश्चिम भारतातील लेखन व कागद यांचा इतिहास (इसवी सन १६०१ ते इसवी सन १८६०), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# ६. राजर्षी शाहू पूर्वकाळातील कोल्हापूर राज्यामधील स्थितंतरे

**डॉ. खंडेराव शिंदे**
इतिहास विभाग, राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी जि, कोल्हापूर.

**प्रास्ताविक**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे अठराव्या शतकातील पहिल्या दशकात महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू महाराज यांच्यातील संघर्षांतून सातारा व कोल्हापूर अशी दोन राज्ये निर्माण झाली. १७१० मध्ये महाराणी ताराबाईंनी कोल्हापूर राज्याची स्थापना केली. अशा या राज्याची राजधानी १७८८ पर्यंत पन्हाळगडावर होती. अशा कोल्हापूर राज्यात एकोणिसाव्या शतकात अनेक महत्वाची स्थितंतरे घडून आली. ती आपल्यापुढे ठेवण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधात केला आहे.

करवीर छत्रपती शिवाजी दुसरे (१७६२-१८१३) यांनी १७८८ मध्ये पन्हाळ्याहून कोल्हापुरला राजधानी आणल्यावर भुईकोट किल्ला बांधला. लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून पद्माळे तळे बांधून घेतले. पण याहीपेक्षा त्यांच्या काळातील महत्त्वाची घटना म्हणजे राज्याशेजारील सिधोजीराव निपाणकर व सावंतवाडीकर यांचा त्रास कोल्हापूर राज्याला होऊ लागला. यांचा बंदोबस्त करण्यासाठी या करवीर छत्रपतींनी १ ऑक्टोबर १८१२ रोजी इंग्रजांशी तह करून मदत मिळवण्याचा प्रयत्न केला. या तहामुळे निपाणकर व सावंतवाडीकर यांनी कोल्हापुरचे जे प्रदेश व किल्ले घेतले होते ते इंग्रज करवीर छत्रपतींना परत मिळवून देणार होते.[1] या तहामुळे करवीर छत्रपतींची उज्ज्वल परंपरा नष्ट होऊन कोल्हापूर 'स्वतंत्र' राज्य न राहता इंग्रजी सत्तेच्या संरक्षणाखालील संस्थान बनले.

छत्रपती शहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराज (१८२१-३८) यांच्या काळात १८२६ ला इंग्रजांशी तह झाला. या तहामुळे छत्रपतींना आपली फौज कमी करण्याचे मान्य करावे लागले. शिवाय या तहाने काही जहागिरदारांना नुकसान भरपाई देण्याचे मान्य करावे लागले . यामुळे जहागिरदारांच्या मनात बंडखोरीचा विचार येऊ लागला. या तहानंतर १८२९ मध्ये एक तह झाला. या तहामुळे छत्रपती लष्करी नियंत्रण व मुलकी कारभार इंग्रजांकडे गेला. या तहानुसार इंग्रज आपल्या पसंतीचा अधिकारी 'कारभारी' म्हणून नेमणार होते.[2] म्हणजे या दोन्ही तहानुसार छत्रपतींच्या सत्तेवर मर्यादा येऊन इंग्रजांचे वर्चस्व निर्माण झाले. या शिवाय जहागिरदारांनी गरज नसताना नवीन सैन्य किंवा विदेशी लोक ठेवू नये असे १८३९ मध्ये इंग्रज अधिकाऱ्याने जाहीर केले.[3] याचाच अर्थ इंग्रजानी आपल्या सत्तेचा पाश कोल्हापूर राज्याभोवती आवळायला सुरुवात केली होती.

**इंग्रजांचे कारभारी**

सन १८२९ च्या तहानुसार मार्च १८४३ मध्ये रामचंद्रपंत राजाज्ञा यानी राज्याच्या कारभाराची सुत्र हाती घेतल्यानंतर त्यांनी प्रशासनावर वचक निर्माण करण्यासाठी एक हुकूम काढला. त्यानुसार कोल्हापूर दरबारच्या घोडेस्वारांनी नियमितपणे कामावर हजर राहावे, सर्वांनी घोडे दाखवावे व त्यांच्या चंदीवैरणीचा

हिशेब दाखवावा. जर हिशेब दाखवला नाही तर चंदीवैरणचा खर्च बंद करण्यात येईल असे स्पष्ट केले. पण बरेचजण घोडे न ठेवता त्याचा खर्च घेत होते त्यामुळे राजाज्ञाविरुद्ध राज्यात दंगा झाला.

पण राजाज्ञांच्या काळात फार सुधारणा झाल्या नसल्याने दाजी कृष्ण पंडित यांची फेब्रु १८४४ मध्ये कोल्हापूरचे मुख्य कारभारी म्हणून नियुक्त केले. पंडितानी सुत्रे हाती घेताच खजिना तपासायला सुरुवात केली. पण रोजकिर्द व खजिन्यातील रक्कमेचा ताळमेळ बसत नव्हता. म्हणून त्यांनी इतरही विभागावर वचक निर्माण केला. पंडितापूर्वी राज्यातील प्रत्येक किल्ल्यावर एक असे एकवीस मामलेदार होते. ती व्यवस्था बंद करून राज्याचे सहा पेट्यात विभाजन करुन प्रत्येक पेट्यावर एक मामलेदार

**सेमस्रातील** उठाव

सन १८१२ पासून कोल्हापूर राज्यावर इंग्रजी पाश आवळले जाऊ लागले. यातच दाजी पंडिताने निर्माण केलेली नवीन व्यवस्था गडकऱ्यांना मान्य नव्हती. पंडितापूर्वी गडकऱ्यांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी किल्ल्याच्या आसपास असणाऱ्या जमिनी दिल्या जात. पण त्यावर शेतसारा आकारला जात नव्हता. या नवीन व्यवस्थेमुळे गडकऱ्यांचा शेतसारा भरायला पाहिजे असे सांगितले. पण हा गडकऱ्यांना कमीपणा वाटल्याने राज्यातील सर्वच किल्ल्यांवर १८४४ चा उठाव घडून आला. पण हा उठाव इंग्रजांनी सहजपणे दडपून टाकला.

सन १८४९ मध्ये राज्यात इनाम चौकशी सुरु झाली. यामुळे कोल्हापूर राज्यातील अनेक इनामदार, सरदार दुखावले गेले. म्हणजे ब्रिटिश राजवटीची झळ अनेकांना बसली. त्यामुळे या राजवटीबद्दल लोकांच्या मनात असंतोष खदखदत होता. या असंतोषाला १८५७ च्या उठावाने वाचा फोडली. पण या उठावात जहागिरदारांनी भाग घेऊ नये म्हणून त्यांना धमकी वजा खलिते पाठवले होते. त्यामुळे जहांगिरदारांनी उठावात भाग घेतला नाही.[7] परिणामी इंग्रजांनी उत्तरेप्रमाणे कोल्हापूर राज्यातील उठाव दडपून टाकला.

**शिक्षणक्षेत्रातील बदल**

सन १८४५ पासून कोल्हापूर राज्यात नवीन कारभार व्यवस्था निर्माण झाली. या नव्या व्यवस्थेनुसार कोल्हापुरचा पहिला " पोलिटिकल सुपरिटेंडेंट ' म्हणून मेजर ग्रॅहमची नेमणूक झाली.[8] मेजर ग्रॅहम यांनी सरकारी खर्चाने शाळा चालवून जनतेला शिक्षण देण्याची व्यवस्था केली. १८४८ मध्ये राज्यात चार सरकारी शाळा सुरु झाल्या. १८५१ मध्ये पहिली इंग्रजी शाळा सुरु झाली. तर १८५३ मध्ये कोल्हापुरात पहिली मुलींची शाळा सुरु झाली.[9]

कर्नल अंडरसन हे कोल्हापुरचे ' पोलिटिकल एजंट ' असताना शिक्षणक्षेत्रात अनेक सुधारणा झाल्या. यांच्याच काळात १८६७ ला कोल्हापुरात हायस्कूलची स्थापना झाली. मराठी शाळांची तपासणी करण्यासाठी 'डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर' ची नेमणूक करण्यात आली. मराठी शाळेच्या शिक्षकांना ट्रेनिंग देण्यासाठी 'ट्रेनिंग स्कूल' सुरू केले. बालक्रीडा मंदीर, ऊर्दू शाळा सुरु करण्यात आली

सन १८७१ मध्ये कोल्हापुर शहरात पहिली रात्रशाळा सुरु झाली. यामुळे दिवसा काम करुन रात्री शिक्षण घेण्याची व्यवसथा मजूर व कामगारांना झाली.[10] १८८० मध्ये राजाराम कॉलेज स्थापना झाली. पुढे याच कॉलेजमध्ये राजर्षी शाहूंनी सर्व जातीच्या विद्यार्थ्यांसाठी एक वसतीगृह १८९६ मध्ये सुरु केले होते.

**कायद्याची राजवट**

इंग्रजांनी आपल्या प्रशासनाबरोबरच राज्यात अनेक कायदे लागू केले. लॉर्ड बेटिंक यांनी हिंदुस्थानात १८२९ ला सतीबंदी कायदा लागू केल्यावर कोल्हापूर राज्यात हा कायदा ११ मार्च १८४१ रोजी लागू केला.[11] हा सतीबंदी कायदा लागू केल्यानंतर राज्यात कोणीही सती गेल्याचे दिसत नाही. राज्यात मनुष्य खरेदी - विक्री होत असावी म्हणूनच खरेदी विक्री करु नये यासाठी ३ ऑगस्ट १८४१ रोजी पत्राने लोकांना कळविले होते.[12] सन १८६९ मध्ये राज्यात स्वतंत्र पोलिस खात्याची निर्मिती करुन संरक्षण व्यवस्था व कायद्याची अंमलबजावणी केली होती. राज्यातील जंगलाची व्यवस्था व संरक्षण करण्यासाठी सन १८८० मध्ये जंगल कायदा केला होता.

१ जानेवारी १८९० पासून राज्यात जुगार खेळण्यावर बंदी घातली होती. १८९२ पासून अफू व दारु विक्रीसाठी परवाना द्यायला सुरुवात केली होती.[13] १८ सप्टेंबर १८९४ पासून गांजा विक्रीसाठी परवाना आवश्यक केला होता.

**आरोग्य व्यवस्थेतील बदल**

ब्रिटिश राजवटीपूर्वी उपचारासाठी स्वतंत्र असे दवाखाने नव्हते. गावातील वैद्य रोग्यावर उपचार करत. पण कोल्हापूर राज्यावर ब्रिटिश राजवट सुरु झाल्यावर सन १८४७ मध्ये कोल्हापूर येथे पहिला सार्वजनिक दवाखाना सुरु झाला.[14] या दवाखान्यात अनेक रोगांवर उपचार केले जात. सन १८८३-८४ मध्ये कोल्हापूरात अल्बर्ट एडवर्ड हॉस्पीटल सुरु झाले. याच हॉस्पीटलमध्ये वेड्यांवर उपचार करणारा विभाग सुरु केला.[15] याच हॉस्पिटलमध्ये मुलींना परिचारिका शिक्षण, सुईणकाम वर्ग सुरु करण्यात आले होते.

तुरुंगातील आजारी कैद्यांवर उपचार करण्यासाठी मध्यवर्ती तुरुंगात 'जेल हॉस्पिटल' सुरु केले. १८८३-८४ मध्ये राज्यात देवीची लस द्यायला सुरुवात केली.[16] माणसांप्रमाणे जनावरांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी १८८१-८२ मध्ये कोल्हापूर येथे जनावरांचा दवाखाना सुरु केला होता.

**व्यापार व उद्योगांवर परिणाम**

कोल्हापूर राज्यात विविध उद्योग - धंदे चालत होते. पण इंग्रजांनी जशी आपल्या सत्तेची पकड आवळायला सुरुवात केली तशी त्याचा परिणाम राज्यातील उद्योगांवरही झाला. बांगड्या तयार करण्याचा उद्योग राज्यातील काही गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर चालत होता पण राज्याबाहेरुन सुबक, देखण्या व टिकाऊ बांगड्या येऊ लागल्याने राज्यातील बांगडी उद्योगाला उतरती कळा लागली. राज्यात सुती विणकाम हातमागावर चाले. पण इंग्लडहून कापड येऊ लागल्याने विणकाम उद्योगाला तेजी नव्हती. राज्यात कागद तयार करण्याचे कारखाने होते पण युरोपियन चांगला व स्वस्त कागद राज्यात आल्याने कोल्हपुरी कागदाची मागणी कमी झाली.[17]

**दळण-वळण व्यवस्थेत बदल**

कोल्हापूर राज्यावर ब्रिटिश अंमल सुरु होण्यापूर्वी राज्यात कोठेही चांगले रस्ते नव्हते. मात्र १८४५ पासून राज्यात रस्ते विकासाला सुरुवात झाली. १८४५-१८५४ या काळात राज्यात ४८० किमीचे रस्ते झाले.[18] यामध्ये सध्याच्या पुणे - बेळगाव महामार्गाचा समावेश होता. १८४८ ला राज्यात एकच वजनमापे लागू केली. १८६८ ला पन्हाळी रुपया बंद करून कंपनी नाणे सुरु केले. कोल्हापुरात १८५४ ला तार ऑफिस व १८८७ ला पोस्ट ऑफिस सुरु झाले. यामुळे पत्रव्यवहार सुलभ झाला होता. राज्यातील बांधकामे व रस्त्यांवर देखरेख ठेवण्यासाठी १८७९ मध्ये स्वतंत्र असा 'ईक्झिकेटिव्ह इंजिनिअर' नेमला होता. सन १८६७

मध्ये न्यायाधिश कोर्टाची स्थापना झाली.[19] ८ मे १८८८ रोजी राजर्षी शाहूंच्या हस्ते कोल्हापूर - मिरज रेल्वेची पायाभरणी झाली.

२ एप्रिल १८९४ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी राज्याभिषेक करून घेऊन इतिहासाला कलाटणी दिली. सन १८९६ कोल्हापूर राज्यात दुष्काळ पडला तेव्हा राजर्षी शाहूंनी या दुष्काळाला तोंड देण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या. त्यामध्ये पाण्यासाठी जुन्या विहीरींचा गाळ काढला, नवीन विहीरी खोदल्या, नवीन तलाव बांधले, दुष्काळ कामावर काम करणाऱ्या मजुरांच्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी दुध - पाण्याची मोफत सोय करून भारतातील पहिले 'पाळणाघर' सुरु केले. राज्यात पुन्हा दुष्काळाची झळ बसू नये म्हणून राधानगरी धरणाचा पाया घातला. हे भारतातील पहिले धरण राजर्षी शाहूंनी बांधले. राजर्षी शाहूंच्या या कार्यामुळे आजच्या कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या १२५ वर्षात दुष्काळाने साधे डोकावलेसुद्धा नाही.

**समारोप**

कोल्हापूर राज्यात ब्रिटिश अंमलानंतर राज्याच्या सर्व घटकांवर चांगले - वाईट परिणाम झाले होते. त्याची झळ अनेकांना बसली. त्याचे चांगले वाईट परिणाम झाले. कारभारात एक वाक्यता निर्माण झाली.

"राजर्षी शाहू पूर्वकाळातील कोल्हापूर राज्यामधील स्थितंतरे" या विषयाच्या अनुषंगाने शोध घेतला असता सारांश रुपाने खालीलप्रमाणे निरीक्षणे नोंदविता येतील.

1. करवीर छत्रपती व कंपनी सरकार यांच्यात झालेल्या १८१२, १८२६ व १८२९ च्या तहामुळे छत्रपतींची उज्ज्वल परंपरा नष्ट होऊन इंग्रजी सत्तेच्या संरक्षणाखालील एक संस्थान बनले.
2. ब्रिटिश राजवटीमुळे जनतेल शिक्षण देण्याची व्यवस्था झाली. शिक्षणावर लक्ष देण्यासाठी "डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर" ची नेमणूक करण्यात आली. शिक्षकांसाठी ट्रेनिंग स्कूल व रात्रशाळा सुरु झाल्या.
3. ब्रिटिश राज्यातील कायदे कोल्हापूर राज्यातही लागू केले. त्यामुळे सती बंदी, मनुष्य खरेदी - विक्री बंदी, नशेले पदार्थ विकण्याला परवाना सुरु केला.
4. रोग्यांवर इलाज करण्यासाठी दवाखाना, हॉस्पिटल सुरु केले. जनावरांसाठीही दवाखाना सुरु केला.
5. राज्यातील उद्योगांवर वाईट परिणाम होऊन उद्योगांमध्ये मंदी आली होती.
6. ब्रिटिश राजवटीमुळे राज्यात पक्के रस्ते, पोस्ट व तार ऑफिस सुरु होऊन दळणवळण सुलभ झाले.
7. राजर्षी शाहूंनी कोल्हापूर-मिरज रेल्वे सुरु केल्याने कोल्हापूर राज्याचा चांगला विकास झाला.
8. राजर्षी शाहूंच्या कल्पकतेतून राधानगरी धरणाची निर्मिती झाली.

**संदर्भ**

१. गर्गे स. मा. - करवीर रियासत पृ - ३९५

२. Graham D. C. - Staistical Report on the Kolhapur state P. ३७०

३. गुजर मा. वि. करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने खंड - ७ पत्र क्र.३९, ४०

४. मोडक बा. प्र. कोल्हापूर राज्याचा इतिहास ( १८९३ ) पृ - ९२ - ९४

५. Kolhapur Archives - General file No.२१६ , General Administration file लोटते No २५ June १८४

६. गर्गे स. मा. करवीर रियासत पृ - ५३५-५३६
७. वर्टीकर श. ह. कापशीकर - सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे पृ - २४४-२४५
८. Kolhapur Archives - General file No. ५७ Letter No. १७१३, letter No. ७२६
९. गर्गे स. मा. करवीर रियासत पृ -५७६
१०. Administration Report of the Kolhapur state for the year १८९३ - ९४ P १४२
११. Graham D. C. - Staistical Report on the Kolhapur state P. ५७६
१२. गुजर मा. वि. - करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने खंड -७ पत्र क्र . २८,२९
१३. करवीर सरकारचे मुलकी वटहुकूम खंड १ पृ - २७
१४. कोल्हापूर गॅझेटिअर (१८८३) पृ - ४३२-४३३
१५. Kolhapur Archives - Albert Edwards Hospital opening file year १८८४
१६. कोल्हापूर गॅझेटिअर पृ - ४३४
१७. Industrial Survey of the Kolhapur Territory १८९५ P - २१to ५
१८. कोल्हापूर गॅझेटिअर (१८८३) पृ - २८९
१९. बगाडे द. रा. - छ. शाहू महाराज आणि कायदेकानू १९ ८२ पृ. ६३

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# ७. दलित चळवळीतील दीक्षाभूमी चे योगदान एक अभ्यास

**अमितकुमार शंकराव गागरे**
सहाय्यक प्राध्यापक, आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा.

**प्रास्ताविक**

शिक्षण हा मानवी विकासाचा केंद्रबिंदू आहे मानवाच्या सामाजिक राजकीय आर्थिक विकासामध्ये शिक्षणाची भूमिका ही मध्यवर्ती आहे. राष्ट्राचा विकास व प्रगती शिक्षणावर आधारित असते त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला त्याची जन्मजात प्रतिष्ठान तसेच जीवनस्तर उंचावण्यासाठी शिक्षण मिळणे आवश्यक आहे किंबहुना तो व्यक्तीचा हक्क आहे.

मानवाच्या विकासातील हे शिक्षणाचे महत्त्व लक्षात आल्यामुळे शिक्षण संघटन व संघर्ष आणि धम्मचक्र परिवर्तन यांच्या माध्यमातून हजारो वर्ष गुलामगिरीच्या खाईत लोटलेल्या लाखो दीनदलित पीडितांच्या पुनरुत्थानाचे महान कार्य महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे.

**दीक्षाभूमी बहुजनांचे शक्तिपीठ**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धार्मिक व सामाजिक पारतंत्र्याच्या नरकात खितपत पडलेल्या समाजामध्ये सामर्थ्य स्वाभिमान व आत्मविश्वास निर्माण व्हावा म्हणून धर्मांतर केले ते नाग लोकांच्या पवित्र भूमीत न्यायावर व समतेवर आधारलेल्या महान धर्माची तत्वज्ञानाची व संस्कृतीची बौद्ध धर्माची दीक्षा त्यांनी दिनांक 14 ऑक्टोबर 1956 ला लाखो अनुयायांसह घेतली. ही एक महान ऐतिहासिक क्रांतिकारक घटना होती हीच ती दीक्षाभूमी सर्वांचे श्रद्धास्थान बनली दीक्षाभूमी हे मानवतेला पडलेले एक सुंदर स्वप्न आहे गुलामगिरीचे जोखड व समाजाची जीर्ण झालेली चौकट उखडून टाकून सामाजिक न्याय व समतेवर आधारित नवसमाज निर्माण करणारे प्रेरणास्थान म्हणजे दीक्षाभूमी.

चिरंतन मूल्यांवर आधारलेले नवे जीवन देणारी अभ्युदयाची संजीवनी देणारी नवयुगाची निर्माती म्हणजे दिक्षाभूमी उत्कर्षाच्या मार्गावरील दीपस्तंभ म्हणजे दीक्षाभूमी मानवी समता आणि हक्क यासाठी लढताना अन्यायाविरुद्ध प्रतिकार करताना हातात बंडाचा झेंडा घेऊन उभे राहण्याचे स्फूर्ती देणारी की दीक्षाभूमी दलितांच्या उत्थानाचे स्थान व अष्टोप्रहर ज्ञानाचे धगधगते अग्निकुंड पेटवून समाजात चैतन्य निर्माण करते ती दीक्षाभूमी प्रज्ञा शील करुणा यांचा त्रिवेणी संगम म्हणजे दीक्षाभूमी. समाजात नवे विचार नव्या प्रेरणा नवे दृष्टिकोन निर्माण करून त्यांचा प्रसार करण्यात अग्रभागी असणारे भूमिती दीक्षाभूमी नव्या उन्मेशा चे अंकुर फुलवणारी भूमी ही दीक्षाभूमी अशा या भूमीवर असून आज अनेकांनी सामाजिक क्रांतीची स्मृती घेऊन तेजाची स्वाभिमानाची ज्योत स्वतःमध्ये व समाजात सतत तेवत ठेवली आहे सामान्य जनांना असामान्य सामर्थ्य प्राप्त करून देऊन त्यांच्या जीवनाच्या सामाजिक आर्थिक राजकीय

शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांना प्रभावित करून त्यांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे महान कार्य दीक्षाभूमी ने केले आहे म्हणूनच दीक्षाभूमी म्हणजे सर्व बहुजनांची शक्तिपीठ आहे.

**शिक्षण एक सामाजिक क्रांतीचे साधन**

शिक्षणाच्या माध्यमातून मानवी विकासाचे कार्य पुढीलप्रमाणे घडून येते आहे

ज्ञान संपादन
अंगभूत क्षमतेचा विकास
कौशल्यात वाढ
शिक्षण → बौद्धिक विकास
सामाजिक जाणिवांचा विकास
मूल्य व श्रद्धा यांचे संवर्धन

सामाजिक क्रांतीचे परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन म्हणून शिक्षणाचा विचार केला जातो समाजातील लोकांच्या विचारांना चालना देऊन सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य शिक्षण करते सामाजिक परिवर्तनाची गती ही शिक्षणावरच अवलंबून असते ज्या समाजात शिक्षणाचा प्रसार होतो त्या ठिकाणी सामाजिक परिवर्तन जास्त वेगाने घडून येते

**अनुसूचित जातीची सद्यस्थिती**

अनुसूचित जातीची लोकसंख्या

अनुसूचित जातीमध्ये 400 पेक्षा जास्त जाती येतात देशातील अनुसूचित जातींची लोकसंख्या व त्याचे प्रमाण पुढील प्रमाणे

कोष्टक क्रमांक एक

**अनुसूचित जातीची लोकसंख्या व प्रमाण**

| अ. क्र | देश/राज्य | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जातीची लोकसंख्या | अनु. जातीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | भारत | १,०२८,६१०,३२८ | १६६,६३५,७०० | १६.२% |
| २ | पंजाब | २४,३५८,९९९ | ७,०२८,७२३ | २८.९% |
| ३ | महाराष्ट्र | ९६,८७८,६२७ | ९,८८१,६५६ | १०.२% |

सर्व राज्यात पंजाब मध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वात जास्त आहे तर उत्तर प्रदेश पश्चिम बंगाल तमिळनाडू आंध्र प्रदेश व बिहार या राज्यात देशाच्या एकूण अनुसूचित जातींच्या लोकसंख्येपैकी ५३.३६% लोकसंख्या आहे

**साक्षरतेत वाढ**

अनुसूचित जातीच्या साक्षरतेत साक्षरतेत वाढ झालेली आहे ते पुढील प्रमाणे

कोष्टक क्रमांक दोन

अनुसूचित जातीच्या लोकांच्या साक्षरतेचे प्रमाण

| अ. क्र | देश/राज्य | साक्षरतेचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | भारत | ५४.६९% |
| २ | महाराष्ट्र | ७१.९०% |

अनुसूचित जातीच्या साक्षरतेच्या प्रमाणात सतत वाढ होत आहे 1991 ते 2000 या कालावधीत अनुसूचित जातींच्या साक्षरतेच्या प्रमाण ३७.४१ वरुन ५४.६९% वर गेले आहे. या दहा वर्षात १७.२८% नि वाढ झालेली आहे.

**पटनोंदणीचा वाढता दर**

अनुसूचित जातीच्या पटनोदणीच्या दर सतत वाढत चाललेला आहे

**कोष्टक क्रमांक ३**

**अनुसूचित जातीच्या लोकांच्या पटनोदनीचे प्रमाण**

| अ. क्र | देश/राज्य | पटनोदनीचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | भारत | ८३.३५% |
| २ | महाराष्ट्र | १००.८६% |

**गळती दर**

अनुसूचित जातीच्या गळतीचा दर सतत कमी होत चाललेला आहे तो पुढीलप्रमाणे

**कोष्टक क्रमांक ४**

**अनुसूचित जातीतील मुला मुलींच्या गळतीचे प्रमाण**

| अ. क्र | वर्ष | इयत्ता १ली ते ८वी | | |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण |
| १ | २००१ - २००२ | ५८.६ | ६३.६ | ६०.७ |
| २ | २००४- २००५ | ५३.७ | ५७.३ | ५५.२ |

अनुसूचित जातींच्या गळतीचा दरही कमी होत आहे त्याची बरीच कारणे आहेत त्यात कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात झालेली वाढ पालकांचे शिक्षण घरातील व शाळेतील शैक्षणिक वातावरण इत्यादींचा समावेश आहे तसेच दहावी व बारावी इयत्ता मध्ये उत्तीर्ण यांच्या प्रमाणात वाढ झालेली आहे स्पर्धा परीक्षेतील यश यामध्ये वाढ झालेली आहे त्यामुळे शिक्षणाचा प्रसार व विकास होत असलेला दिसून येतो

**अनुसूचित जाती मध्ये झालेल्या शिक्षण प्रसार मागील कारणे**

**घटनात्मक तरतुदी**

भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जातीच्या शिक्षणाला सहाय्यभूत ठरणाऱ्या तरतुदी आहेत त्यामध्ये कलम यांचा समावेश आहे या तरतुदीमुळे अनुसूचित जातीच्या शिक्षणाला चालना मिळालेली आहे

**शासकीय योजना**

अनुसूचित जातीच्या लोकांत शिक्षणाचा प्रसार व्हावा व त्यांच्या विकासाला चालना मिळाली म्हणून सरकार अनेक योजना राबवित असते यामध्ये शिक्षण फी माफी व इतर सवलती शिष्यवृत्ती पुस्तक पेढी योजना राजीव गांधी राष्ट्रीय योजना विशेष मार्गदर्शन वर्ग परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती वसतिगृहाची सोय शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण इत्यादींचा समावेश आहे यासंदर्भात पंचवार्षिक योजना केंद्रीय अंदाज पत्रकात ही तरतूद करण्यात येत असते

दीक्षाभूमी ची प्रेरणा

घटनात्मक तरतुदी शासकीय योजना त्याचप्रमाणे दीक्षाभूमीची शैक्षणिक प्रेरणा हिचाही अनुसूचित जातीच्या शैक्षणिक प्रगतीत महत्वाचा वाटा आहे दीक्षाभूमीच्या प्रेरणेमुळेच अनुसूचित जातींचा शैक्षणिक विकास साध्य होत आहे यामुळेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मंत्र शिका संघटित व्हा व संघर्ष करा पूर्णत्वास जात आहे दलितांना आत्मदहनाचा राजमार्ग मिळालेला आहे दीक्षाभूमीवर आलेला बहुजन समाजातील माणूस किंवा दलित समाजातील माणूस येथे येऊन शिकण्याची संघर्षाचे प्रेरणा घेऊनच घरी जातो.

**सारांश**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारी सामाजिक क्रांती शिक्षणाशिवाय शक्य नाही. शिक्षण शहरीकरण व्यवसायात बदल धर्मांतर यामुळे सामाजिक गतिमानता त्यात वाढ होऊन अनुसूचित जातीच्या सामाजिक आर्थिक व राजकीय स्थितीत परिवर्तन होत आहे दीक्षाभूमी पासून शिक्षणाच्या प्रेरणा घेऊन मिळालेल्या शिक्षणाचे बळ पंखात भरून अनेकांनी स्वकर्तृत्वाच्या उंचच आकाशात घेतलेली आहे शिक्षणाच्या बळावर अनेक जण सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात चांगली कामगिरी बजावत आहेत दीक्षाभूमी मुळेच दलित समाजाच्या स्व जाणिवेत व आत्मसन्मान यात वाढ होऊन त्यांना एक नवी ओळख प्राप्त होत आहे शिक्षणामुळेच आज विविध व्यवसायात ते आपले स्वतंत्र स्थान निर्माण करीत आहे दीक्षाभूमी ने सर्वांना शैक्षणिक दृष्टिकोन प्रेरणा व स्फूर्ती देण्याचे कार्य केले आहे आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही घट्ट पाय रोवून उभे राहण्याची ताकद दीक्षाभूमी मुळे मिळालेली आहे यामुळे दलितांचा शैक्षणिक विकास होऊन त्यांचा शैक्षणिक स्तर उंचावतो आहे दीक्षाभूमी चा हा वैचारिक वारसा अधिक विकसित करणे उन्नत करणे बहुजन समाजाच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


- चौधरी रा.व. 2011, भारताचे संविधान पुणे चौधरी लॉ पब्लिशर्स
- घांगरेकर ची. ग. 2009, भारतीय राज्यघटना नागपूर श्री मंगेश प्रकाशन
- गायकवाड ज्ञा. का. 2009, महामानव डॉक्टर भीमराव रामजी आंबेडकर कानपुर अमन प्रकाशन
- पानतावणे ग. 1978, विचार योगाचे प्रणेते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर औरंगाबाद विचार ग्रंथमाला.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# ८. वाईतील सार्वजनिक गणेशोत्सव किंवा द्वार सोहळा

**प्रा. डॉ. कोरडे दत्तात्रय ज्ञानदेव**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, कोरेगाव, जि. सातारा.

**प्रास्ताविक**

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव चळवळीचा कल्पकतेने उपयोग करून जनजागृती व राष्ट्रवादी आंदोलनाचे एक प्रभावी साधन म्हणून उपयोगात आणले. सार्वजनिक वर्गणी गोळा करून मनोरंजनाबरोबर लोकशिक्षणासाठी सार्वजनिक गणेश मंडळांना कार्यरत केले. या चळवळीला गणेश मेळे नावाच्या कला पथकाची जोड देऊन मेळयाच्या माध्यमातून राष्ट्रीय गीते, पोवाडे, पथनाटय व नाटकांचे प्रयोग करून लोकांची देशभक्ती जागृत करण्याचा उपक्रम हाती घेतला. टिळकांच्या आवाहनानुरूप पुणे-मुंबई व्यतिरिक्त इतर शहरामध्येही मेळयाचे कार्यक्रम होऊ लागले. सन 1905 मध्ये पुण्याव्यतिरिक्त 72 शहरामध्ये टिळकांच्या पद्धतीनुसार गणेशोत्सव साजरा होत असल्याचे आढळते. पुण्यातील मेळयाच्या धर्तीवर सातारा, कराड येथेही मेळे संघटित करण्यात आले. सातारा जिल्हयात सन 1900 मध्ये 15 गणेश मेळे कार्यरत होते. या माध्यमातून सरकारविरोधी वातावरण निर्माण होत असल्याने मेळयांना सरकारी परवाना काढण्याचे बंधन घालण्यात आले. या मेळयात पोवाडे व गीतांचे नियोजन करण्यात येत असे. मिरवणुकावर कडक निर्बंध असत. त्यातील घोषणा व मिरवणुकीच्या मार्गासाठी दंडाधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घ्यावी लागे. वाईतील गणेशोत्सव पुण्यापेक्षा बऱ्याच बाबतीत वेगळे हो त्याची सविस्तर माहिती या शोधनिंबधातून दिलेली आहे.

**वाईतील प्रारंभीचा गणेशोत्सव किंवा द्वार सोहळा**

वाई शहरात लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्यापूर्वीच हा उत्सव सुरू झालेला होता. श्रीमंत गणपतराव रास्ते यांनी गणपतीचे प्रचंड मंदिर इ.स.1762 मध्ये बांधले. त्यावेळेपासून गणपतीचे महत्त्व मोठया प्रमाणावर सुरू झाले. गंगापुरीतील द्वारकेचा गणपतीचा उत्सव इ.स.1848 पासून सार्वजनिकरित्या सुरू झाला. त्यामुळे पुण्यात सार्वजनिक गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी वाईत गणेशोत्सव साजरा केला जात होता. उत्सवापूर्वी आठ दिवस गणेशचतुर्थीच्या अगोदर भाद्रपद महिन्यात वाईमध्ये गणपतीची 'द्वारे' निघत असत. 'द्वार' म्हणजे, वाईच्या चारी दिशांना मुले स्वयंभू स्थानाच्या यात्रेस देवतांच्या दर्शनासाठी बाहेर जातात. ब्राह्मणशाहीतील श्रीगजाननाच्या दर्शनास गावात परत येतात. त्यावेळी त्यांच्या काढलेल्या मिरवणुकी म्हणजे 'द्वार' होय. गावचे लोक या मुलांना सामोरे जातात व त्यास वाजत गाजत गावांत आणतात. मिरवणुकीच्या वाटेवर एक निमजगा(मशीद) आहे. आदल्या वर्षी नेहमीप्रमाणे निमजग्यावरून 'द्वारे' वाजत गेली.[1]

**द्वाराचा खटला**

ब्रिटीश शासनाद्वारे असा जाहीरनामा 1893 मध्ये प्रसिद्ध झाला की, मुस्लिमांच्या निमजग्यावरून द्वारे जाताना वाद्ये वाजवू नयेत.[2] हा जाहीरनामा रद्द होईपर्यत मानला पाहिजे. म्हणून पुढाऱ्यांनी मशीदीपुढे वाद्य थांबविली. परंतु एका बेजबाबदार तरूणाने एकटयाने मोठया उत्साहाने झांज वाजविली. त्यावेळी वाई येथे दुल्हेरखान नावाचा फौजदार होता. सातारला रॅंडसाहेब हा उपजिल्हाधिकारी होता. त्याचे बारीक लक्ष या तरूणांवर होते. तेव्हा त्याने झांज

वाजविल्याबद्दल ब्रिटिश अधिकाऱ्यांना खटला त्या एकटया तरूणावर चालवावयास हवा होता. परंतु इतर लोक साथीदार मानण्यांत तेरा संभवित पुढाऱ्यांवर खटले भरून त्यांना वाईहून साताऱ्यास एकवीस मैल बेडया घालून पायी चालत आणले. हा खटला फौजदार दुल्हेखान याने भरला होता तर त्यास संमती उपजिल्हाधिकारी रँडसाहेब यांनी दिली होती. झांज वाजविण्याचा प्रकार झाला त्यावेळी दुल्हेरखानबरोबर देशमुख मॅजिस्ट्रेट हजर होते.[3]

फौजदाराने देशमुख मॅजिस्ट्रेट यास असे सांगितले की, 'केनेडी साहेबांच्या खटल्यात साक्ष देताना आरोपीवर गुन्हा शाबीत होईल अशी साक्ष द्या.मी सांगतो त्याप्रमाणे आपण वागला नाही तर, परिणाम आपणास भोगवा लागेल. पण ज्या पवित्र जागेवर आपण आहों तिची नापत करण्यापेक्षा आपले नुकसान झाले तरी पत्करेल असा मॅजिस्ट्रेट देशमुख यांनी फौजदारास जबाब दिला. इतके झाल्यावर ते स्वस्थ बसले नाहीत., तर आपले वरिष्ठ जे मामलेदार यांस त्यांनी ही गोष्ट कळविली व परंपरेने ती केनेडी साहेबांच्या कानावर घातली.' अनुभव नसल्याने तरूण असिस्टंट कलेक्टर केनेडी साहेबांनी 'हिंदु साक्षीदार तेवढे बेभरंवशी असा शेरा मारून' झांज प्रकरणाच्या वेळी हजर नसलेल्याही संभावितास शिक्षा दिल्या.[4] दि.27 सप्टेंबर रोजी झालेल्या शिक्षा पुढीलप्रमाणे सुनावल्या होत्या. तात्यासाहेब गाडगीळ 21 दिवस, वि.अ. उर्फ तात्यासाहेब पंत. 42दिवस, वाई म्युनिसिपलचे चेअरमन हरी बाबाजी पुरोहित 21 दिवस, म्यु. कौन्सिलर व न्यू स्कूलचे चालक अंताजी गंगाधर जोशी 21 दिवस, वासुदेव बाबुराव पंडित 21 दिवस, लोकल बोर्डाचे चेअरमन व कन्सिलिएटर नानासाहेब वैद्य 30 दिवस, वामन बजाजी कुलकर्णी 42 दिवस व 40 रूपये दंड, जनार्दन अप्पाजी एरंडे 21 दिवस, कृष्णा तात्या ढवळीकर 30 दिवस व 40 रूपये दंड अशा प्रकारच्या शिक्षा केनेडी साहेबांनी शिक्षा दिल्या.[5]

सन 1893.94 मध्ये वाईमध्ये जो प्रसंग घडला. त्याच्या मुळाशी केवळ झांजेचा खटला असेल असे वाटत नाही. त्यास काही तरी पोलिटिकल कारणे असावी व ती हीच की, वाईतील बरीच मंडळी सार्वजनिक कामात असतात. ती एकदा डँबीस ठरवून टाकली म्हणजे इतर ठिकाणच्या लोकांसही ते एक प्रकारचे उदाहरण होईल व अलीकडे सरकारी अधिकाऱ्यावर जो ओरडा होत असतो तोही नष्ट होईल.[6] याचा अर्थ शिक्षा भोगून झाल्यावर साताऱ्चे लोक त्यांचा जाहीर सन्मान करतील म्हणून साताऱ्च्या अधिकाऱ्यांनी त्याविरूद्ध आधीच जाहीरनामे काढून ठविले. तरीही त्यातून नऊ जण सुटले. अशा प्रकारे सातारा येथे गणेश मेळा चळवळीत जे होऊ शकले नाही ते वाईस घडले. सातारा येथे जनार्दन सखाराम गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली तेरा जणांच्या सन्मानार्थ सभा झाली. मुंबई व धारवाडहून सांत्वनपर पत्रे आली होती. सभेच्या शेवटी नानासाहेब वैद्य यांनी आभार मानताना सांगितले की, 'आम्ही सार्वजनिक कामे करीत असताना कारागृहवासासारखे जरी प्रसंग आले तरी आम्ही देशहिताच्या कामापासून कदापि परांड्मुख होणार नाही.'[7]

**वाईत पुन्हा गणेश मेळयास प्रारंभ**

वाईमध्ये पुढे 1894.95 मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव व मेळे सुरू झाले. इ.स.1897 मधील भाद्रपद महिन्यात श्री.नानासाहेब व आप्पासाहेब रास्ते नंतर मेळयाचे नेतृत्व चौंडे महाराजांच्याकडे आले होते. मेळयातील पदे छत्रपती शिवाजी महाराज आणि गोपीनाथपंत बोकील यांचा पद्यात्मक संवाद यांची रचना, चौंडेमहाराजांनी बसवून दिली होती. हा मेळा सर्वश्रेष्ठ होता.

वाईतील सार्वजनिक गणेशोत्सव श्री.तात्यासाहेब नित्सुरे यांनी मेळयाची सुरूवात केली होती. ते स्वतः पदे रचीत असत, ते सुरात गात असत. त्यानंतर प्रामुख्याने देशभक्तीच्या भावनेला या मेळयातून प्राधान्य दिलेले आहे. पंचवीस ते तीस मेळे त्यावेळी होत असत. त्यामध्ये 'वीर तानाजी मेळा', 'प्राज्ञपाठशाळेचा मेळा', 'प्रौढांचा मेळा', मुलींचा

'कन्या मेळा' इत्यादी मेळे प्रसिद्ध असून बाळकोबा कोल्हटकर, आप्पासाहेब बोपर्डीकर इत्यादींनी खास मेळे काढले होते. ठोसर स्वामी, मामा पंडित, ग.वि.महाशब्दे, रा.ब.काळे इत्यादींची पद्यरचना असे हे सर्व मेळे एकत्र करून मधल्या आळीत त्यांचे क्रमांक लावले जात. स्वातंत्र्यपूर्व काळात दादासाहेब करंदीकर, रा.ब.काळे, नारायणशास्त्री मराठे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, तात्यासाहेब नित्सुरे, ग.का.वैद्य इत्यादी परीक्षकांद्वारे गुणवत्तेनुसार क्रमांक निश्चित करण्यात येई, त्यानंतर पानविडा व श्रीफळ अशी बिदागी दिली जाई. नागपंचमीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत मेळयांचा कार्यक्रम चालत असे. पुढे राजकीय, सामाजिक, पौराणिक घटनांचे देखावे गणेश उत्सवात होऊ लागले.[8]

सन 1940 सालापासून गणेश मेळयांचे स्वरूप बदलले. त्यामध्ये 'सम्राट अशोक मेळा' व 'आझाद मेळा' हे मेळे होत असत. नंतर कलापथकाचे कार्यक्रम होऊ लागले.[9]

वाईतील गणेशोत्सव पुण्यातील उत्सवापेक्षा बऱ्याच बाबतीत वेगळा होता. या सोहळयास वाईतील लोकांनी वेगळे स्वरूप देऊन मेळा चळवळीचा 'द्वार सोहळयाशी' समन्वय घडवून आणलेला होता.[10]

**निष्कर्ष**

श्रीमंत गणपतराव रास्ते यांनी गणपतीचे प्रचंड मंदिर इ.स.1762 मध्ये बांधले. त्यावेळेपासून गणपतीचे महत्त्व मोठया प्रमाणावर सुरू झाले. गंगापुरीतील द्वारकेचा गणपतीचा उत्सव इ.स.1848 पासून सार्वजनिकरित्या सुरू झाला. या गणपती उत्सवास 'द्वार सोहळाही' म्हणतात. हा गणेशोत्सव साजरा करण्याची पद्धती ही पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सव पद्धतीपेक्षा पुर्णपणे वेगळी होती. वाईमध्ये सन 1893.94 मध्ये द्वार सोहळयावरून जो खटला सुरू झाला होता त्यास द्वाराचा खटला असे म्हटले जाते. या खटल्यामध्ये 21 जणांना समावेश करून त्यांना कारावास व दंडाची शिक्षा देण्यात आलेली होती. त्यास काही तरी पोलिटिकल कारणे असावी व ती हीच की, वाईतील बरीच मंडळी सार्वजनिक कामात असतात. ती एकदा डॅबीस ठरवून टाकली म्हणजे इतर ठिकाणच्या लोकांसही ते एक प्रकारचे उदाहरण होईल व अलीकडे सरकारी अधिकाऱ्यावर जो ओरडा होत असतो तोही नष्ट होईल. तरीही वाईतील गणेश मेळे मोठया उत्साहात पार पाडले जात होते.

**संदर्भ**

1. गोखले पु.पा., जागृत सातारा, 1935, भाग दुसरा, पृ.15
2. ब्रिटिश सरकारचा जाहीरनामा, 1893
3. गोखले पु.पा., उपरोक्त, पृ.16
4. वृत्तपत्र, इंदुप्रकाश, दि.28 सप्टेबर, 1893
5. Bombay Archive Dept., Home Department-Spl.-, File No.110-2-B-10-1893-94, P.15.
6. प्रतोद वृत्तसार, 28 ऑक्टोबर 1895
7. कित्ता
8. साप्ताहिक, वृत्तसार, 1986, पृ.5
9. खरे ग.ह. व बोराटे व.म., अशी आमुची वाई,26 जानेवारी, 1979, पृ.79
10. Cashmen Richard, The Mith Of the Lokmanya: Tilak And Mas Politics in Maharashtra] 1900, P.226.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# ९. सेझ (SEZ) विरोधी आंदोलन आणि प्रा. डॉ. एन. डी. पाटील

**प्रा. डॉ. गाढवे किशोर गुलाब**
शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद, ता. खंडाळा. जि. सातारा.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये आधुनिक महाराष्ट्राच्या जडण–घडणीमध्ये अनेक राजकीय नेते, विचारवंत, समाजसुधारक व राजकीय पक्षांनी आपले योगदान दिले आहे.यामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते, थोर विचारवंत, शिक्षणतज्ञ, परिवर्तनवादी चळवळीचे पुढारी प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी आपली संपुर्ण हयात बहुजन समाजाचे जीवन सुखी बनविण्यासाठी संघर्ष करण्यात घालवली. शेती, शेतकरी, कष्टकरी व बहुजन समाजाचे प्रश्न सोडविणे हा आपल्या कार्याचा केंद्रबिंदू मानून कार्य करण्याचा प्रयत्न केला. सभा, मोर्चे, जनआंदोलन, उपोषण, रास्ता रोको व विधिमंडळात विरोधीपक्ष नेता म्हणून सरकार समोर सत्य बाजू मांडून प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची स्वतंत्र ओळख समाजाला झाली होती. एखादया प्रश्नाचा मुळापासून सखोल अभ्यास केल्यानंतरच त्या प्रश्नाला हात घालणे हे त्यांचे स्वभाव वैशिष्टये होते. यापैकिच एक प्रश्न म्हणजे रायगड जिल्हयात निर्माण झालेला महामुंबई सेझ विरोधी आंदोलनाचा प्रश्न. औद्योगिक विकासाच्या नावाखाली रायगड जिल्हयातील 24 हजार शेतकऱ्यांची 34 हजार एकर जमीन सरकारच्या माध्यमातून रिलायन्स उद्योग समूहाने (अंबानी) शेतक–यांच्याकडून काढून घेवून महामुंबई सेझ (**SEZ**)निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. सरकारने उद्योगपतींचे आर्थिक हित पाहणारा आणि सामान्य शेतक–याला भिकेला लावणारा निर्णय घेतला होता. यामध्ये केंद्र आणि राज्यसरकार सामिल होते. तो निर्णय रद्द करण्यासाठी मोर्चे, निदर्शने, उपोषण, रास्तारोको करून शासनाला या निर्णयाचा फेर विचार करण्यास नाही तर रदद करण्यास भाग पाडले. हजारो लोकांचे उध्द्वस्त होणारे संसार सावरण्याचा प्रयत्न केलयामुळेच प्रा.डॉ.एन.डी. पाटील सर रायगड जिल्हयातील लोकांच्या गळयातील ताईत बनले होते. पेण, पनवेल, उरण, अलिबाग भागातील सामान्य शेतकरी तर एन.डी. सर म्हणजे आमचा देव आहे असे उघडपणे म्हणतात.[1] प्रा.डॉ.एन.डी. पाटील यांनी सेझ विरोधी आंदोलनाला सुरूवात करून उद्योगपती पैशाच्या जोरावर सरकारला आपलंस करून हवा तो निर्णय घेउ शकतात या प्रवृत्तीला धडा शिकवण्याचा प्रयत्न केला. सरकारला आपला निर्णय मागे घेण्यास भाग पाडले. हजारो शेतकऱ्यांची 34 हजार एकर हक्काची जमिन परत मिळवून सातबाऱ्यावरती शेतकऱ्याच नाव लावून परत मिळवून देण्याचा प्रयत्न केला. हे या आंदोलनाचे यश होते.

**1. सेझ निर्माण करण्या पाठिमागचा उद्‌देश : (Special Economic Zone)**

बडया भांडवलदारी देशांच्या दबावाखाली स्वस्त मजूर व स्वस्त संसाधने वापरुन भारतात रोजगार निर्मीती करुन त्याव्दारे राष्ट्रीय उत्पन्न निर्देषांकात वाढ करणे हे सुत्र बाळगून सेझ ( **SEZ** ) ची निर्मिती करण्यात आली होती. महाराष्ट्राचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी **गुणवत्तापूर्ण पायाभुत सुविधांसह आर्थिक विकास साधण्यासाठी प्रभावक्षेत्र निर्माण करणे** यासाठी 1/11/2000 साली भारत सरकारने अधिसुचना काढली तिचीच अंमलबजावणी पुढे 2005 मध्ये करण्यात आली. यालाच Special Economic Zone असे म्हणतात.[2]

यावेळी काही उद्दिष्टे शासनाने निश्चित केली होती.

1. आर्थिक उलाढाली करणे.
2. वस्तू आणि सेवा यांच्या निर्यातीमध्ये वाढ करणे.
3. देशी व परदेशी गुंतवणुकीला चालणा देणे.
4. रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
5. पायाभुत सोयी सुविधांचा विकास करणे.

वरील उद्दिष्टांच्याद्वारे सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न केला जाईल. असे आश्वासन सुरवातीलाच देण्यात आले होते. यासाठी केंद्रसरकारने महाराष्ट्रातील रायगड जिल्हयाची निवड करून 50 हजार हेक्टर जमीन या प्रकल्पासाठी देण्याचे आश्वासन विविध उद्योगपती, भांडवलदार, कारखानदार यांना दिले होते. परंतु जमीन ज्यांच्या मालकिची आहे त्यांना मात्र या गोष्टीची कोणतीही कल्पना दिली नव्हती. एवढेच नाही तर सेझ मध्ये एखादा उद्योगधंदा सुरू करण्यासाठी शासकीय पातळीवर ज्या अटी व शर्थीची पुर्तता करावी लागते त्यांचे प्रमाण कमी करून एक खिडकी योजनेद्वारे या परवानग्या झटपट देण्याचे धोरण अंमलात आणले. 45 दिवसांच्या आत विकासकाला केंद्र सरकार व राज्यसरकार कडून आवश्यक त्या परवानग्या देण्यात येतील असे आश्वासन सरकार कडून देण्यात आले होते. सरकारी पातळीवर हालचाली होवून विकासकांना परवानग्या मिळत होत्या परंतू ज्यांच्या जमीनीवरती हे सर्व केले जाणार आहे त्या जमीन मालकाला, शेतक–याला, शेतमजूर, कामगार, आदिवासी यांना मात्र सेझ **SEZ** म्हणजे काय याची मुळात कल्पणाच नव्हती. [3]

याबाबत प्रा.एन.डी.पाटील म्हणतात की, माझी अशी भूमिका होती की,सरकारच्या महसूल खात्याच्या रेकॉर्ड नुसार इकॉनॉमिक सव्हेनुसार राज्यातील 43 लाख एकर जमिन अनकस्ठिव्हेबल वेस्ट म्हणजे लागवडीस अयोग्य अशी पडीक आहे. ती जमिन तुम्ही घ्या. एकटया यवतमाळ जिल्हयात दहा वर्षात सात हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आणि सारे सेझ **SEZ** मात्र पश्चिम महाराष्ट्रात कार्ला,लोणवळा,खंडाळा,मुंबई,ठाणे,नाशिक,औरंगाबाद इथेच का ? कारण इथे बंदरे आहेत, विमानतळ आहेत, वाहतुकीसाठी सुविधा आहेत. चौपदरी, आठपदरी रस्ते आहेत. थंड हवेची ठिकाने आहेत. हे सगळे ठिक आहे पण उर्वरीत महाराष्ट्राचा विकास कधी होणार[4] या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील रायगड जिल्हयामध्ये रिलायन्स उद्योग समूहाला 34 हजार हेक्टर जमीन शासनामार्फत देण्यात आली होती. या जमीनीवरती रिलायन्स उद्योग समूह (अंबानी) महामुंबई सेझची उभारणी करणार होते. पेण, पनवेल, उरण, वडखळ, अलिबाग भागातील शेतकरी मात्र आपल्या सिंचनाखली असलेल्या जमिनी या प्रकल्पासाठी देण्यास तयार नव्हते. वेगवेगळया प्रकारची लालूच दाखवून 14 हजार हेक्टर जमीन रिलायन्स उद्योग समुहाने मिळविण्याचा प्रयत्न केला होता. यासाठी वेळप्रसंगी गुंडांचाही वापर केला होता.[5] या प्रकल्पामुळे 45 गावे बाधीत झाली होती. शासनाचे शिक्के जमिनच्या सातबा–यावरती पडल्यामुळे या भागातील लोकांना जमीनीची खरेदी–विक्री किंवा हस्तांतरण ही करता येत नव्हते. ही बातमी लोकांच्या मध्ये पसरल्यानंतर चर्चा होवू लागली. गावोगावी सभा घेतल्या जावू लागल्या अशा वेळी कंपनीचे एजंट असणारे लोक या चर्चा व सभांमध्ये सहभागी होवून **शासन आदेष आहे. आपणाला काही करता येणार नाही**. अशी चर्चा करू लागले. यातूनच शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी **महामुंबई सेझ विरोधी संघर्ष समिती, जागतिकीकरण विरोधी कृती समिती, चोवीस गांव सेझ विरोधी संघर्ष समिती, पंचक्रोषी खारभूमी शेती बचाव समिती** या सारख्या संघटनांची निर्मीती होवून सेझ च्या विरोधात लढा उभारण्याचा प्रयत्न केला जावू लागला.[6] या जनआंदोलनात शेतकरी कामगार पक्ष सहभागी झाला.याचे नेतृत्व प्रा.एन.डी.पाटील, मोहन पाटील, मोहन कांबळे,

उल्का महाजन, विवेक पाटील, धैर्यशिल पाटील, मिनाक्षी पाटील, निलीमा पाटील,सुरेखा दळवी, ब्रायन लोबो, इंदूबाई तुळपुले इ. सारख्या कार्यकर्त्यांनी केले. या काळात उल्का महाजन रायगड व ठाणे जिल्हयातील आदिवासी लोकांना जंगल जमिनी हक्काने लागवडीसाठी मिळाव्यात यासाठी आंदोलन करत होत्या. महामुंबई सेझ विरोधी संघर्ष समिती, जागतिकीकरण विरोधी कृती समिती, चोवीस गांव सेझ विरोधी संघर्ष समिती, पंचक्रोषी खारभूमी शेती बचाव समिती सारख्या संघटना स्थापन झाल्या होत्या परंतू सर्वसमावेशक नेतृत्व आंदोलनासाठी मिळत नव्हते. सामान्य लोकांमध्ये चर्चा होत होती आपणाला या संकटातून एकच व्यक्ती वाचवू शकते, न्याय मिळवून देवू शकते ती म्हणजे प्रा.डॉ.एन. डी.पाटील. अशा परिस्थितीत उल्का महाजन यांच्यानेतृत्वा खालील शिष्टमंडळाने प्रा.डॉ.एन.डी. पाटील यांची भेट घेउन नेतृत्व करण्याची विनंती केली.लोक इच्छेचा मान राखत एन.डी.सरांनी या आंदोलनाचे नेतृत्व करण्याचे मान्य केले.

**2. सेझ बाधित शेतक–यांची आंदोलने**

महामुंबई सेझ विरोधी संघर्ष समिती,जागतिकीकरण विरोधी कृती समिती, चोवीस गांव सेझ विरोधी संघर्ष समिती, पंचक्रोषी खारभूमी शेती बचाव समिती मधील कार्यकर्त्यांनी **"आम्ही आमचा प्राण देवू पण आमची जमीन देणार नाही, भू माता देणार नाही"** अशी घोषणाच दिली होती.[7]यामधून जी आंदोलने झाली त्यामध्ये शेतकरी कामगार पक्ष ,नॅशनल अलायन्स फॉर पिपल्स मुव्हमेंट, लेफट प्रोग्रेसिव्ह ॲण्ड वर्कस युनियन या सारख्या संघटना सहभागी झाल्या. परंतू या आंदोलनात सर्वस्व झोकून देवून एकच पक्ष उतरला तो म्हणजे शेतकरी कामगार पक्ष आणि त्याचे नेते प्रा. डॉ.एन.डी.पाटील.

या काळात शेतकऱ्यांचे आंदोलन दडपून टाकण्यासाठी सरकार आपली कारवाई करतच होते. यामुळे सेझ बाधीत 22 गावांमधील विरोध दिवसें–दिवस वाढत होता. अशा परिस्थितीत सरकारच्या भुमिकेचा निषेध म्हणून सामुदाईक उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला. याच पार्श्वभूमीवर 2006 सालातील रायगड (अलिबाग ) जिल्हा परिषदेची निवडणूक शेतकरी कामगार पक्षाने लढवली आणि 61 पैकी 42 जागा जिंकून शेकापच्या निलीमा पाटील जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा बनल्या त्यांनी पहिल्याच सभेत **संपूर्ण सेझ विरोधी ठराव** पास केला. सेझला ( **SEZ** ) विरोध म्हणून 23 मार्च, 2006 ला शेकाप आणि जागतिकीकरण विरोधी कृती समितीने रायगड जिल्हाभर रास्ता रोखो आंदोलन केले.[8]

21 सप्टेंबर, 2006 साली रायगड जिल्हयातील शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) चे सदस्य सिताराम येचुरी यांनी बेलापूर या ठिकाणी रॅलीचे आयोजन केले याला 50 हजारा पेक्षाही जास्त लोक उपस्थित होते.[9] यानंतर एन.डी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डिसेंबर 2006 ला 2 हजार शेतक–यांनी दिल्ली येथिल जंतर–मंतर वरती मोर्चा काढून सेझ संदर्भातील आपल्या तिव्र भावना सरकार पर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला.[10] याचवेळी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नागपूर या ठिकाणी हिवाळी आधिवेशनात गृहमंत्री आर.आर.पाटील व मदत व पुनर्वसनमंत्री डॉ.पतंगराव कदम यांची भेट घेवून सिंचनाखालील जमीन संपादीत करण्यात येवू नये अशी मागणी केली. तर इकडे 3 जानेवारी 2007 साली प्रा.एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली पेण या ठिकानी 2 हजार लोकांनी जेल भरो आंदोलन केले. याच वेळी रायगड जिल्हयातील स्थानिक नेतृत्व कॉग्रेसचे जेष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री **बॅ.ऐ.आर.अंतुले** यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी कार्यकर्ते जेवणावळीवर लाखो रूपये खर्च करीत होते जणू काही त्यांना सेझ बाधीत लोकांशी काही देणे घेणेच नव्हते. त्याचवेळी शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते मात्र पेण तहसील कार्यालयात उपोषण करीत होते. त्यांच्या बरोबर 10 हजार लोकांचा समुदाय उपाषीपोटी ठाण मांडून बसला होता.[11]

या आंदोलनांची दखल सरकार घेत नाही हे लक्षात आल्यावर 5 एप्रिल, 2007 रोजी प्रा.एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथिल आझाद मैदानावर 50 हजार लोकांचा प्रचंड मोर्चा आयोजित करण्यात आला.[12] दरम्याणच्या काळातच सेझ निवड समितीचे चेअरमन **काशीराम राणा** रायगड सेझ ला भेट देण्यासाठी आले होते. त्यांनी रिलायन्स सेझ व महाराष्ट्र सरकारच्या सचिवांची भेट घेतली मात्र प्रकल्पग्रंस्तांची भेट घेण्यास नकार दिला. याचा निषेध म्हणून प्रा.डॉ.एन.डी.पाटील व पक्ष कार्यकर्त्यांनी पेण पंचायत समिती ऑफीसला घेराव घातला व काशीराम राणा यांना प्रकल्प ग्रस्तांची भेट घेण्यास भाग पाडले. अशा प्रकारे सेझ विरोधी आंदोलन दिवसें–दिवस आक्रमक बनू लागले होते.

3. **सेझ बाधीत शेतक–यांचे सामुदायिक उपोषण**

रायगड जिल्हयातील 45 गावें सेझ बाधीत असली तरी त्यातील 22 गावामध्ये होणारा विरोध तीव्र होता. अशा परिस्थितीत सरकार मात्र माघार घ्यायला तयार नव्हते. शेवटी लोकांनी निर्वाणीचा उपाय म्हणून सामुदायिक उपोषणाला सुरवात केली. यामध्ये तरूणांच्या बरोबर वयस्कर लोकही सहभागी झाले होते. उपोषणासाठी बाधीत गावातील 84 वर्षाची वृदध स्त्री सहभागी झाली होती. 5 दिवसानंतर तिची प्रकृती खालावू लागली होती. अशा वेळी प्रा.एन.डी. पाटील यांनी त्या महिलेला दवाखान्यात पाठवण्याची व्यवस्था करून मुख्यमंत्र्याची भेट घेण्यासाठी मंत्रालय गाठले.परिस्थितीचे गांर्भीय लक्षात आणून दिले.यावेळी मुख्यमंत्रीसाहेबांनी घाईगडबडीत 22 गांवे वगळण्याचे आश्वासन दिले. यामुळे प्रा.एन. डी. पाटील सरांनी उपोषण करणा–या कार्यकर्त्यानां उपोषण सोडायला सांगितले.[13] पुढे 1 वर्षे झाले तरी 22 गांवे वगळण्यासंबधी कोणतीही हालचाल शासकीय पातळीवर झाली नाही. ही संबंधीतांची फसवणुक होती. या फसवणूकीची जबाबदारी प्रा.डॉ. एन. डी. पाटील सरांनी घेतली. त्यांचे म्हणणे असे होते की, **'माझ्या शब्दावर विसंबून उपोषण करणा–यांनी उपोषण सोडले. पण प्रश्न सुटला नाही. याचा अर्थ उपोषण कर्त्याची मी फसवणुक केली'.** या स्वतःच्या चुकीचे प्रायश्चित करण्यासाठी 26 जुलै 2007 रोजी त्यांनी उपोषण करण्याचा निर्णय जाहीर केला. यावेळी त्यांच्याबरोबर मोहन पाटील, मानव कांबळे, श्रीमती उल्का महाजन, वैषाली पाटील, सुरेखा दळवी ,श्री गणेष ठाकूर, धैर्यषील पाटील यांच्यासारखे मंडळी बरोबर होती. प्रा.डॉ.एन. डी. पाटील सरांच्या उपोषणाच्या निर्णयानंतर सरकार खडबडून जागे झाले.[14]

4. **संमतीपत्राची योजना**

सरकारने यातून मार्ग काढण्यासाठी संमतीपत्रपची योजना पुढे आणली. शेतक–यांच्या मागणीप्रमाणे संमतीपत्र त्या त्या गावात दयायचे ठरले. त्याप्रमाणे एकाच दिवशी एकाच वेळी संमतीपत्रे दयायची होती. या घटनेचे गांभीर्य ओळखूनच प्रा. डॉ. एन. डी. पाटील आणि कार्यकर्त्यांनी 11 सप्टेंबर 2007 ते 17 सप्टेंबर 2007 या काळात सर्व गावांना भेटी देवून फसवणूक होउ नये म्हणून 50 हजार फॉर्म छापून घेतले.शेतक–यांकडून दोन फॉर्म भरून घ्यायचे. **"मला जमिन दयायची नाही**."असे लिहून यातला एक फॉर्म संबंधित अधिका–याकडे तर दुसरा फॉर्म पोहोच म्हणुन संबंधित अधिका–याची सही घेउन स्वतःजवळ ठेवायचे ठरविले. कारण फसवणूक कधी होईल सांगता येत नव्हते.[15] फॉर्म भरून झाल्यानंतर किती अनुकूल आणि किती प्रतिकूल याचा निर्णय जाहीर झाला. 97% टक्के लोकांनी जमिन देण्यास विरोध दर्शवला होता. यानंतर मात्र सरकारला माघार घ्यावी लागली. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी डिसेंबर 2009 मध्ये सेझ प्रकल्प रद्द केल्याचे जाहीर केले. याची अधिसुचना मात्र दोन वर्षानंतर 19 फेब्रुवारी 2011ला काढण्यात आली. 34 हजार एकर शेतजमिनींवर अंबानींच्या नावाऐवजी 7/12 वरती 20 हजार शेतक–यांची नावे लावून त्यांच्या जमिनी परत करण्यात आल्या. त्याचवेळी रिलायन्स उद्योग समूहाने केंद्र सरकारला 5 हजार एकराचा सेझ ( **SEZ** )चा प्रस्ताव सादर केला. याविरोधातही लढा देण्याचा निर्णय प्रा.डॉ. एन डी पाटील यांनी

घेतला. त्यावेळी रिलायन्स उद्ययोग समूहाकडून अजित वर्टी (आयएएस) अधिकारी यांची मध्यस्थीसाठी नियुक्ती करण्यात आली. रिलायन्सच्या नोकरीत असलेल्या त्या अधिकाऱ्याला एवढेच हवे होते की, माझी प्रा.एन.डी. पाटलांशी चर्चा झाली. पण मी तेच होउ दिले नाही. पुढे ते म्हणतात की, आज मी शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिलाय या गोष्टीचे मला समाधान आहे. म्हणून माझा प्रवास उलटया दिशेने आहे."फॉम रिलायन्स टू सेल्फ रिलायन्स"[16] सेझ विरोधी लढा हा  देशाातील यशस्वी झालेला एकमेव लढा होता. हा कश्टक–यांचा विजय होता. सर्व सामान्य शेतक-यांनी प्रा.डॉ .एन.डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढयाच्या माध्यमातून सरकारला आपल्या निर्णयापासून माघार घेण्यास भाग पाडले होते.

**सारांश**

बडया भांडवलदारी देशांच्या दबावाखाली स्वस्त मजूर व स्वस्त संसाधने वापरुन भारतात रोजगार निर्मीती करुन त्याव्दारे राष्ट्रीय उत्पन्न निर्देषांकात वाढ करणे हे सुत्र बाळगून सेझ ची निर्मिती करण्यात आली होती. उदारीकरणाच्या नावाखाली सेझ भारतभर निर्माण करण्याचा प्रयत्न झाला होता. कारण सेझला सर्व शुल्क माफ होते. स्टॅम्पडयुटी नाही. रजिस्ट्रेशन फी नाही, खरेदी– विक्री कराची वसूली नाही. पाणी व वीजबिल माफ, 10 वर्ष आयकर माफ, विदेषी कंपनीला आपला नफा विदेशात गुंतविण्यास परवानगी यामुळे या सर्व करमाफीतून सरकारी आकडेवारीनुसार होणारे नुकसान 1 लाख 75 हजार कोटींचे असणार होते. या नुकसानीमध्ये पर्यावरणाचे होणारे नुकसान , शेतीचे होणारे नुकसान, वाढणारी बेरोजगारी, संस्कृतीचा होणारा –हास, वाढती गुन्हेगारी याचा काठेही विचार करण्यात आला नव्हता. कामगारांच्या कल्याणकारी कायदयाचा कोठेही उल्लेख नव्हता. या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर प्रा. डॉ.एन. डी. पाटील म्हणतात. की  सेझ च्या नावाखाली लाटलेल्या जमिनीपैकी 35 टक्के जमिन उदयोगासाठी लागते. **"म्हणजे जेवणाच्या ताटात लोणचे, चटणी, कोशिंबीरसाठी जेवढी जागा लागते फक्त तेवढीच जागा उदयोगासाठी लागते"**.त्यांच्या या अभ्यासपूर्ण निष्कर्शावरून ते केवळ अभ्यासक, चिकित्सक, विष्लेशक नव्हते तर जे बिघडले ते घडवण्यासाठी शेतकरी, कामगार,राज्य आणि राष्ट्र उभारणीच्या संघर्शात उतरलेले कृतिशिल लढाऊ झुंजार विचारवंत होते.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सेझ विरोधी आंदोलन अहिंसेच्या मार्गाने चालू होते. साडेचार वर्ष चाललेल्या आंदोलनात 27 वेळा झालेल्या धरणे, मोर्चे, घेराव, उपोषण इत्यादी वेळी एकही हिंसात्मक घटना घडलेली नाही. याउलट सरकारकडूनच अश्रूधुर, लाठीमार करण्याचा प्रयत्न झाला. शेवटचा उपाय म्हणून सरकारने पेण तालुक्यातील 22 गावांमधून सेझसाठी जमिन द्यायची किंवा नाही हे प्रत्यक्ष शेतकऱ्यांनी ठरवावे म्हणून जनमत चाचणी घेण्याचा निर्णय घेतला. परंतू प्रा.डॉ. एन.डी. पाटील यांनी केलेल्या लढयाचा परिणम म्हणून 97% लोकांनी सरकारला जमिन देण्यास विरोध केला. अशा शांततेच्या मार्गाने चाललेल्या या लढयात मिळालेले यश हे अभूतपुर्वच होते. असे म्हटले, तर वावगे ठरु नये. पैशाच्या जोरावर आपण काहीही करू शकतो या भांडवलदार वर्गाच्या भूमिकेला जोरदार चपराक लगावण्याचा प्रयत्न या आंदोलनाच्या माध्यमातून केला आहे. आज पुन्हा एकवेळ देशाच्या विकासाच्या नावाखाली विद्यमान सरकार उदयोगपती, भांडवलदार,कारखानदार यांना गुतवणूकीसाठी देशात आणि महाराष्ट्रात आमंत्रित करीत आहे. सर्व परवानग्या आणि त्यासाठी लागणारा वेळ कमी करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे सामान्य जनतेची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विकासाच्या नावाखाली सेझ सारखेच धोरण आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.आर्थिक सवलती दिल्या जात आहेत,कर्ज माफ केली जात आहेत याला वेळीच

विरोध करण्यासाठी आपल्यासारख्या बुध्दीवादी लोकांनी एकत्र येण्याची गरज आहे. आज ही आंदोलन म्हटले की, प्रा. एन. डी. पाटील सरांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. यातच त्यांच्या कार्याचे यश सामावले आहे. त्यांच्या कार्याला विनम्र आदरांजली.

**संदर्भ**

1. संग्राम ,शेतकरी कामगार पक्ष, मासिकातील लेख दि. 1 ऑगस्ट 2011 पान नं 30
2. http;//www.**sez** india.nic.in
3. उपरोक्त संग्राम, शेतकरी कामगार पक्ष, मासिकातील लेख दि. 1 ऑगस्ट 2011 पान नं. 31
4. पाटील (डॉ.) एन. डी. यांचे 16 जुलै 2011 रोजी कोल्हापूर येथील शाहू स्मारक भवनात व्यक्त केलेले मनोगत
5. उपरोक्त संग्राम, शेतकरी कामगार पक्ष, मासिकातील लेख दि. 1 ऑगस्ट 2011 पान नं. 32
6. http;//www.**sez** india.nic.in (Asit Das ;kapk ys[k iku ua- 1 )
7. http;//www.**sez** india.nic.in (Asit Das ;kapk ys[k iku ua- 2 )
8. दै. सकाळ दि 24/03/2006 मुंबई आवृत्ती
9. दै. सकाळ दि 22/09/2006 मुंबई आवृत्ती
10. शेतकरी कामगार पक्षाचा वार्षिक अहवाल 2006
11. शेतकरी कामगार पक्षाचा वार्षिक अहवाल 2007
12. दै. सकाळ दि 6/04/2007 मुंबई आवृत्ती
13. श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर. चरित्र ग्रंथमाला प्रा डॉ. एन. डी. पाटील. लेखक विश्वास सायनाकर. पान नं 89
14. उपरोक्त चरित्र ग्रंथमाला पान नं.90
15. उपरोक्त चरित्र ग्रंथमाला पान नं.91
16. पाटील (डॉ.) एन. डी. यांचे 16 जुलै 2011 रोजी कोल्हापूर येथील शाहू स्मारक भवनात व्यक्त केलेले मनोगत

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# १०. दिल्लीच्या तख्ता विषयी मराठ्यांचे धोरण

**डॉ. प्रमोद कोंडाजी चव्हाण**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, श्री.सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स आणि संजीवनी कॉमर्स कॉलेज कोपरगाव. जि.- अहमदनगर, (महाराष्ट्र)

**प्रस्तावना**

विविधतेने नटलेला भारताचा इतिहास हा एक नवीन चेतना निर्माण करणारा आहे. त्यातच महत्वाचा भाग म्हणजे मराठ्यांचा इतिहास सह्याद्रीच्या डोंगर दऱ्यात निर्माण झालेल्या मराठा साम्राज्य बघता-बघता संपूर्ण भारतभर पसरले हे आपल्या बुद्धीच्या व कर्तृत्वाच्या जोरावर निर्माण झालेले स्वराज्य होय. म्हणूनच आज वर्तमान काळात सुद्धा महाराष्ट्रात मराठा साम्राज्यास एक उत्कृष्ट शिखर मानले जाते. आज महाराष्ट्र एक विशाल वटवृक्षाप्रमाणे संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेण्याचे काम करत आहे. मराठेशाहीतिल राजे, सरदार, जहागीरदार यांनी मराठा साम्राज्य विस्तारासाठी तसेच ते टिकवण्यासाठी असंख्य प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नाना आलेले यश अपयश यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे

सन १६४६ पर्यंत मराठ्यांचे असणारे धोरण हे मोगल साम्राज्याच्या हाताखाली राहून त्याची धोरणे सांभाळून तसेच जहागिरी उपभोगून एक प्रकारे पारतंत्र्यात होते पण ते सुखाने नांदत होते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य स्थापन करून या धोरण मोघल साम्राज्या मध्ये आपले स्वतंत्र साम्राज्य निर्माण केले. शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर आणि वीर संभाजी महाराज यांच्या कार्याने मराठ्यांचे एक प्रखर अस्तित्व निर्माण केले होते. तसेच शाहू मोगलांच्या सुटके पर्यंत मराठा साम्राज्य परकीय आक्रमणापासून सुखरुप ठेवणे हेच होते. त्यानंतर मराठा साम्राज्यात खऱ्या अर्थाने विस्तार झाला तो शाहू व पेशवे सवाई माधवराव यांच्या कार्यकाला पर्यंत, या काळात जुने स्वराज्य सांभाळून सर्व हिंदुस्थानभर सत्ता मराठ्यांनी गाजवली दिल्लीची मोगल सत्ता ही फक्त नाममात्र सांभाळून प्रत्यक्षपणे मराठ्यांचे वर्चस्व होते. अशा पद्धतीने मराठ्यांनी आपल्या बुद्धीच्या व ताकदीच्या जोरावर संपूर्ण भारतभर हिंदू पातशाही म्हणजेच आपले वर्चस्व निर्माण केले.

मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पासून ते पेशवा दुसरा बाजीराव तसेच उत्तरेत स्थायिक झालेले पेशवे घराने महाराष्ट्रात नव्हे तर उत्तरेत पण आपले वर्चस्व निर्माण करून १८५७ च्या उठावाचे नेतृत्व करणाऱ्या मारठयानी इंग्रजांना जेरीस आणले होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी मराठ्यांचा निर्माण केलेला दबदबा बघता मराठ्यांचा उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत मराठी शाहीचा इतिहास निर्माण केला होता. यात आणखी भर घातली ती म्हणजे पेशवा पहिला बाजीरावानी त्यांनी उत्तरेत अस्तिर मराठी शाहीचे प्रभुत्व कायम केले. सत्ता विस्ताराचा मार्ग

मराठ्यांना आखून देऊन हिंदुस्थानच्या इतिहासात मराठ्यांना मानाचे स्थान अबाधित राखण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच उत्तरेत एक विशाल शक्तीची मराठेशाही निर्माण झाली होती. छत्रपतींच्या आशीर्वादाने पेशव्यांच्या कर्तृत्वाने मराठ्यांनी उत्तरेत आपला एक राजकीय दबदबा निर्माण केला. पहिल्या बाजीरावाची कामगिरी अध्यासत असताना त्यांनी उत्तर हिंदुस्थानात आपली एक वेगळी ओळख रजपूत, बुंदेले यांच्या मदतीने निर्माण केली. पहिला बाजीराव यांच्या काळात गुजरात, माळवा, राजपुताना हे मराठ्यांच्या वर्चस्वखाली आले होते. बाजीरावाने दिल्लीच्या बाहेरील मोगलांचा पराभव करून बरेच भाग आपल्या ताब्यात घेतले. पहिल्या बाजीरावाच्या कामगिरीमुळे मराठी साम्राज्याचा विस्तार झाला होता. पहिल्या बाजीरावाचा मुलगा नानासाहेब पेशवा यांनी वडिलांच्या पायावर पाय ठेवून मराठेशाहीचा विस्तार वाढवला. दिल्ली दरबारी अखेर पेशव्यांनाच मराठ्यांचा प्रमुख माणू लागले व छत्रपती पद हे नामधारी आजच्या राष्ट्रपती पदा प्रमाणे बनले. नानासाहेब पेशव्यांच्या काळात १७५८ मध्ये पंजाबवर आक्रमण करून तो प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात घेतला हा प्रदेश लाहोर पर्यंत वाढवला यालाच मराठ्यांचे अटकेपार झेंडे लावणे असे म्हंटले जाते. या नंतरच्या काळात अब्दाली व मराठे यांच्यात पानिपतचे युद्ध झाले. यात मराठ्यांचा पराभव झाला या युद्धा मध्ये मराठ्यांनी आपले अनेक कर्तबगार तरुण मराठा साम्राज्याचे वंशज या युद्धात गमावले होते. याच प्रमाणे अब्दालीचे ही भरपूर नुकसान झाले होते. या युद्धाच्या पराभवामुळे मराठ्यांचा उत्तरेतील दबदबा काही अंशी कमी झाला होता. या घटने नंतर मराठ्यांच्या उत्तरेतील वर्चस्वाला कुठेतरी सुरुंग लागला होता. पुढे हळूहळू मराठ्यांनी आपली एकजूट दाखवून पुन्हा उत्तरेत आपले नेतृत्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. भविष्यात मराठ्यांनी उत्तरेत आपले असे नेतृत्व निर्माण केले. त्याचा एक भाग असा वाटतो की, तो म्हणजे संपूर्ण हिंदुस्थान मराठ्यांच्या आधीन होता की काय दिल्लीची गादी एक काळ मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आली खरी पण मराठ्यांना तिच्यावर आपला अधिकार गाजवता आला नाही.

हिंदुस्तानच्या इतिहासात अठराव्या शतकात खऱ्या अर्थाने मराठ्यांना आपले वर्चस्व हिंदुस्थानच्या साम्राज्यावर निर्माण करता आले असते पण तो विचार त्यांनी कधी गेला का नाही हे संदिग्धच राहिले. मराठ्यांनी दिल्लीवर वर्चस्व निर्माण केले पण कधी अधिकार नाही सांगितला. फक्त तेथील दिवाणगिरी व सेनाधिपत्व स्वतःच्या हाती ठेवले यामुळे त्यांनी फक्त सर्व राजेरजवाडे यांना आपल्या वर्चस्वाखाली आणून फक्त नावाने नाही तर कृतीने हिंदू साम्राज्य (मराठा) निर्माण केले होते. हिंदुस्तानचा इतिहास अभ्यासत असताना खरं तर संपूर्ण हिंदुस्थानभर वर्चस्व प्रस्थापित करणं हे अवघड काम होते. त्यामध्येचे छत्रपती शिवाजी महाराज यांना एक हाती सत्ता स्थापन करून महाराष्ट्राला कायद्याचे, समानतेचे, न्याय हक्काचे असे राज्य निर्माण केले. त्यांनी ते टिकविण्यासाठी अष्टप्रधानमंडळ निर्माण केले त्यासाठी त्यांनी राज्याची एक घटना निर्माण केली. शिवाजी महाराज यांच्या तिसऱ्या पिढी नंतर राजसत्ता ही त्यांच्या अष्टप्रधानमंडळातील पेशवा (पंतप्रधान) यांच्या हाती आली.

मराठा साम्राज्य विस्तार हा नुसता छत्रपती व पेशव्यानीच केलेला नाही. तर त्यामध्ये भोसले, शिंदे, होळकर, गायकवाड या सरदारांनी आपले काष्ठ व प्रयत्न ओतले. हे अतिशय महत्त्वाचे मानले पाहिजे. यामध्ये महत्वाचे म्हणजे दिल्लीच्या पातशाहीला आपल्या वर्चस्वाखाली ठेवण्याचे काम मराठा साम्राज्याचे सरदार महादजी शिंदे यांनी केले. मोगल साम्राज्याच्या रक्षणासाठी धावून जाणारे शिंदे यांनी शहाआलम यांच्याकडून पेशवासाठी 'वकील मतलक' व स्वतःसाठी 'मुक्त्यार उल्मुल्ख' या पदव्या मिळविल्या या वेळी खऱ्या अर्थाने मराठे शहाआलमच्या वजीरा पेक्षा पण मोठ्या पदावर जाऊन बसले हे मराठ्यांच्या दुष्टिने अतिशय महत्वाचे होते. यामुळे इंग्रजांच्या गोटात खळबळ उडाली "महादजीस मिळालेल्या अधिकाराने त्याला खुद्द दिवानीवरही हुकुमत चालविता येऊ लागली व मराठ्यांच्या हातात हिंदुस्तानच्या अधिकाराची सर्व कायदेशीर सत्ता एकवटली."[१]

अश्या पद्धतीने मराठा साम्राज्याचा प्रभाव उत्तरेच्या गादीवर दाखवला पण मराठ्यांनी स्वतःकडे कधी घेतला नाही. मराठ्यांनी आपल्या आपापसातील भांडना मुळेच आपल्याच राज्याला गृहण लावून घेतले.

दिल्लीच्या तख्तावर सुध्दा मराठ्यांनी आपले वर्चस्व निर्माण केले ही गोष्ट खरी असली तरी त्यांना ती टिकवता आली नाही. यातच मराठ्यांचा मोठा पराभव झाल्याचे आपणास दिसून येते मराठ्यांकडे असणारे कर्तबगार सरदार यांच्या जोरावर मराठ्यांनी हिंदुस्तानचा वेगळा इतिहास निर्माण केला असता पण सत्तेची लालसा आणि वर्चस्व यामध्ये कधी मराठा साम्राज्य भरकटत गेले. याचाच फायदा परकियांनी घेतला आणि यामुळेच १८१८ ला मराठ्यांचा एकसंग कारभार असणार संपुष्टात आला. पेशवाईच्या कालखंडात मोगलांना कायम आपल्या वर्चस्वाखाली ठेवून त्यांच्यावर आपला वचक ठेवून राहिलेले मराठे यांनी कधी दिल्लीच्या सत्तेचा विचार केला नाही. ही मोठी खेदाची बाब म्हणावी लागेल एवढेच खरे.

मराठ्यांच्या हिंदुस्थानातील वर्चस्व ऱ्हास कारणीभूत ठरले ते दुसऱ्या बाजीराव पेशव्याचे सत्ता, राजकारणाचे विचार. त्याच्या काळात मराठ्यांच्या साम्राज्यविस्ताचे धोरण संकुचित होऊ लागले त्यामुळे मराठ्यांच्या साम्राज्य विस्ताराला चालना मिळाली नाही उलट मराठ्यांच्या अधिपत्याखालील प्रदेश परकीय सत्तेच्या अधीन जाऊ लागले. काही नाममात्र मोबदल्यात मराठशाहीचे प्रदेश इंग्रजांकरवी टिकवण्यासाठीचा नाममात्र प्रयत्न दूसरा बाजीराव व त्याचे अधिकार मंडल करीत होते असे निदर्शनास येते.

## सारांश

मराठा साम्राज्याची निर्मिती छत्रपती शिवाजी राजांनी केली. मराठा विस्तार व वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजान बरोबर इतर सरदार व महाराजांच्या वंशजांनी केलेली दिसून येते मराठा साम्राज्याचे प्रखर विचार, भाषा, विज्ञान, निष्ठा, आत्मविश्वास यांचा प्रभाव हिंदुस्तानच्या दिल्ली

दिल्ली तख्तावर दिसून येतो शिवाजीराजा प्रमाणे छत्रपती संभाजी व पहिला बाजीराव यांनी मराठा साम्राज्य विस्तारधोरण खाली दिल्ली साम्राज्यावर आपले वर्चस्व निर्माण केल्याचे दिसून येते. महाराष्ट्राला एक नवा इतिहास देऊन हिंदुस्तान वर महाराष्ट्राचे प्रभुत्व कायम टिकवले. १८ व १९ व्या शतकात महाराष्ट्राची भूमिका ही बादशाही नष्ट करून हिंदूपातशाही निर्माण करणे हीच होती. सत्ता कुणाचीही असो पण त्या सत्तेवर वर्चस्व फक्त मराठ्यांनीच निर्माण केले. महाराष्ट्राने उत्तरेच्या राजकारणात एक नवचैतन्य नवचैतन्य निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याचा कारभार, स्वराज्य व्यवस्था कशी असते हि संपूर्ण हिंदुस्थानला पटवून दिले.

**संदर्भ**

१. मराठे - इंग्रज, नरसिंह चिंतामण केळकर, धी प्रिंटींग एजन्सी पुणे - १९१८, पृ.१२०
२. मराठेकालीन संस्था व विचार, गायकवाड, सरदेसाई, थोरात, प्रकाशन - मोरेश्वर फडके, कोल्हापूर - १९८२
३. मराठे व ब्रिटीश कालीन भारत, नी. सी. दीक्षित, पिंपलापुरे पब्लिशर्स नागपूर –१९९१
४. मराठी सत्तेचा उद्या १६००-१७०७, डॉ. धनंजय आचार्य, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर - २००७
५. मराठ्यांचा इतिहास - खंड १ ते ५, अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे - २००६.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# ११. संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण: एक अभ्यास

**प्रा. डॉ. सुमित संभाजी यादव**
इतिहास विभाग, डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव.

**प्रस्तावना**

प्रामुख्याने सन १९५५ ते १९६० या काळात झालेली संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही खऱ्या अर्थाने जनचळवळ होती. यामध्ये विविध पक्षातील राजकीय नेते, साहित्यिक, समाजसेवक, पत्रकार यांच्यासह सामान्य जनताही उत्स्फूर्तपणे सहभागी होती. सर्व मराठी समाजाचे जीवन या लढ्याने ढवळून निघालेले होते. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या झेंड्याखाली येवून महाराष्ट्रीयन जनतेने संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी दिलेला लढा महाराष्ट्र राज्याच्या इतिहासातील सोनेरी पान आहे. ही चळवळ सर्व मराठी भाषिक प्रदेशाचे एक राज्य अस्तित्वात यावे यासाठी निर्माण झालेली होती. प्रस्तुत शोध निबंधात १९५८ मध्ये शासनातर्फे झालेले प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण व संयुक्त महाराष्ट्र चळवळ यांच्या परस्पर संबंधाविषयी चर्चा करण्यात आलेली आहे.

**संयुक्त महाराष्ट्र संकल्पनेचा विकास**

स्वातंत्र्यापूर्वीपासूनच भारतात भाषावार प्रांतरचना व्हावी असा जनमताचा प्रवाह होता. मराठी भाषिक जनतेचे स्वतंत्र राज्य व्हावे अशी मागणी मराठी जनतेतूनही जोर धरू लागली होती तरीही महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांना हा प्रश्न स्वातंत्र्यानंतरच हाताळावा असे वाटत होते. परंतु मे १९४६ मध्ये बेळगाव येथील ३० व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग.त्र्यं. माडखोलकर यांनी अध्यक्षीय भाषणातून संयुक्त महाराष्ट्राची मागणी प्रभावीपणे केली. तसेच संमेलनात 'संयुक्त महाराष्ट्र परिषदेचीही स्थापना करून शंकरराव देव यांना अध्यक्ष केले.'[१] १९४६ ते १९५५ पर्यंत या समितीने संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे नेतृत्व केले. तेव्हापासून संयुक्त महाराष्ट्राच्या प्राप्तीसाठी चालविल्या जाणाऱ्या चळवळीला उर्जितावस्था प्राप्त झाली.

**फाजल अली कमिशन व स्वतंत्र मराठी भाषिक राज्याला नकार**

आंध्रमधील पोट्टी श्रीरामलू यांचे उपोषण व त्यानंतर आंध्रप्रदेश या स्वतंत्र तेलगु भाषिक राज्याची निर्मिती या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रा प्रमाणेच संपूर्ण देशात भाषावार प्रांत रचनेच्या चळवळीने उग्र स्वरूप धारण करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे भारत सरकारने भाषिक तत्वावर फेररचना करण्यासाठी २९ डिसे.१९५३ रोजी न्या. फजल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना केली.[२]श्री हृदयनाथ कुंझरू व सरदार पन्नीकर हे इतर दोन सदस्य होते. या आयोगाने देशात ठिकठिकाणी जावून परिस्थिती समजावून घेतली. स्थानिक मान्यवरांशी चर्चा केली आणि २२ महिन्यांच्या प्रदीर्घ अभ्यासानंतर आयोगाने आपला २६७ पानांचा अहवाल केंद्र

सरकारला सादर केला. सरकारने १० ऑक्टो. १९५५ ला तो प्रसिद्ध केला. या अहवालाने देशातील १६ पैकी १४ प्रांतात भाषावार प्रांत रचनेचे तत्व गृहीत धरून राज्य निर्मिती केली होती. परंतु महाराष्ट्र व गुजरात यांचे स्वतंत्र द्वैभाषिक राज्य निर्माण करून त्या मधूनही बेळगाव, कारवार आदी मराठी भाग वगळला होता.[३] ही अत्यंत अन्यायकारक व अनैसर्गिक अशी शिफारस होती. या अहवालानंतर महाराष्ट्रात प्रचंड निदर्शने सुरु झाली.

**संयुक्त महाराष्ट्र लढा व संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना**

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीवरून महाराष्ट्रीयन जनता काँग्रेस विरोधी बनू लागल्याचे निदर्शनास आल्यानंतर शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे इ. काँग्रेस नेते दिल्लीला वरिष्ठांशी चर्चा करण्यासाठी गेले. तेव्हा काँग्रेस नेतृत्वाने या महाराष्ट्रीयन नेत्यांना द्विभाषिक राज्य अथवा मुंबई, गुजरात व महाराष्ट्र अशी त्रिराज्य योजना स्वीकारा असे दोन पर्याय सांगितले. नंतर ८ नोव्हेंबर १९५५ रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत त्रिराज्य ठराव पास केला गेला. मोरारजींनी ही त्रिराज्य योजना संमती साठी १८ नोव्हेंबर १९५५ ला मुंबई विधानभवनात मांडली. याच्या निषेधार्थ कामगारांनी २१ नोव्हेंबर १९५५ ला लाक्षणिक संप पुकारला. त्यावेळी कामगार एकत्र जमून विधान भवनाकडे मोर्चाने निघाले असताना, बंदी हुकुम मोडला म्हणून पोलीसांनी मोर्चावर गोळीबार केला. यात १५ हुतात्मे झाले.[४] दिवसेंदिवस महाराष्ट्रातील वातावरण जास्तच स्फोटक बनले. संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनी लढा अधिक जोमाने चालविला. अशातच ९ डिसेंबर १९५५ ला फलटण येथील मनमोहन राजवाडयात महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांची एक बैठक झाली. या बैठकीनंतर यशवंतराव चव्हाणांनी 'संयुक्त महाराष्ट्रापेक्षा नेहरूंचे नेतृत्व श्रेष्ठ' असे विधान केले.[५] या विधानात राजकीय धूर्तता दडलेली होती. परंतु राजकीय आशयापेक्षा महाराष्ट्रावर अलोट भक्ती करणाऱ्या मराठी भाषिकांनी यशवंतरावांच्या या भूमिकेचा निषेध केला.

दिवसेंदिवस संयुक्त महाराष्ट्राचा लढा अधिकच तीव्र बनू लागला होता. त्यामुळे हे आंदोलन दडपण्यासाठी सरकारने १६ जानेवारी १९५६ च्या पहाटे क्रांतिसिंह नाना पाटील, प्र.के.अत्रे आदी प्रमुख नेत्यांना अटक करून नाशिकच्या जेलमध्ये त्यांची रवानगी केली व १६ जानेवारीलाच सकाळी नेहरूंनी त्रिराज्य योजना जाहीर केली.[६] नेत्यांच्या अटकेच्या निषेधार्थ सलग ३ दिवस मुंबई बंद ठेवली गेली, निदर्शने झाली. सरकारने पाशवी बळाचा वापर सुरू केला यात ९० लोक ठार झाले अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्रासाठी १०५ लोकांनी हौतात्म्य पत्करले.[७]

२६ जानेवारी १९५६ ला महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसची बैठक बोलाविली गेली. यामध्ये केंद्रीय नेतृत्वाच्या निर्णयाचे पालन करायचे असे ठरविले गेले. तसेच 'संयुक्त महाराष्ट्र परिषद' विसर्जित करण्याचेही ठरले. त्यामुळे नंतर ६ फेब्रुवारी १९५६ ला सर्व विरोधी पक्षांची बैठक पुण्यात झाली यामध्ये संयुक्त महाराष्ट्राचा लढा चालविण्यासाठी 'संयुक्त महाराष्ट्र समितीची' स्थापना करण्याचे ठरले. केशवराव जेधे अध्यक्ष तर एस.एम.जोशी सर चिटणीस झाले.[८] पुढे महाराष्ट्राप्रमाणे गुजरातमधूनही त्रिराज्याला विरोध झाल्यामुळे महाराष्ट्, गुजरात व मुंबईसह विशाल द्विभाषिक राज्याची निर्मिती झाली व १ नोव्हेंबर १९५६ ला याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांची नेमणूक झाली.

**१९५७ च्या सार्वत्रिक निवडणुका**

मार्च १९५७ मध्ये देशात होणाऱ्या पंचवार्षिक सार्वत्रिक निडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला. रस्त्यावरील लढयाबरोबरच विधानसभा व लोकसभेतही आपला आवाज पोचविण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीने या निवडणुका लढवण्याचे ठरविले. या निवडणुकीचे डावपेच ठरविण्यासाठी जानेवारी १९५७ मध्ये मुंबईतील लोटावाला ट्रस्टच्या इमारतीत भाऊसाहेबांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक झाली यात समितीचा निवडणुक जाहीरनामा प्रसिद्ध करून ग्रामीण भागातील प्रचार प्रमुख म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील व शहरी भागातील प्रचारप्रमुख म्हणून प्र.के. अत्रे यांची नेमणूक केली गेली.[९] १५ जानेवारी १९५७ मध्ये मुंबईतील फर्ग्युसन रोडवरील नेहरूनगर मध्ये प्रचंड सभा घेऊन क्रांतिसिंह नाना पाटील यांनी समितीच्या निवडणूक प्रचाराचा नारळ फोडला.[१०] पुढील काळात समितीचा झंझावाती प्रचार व जनतेची उत्तम साथ यामुळे पश्चिम महाराष्ट्र व मुंबई येथे समितीला प्रचंड यश मिळाले परंतु विदर्भ, मराठवाडा व गुजरात येथील बहुमताच्या जोरावर काँग्रेसचे सरकार येऊन यशवंतराव चव्हाण पुन्हा मुख्यमंत्री झाले. समितीच्या भरघोस यशाने महाराष्ट्रातील बहुसंख्य जनता ही संयुक्त महाराष्ट्र व्हावा या मताचीच असल्याने पुन्हा एकदा सिद्ध झाले.

**मुंबई कॉर्पोरेशनच्या किंवा महानगरपालिकेच्या निवडणुका**

१९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्रवाद्यांनी प्रचंड यश मिळविले होते. त्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसमध्ये एक प्रकारची मरगळ झालेली होती अशा वेळी ९ मे १९५७ला मुंबई कॉर्पोरेशनच्या निवडणुका जाहीर झाल्या. मुंबईत मराठी भाषिकांप्रमाणेच परप्रांतीयांची संख्या लक्षणीय होती त्यामुळे समिती व काँग्रेस यांच्यातील लढाई चुरशीची व प्रतिष्ठेची होती. या निवडणुकीत १३१ पैकी ७१ जागा जिंकून समितीने कॉर्पोरेशन मध्ये बहुमत मिळविले. समितीच्या वतीने प्राचार्य मो.वि. दोंदे हे मुंबईचे महापौर झाले.[११] मुंबई कॉर्पोरेशनमधील समितीचे यश हे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रनिर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असे होते.

**पंडित नेहरूंच्या हस्ते प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण व संयुक्त महाराष्ट्र समिती**

विधानसभा, लोकसभा व मुंबई कॉर्पोरेशनच्या निवडणुकीतील यशानंतर संयुक्त महाराष्ट्र समितीने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतही प्रचंड यश मिळवले त्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसचे पुनरुज्जीवन करण्यासाठी काँग्रेसतर्फे अनेक योजना राबवल्या गेल्या. त्यापैकीच एक म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतिक असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा प्रतापगडावर उभारला गेला व त्याचे अनावरण ३० नोव्हें १९५७ ला देशाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते करण्याचे निश्चित केले गेले.[१२]

छत्रपतीच्या पुतळ्याचे अनावरण ही महाराष्ट्रीयन जनतेसाठी अभिमानाची गोष्ट आहे. समितीने यात राजकारण आणू नये असे काँग्रेस नेत्याकडून सांगितले जावू लागले पण या अनावरण समारंभाला असणाऱ्या राजकीय अंगामुळे समितीने हा मुद्दा संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी गरजेचा मानून याला विरोध करण्याचे ठरविले. कारण क्रांतिसिह नाना पाटलांपासून अनेक महाराष्ट्रीयन नेत्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी राष्ट्रीय पुरुष

पुरुष म्हणून घोषित करण्याची मागणी स्वातंत्र्यानंतर सातत्याने काँग्रेस सरकारकडे केली होती. तेव्हा याच काँग्रेसचे तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी याला नकार देताना एकदा म्हटले होते की, महापुरुषांच्या संदर्भामध्ये जी सरकारी व्याख्या आहे तिच्या चौकटीमध्ये शिवछत्रपती बसू शकत नाहीत आणि आता अचानक या काँग्रेस सरकारला शिवप्रेमाचा साक्षात्कार झाला यापाठीमागे निश्चितच राजकारण आहे. याची जाणीव समितीच्या नेत्यांना होती त्यामुळे त्यांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी आंदोलन करण्याचे ठरविले पण या विरोधाच्या कार्यक्रमाबाबत समितीतील पक्षात एकमत नव्हते. 'जनसंघ' या पक्षाने अनावरणाच्या कार्यक्रमाला पाठींबा देऊन समितीतून माघार घेतली तरीही इतर पक्षांनी हा कार्यक्रम नेटाने पार पाडण्याचा निश्चय केला.[१३]

प्रतापगड हा सातारा जिल्ह्यात येतो. वाई, पांचगणी, महाबळेश्वर प्रतापगड असा नेहरूंच्या जाण्याचा मार्ग सरकारतर्फे जाहीर केला गेला. समितीचे एक प्रमुख नेते क्रांतिसिंह नाना पाटील व द्विभाषिकाचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे दोघेही सातारा जिल्ह्यातील होते. त्यांच्या परस्पर विरोधी भूमिकेमुळे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष प्रतापगडाच्या कार्यक्रमाकडे लागले होते. नेहरूंची सुरक्षितता व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यशवंतरावांनी सरकारी पातळीवर जय्यत तयारी केली होती तर प्रतापगडावरील कार्यक्रमात पंडितजीसमोर निदर्शने करून संयुक्त महाराष्ट्राची मागणी त्यांच्यासमोर करताना त्यांचा किंचितही अवमान होणार नाही याची काळजी नाना पाटलांनी घेतली. सगळे सातार्‍याच्या क्रांती परंपरेला शोभेल असे शिस्तीने व्हावे यासाठी क्रांतिसिंहाबरोबर, कॉ. शेख काका, कॉ. बाबुराव जगताप, विठाबाई पवार, कॉ. नारायणराव माने, बाजीराव पैलवान, व्ही. एन. पाटील, हरिभाऊ निंबाळकर, केशवराव पवार आदि कार्यकर्त्यांनी प्रचंड कष्ट घेतले.[१४] २७ नोव्हेंबर पासून पसरणीच्या घाटात संयुक्त महाराष्ट्रप्रेमी जनता जमू लागली होती.

३० नोव्हेंबर १९५७ च्या सकाळीच नेहरूंच्या प्रतापगडावरील मार्गाच्या दुतर्फा हजारोंच्या संख्येने जनता संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणा देत उभी होती नेहरूनाही प्रथमच संयुक्त महाराष्ट्राची मागणी जनतेतून किती प्रखरपणे केली जात आहे. याची जाणीव झाली. तसेच पंडित नेहरूनाही या निदर्शनाचे कौतुक वाटले. नंतर प्रतापगडावर जावून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केले. तेथील भाषणात नेहरू म्हणाले की, महाराष्ट्राने माझ्यावर अमर्याद प्रेम केलेले आहे. म्हणून महाराष्ट्राला माझ्यावर रागावण्याचाही हक्क आहे. आज इथे पार पडलेला सोहळा आणि वाटेत पाहिलेली शिस्तबद्ध निदर्शने मी कधीच विसरणार नाही.[१५] अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील एक महत्वपूर्ण टप्पा पार पडला.

**समारोप**

प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरणाच्या निमित्ताने पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू महाराष्ट्रात आले होते. तेव्हा संयुक्त महाराष्ट्राची मागणी त्यांच्या समोर करून या लढ्यामागे लढ्यामागे केवढी मोठी जनशक्ती उभी आहे, हे दाखविण्याचे काम समितीने यशस्वीपणे केले. प्रतापगडच्या भेटीनंतर नेहरूंच्या संयुक्त महाराष्ट्राच्या संबंधीच्या धोरणात फरक पडण्यास मदत झाली. तसेच स्वातंत्र्य संग्रामात संग्रामात सातार्‍यातील प्रतिसरकारने निर्माण केलेले ध्येयधुंद, शिस्तबद्ध कार्यक्रम कसे चालविले जात होते याची

झलकच या कार्यक्रमातून पुन्हा एकदा महाराष्ट्राला पहायला मिळाली. प्रतापगडच्या यशस्वी ऐतिहासिक निदर्शनामुळे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होण्यास खूपच मदत झाली.

**संदर्भ**

१. प्रकाशक, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, लोकमहर्षी भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ, डिसेंबर १९९९, पृष्ठ-१३२.

२. बेडेकर दि.के., संयुक्त महाराष्ट्र, चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे,पृष्ठ-२३.

३. मुलाखत: श्रीमती पाटील हौसाताई, दि. १४/११/२०११.

४. पेंडसे लालाजी, महाराष्ट्राचे महामंथन, साहित्य सहकार संघ प्रकाशन १७२ मुंबई -१४, १९६५ पृष्ठ १९० ते १९४.

५. मुलाखत: श्री नायकवडी नागनाथ, दि.१८/११/२०१०.

६. पाटणकर भारत, महाराष्ट्राचे शिल्पकार नाना पाटील, पृष्ठ-७८.

७. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ७ वा, मौज प्रकाशन गृह मुंबई, २००७ पृष्ठ २०२ ते २१५.

८. मुलाखत: श्री पाटणकर भारत, दि. १३/०९/२०११.

९. मुलाखत: प्रा. डॉ. पाटील एन. डी., दि.४/१२/२०११.

१०. दै.मराठा: दि. १६/०१/१९५७.

११. दै.मराठा: दि. ११/०५/१९५७.

१२. दै.मराठा: दि. १/११/१९५७.

१३. मुलाखत: प्रा. डॉ. पाटील. एन. डी., दि.१२/०३/२०१२.

१४. मुलाखत: ॲड. धैर्यशील पाटील, दि.१२/०३/२०१२.

१५. दै. मराठा: दि.१/११/१९५७.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# १२. जागतिकीकरण आणि महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था

**डॉ. भोसले एस.एम.**
प्रोफेसर व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, सहाय्यक प्राध्यापक, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.
**प्रा. जी. सी. खामकर**
अर्थशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

**१.१ प्रास्ताविक**

अलीकडील काळात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण हे नित्य परवलीचे शब्द झाले आहेत. भारताने सन १९९१ पासून आर्थिक सुधारणा कार्यक्रम हाती घेतला.त्यामुळे जागतिक पातळीवरील स्पर्धा वाढत आहे. सहकारी चळवळीचा प्रारंभ ग्रामीण भागातच झाला.ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमकुवत लोकांना योग्य व्याजदराने कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली. त्याबरोबरच शहरी भागातील सामान्य लोकांना पतपुरवठ्याची गरज असते व त्यासाठी बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था सुरु करण्यात आल्या.भारतात सहकारी चळवळीचा प्रारंभ कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या स्थापनेतून झाला.१९५१ ते १९९१ याकाळात सहकारी चळवळ उत्तम वाढली.परंतु १९९१ नंतर आर्थिक सुधारणामुळे सहकारी चळवळीवर परिणाम झालेचे दिसून येते.नव्या आर्थिक धोरणामुळे सहकार चळवळीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. परंतु सरकारने योजलेल्या उपाययोजनेमुळे सहकारी चळवळीला काही प्रमाणात दिलासा मिळाला.

महाराष्ट्रातील शेतकरर्यांची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी आणि त्याचा कर्जबाजारीपणा दूर करण्यासाठी प्राथमिक शेती सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थापना करण्यात आली.ग्रामीण विकासाचा पाया म्हणून या संस्थेकडे पहिले जाते. महाराष्ट्रात सहकारी संस्थांचे जाळे ग्रामीण व नागरी भागात पसरले असल्याने सर्वसामन्यांच्या जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याचे काम या संस्थांनी केले आहे. या संस्था पतपुरवठा क्षेत्रातील पायाभूत घटक आहेत.शासनाने सहकारी चळवळीला भरभराटीला आणण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास प्रामुख्याने प्राथमिक शेती पतपुरवठा संस्थांच्या विकासामुळे झालेला दिसून येतो. त्यानंतर कृषिमाल प्रक्रिया,विपणन संस्था,ग्राहक भांडारे,बिगरकृषी नागरी सहकारी संस्था यांचा विकास झाला. महाराष्ट्र सहकारी चळवळीच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहे.

**१.२ अभ्यासाची उद्दीस्टे**

१. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषीसहकारी पतपुरवठा संस्थावर जागतिकीकरणाचे झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाचा ऐतिहासिक आढावा घेणे.

३. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या प्रगतीचा अभ्यास करणे.

४. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाच्या समोरील समस्यांचा अभ्यास करणे.

५. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**१.३. संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाची प्रगती व या संस्थावर जागतिकीकरणाचे झालेल्या परिणामांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने तयार केला आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे योगदान महत्वपूर्ण आहे. प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम माहितीवर आधारित आहे. दुय्यम सामग्रीमध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, पुस्तके, वर्तमान पत्रे, इत्यादीद्वारे सामग्रीचे संकलन केले आहे. उपलब्ध आकडेवारीच्या सहाय्याने हा शोधनिबंध तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्राची स्थापना १९६० मध्ये झालेपासून व १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा भारत सरकारने स्वीकार केल्यानंतर या संस्थांच्या कामगिरीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कार्याचा आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा हेतू आहे. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्यासमोरील समस्यांचा शोध घेवून त्या कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**१.४.अभ्यासाचे गृहीतक**

महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांवर जागतिकीकरणाचे अनुकूल व प्रतिकूल असे दोन्ही प्रकारचे परिणाम झालेले आहेत.

**१.५. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची प्रगती**

तक्ता क्र.१.१

जागतिकीकरणपूर्व व जागतिकीकरणानंतर महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थिती

| अ.न. | तपशील | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०२१ | १९६१ ते १९९१ वृद्धीदर (%) | १९९१ ते २०२१ वृद्धीदर (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संस्थांची संख्या | १८,९९८ | २०४२० | १८३८९ | १९४९१ | २०५२४ | २१४९२ | २०८९७ | २.६० | ७.२१ |
| २. | सभासद – लाख | १,८२७ | ३१३६ | ५३९१ | ७५०७ | १०१२१ | १५००० | १५१००० | ३१०.९० | १९११.४६ |
| ३. | भागभांडवल कोटी रु. | १२१२ | ५२३१ | १०६९१ | ३०७१९ | ९६०१९ | १४,९००० | २९७३००० | २२७७ .६३ | ९५५७८.०४ |
| ४. | स्वनिधी | १५१९ | ६२७७ | १३३८६ | ३७९१४ | १२२४१४ | ३३४६०० | ४४१९००० | २३८०.३१ | ११,५५५.०० |
| ५. | ठेवी | ९९ | ४०५ | १०३५ | २१५७ | ८७१२ | १२७८८ | उ.ना. | ४३२.५९ | ४९२.८६ |
| ६. | खेळते भांडवल | ५,६६८ | २०९८४ | ५२६९५ | १७८३१९ | ६९८७६८ | १६२५५०० | २१८०२ | २०७८.७९ | १२१२६.४० |
| ७. | कर्ज | ४०२६ | ११४९३ | २४९९३ | ७६८५५ | ३७३४१२ | ११४२५०० | १३८९० | ३०४६.०६ | १७९७२.९९ |
| ८. | नफ्यातील संस्था | १४,२८९ | १०६८४ | ९४०७ | ११९९२ | ८२१२ | ६१८७ | ९२७५ | -१६.०७ | -२२.६६ |
| ९. | तोट्यातील संस्था | ४,०४२ | ९११४ | ८६५८ | ७२८४ | १२१५७ | १०४६९ | ११३२६ | ८०.२१ | ५५.४९ |

आधार - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी –पर्यायी दृष्टीकोन पा.न.२२०,श्रमिक प्रतिष्ठान,कोल्हापूर.-२०१२, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी – २००८,२०२१.

महारष्ट्रातील सहकारी पतपुरवठ्याची व्यवस्था कृषी सहकारी पतपुरवठा संस्था आणि बिगर शेती सहकारी पतपुरवठा संस्था यात विभागली जाते.महाराष्ट्राचा आर्थिक सामाजिक व सांकृतिक विकास प्रामुख्याने प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांच्या विकासामुळे झालेला आहे.तक्ता क्र.१.१ मध्ये महाराष्ट्रातील कृषी प्राथमिक सहकारी संस्थांची १९६१ ते २०२१ या कालखंडातील प्रगतीची आकडेवारी दिली आहे.प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांच्या संख्येत १८,९९८ वरून २०,८९७ ,सभासद संख्येत १,८२७ वरून १,५१,००० ,भाग भांडवल १२९२ लाख रु,वरून २९,७३,००० लाख रु.,खेळते भांडवल ५,६६८ लाख रु.वरून २१,८०,२०० लाख रु., कर्जामध्ये ४०२६ लाख रु.वरून १३,८९,००० लाख रु.पर्यंत वाढ झालेचे दिसून येते मात्र नफ्यातील संस्थांच्या संख्येत १४,२८९ वरून ९,२७५ पर्यंत संख्या घटल्याचे दिसून येते.तसेच तोट्यातील संस्थांची संख्या मात्र ४,०४२ वरून ११,३२६ पर्यंत वाढलेली आहे.

प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या संख्येत,भागभांडवल,स्वनिधी,खेळते भांडवल,कर्जामध्ये व तोट्यामधील संस्थांची संख्या वाढली आहे. नफ्यातील संस्थांच्या संख्येत मात्र घट झालेली आढळते.प्रचंड थकबाकी, निधीची टंचाई, अकार्यक्षम व्यवस्थापन इ. कारणामुळे या संस्थांच्या कार्यात मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत. शेतकर्यांनी वेळेत कर्जाची परत फेड करावी म्हणून शासनाने त्यांना व्याजात सबसिडी

देण्याचे धोरण आखले आहे.तसेच कर्जमाफी देण्यात आली आहे.या संस्थांची प्रगती लक्षात घेता या संस्थांची सभासद संख्या वाढत आहे हे महत्त्वाची वैशिष्ठ्य दिसून येते.या संस्थांच्या भांडवल प्रमाणात वाढ झाली आहे.ठेवीच्या प्रमाणात घट व कर्ज पुरवठ्याच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झालीआहे.

**१.६. महाराष्ट्रातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थावर जागतिकीकरणाचे झालेले परिणाम:**

**१.६.१.प्राथमिक शेती सहकारी संस्थांची संख्या**

नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यापूर्वी ३० वर्ष व नंतर ३० वर्ष अशी पद्धती वापरली असता १९६१ ते १९९१ पर्यत प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या संख्येत २.६०% नी वाढ झाली आहे.जागतिकीकरणा नंतरच्या ३० वर्षात या संस्थांच्या संख्येत ७.२१% इतके वाढीचा दर आढळतो. थोडक्यात जागतिकीकरणानंतर या संस्थांच्या संख्येत वाढ झाली आहे.

**१.६.२.सभासद संख्या**

प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या सभासदामधील वृद्धी दर १९९१ पूर्वी तो३१०.९० % व १९९१ नंतर वृद्धी दर १९११.४६ % आढळतो.म्हणून १९९१ पूर्वीच्या तुलनेने १९९१ नंतर सभासद संख्येच्या वृद्धी दर अधिक आढळतो.

**१.६.३.भागभांडवल**

आर्थिक सुधारणा पूर्वीचा भाग भांडवलाच्या वाढीतील वृद्धी दर २२७७.६३ %व आर्थिक सुधारणा नंतर च्या काळातील भाग भांडवलातील वृद्धी दर ९५७८.०४ % इतका आढळतो.म्हणजे आर्थिक सुधारणा पूर्वीच्या दराच्या तुलनेने नंतरचा वृद्धी दर अधिक आढळतो.

**१.६.४.स्वनिधी**

सहकारी संस्थांच्या विकासाच्या दृष्टीने स्वनिधी अतिशय महत्त्वाचा मानला जातो.आर्थिक सुधारणा पूर्वीच्या २३८०.७९ % काळातील वृद्धी दरापेक्षा आर्थिक सुधारणा काळानंतरचा ११५५५.०० % वृद्धी दरातील वाढ अधिक आहे.

**१.६.५.ठेवीच्या वाढीतील बदल**

प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी ठेवी हा घटक महत्त्वाचा मानला जातो.यावरच संस्थेची प्रगती अवलंबून असते. तो आर्थिक सुधारणा पूर्वी ४३२.५४% व सुधारणा नंतर ४९२.८६% होता म्हणजे सुधारणा नंतरच्या कालावधीतील वृद्धीदर सुधारणा पूर्वीच्या कालावधीच्या तुलनेने अल्प प्रमाणात वाढल्याचे दिसते.

**१.६.६.खेळते भागभांडवल**

सहकारी संस्थांची कामगिरी सुधारणेसाठी खेळते भांडवळाची भूमिका महत्त्वाची असते.या संस्थांच्या खेळत्या भांडवलात वाढ झाली आहे.याचा वृद्धीदर पूर्वीचा २०७८.७९ % व नंतरचा १२१२६.४०% इतका आढळतो.थोडक्यात जागतिकीकरणानंतर खेळत्या भाग भांडवलातील वृद्धी दर वाढता आहे.

**१.६.७.कर्जात सर्वाधिक वाढ**

प्राथमिक सहकारी संस्थांची संख्या, सभासदत्व, भागभांडवल, स्वनिधी,ठेवी,खेळते भांडवल या सर्वामध्ये झालेल्या वाढीपेक्षा कर्जातील वाढीचा वृद्धी दर ३४४,९०७.४५%अधिक आहे.आर्थिक सुधारणा पूर्वीचा वृद्धी दर ३०४६.०६% असून, सुधारणा नंतरचा वृद्धीदर १७९७२.९९% इतका होता.म्हणजे आर्थिक सुधारणापूर्वीच्या तुलनेने आर्थिक सुधारणा नंतर कर्जाच्या प्रमाणात प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.

**१.६.८.तोट्यातील संस्थात वाढ**

प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांच्या तोट्यातील संस्थांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसते. आर्थिक सुधारणा पूर्वीचा वृद्धी दर ८०.२१ % होत. तो आर्थिक सुधारणा नंतर ५५.४९% इतक्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.

**१.६.९.नफ्यातील संस्थांत घट**

नफ्यातील एकूण संस्थांच्या संख्येत घट होताना दिसते.नफ्यातील संस्थाचा वृद्धी दर सुधारणा कालावधी पूर्वी तो -१६.०७ % व सुधारणा नंतर - २२.६६% इतक्या घटल्या आहेत.

**१.७. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या समस्या**

या संस्थांची संख्यात्मक वाढ होत आहे मात्र गुणात्मक वाढ होताना दिसून येत नाही.सभासद संख्येत विशेष अशी वाढ झाल्याचे दिसत नाही.बहुतेक संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत.सभासदाच्या गरजा पूर्ण करण्यात या संस्था असमर्थ ठरत आहेत.लहान शेतकरी व कुळे यांना या संस्थाकडून कर्जे मिळणे कठीण जाते,सभासदांना योग्य वेळेत व पुरेसा कर्जपुरवठा होत नाही,ठेवी गोळा करण्यात या संस्थाना अपयश आलेले आहे, नफ्यातील संस्थांची संख्या कमी होत आहे मात्र तोट्यातील संस्थांची संख्या वाढत आहे हे चांगले लक्षण नाही.या संस्थांची थकबाकी वाढत आहे.यामुळे या संस्थांच्या विकासात मोठे अडथळे निर्माण होत आहेत.याबरोबरच भाग भांडवल व कर्जवाटपात समन्वयाचा अभाव,कर्जाचे अयोग्य वाटप,सदोष कर्ज व्यवहार,व्यवस्थापकीय दोष,राजकारणाचा अड्डा,प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव इ.अनेक समस्या आढळत आहेत.त्यामुळे त्यांच्या कार्यावर व विकासावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

**१.८. महाराष्ट्रातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थाच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना**

या संस्थांची संख्यात्मक वाढ होत आहे मात्र गुणात्मक वाढ होतना दिसून येत नाही.त्यामुळे या संस्थांच्या गुणात्मक वाढीकडे लक्ष दिले पाहिजे.सभासद संख्येत वाढ घडवून आणणेसाठी प्रयत्न केले पाहिजेत. संस्था आर्थिकदृष्ट्या सबल व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत, भागभांडवल व ठेवी वाढवाव्यात,कर्जे उत्पाद्क कारणासाठीच द्यावीत व कर्जे देताना पुरेशे तारण विचारात घेवून कर्जे द्यावीत, कर्मचारी वर्ग तज्ञ व प्रशिक्षित नेमावा.कर्ज वसुलीकडे लक्ष देवून थकबाकीचे प्रमाण कमी करण्याचे प्रयत्न करावेत. सरकारने या संस्थांच्या वाढीकडे लक्ष दिले पाहिजे.

**१.९.निष्कर्ष**

१. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या संख्येत वाढ झालीआहे.मात्र १९९१ पूर्वी या संस्थांच्या संख्येत घट झाल्याचे दिसते.

२. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या सभासद संख्येत वाढ झाली आहे. १९९१ पूर्वीच्या तुलनेने १९९१ नंतरचा वाढीचा वेग कमी आढळतो.

३. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या भागभांडवलात वाढ झालेली आढळते.मात्र १९९१ पूर्वीच्या तुलनेने १९९१ नंतरचा वाढीचा दर कमी दिसून येतो.

४. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या स्वनिधीच्या वृद्धी दरात वाढ झालेली आहे. मात्र १९९१ तुलनेने १९९१ नंतर स्वनिधीतील वृद्धीदर अधिक आढळतो.

५. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या ठेवीतील वृद्धीदर वाढलेला आहे. १९९१ नंतर ठेवीतील वृद्धीदर वाढलेला आहे.

६. १९९१ पूर्वीच्या तुलनेने १९९१ नंतरखेळत्या भांडवलाच्या वृद्धीदरात अल्पप्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

७. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या इतर सर्व घटकांच्या वाढीच्या तुलनेने कर्जातील वृद्धीदर सर्वाधिक आहे.

८. महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या नफ्यातील संस्थांच्या संख्येत घट होत आहे.

९. आर्थिक सुधारणा पूर्वी तोट्यातील संस्थांची संख्या व १९९१ नंतर तोट्यातील संस्थांची संख्या वाढल्याचे दिसून येते.

**१.१०. सारांश**

प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या संख्येत, भागभांडवल, स्वनिधी, खेळते भांडवल,कर्जामध्ये व तोट्यामधील संस्थांची संख्या वाढली आहे. नफ्यातील संस्थांच्या संख्येत मात्र घट झालेली आढळते.प्रचंड थकबाकी, निधीची टंचाई, अकार्यक्षम व्यवस्थापन इ. कारणामुळे या संस्थांच्या कार्यात मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत. शेतकर्यांनी वेळेत कर्जाची परतफेड करावी म्हणून शासनाने त्यांना व्याजात सबसिडी देण्याचे धोरण आखले आहे. तसेच कर्जमाफी देण्यात आली आहे. या संस्थांची प्रगती लक्षात घेता या संस्थांची सभासद संख्या वाढत आहे हे महत्त्वाची वैशिष्ठ्य दिसून येते. या संस्थांच्या भांडवल प्रमाणात वाढ झाली आहे. ठेवीच्या प्रमाणात घट व कर्ज पुरवठ्याच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने या संस्था महत्त्वाच्या आहेत.

**१.११. संदर्भ**

१. महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण
मूल्यमापनव दिशादर्शन - २०११

२. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
पर्यायी दृष्टीकोन, श्रमिक
प्रतिष्ठान कोल्हापूर. - २०१२.

३. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - २००८, २०१० व २०२१.

४. जागतिकीकरणानंतर भारतीय सहकारी
चळवळीवर झालेले परिणाम - राज्यस्तरीय चर्चासत्र - प. डॉ. व. पा. महाविद्यालय, तासगाव.

५. सहकाराचा विकास - प्रा. रूपा शहा.प्रा,दामजी.

६. सहकाराचा विकास - सी.जी.जोशी.

# १३. कान्होजी जेधे यांचे स्वराज्य निर्मितीतील योगदान

**प्रा. डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत**
शिवाजी विद्यापीठ संलग्नित शंकरराव जगताप आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली. ता. कोरेगांव जि. सातारा.

**छ. शिवाजी महाराजांनी सर्वसामान्य मावळयांना सोबत घेऊन स्थापन केलेले स्वराज्य ही अतिशय दुर्मिळ आणि अव्दितीय घटना होय. संपुर्ण भारतामध्ये मुस्लिम सत्ताधिशांनी वर्चस्व प्रस्थपित केलेले असताना आपल्या मातेच्या आर्शिवादाच्या आणि अंगभूत गुणांच्या जोरावर त्यांनी स्वराज्य निर्मितीचा आरंभ केला. आदिलशाही सत्ता आणि मोगली सत्ता यांना पराभूत करून राजांनी स्वराज्य उभारले. सर्वसामान्य जनतेच्या मनात स्वराज्याबाबत प्रेम आणि स्वातंत्र्याची उर्मी निर्माण केली. छ. शिवाजी राजांनी निर्माण केलेले स्वराज्य हे वास्तविकपणे अनियंत्रित राजेशाही हे वैशिष्टय असणा[1]या मध्ययुगिन कालखंडात लोककल्याणकारी आणि रयतेला आपले वाटणारे राज्य होते. त्यांच्या या कार्यात अनेक सेनानींनी आपल्या प्राणाची बाजी लावण्यास कधीच मागेपुढे पाहिले नाही. अनेक सेनानी छ.शिवाजी महाराजांच्या तालमीतच तयार झाले. हे योध्दे अत्यंत सर्वसामान्य घरातून निर्माण झाले होते. या इतिहास परिषदेमध्ये छ. शिवरायांच्या याच सरदारांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात येतो आहे हे अतिशय महत्वपुर्ण कार्य आहे कारण जेव्हा आपण शिवकाळाचा अभ्यास करतो तेव्हा फक्त छ.शिवाजी राजे आणि त्यांच्या कार्याचा अभ्यास करतो मात्र या परिषदेत शिवचरित्रासोबतच इतर सरदारांच्या कार्याचा आढावा घेण्यात येतो आहे याच संदर्भाचा विचार करून मी येथे छ. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनाकार्यातील प्रारंभीक सहकारी कान्होजी जेधे यांचे कार्य मांडू इच्छितो.**

**स्वराज्य स्थापनेच्या सुरूवतीच्या कालखंडात ज्या सेनानींनी स्वराज्य निर्मीतीमध्ये आपले योगदान दिले आहे त्यामध्ये मावळ प्रांतातील देशमुख आणि त्यांच्या सैन्याचा छ. शिवरायांना फार उपयोग झाल्याचे दिसते. यामध्ये कान्होजी जेधे, बाजी जेधे, बाजी पासलकर, बापूजी मुदगल, येसाजी कंक, बाजीप्रभू देशपांडे, बाजी बांदल, तानाजी मालूसरे आणि सुर्याजी मालूसरे, कावजी कोंढाळकर, कावजी मल्हार, दादाजी नरसप्रभू, नारो बापूजी, बाळाजी बापूजी, चिमणाजी बापूजी, जिवा महाले, संभाजी कावजी, हैबतराव सिलिंबकर, बाबजी झुंजारराव मरळ देशमुख या मंडळींचे बहुमोल सहकार्य लाभलेले आहे. याच बरोबर या परिसरातील काटक आणि निष्ठावंत मावळे हेच राजांच्या आरंभीच्या पायदळ आणि घोडदळाचे आधरस्तंभ होते. यामध्ये नेताजी पालकर, सुर्यराव काकडे, वाघोजी तुपे, गोदाजी जगताप, भीमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर, भैरव चोर, सिदोजी पवार, हिराजी इंगळे, तुकाजी पोळ, सदाजी घाटगे, रामाजी पांगारे इ. या सर्व प्रमुख सहका[1]यांपैकी कान्होजी जेधे हे आपल्या वतनावर पाणी सोडणा[1]या काही मोजक्या देशमुखांपैकी एक होते**

**कान्होजी जेधे**

**कान्होजी जेधे हे छ. शिवरायांच्या आरंभीच्या सहकार्यांपैकी एक होते. जेधे घराण्यातील खेळोजी आणि बाजी नाईक यांनी प्रामाणिकपणे केलेल्या सेवेबद्दल खूष होऊन बिदरच्या पातशहाने त्यांना कारीचे वतन बहाल केले होते. या घराण्यातील कान्होजी यांनी आपल्या पराक्रमाने वतनी गावांची संख्या विसवर आणली. कान्होजींना सात पुत्र होते त्यातील सर्वात लहान पुत्र नाईकजी नाईक यांचे पुत्र कान्होजी हेच शिवकाळातील इतिहासप्रसिध्द कान्होजी जेधे हे होत. कान्होजींच्या आजोबांनी आपले पुत्र नाईकजी नाईक यांन आपले वारसदार करून देशमुखी वतन त्यांच्या हवाली केले. त्यांच्या खूना नंतर कान्होजी जेधे कारीचे देशमुख बनले.[1] कान्होजी सुरूवतीला निजामशाहीच्या चाकरीत होते. सन 1626 मध्ये मलिक अंबरच्या मृत्यू नंतर सर्व मावळ खोरे हे आदिलशहीच्या ताब्यात आले याचवेळी शहाजीराजेही आदिलशाहीत रूजू झाले तेंव्हा आदिलशहाचा सेनापती रणदौलतखान याने शहाजीराजांशी कान्होजीचा परीचय करून दिला.पुढे शहाजीराजे जेंव्हा आदिलशाहीत रूजू झाले त्यावेळी त्यांनी आपल्याकडे कान्होजीस मागून घेतले. सन 1648 मध्ये जेंव्हा आदिलशहाने शहाजीराजांना अटक केली त्यावेळी कान्होजी जेधेंनाही अटक झाली. पुढे आदिलशहाने शहाजीराजांची मुक्तता करून बंगरूळास त्यांची रवानगी केली. याच वेळी कान्होजींचीही सुटका झाली. शहाजी राजांनी कान्होजींना मावळात परत जावून शिवाजीराजांना मदत करण्याविषयी वचन घतिले आणि त्यांना व त्यांचे कारभारी दादाजी कृष्ण लोहकरे यांना शिवाजीराजांकडे पाठवून दिले.[2] कान्होजी जेधे शहाजीराजांचा निरोप घेऊन मावळात येतात, तोच 25 जून 1649 रोजी वाईचा सुभेदार अफजलखानाचे पत्र त्यांना आले. अफजलखानाने जावळीवर स्वारी करण्याचे नियोजित केले होते या स्वारीत कान्होजींनी सैन्यासह सामील व्हावे असा आदेश त्याने पत्राव्दारे दिला होता. परंतू कान्होजींनी काहीच हालचाल न करता चालढकल सुरू केली. आपल्याला 200 लोकांची नायकी द्यावी किंवा जोहर खोरे मोकासा म्हणून द्यावे अशी नवीनच मागणी त्यांनी पुढे केली. अफजलखानाने ती मान्य करून जोहर खोऱ्याची सनद कान्होजीकडे पाठवून दिली. तरीही कान्होजी जागचे हालले नाहीत. या काळात त्यांचा शिवाजीराजांशीही पत्रव्यवहार सुरू होता.[3] नुकतेच शहाजीराजांना वचन देवून आलेल्या कान्होजींनी अफजलखानाच्या या नियोजित स्वारीत सहभागी होण्याचे जाणीवपुर्वक टाळले. पुढे ही स्वारीच स्थगित झाली.**

**कान्होजी जेध्यांनी येथून पुढील काळात शिवाजी महाराजांना सर्वेतोपरी सहाय्य केले. जेध्यांसारखे मातब्बर देशमुख महाराजांना सामील झाल्यामुळे मावळातील इतर मंडळीही महाराजांकडे हळूहळू रूजू होवू लागली. इ.स.1656 मध्ये महाराजांनी केलेल्या जावळीवरील स्वारीत कान्होजी आपल्या सैन्यासह सामील झाले होते.[4] परंतू कान्होजींचा खरा कस लागला तो अफजलखान स्वारीच्या वेळी. कान्होजी आदिलशहाच्या सेवेत होते. आदिलशहाने शिवाजीराजांच्या बंदोबस्तासाठी अफजलखानास मदत करण्याचे फर्मान जारी केले. ते 16 जून 1659 रोजी कान्होजींना मिळाले.[5] कान्होजींच्या जीवनातील सत्वपरीक्षेचा प्रसंग होता. कान्होजींनी शिवाजीराजांशी 'इमाने वर्तु'अशी शपथ शहाजीराजांसमोर घेतली होती. तर इकडे खानाच्या**

मदतीला न गेल्यास वतन जाण्याचा धोका निर्माण झाला होता. शेवटी कान्होजी आपल्या 5 पुत्रांसह रायगडी शिवाजी महाराजांकडे आले व बादशहाकडून आलेला फर्मानाचा कागद दाखविला. महाराजांनी तो पाहिला व म्हटले, "तुमचे सेजारी केदारजी व खंडोजी खोपडे देशमुख हे अफजलखानाकडे गेले. तुम्ही पातशाही हुकूम मोडून राहिले म्हणजे वतनास अपाये होईल. जिवावरी गोष्ट येवून संकट पडले याकरिता तुम्हीही जाणे" पण निष्ठावान कान्होजी उदगारले, "महाराजांनी (शहाजीराजांनी) आपली क्रिया (शपथ) घेवून तुमचे हाती दिली तेच क्रिया व इनाम आपला (माझा) शाबूत आहे. वतन साहेबांच्या (शिवाजी महाराजांच्या) पायावरी ठेविले. आपण व आपले लेक साहेबापुढे खस्त होवून (मरून जाऊ). तेंव्हा जे होणे ते होईल. कान्होजी नाईक ऐसे बोलून शफत केली. त्यावरी राजश्री स्वामी बोलिले की, 'हातावरी पाणी घेवून वतनास घालणे' कान्होजींनी खरोखरच हातावर पाणी घेवून वतनावर सोडले.[6] कान्होजींच्या निर्धाराची परीक्षा महाराजांनी पुरेपुर घेतली. कान्होजीही कसोटीस पुर्ण उतरले.

कान्होजींना विश्वासात घेतल्यानंतर महाराजांनी त्यांच्यावर एक महत्वाची कामगिरी सोपविली. मावळातील सर्वच वतनदार देशमुखांना आदिलशाही फर्माने आली होती. अशा वेळी त्या सर्वांच्या मनात काय आहे याचा शोध घेण्याची व त्यांना स्वराज्याच्या झेंडयाखाली एकत्र आणण्याची अवघड कामगिरी महाराजांनी कान्होजींना सांगितली त्यानुसार कान्होजींनी मावळ खो[1]यातील देशमुख मंडळींना एकत्र जमवून आपला विचार सर्वांना सांगितला. 'आम्ही राजश्री स्वामीच्या पायाशी इनाम धरून वतनास देखील पाणी सोडिले. आम्ही व आपले लेक देखिल स्वामी पुढे खस्त होते. यैसा आमचा दृढ विश्वास आहे. तुमचा मुदा काये तो बोलणे. मुसलमान बेईमान आहे.कार्य जालियावरी नस्ते निमित्य ठेवून नाश करील. हे मऱ्हाष्ट राज्य आहे. अवघीयानी हिंमत धरून जमाव घेवून राजश्री स्वामी संनिध राहोन येकनिष्ठेने शेवा कराची' कान्होजींचे हे हिमतीचे बोलणे ऐकल्यानंतर मावळातील बांदल, सिलिंबकर, ढमाले, मरळ, डोहार इत्यदी अनेक देशमुखांनी महाराजांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला.[7]

अफजलखानाच्या वधानंतर इशारा मिळताच कान्होजी जेधे मावळच्या देशमुखांसमवेत खानाच्या पार मुक्कामी असलेल्या सैन्यावर तुटून पडले. या युध्दात कान्होजींनी केलेल्या सेवेबद्दल शिवाजी महाराजांनी त्यांना मानाचे प्रथम पान देण्याचा बहुमान दिला. या युध्दात खंडोजी खोपडे महाराजांच्या विरोधात खानकडून लढला आणि मराठयांच्या फौजेस जिवंत सापडला. येथे खंडोजीने आपले जावई हैबतराव सिलिंबकरांच्या करवी कान्होजींना जिव वाचवण्याची गळ घातली आणि कान्होजींच्यामुळे महाराजांनी त्यास अभय दिले. परंतू एक दिवशी खंडोजी खोपडे राजांच्या समोर आला व महाराजांचा राग अनावर होवून त्यांनी खंडोजीचा एक हात व एक पाय कापण्याची आज्ञा केली. या घटनेने कान्होजी नाराज झाले. कान्होजींनी राजांना यासंबंधी विचारले तेंव्हा राजे म्हणाले की, "तुम्ही भिड घातली म्हणून त्याला जीवे मारले नाही आणि त्याचे वतनही जप्त केले नाही."[8]

सन 1660 च्या सप्टेंबर महिन्यात कान्होजी जेधे आजारी पडले.आपण या आजरातून वाचणार नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांनी शिवाजीमहाराजांना पत्र पाठवून आपली सहा मुले व वतन तुमच्या

पायापाशी आहे त्याचा सांभाळ करणे अशी विनंती केली. छ.शिवाजी महाराजांनी 2 सप्टेंबर 1660 रोजी कान्होजींना पाठविलेल्या पत्रात त्यांना 'तुमचा आमचा पहिल्यापासूनच घरोबा आहे; सांभाळ करू' असे अश्वस्त केले व तब्येतीची काळजी घ्या. ईश्वरकृपेने बरेच होईल असा धीरही दिला.[9] परंतू यानंतर लवकरच कान्होजींचा मृत्यू झाला असावा. 25 ऑक्टोबर 1661 रोजी कान्होजींचा मुलगा बाजी सर्जेराव यांनी आपला भाऊ शिवबा जेधे याला पाठविलेल्या पत्रात कान्होजींचा मृत्यू झाल्याचा उल्लेख मिळातो.[10]

**समारोप**

छ. शिवाजीराजांनी निर्माण केलेले स्वराज्य ही 17 व्या शतकातील एक अपुर्व आणि अलौकिक घटना आहे. मराठा सरदार कितीही पराक्रमी असला तरीही मुस्लिम सत्ताधीशांच्या सेवेत फारतर पंचहजारी मनसबदार होणे एवढीच महत्वकांक्षा बाळगून अनेकजण आपले आयुष्य घालवित होते. मात्र या सत्ता संपवून स्वराज्य निर्मीतीचे कार्य करण्याची ईच्छा निर्माण करून ती साक्षात निर्माण करण्याचे कार्य महाराजांनी केले. छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्यस्थापनेचा आरंभ केल्यानंतर मावळ प्रांतातील सर्वच वतनदार त्यांच्या सोबत आले नाहीत परंतू कान्होजी जेधे सुरूवातीच्या काळापासून आपल्या जीवनाच्या अंतापर्यंत छ. शिवजी महाराजांशी एकनिष्ठ राहीले. एवढेच नाही तर त्यांनी मावळ प्रांतातील अनेक मातब्बत देशमुख वतनदारांना आपल्या सोबत शिवाजी महाराजांच्या कार्यात सोबत घेतले. अफजलखान मोहिमेप्रसंगी त्यांनी दाखवलेल्या धाडसामुळेच अनेक वतनदारही राजांच्या कार्यात सहभागी झालेले दिसतात. एकुण कान्होजी जेधे हे छ. शिवाजी महाराजांच्या प्रारंभीच्या सहकार्यांपैकी एक असून स्वराज्य उभारणीत यांचाही खारीचा वाटा असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

**संदर्भ सूची**

1. कुलकर्णी अ.रा.(संपा), जेधे शकावली-करीना, डायमंड पब्लिकेशन, पुणे 2007, पृ.16, 17
2. कुलकर्णी अ.रा.(संपा), उपरोक्त, पृ.17
3. मेहेंदळे ग.भा., श्रीराजा शिवछत्रपती, खंड 1, भाग 1, प्रकाशक मेहेंदळे ग.भा.,पुणे, 1996, पृ.705
4. कुलकर्णी अ.रा.(संपा), जेधे शकावली-करीना, उपरोक्त, पृ.21
5. मेहेंदळे ग.भा. , श्रीराजा शिवछत्रपती, खंड 1, भाग 1, उपरोक्त, पृ.913
6. कुलकर्णी अ. रा. (संपा), जेधे शकावली-करीना, उपरोक्त, पृ.31
7. देशमुख विजय, शककर्ते शिवराय (पुर्वार्ध), छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपूर, 1980, पृ.322
8. कुलकर्णी अ.रा.(संपा), जेधे शकावली-करीना, उपरोक्त, पृ.215
9. कुलकर्णी अनुराधा(संपा.) शिवछत्रपतींची पत्रे खंड 1, परममित्र पब्लिकेशन, ठाणे, 2011, पृ.77
10. मेहेंदळे ग.भा., श्रीराजा शिवछत्रपती, खंड 1, भाग 2, प्रकाशक मेहेंदळे ग.भा., पुणे, 1996, पृ.1287

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# १४. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील शंकरराव देव यांचे योगदान

**प्रा. डॉ. काशिलिंग रघुनाथ गावडे**
इतिहास विभाग प्रमुख, बाबा नाईक महाविद्यालय, कोकरुड, ता. शिराळा, जि. सांगली.

**गोषवारा**

शंकरराव देव हे निष्ठावान गांधीवादी स्वातंत्र्यसेनानी म्हणून प्रसिद्ध होते. एक कुशल संघटक, प्रभावी वक्ते व राजकारणी म्हणून महाराष्ट्राला ते सुपरिचित होते. त्यांचे बालपण व शिक्षण अत्यंत हलाखीत गेले. देशसेवेसाठी आपले जीवन अर्पण करण्याची प्रतिज्ञा त्यांनी शाळेत शिकत असतानाच घेतली होती. टिळकांपासून त्यांना देशसेवेची प्रेरणा मिळाली आणि देशसेवेचा कार्यक्रम त्यांनी महात्मा गांधींपासून आत्मसात केला. आत्मविद्या आणि स्वातंत्र्यप्राप्ती या दोन्ही प्रेरणांचा गांधीजींच्या जीवनात झालेला सुंदर संगम पाहून त्यांनी गांधीप्रणीत कार्याला आपले जीवन वाहिले. महाराष्ट्रात गांधीवादी काँग्रेस संघटना उभी करण्याचे व वाढविण्याचे, काँग्रेस कार्यकर्ते घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. गांधीजींनी हाती घेतलेल्या स्वातंत्र्य आंदोलनातील प्रत्येक लढ्यात ते सहभागी झाले. त्यांना अनेक वेळा तुरुंगवास ही झाला. तुरुंगवासाचा काळ हा शंकररावांनी आत्मचिंतनासाठी आणि लेखन व वाचनासाठी उपयोगात आणला. शंकररावांनी मोठ्या कष्टाने राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन फैजपूर सारख्या ग्रामीण भागात भरवून ते यशस्वी करून दाखविले. महाराष्ट्राच्या दृष्टीने फैजपूर काँग्रेस हा स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख टप्पा ठरला. राजनैतिक आणि रचनात्मक अशा दोन्ही क्षेत्रात त्यांनी काम केले. त्यांनी आपल्या दीर्घ आयुष्यात विधायक कार्याच्या अनेक संस्था उभारल्या. त्या संस्थांसाठी कर्तबगार कार्यकर्ते मिळविले आणि महाराष्ट्र जीवन सर्व बाजूंनी समृद्ध करण्याचा सतत प्रयत्न केला. महात्मा गांधीजींनी भारताला आधुनिक काळात स्वावलंबी, स्वाभिमानी, निर्भय आणि शांतीपरायन बनविण्यासाठी ज्या ज्या प्रेरणा दिल्या त्या बहुतेक प्रेरणांशी समरस होऊन शंकररावांनी महाराष्ट्राचे जीवन फुलविण्याचा अथक प्रयत्न केला. त्यांचे जीवन सेवकत्व, साधकत्व आणि लोकनेतृत्व या तीन गुणांची त्रिपदा गायत्री होते.

**कि नोट्स :** 'भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील शंकरराव देव यांचे योगदान' या शोधनिबंधामध्ये बालपण व शिक्षण, राष्ट्रप्रेमाचे संस्कार व राष्ट्रीय चळवळीत सहभाग, शंकराव देवांची गांधीजींची प्रथम भेट, चंपारण्य लढा, असहकार आंदोलनातील शंकररावांचे कार्य, गांधी तत्वज्ञानाचे प्रचारक, फैजपूरची फत्तेह, विविध आंदोलनातील सहभाग आणि तुरुंगवास, विधायक कार्य या मुद्द्यांवर प्रकाश टाकला आहे.

**उद्दिष्टे**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील शंकरराव देव यांचे योगदान' या शोधनिबंधासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

1. शंकरराव देवांच्या जीवनाचा अभ्यास करणे.

2. शंकरराव देव यांचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धत**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील शंकरराव देव यांचे योगदान या शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. शंकरराव देवांनी लिहिलेले ग्रंथ, पत्रे, विविध वर्तमानपत्रातील लेख तसेच इंग्रजांचे दप्तर आणि शंकरराव देव यांच्या समकालीन व्यक्तीने लिहिलेली ग्रंथसंपदा, वर्तमानपत्रे यांचा उपयोग सदर संशोधनासाठी केलेला आहे. प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचे अंतर्गत व बहिरंग परीक्षण करून सदर संशोधनासाठी त्यांचा उपयोग केला आहे.

**प्रस्तावना**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी व्यापारासाठी भारतात आली. येथील दुहीचा फायदा घेऊन ती सत्ताधीश झाली. कंपनीच्या अन्यायी धोरणांविरोधात 1857 चा उठाव झाला. या उठावात भारतीयांचा पराभव होऊन भारतावर इंग्लंडच्या राणीचे राज्य प्रस्थापित झाले. 'भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस'ची स्थापना डिसेंबर1885 रोजी झाली. या संघटनेच्या माध्यमातून मवाळवाद 1885 ते 1905 जहालवाद 1905 ते 1920 व गांधीवाद 1920 ते 1947 या तीन टप्प्यांमध्ये स्वातंत्र्य आंदोलन लढले गेले. तसेच देशभरात मवाळ, जहाल, सशस्त्र क्रांतिकारक, डाव्या व उजव्या विचारधारेचे प्रवाह भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनास आपापल्या परीने गति देत होते. तत्कालीन महाराष्ट्रीय राजकारणामध्ये मवाळ, जहाल आणि सशस्त्र क्रांतिकारक असे तीन प्रवाह होते. या प्रवाहांचे नेतृत्व अनुक्रमे नामदार गोपाळ कृष्ण गोखले, बाळ गंगाधर टिळक आणि वि.दा. सावरकर हे करीत होते. महात्मा गांधीजींनी भारतीय जनतेच्या हातामध्ये सत्याग्रहाचे शस्त्र देऊन जनतेला निशस्त्र प्रतिकाराचा मार्ग दाखविला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे स्वरूप व्यापक बनले.

**बालपण व शिक्षण**

शंकररावांचा जन्म 30 जानेवारी 1895 रोजी सातारा जिल्ह्यातील भोर येथे झाला.[1] त्यांच्या वडिलांचे नाव दत्तात्रेय तर आईचे नाव गंगुबाई होते.[2] सातारा जिल्ह्यातील बावधन हे शंकररावांचे मूळ गाव होते. त्यांना सात काका काका होते. वडील दत्तात्रेय हे सर्वात मोठे होते.[3] शंकरराव अडीच वर्षाचे असताना त्यांची आई वारली. त्यामुळे त्यांचा सांभाळ व संवर्धन 1904 सालापर्यंत भोर येतेच त्यांच्या काकीने केले. शंकररावांचे वडील पुण्याला आचारीचा व्यवसाय करीत. पुण्यातील भांग्या मारुतीच्या आचारी च्या अडयातील ते प्रमुख होते. दारू शिवाय त्यांना सर्व प्रकारची व्यसने होती. यामुळे शंकरराव आई बापाच्या प्रेमाला पोरकेच राहिले. मुंडले काकीकडे भोर येते ते पहिली ते तिसरी पर्यंत शिकले. चौथी व पाचवी चे शिक्षण बावधन येते झाले.[4] प्राथमिक शिक्षण संपवून शंकरराव हायस्कूलच्या शिक्षणाकरिता 1907 साली पुण्यास आले. पुण्यात एका चुलत्याचे शिलाईचे दुकान होते. ते त्यांच्याकडे राहू लागले. महाराष्ट्र स्कूल या इंग्रजी शाळेत राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करणारे धडे गिरवू लागले. वयाच्या तेविसाव्या तेविसाव्या वर्षी ते बी.ए .झाले.[5] संस्कृत शिक्षणाची सोय न झाल्यामुळे त्यांना फ्रेंच भाषा घ्यावी लागली. इंटर पर्यंतचे कॉलेजचे शिक्षण बडोद्यास झाले. तेथे विनायक भावे, न. वि. गाडगीळ हे त्यांचे सहाध्यायी होते. या कॉलेज जीवनात

त्यांना स्वता:मधील वक्तृत्व कलेची जाणीव झाली. फ्रेंच व इंग्रजी हे विषय घेऊन त्यांनी बी.ए.चे शिक्षण मुंबईतील सेंट झेवियर कॉलेजमध्ये पूर्ण केले.[6] देशसेवेसाठी कायद्याचे ज्ञान असणे आवश्यक असल्यामुळे त्यांनी कायद्याची पदवी घ्यायचे ठरविले. 1919 आली एल.एल.बी.च्या पहिल्या परीक्षेस बसले पण अभ्यासापेक्षा इतर कामातच ते गर्क असल्याने नापास झाले.

**राष्ट्रप्रेमाचे संस्कार व राष्ट्रीय चळवळीत सहभाग**

शंकरराव आपले खडतर जीवन जगत शिक्षण घेत असताना त्यांचे मन भारतात चाललेल्या राजकीय घडामोडींचा वेध घेत होते. त्या काळात पुण्यात केसरी, काळ, भाला ही वर्तमानपत्रे होती. भारतीय प्रबोधनाचा सूर्य उगवू लागला होता. लाल बाल पाल ही त्रिकुटी आबालवृद्धांच्या तोंडी होती. शंकररावांचे एक मित्र शिंपीकाम करीत असत शंकरराव त्यांना केसरी, काळ, ज्ञानप्रकाश ही वर्तमानपत्रे वाचून दाखवीत. त्यातील राष्ट्रीय स्वातंत्र्यविषयक लेखात ते तल्लीन होत.

शंकररावांच्या जीवनाची मूलभूत प्रेरणा अध्यात्मविद्येची होती. त्यांना गीता, उपनिषद व ब्रह्मसूत्रे इत्यादी ग्रंथांचे आकर्षण होते. तसेच ज्ञानेश्वर, रामकृष्ण परमहंस ,विवेकानंद, अरविंदबाबू, रमणी महर्षी, जे. कृष्णमूर्ती इत्यादी प्रभूतींचे जबरदस्त आकर्षण वाटत असे. तथापि आत्मविद्या आणि स्वातंत्र्यप्राप्ती या दोन्ही प्रेरणांचा गांधीजींच्या जीवनात झालेला सुंदर संगम पाहून त्यांनी गांधीप्रणीत कार्याला आपले जीवन वाहिले.

राष्ट्रीय चळवळीत कसे सामील व्हायचे, काय करायचे हा विचार शंकरराव देवांच्या मनात घोळत होता. राष्ट्रीय बाण्याच्या छत्रे मास्तरांनी हे हेरले. कर्नाटकाचे लोकप्रिय नेते गंगाधरराव देशपांडे यांच्याशी शंकररावांची भेट घालून दिली.[7] ते राजकीय कार्याकरिता तरुणांना हेरण्यात तरबेज होते. त्यांच्या बरोबर शंकरराव बेळगावला त्यांच्या घरी गेले. टिळकांच्या होमरूल लीगच्या सभासदांची वर्गणी वसूल करण्याचे काम त्यांच्यावर सोपविले, हीच शंकररावांच्या सार्वजनिक जीवनाची सुरूवात ठरली.

**शंकरराव देवांची गांधीजींशी प्रथम भेट**

गांधींजी 1915 साली दक्षिण आफ्रिकेतील पराक्रमाचे तेजोवलय घेऊन भारतात दाखल झाले. त्यांचे निर्मळ चारित्र्य, कर्तृत्व व आदर्श कार्यप्रणालीचा प्रभाव देशभरातील जनतेच्या मनावर पडू लागला होता. कर्नाटकचे लोकप्रिय नेते श्री गंगाधर देशपांडे हे देखील गांधीवादी विचाराने प्रभावित झाले. महात्मा गांधीजींना बिहारमध्ये चंपारण्यात ग्रामसेवेचे काम करण्यासाठी योग्य महाराष्ट्रीयन तरुण तात्काळ हवा होता. गांधीजींनी गंगाधर देशपांडे यांना पत्र लिहून तशी विचारणा केली. तेंव्हा त्यांनी शंकररावांना 'तुम्ही जाणार का' अशी विचारणा केली.[8] शंकररावांनी लगेच होकार दर्शविला. गंगाधररावांची चिठ्ठी घेऊन शंकरराव गांधीजींना भेटण्यास निघाले. गुजरातमधील गोध्रा येथे वामनराव मुकादम वकिलांच्या घरी त्यांची गांधीजींशी प्रथम भेट झाली.[9] तर दुसरी भेट मुंबई येथील मणी भवनात झाली. तेथून ते बिहारमधील चंपारण्य जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असलेल्या मोतीहारीश गेले

**चंपारण्याचा लढा**

चंपारण्यातील निळीच्या शेतकऱ्यांनी गोऱ्या मळे वाल्यांच्या पिळवणूकी विरुद्ध गांधीजींच्या सत्याग्रही मार्गाने उठाव केला. तो यशस्वीही झाला. निळीची प्रथा बंद झाली तरी कोठीवाल्यांची गुर्मी व शेतकऱ्यांना त्यांची वाटणारी दहशत कमी झाली नव्हती. या शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम गांधीजींनी शंकररावांवर सोपविले. मोतीहारीहून निघणाऱ्या रेल्वेच्या नर्कटिया जंक्शन पासून नेपाळच्या पायथ्याशी असलेल्या बेतीहारवा या गावी तेथे स्थापिलेल्या आश्रमात कार्यकर्ता म्हणून त्यांची नेमणूक झाली गांधीजींना मिळालेला हा पहिला महाराष्ट्रीयन तरुण होय.

आश्रमात राहणाऱ्या कार्यकर्त्यांना, प्रौढ शेतकरी बंधूंना शिकविणे, वर्तमानपत्र वाचून दाखविणे, देशातील घडामोडींचा अर्थ समजावून सांगणे, अधिकाऱ्यांच्या अन्यायाविरुद्ध झुंज देण्यास प्रेरणा देणे ही कामे त्यांनी सहा सात महिने उत्कृष्टपणे केली.[10] यानंतर ते पुण्यास परत आले.

**असहकार आंदोलनातील शंकररावांचे कार्य**

ब्रिटिशांच्या विरोधात महात्मा गांधींनी असहकार आंदोलनाचे रणशिंग फुंकले. बिहारहून पुण्यास परत आलेल्या शंकररावांनी महाराष्ट्राच्या राजकारणात हिरीरीने भाग घेतला. त्यांच्या ठिकाणी प्रभावी वक्तृत्व होते. 'शंकराचार्य जसे दिग्विजयार्थ निघत' तसे गांधीजींच्या असहकारीतेच्या व रचनात्मक कार्यक्रमाची पताका फडकवित ते महाराष्ट्रभर फिरले.[11] महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव या प्रमुख शहरात भाषणाच्या माध्यमातून असहकार आंदोलनाचा प्रचार केला. पुणे हे तर महाराष्ट्राचे नाक समजले जाई. शंकरराव देवांनी गणेशउत्सवात पुण्याच्या पेठापेठातून असहकार आंदोलनाचा उद्घोष केला[12]. 1920 च्या कलकत्ता काँग्रेसमध्ये गांधीजींच्या असहकारितेच्या ठराव पास झाला. त्यांच्या प्रचाराकरिता स्थापन केलेल्या समितीत ते चिटणीस पदावर कार्यरत होते. काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनाच्या विषय नियामक समितीमध्ये शंकरराव देव निवडून आले. विषय नियामक समितीच्या कामकाजाचा वृत्तांत प्रतिनिधी व प्रेक्षकांना शंकरराव मोठ्या आवडीने सांगत.[13]

**गांधी तत्वज्ञानाचे प्रचारक**

गांधी युगाच्या प्रारंभी महाराष्ट्रात राजकीय क्षेत्रात टिळक पक्षाचे प्राबल्य होते. टिळकांच्या मृत्यूनंतर भारतीय राजकारणात महात्मा गांधी रुपी सूर्याचा उदय झाला. सत्य, अहिंसा, सत्याग्रह हे तत्वज्ञान त्यांनी मांडले. तथापि या नवीन तत्वज्ञानाच्या किरणांनी महाराष्ट्रातील विचारवंतांच्या बुद्धिकुहरात प्रवेश केला तेंव्हा त्यांची प्रतिक्रिया सर्वसाधारणपणे प्रतिकूल अशीच राहिली. काचेवर सूर्यकिरणे पडून परावर्तित व्हावे काहीशी तशीच अवस्था महाराष्ट्रातील बहुतांश विचारवंतांची होती. टिळकपंथीय विचारवंतांनी गांधीजींचा साबरमतीचा सत्याग्रह आश्रम हा टिळकांचे तत्वज्ञान नष्ट करण्यासाठी जन्माला आला आहे असा अगदी उघड प्रचार सुरू केला.[14] त्याला रोखण्याचे काम शंकररावांनी केले. 1920 साली महाराष्ट्राच्या सार्वजनिक राजकीय जीवनात एक प्रभावी परिणामकारक वक्ता व एका नवीन राजकीय तत्वज्ञानाचा पुरस्कर्ता म्हणून त्यांनी प्रवेश केला.[15]

1920 च्या दशकामध्ये गांधीजींच्या सत्याग्रही राजकारणास महाराष्ट्रामध्ये फारसा प्रतिसाद नव्हता. अशा प्रतिकूल परिस्थितीत गांधीजींचे सत्याग्रहाचे तत्वज्ञान जनतेमध्ये प्रसारित करून गांधीप्रणीत राजकारण महाराष्ट्रमध्ये रुजविण्याचे मोठे आव्हान होते. हे महत्वपूर्ण कार्य आचार्य शं.द.जावडेकर, आचार्य स.ज. भागवत, काकासाहेब गाडगीळ, वि.म. भुस्कुटे, अण्णासाहेब दास्ताने, काकासाहेब कालेलकर आणि शंकरराव देव यांनी मोठ्या शर्थीने केले. हे कार्य घडवून आणण्यामध्ये शंकरराव देव यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

असहकार युगात महाराष्ट्रात अनेक ठिकाणे राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्था उदयास आल्या आणि त्यातील शिक्षकांनी गांधीजींच्या शिकवणीचा महाराष्ट्रातल्या तरुण पिढीला लाभ करून दिला. या नव्या पिढीतील कार्यकर्त्यांचे संघटन व मार्गदर्शन करण्याचे काम शंकररावांनी केल्यामुळे गांधी युगातील नव्या महाराष्ट्रातील पुढारीपण स्वाभाविकच शंकरराव देवांकडे चालत आले.[16] टिळकांच्या वैचारिक पकडीतून महाराष्ट्रातल्या आणि मुख्यतः पुण्यातल्या पांढरपेशा मध्यमवर्गीयांना काँग्रेसकडे आणली ते शंकरराव देवांनी. महाराष्ट्रात काँग्रेस सर्व व्यापक करण्याच्या उद्देशाने शंकररावांनी ब्राह्मणेतरांना सत्तास्थापनात प्रवेश दिला. त्यांच्या कार्याचा योग्य गौरव व सन्मान केला. त्याचाच भाग म्हणून त्यांनी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष पद केशवराव जेधे यांना दिले.[17] शंकररावांनी महाराष्ट्रात गांधीवादी काँग्रेस वाढीसाठी महत्त्वाच्या पदांचा त्याग केला .फेर नाफेरामधील बखेडा 1 ऑगस्ट 1927 रोजी समेट घडवून आणून तात्यासाहेब केळकर आणि शंकरराव देव यांनी मिटविला.[18]

शंकरराव देवांनी 1920 साली महाराष्ट्रात येऊन गांधीवादी काँग्रेस संघटना महाराष्ट्रात उभी करण्याचे व त्यासाठी काँग्रेसचे कार्यकर्ते घडविण्या ची फारच मोठी आणि महत्वाची कामगिरी केली. राजनैतिक आणि रचनात्मक अशा दोन्ही क्षेत्रात त्यांनी कामे केली. महाराष्ट्राला महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसात्मक राजकारणाकडे खेचून आणण्याचे सारे श्रेय त्यांनाच आहे.[19]

**फैजपूर ची फतेह**

ग्रामीण जनता स्वावलंबी आणि संघटित झाल्याशिवाय भारतीय भारतीय स्वातंत्र्याचा लढा परिणामकारक होणार नाही ही गांधीजींची दृष्टी प्रारंभापासून होती आणि त्या दूरदृष्टीने काँग्रेसची अधिवेशने खेडोपाड्यात भरविण्याची कल्पना गांधीजींनी सर्वां पुढे ठेवली. शंकररावांनी ती कल्पना उचलून धरली आणि त्यादृष्टीने काँग्रेसचे अधिवेशन 1936 साली खानदेशातील जळगाव जिल्ह्यातील फैजपूर ला घेतले.[20] जळगावचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक यावल व रावेरचे मामलेदार इत्यादी शासकीय अधिकारी वैजापूर व सावदा नगरपालिका आणि राजनिष्ठ धनिकांनी अधिवेशनास विविध कारणांसाठी विरोध केला.[21] अधिवेशनासाठी जमीनही मिळू नये यासाठी शेतकऱ्यांवर दडपण आणले. या फैजपुरचे फजितपूर होणार अशी कोल्हेकुई विरोधकांनी केली. शंकरराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मोठ्या हिमतीने हे अधिवेशन उत्कृष्टरित्या पार पाडले. या अधिवेशनाचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू होते. गांधीजी तर सहा दिवस आधीच येऊन राहिले होते. शंकरराव देव यांनी स्वागताध्यक्ष म्हणून स्वच्छ व सुंदर मराठी भाषेत भाषण केले होते. या अधिवेशनामुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा मास कॉन्टॅक्ट वाढला. या अधिवेशनामुळे पूर्व खानदेशात काँग्रेसचे संख्याबळ वाढून 10000 सभासद

नोंदविण्यात आले. महाराष्ट्रात त्यावेळी काँग्रेसचे 45000 सभासद नोंदवले गेले होते.[22] नव्या महाराष्ट्राच्या दृष्टीने फैजपूर काँग्रेस हा स्वातंत्र्यसंग्रामातील प्रमुख टप्पा ठरला. शंकररावांनी मोठ्या कष्टाने फैजपुरचे फत्ते करून दाखविली.

**आंदोलनातील सहभाग आणि तुरुंगवास**

गांधीयुगात तुरूंगयात्रा सुरू झाल्या. त्यामुळे राजकीय क्षेत्रात काम करीत असताना ही अनेक वेळा तुरुंगात जावे लागत असे. शंकररावांनी ही अनेक वेळा तुरुंगात जावे लागले. मुळशी सत्याग्रह आंदोलनात त्यांना येरवडा जेलमध्ये 1922 साली एक महिन्याची साध्या कैदेची शिक्षा झाली तर 1923 मध्ये तीन महिन्यांची सक्तमजुरीची अशा दोन वेळा शिक्षा झाल्या दुसऱ्यांदा झालेल्या शिक्षेच्या वेळी तुरुंगात अन्न सत्याग्रह केल्याबद्दल त्यांना 20 फटक्यांची शिक्षा झाली होती.[24] 1927 साली स्वराज्य पत्रातील 'निदान धर्मयुद्ध करा 'या लेखाबद्दल त्यांना दोन वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली.[25] 1930 साली दीड वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. 1940 च्या वैयक्तिक सत्याग्रहात येरवडा जेलमध्ये एक वर्षाची शिक्षा भोगावी लागली. आणि अंग्रेजो छोडो भारत आंदोलनात 1942 साली पावणे तीन वर्षाच्या तुरुंगवासात राहावे लागले. शंकररावांना पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल इत्यादी नेत्यांबरोबर अहमदनगरच्या किल्ल्यात राजबंदी म्हणून ठेवण्यात आले. तुरुंगवासाचा काळ हा शंकररावांनी आत्मचिंतनासाठी आणि लेखन वाचण्यासाठी उपयोगात आणला .नोव्हेंबर 1946 मध्ये मिरज येते आचार्य कृपलानी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनात शंकरराव काँग्रेसचे सरचिटणीस झाले. पुढे भारतीय राज्यघटना बनविण्यासाठी घटना समिती नियुक्त झाली त्या समितीमध्ये ते सभासद होते.[26]

**विधायक कार्य**

गांधीजींचा रचनात्मक कार्यक्रम म्हणजे लोकांची अहिंसात्मक शक्ती निर्माण करण्याचे शक्ती घर होते हे शंकरराव देवांनी जाणले होते , म्हणूनच 1924 - 25 सालापासून ते विधायक कार्याकडे वळले. त्यांनी आपल्या दीर्घ आयुष्यात विधायक कार्याच्या अनेक संस्था उभारल्या त्या संस्थांसाठी कर्तबगार कार्यकर्ते मिळविले आणि महाराष्ट्र जीवन सर्व बाजूंनी समृद्ध करण्याचा सतत प्रयत्न केला. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, सुलभ मुद्रणालय,नवभारत मासिक सासवड आश्रम या त्यांनी स्वतः निर्माण केलेल्या व वाढविलेल्या संस्था आहेत.[27] याशिवाय महाराष्ट्रातील गिरणी कामगार संघटना, राष्ट्रभाषा प्रचार, स्त्रियांचे संघटन ,हरिजन उद्धार खादी ग्रामोद्योग, वर्धा शिक्षण, विद्यार्थी संघटन इत्यादी अनेक प्रकारच्या विधायक कार्यांना सतत पोषण व मार्गदर्शन पुरविले. महात्मा गांधीजींनी भारताला आधुनिक काळात स्वावलंबी, स्वाभिमानी, निर्भय आणि शांतीपरायण बनविण्यासाठी ज्या ज्या प्रेरणा दिल्या त्या बहुतेक प्रेरणांची समरस होऊन शंकररावांनी महाराष्ट्राचे जीवन फुलविण्याचा अखंड प्रयत्न केला. भारताच्या इतिहासात हे त्यांचे कार्य कायमचे नमूद होऊन राहील यात मुळीच संशय नाही.

**निष्कर्ष**

शंकरराव देव यांचे बालपण व शिक्षण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये गेले. लहानपणीच ते आईच्या प्रेमाला पारखे तर वडिलांच्या प्रेमाला पोरके झाले. शालेय जीवनातच त्यांनी देशसेवेसाठी आपले जीवन अर्पण

करण्याची प्रतिज्ञा घेतली. टिळकांपासून त्यांना देशसेवेची प्रेरणा मिळाली आणि देशसेवेचा कार्यक्रम त्यांनी महात्मा गांधींपासून आत्मसात केला. चंपारण्य सत्याग्रहापासून ते गांधीजींच्या आंदोलनाशी जोडले गेले. महाराष्ट्रात गांधीवादी काँग्रेस संघटना उभी करण्याची व वाढविण्याची ,काँग्रेस कार्यकर्ते घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. त्यांनी मोठ्या कष्टाने फैजपूर सारख्या ग्रामीण भागांमध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन यशस्वी केले. भारताच्या भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनांमध्ये सहभाग घेतला आणि अनेकवेळा तुरुंगवासही सहन केला. राजनैतिक आणि रचनात्मक अशा दोन्ही क्षेत्रात त्यांनी कामे केली. त्यांनी आपल्या दीर्घ आयुष्यात विधायक कार्याच्या अनेक संस्था उभारल्या. त्या संस्थांसाठी कर्तबगार कार्यकर्ते मिळविले आणि महाराष्ट्र जीवन सर्व बाजूंनी समृद्ध करण्याचा सतत प्रयत्न केला. त्यांचे जीवन सेवकत्व ,साधकत्व आणि लोकनेतृत्व या तीन गुणांची त्रिपदा गायत्री होती. शंकरराव देव निष्ठावान गांधीवादी स्वातंत्र्यसेनानी, कुशल संघटक, प्रभावी वक्ते, राजकारणी आणि गांधीवादी विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. राष्ट्रउभारणीच्या महायज्ञात त्यांनी आपले जीवन समर्पित केले.

**संदर्भसूची**


1. देव शंकरराव, दैव देते पण कर्म नेते, सासवड आश्रम विश्वस्त मंडळ सासवड, प्रथमावृत्ती 1976. पृष्ठ 1
2. किता पृ.1
3. महाजन सेना, श्रद्धेय शंकरराव देव, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे, प्रथमावृत्ती 1997. पृष्ठ 2
4. देव शंकरराव ,दैव देते पण कर्म नेते, उपरोक्त पृष्ठ 13
5. भाऊ धर्माधिकारी व सेना महाजन संपा., गांधीमार्ग मीमांसा, शंकरराव देव जन्मशताब्दी विशेषांक,सासवड आश्रम पुणे, जानेवारी फेब्रुवारी 1995. पृष्ठ 16
6. किता पृष्ठ 17
7. देव शंकरराव, उपरोक्त पृष्ठ 38
8. किता, पृष्ठ 39
9. किता, पृष्ठ 40
10. किता, पृष्ठ 44
11. भागवत के.अ. संपा. आचार्य भागवत संकलित वाङ:मय, खंड ॥, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, प्रथमावृत्ती 1987. पृष्ठ 310
12. धर्माधिकारी भाऊ, संपा. उच्चार्थ साधक शंकरराव, सासवड आश्रम विश्वस्त मंडळ सासवड, प्रथमावृत्ती 1987. पृष्ठ 2 , 3.
13. डॉ. मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, राजहंस प्रकाशन, पुणे, 2007. पृ 576
14. देव शंकरराव, उपरोक्त, पृष्ठ 56
15. डॉ. मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा ,उपरोक्त, पृष्ठ 576
16. भागवत अ. के., संपा., उपरोक्त, पृष्ठ 309

**17.** महाजन सेना, श्रद्धेय शंकरराव देव, उपरोक्त पृष्ठ 41

**18.** फडके य.दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड IV, श्री विद्या प्रकाशन,पुणे, 1991. पृष्ठ 44

**19.** सोवनी म. वि. संपा., महाराष्ट्राच्या कालमुद्रा, नितीन प्रकाशन पुणे ,1976. पृष्ठ 601

**20.** चौधरी कि.का. संपा. जळगाव जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मराठी आवृत्ती, 1994. पृष्ठ 134

**21.** किता, पृष्ठ 135

**22.** किता, पृष्ठ 138

**23.** भागवत अ.के., संपा. उपरोक्त,पृष्ठ 309

**24.** देव शंकरराव, उपरोक्त, पृष्ठ 90

**25.** देव शंकरराव व त्र्यं.ब. हरोलीकर संपा., स्वराज्यावरील खटला 1928 स्वदेशी प्रकाशन मंडळी पुणे, 1928. पृष्ठ 5

**26.** भाऊ धर्माधिकारी, उपरोक्त, पृष्ठ 5

**27.** भागवतअ. के., आचार्य भागवत संकलित वाङमय , उपरोक्त, पृष्ठ 308

# १५. पंढरपूर तालुक्याच्या सहकार चळवळीतील स्थित्यंतरे

**डॉ. लोखंडे नारायण सोपान**
उमा महाविद्यालय, पंढरपूर.

## प्रास्ताविक

पंढरपूर हे सोलापूर जिल्हयामधील महत्वाचे असे तालुक्याचे ठिकाण आहे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतात कृषी विकास, औद्योगिक विकास आणि शैक्षणिक विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून व सहकारी चळवळीच्या माध्यमातून स्थानिक भागाच्या विकासास सुरूवात झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात पंढरपूर तालुक्यात पारंपरिक पध्दतीने शेती व उद्योग केले जात होते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मात्र सहकार चळवळीच्या विकासामुळे नगदी पिकांची मोठया प्रमाणात लागवड होऊ लागली. तसेच बदलत्या पीक पध्दतीमुळे येथील सहकारी चळवळीच्या माध्यमातून विविध सहकारी संस्थांची स्थापना झाली. सहकार क्षेत्राने पंढरपूर तालुक्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल केला. क्रांती घडविली स्वातंत्र्यपूर्व काळात तालुक्यात विकास सहकारी संस्थांची संख्या मोठी होती. मात्र इ.स. 1960 नंतरच्या कालखंडानंतर येथील सहकारी चळवळीत मोठी स्थित्यंतरे घडून आली आणि येथे विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना झाली. पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीस स्वातंत्र्यपूर्व काळापासून ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात पंढरपूर तालुक्यातील या चळवळीमध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आली. इ.स. 1990 च्या दशकात येथील सहकार चळवळीने मोठी प्रगती केली. मात्र इ.स. 1990 नंतरच्या कालखंडात येथील सहकाराच्या विकासाला ओहोटी लागली.

सहकार ही संकल्पना मानवाच्या सहजीवनातून उदयास आली आहे. भारतातील सहकारितेच्या विकासाचा मागोवा घेतल्यास सहकाराची कल्पना आणि सहकाराची प्रवृत्ती भारतात प्राचीन काळापासून चालू आहे. अशी माहिती आपणास अर्थवेदाच्या अध्ययनावरून मिळते. आधुनिक कालखंडातील सहकार चळवळीचा उदय 19 व्या शतकात युरोपमध्ये झाला. सहकाराची सुरूवात इंग्लंडमध्ये इ.स. 1844 मध्ये रॉबर्ट ओवेन ओवेन या परोपकारी सद्गृहस्थाने केली.[1] ग. ज. लॉर्ड कर्झन याच्या कालखंडात 25 मार्च 1904 रोजी भारतात पहिला सहकारी पतसंस्थांचा कायदा पास झाला व सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ भारतात रोवली गेली.[2] ब्रिटीश सरकारच्या पुढाकारातून येथे सहकारी संस्थांची स्थापना झाली. ब्रिटीश सरकारला अशा चळवळीची आवश्यकता भासण्याचे कारण म्हणजे भारतात 19 व्या शतकाच्या शेवटी कायदा आणि सुव्यवस्था ढासळली गेली. यावेळी मुंबई प्रांतातील ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर लुटालूट, जाळपोळ व दंगे होऊ लागले. ब्रिटीश सरकारला राजकीय स्थैर्याच्या दृष्टीने असे उठाव परवडण्यासारखे नव्हते आणि म्हणूनच सरकारने याची गंभीर दखल घेतली व सावकारशाहीला पर्याय म्हणून सहकारी संस्था स्थापन कराव्यात अशी कल्पना पुढे आली आणि सहकारी चळवळीचा प्रारंभ झाला.[3] खाजगी सावकाराच्या तावडीतून येथील जनेतला सोडविण्यासाठी या देशात सहकारी चळवळीचा जन्म झाला. एवढे मात्र खरे.

पंढरपूर तालुक्यातील पहिली प्राथमिक शेती पतपुरवठा सहकारी संस्था विकास सहकारी सेवा संस्था दिनांक 3 नोव्हेंबर 1911 रोजी भाळवणी येथे स्थापन झाली. या संस्थेचे नाव भाळवणी वि.का. सेवा संस्था मर्या. भाळवणी असे असून तिचा नोंदणी क्रमांक एमयुआर/पीआरआर/आरएमआर / एसआर/ 2763 असा आहे. दुसरी वि.का. सेवा सहकारी संस्था दिनांक 15 जानेवारी 1913 रोजी करकंब येथे स्थापन झाली.[4]

इ.स.1911 ते इ.स. 2004 या कालखंडात एकूण 128 वि.का. सेवा. सहकारी संस्था पंढरपूर तालुक्यात कार्यरत होत्या. पंढरपूर तालुक्यातील दुसरी सहकारी संस्था व पहिली बॅंक दि. 19 नोव्हेंबर 1912 रोजी पंढरपूर अर्बन को. ऑफ बॅंक लि. पंढरपूर या नावाने स्थापन झाली. नोकरदारांच्या पतपुरवठा सहकारी संस्थेमध्ये पंढरपूर नगरपरिषद नं. 1 कर्मचारी सहकारी पतसंस्था, पंढरपूर ही दि. 20 मार्च 1818 मध्ये स्थापन झाली. 9 जुलै 1951 रोजी पंढरपूर तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्या. पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध झालेली आहे. दि. 17 एप्रिल 1989 रोजी श्री. विठ्ठल फळ उत्पादक सहकारी संस्था, मर्या, पंढरपूर या संस्थेची स्थापना झाली. श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणूनगर गुरसाळे या कारखान्याची स्थापना 5 मार्च 1974 रोजी झाली तर चंद्रभागा सहकारी साखर कारखाना भाळवणी या सहकारी साखर कारखान्याची स्थापना 22 जानेवारी 1990 रोजी झाली. या सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे पंढरपूर तालुक्याच्या सहकारी चळवळीत मोठे परिवर्तन झाले. इ.स. 1911 ते 2004 पर्यंतच्या कालखंडात पंढरपूर तालुक्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या 772 एवढी होती.[5] पंढरपूर तालुक्याच्या सहकारी चळवळीमध्ये स्थित्यंतरे घडवून आणणाऱ्या संस्थांमध्ये सहकारी साखर कारखाने, दि. पंढरपूर अर्बन को. ऑफ. बॅंक लि. पंढरपूर, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या पंढरपूर तालुक्यातील शाखा, वि.का. सेवा संस्था आणि सहकारी दूध संस्थांची भूमिका अतिशय महत्वपूर्ण राहिली आहे. या सहकारी संस्थामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे.

इ.स. 1912 साली फक्त 2300 रूपये भागभांडवलावर सुरू झालेली दि पंढरपूर अर्बन को. ऑफ बॅंक लि. पंढरपूर ही संस्था सध्या एक हजार कोटी रूपयांची उलाढाल करणारी एक सक्षम बॅंक म्हणून सहकारी क्षेत्रात स्थिरावलेली आहे. 604.93 कोटी रूपयांच्या ठेवी, 371.80 कोटी रूपयाचे कर्ज वाटप आणि 16 शाखा असा बॅंकेचा विस्तार झालेला आहे.[6]

पंढरपूर तालूक्यातील सहकारी चळवळीने ग्रामीण व शहरी भागात औद्योगिकरणाचे व सहकारी संस्थांचे जाळे विणल्याने ग्रामीण व शहरी भागाचा आर्थिक विकास झालेला आहे. तालुक्यातील सहकारी क्षेत्रातील नेतृत्व हे मोठया प्रमाणात राजकीय क्षेत्रातून आणि मोठया शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले आहे. या चळवळीमुळे शेतकऱ्यांची सावकारशाहीतून सुटका होण्यास मदत झाली आहे. तालुक्याच्या ग्रामीण भागात रस्ते, पुल, जलसिंचनाच्या सोई, शिक्षणाच्या सोई व वैद्यकिय सुविधा निर्माण झाल्या आहेत. या चळवळीमुळे स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण होवून बेरोजगारांना काम मिळाले आहे. परिणामी स्थलांतराचे प्रमाण कमी झाले आहे.

औदुंबर कोंडिबा पाटील व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून तालुक्यातील गुरसाळे या ठिकाणी इ.स. 1973 रोजी श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. 20 ऑक्टोबर 1976 रोजी कारखान्याचे भूमिपूजन झाले आणि इ.स. 1980 पासून प्रत्यक्ष गाळपास सुरूवात झाली. आणि हा कारखाना

तालुक्याच्या विकासाचा केंद्रबिंदू बनला. या कारखान्याने औंदुबर पाटील व वसंतराव काळे यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रात आपला नावलौकिक प्राप्त केला होता. मात्र नंतरच्या काळात हा कारखाना रसातळाला गेलेला आहे. या कारखान्याने अनेक क्षेत्रात उच्चांक प्राप्त केले होते. उत्कृष्ट व्यवस्थापन, शेतकऱ्यांना दिला जाणार भाव, कार्यक्षमता इत्यादी घटकामुळे पंढरपूर तालुक्याच्या सहकारी क्षेत्रात या कारखान्याने नावलौकिक मिळविला होता. मात्र इ. स. 2000 नंतरच्या कालखंडात टोकाची गटबाजी, नेतृत्वावरून वाद, राजकारण, परिणामी हा कारखाना अधोगतीच्या दिशेने वाटचाल करू लागला. सध्या हीच स्थिती चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याची आहे. तालूक्यातील अनेक सहकारी संस्थांना या अवस्थेतून जावे लागत असल्याने तालूक्याच्या सहकारी चळवळीत एक मोठी समस्या निर्माण झाली आहे.[7]

अनेक सहकारी संस्था आर्थिकदृष्टया डबघाईस आलेल्या आहेत. व्यवस्थापन शास्त्राच्या तत्वाप्रमाणे सहकारी संस्था चालविण्यापेक्षा सामाजिक व राजकीय हिताची जोपासणा केल्यामुळे सहकारी संस्था व्यावसायिक पातळीवरती कमकुवत ठरत आहेत. अनेक सहकारी संस्थांचे आजारीपण दिवसेंदिवस वाढत आहे व याकडे शासनाचेही दुर्लक्ष होत आहे. या चळवळीची ही शोकांतिका म्हणावी लागेल.[8] तसेच तालुक्यातील सहकारी चळवळीचा इतिहास पाहिला तर या तालुक्याचा सहकारातून खाजगीकरणाकडे असा उलटा प्रवास चालू झाला आहे. ही या चळवळीच्या विकासातील एक प्रमुख अडचण ठरणार आहे.[9]

पंढरपूर तालुक्यात स्थापन झालेल्या विविध प्रकारच्या सहकारी संस्थांमुळे तालुक्यातील पीक पध्दतीत मोठया प्रमाणात बदल झाले. पारंपारिक पिकांच्याऐवजी नगदी पिकांचे प्रमाण वाढले. बदलत्या पीक पध्दतीमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला. प्रामुख्याने सहकारी साखर कारखाने, दूध संस्था, अर्बन बँक, पतसंस्था, वि.का. सोसायटी, पणन संस्था, गृहनिर्माण संस्था इत्यांदींची मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. या संस्थांमुळे तालुक्याच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होण्यास मदत झाली.

इ.स. 1990 नंतरच्या कालखंडात पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीला विविध प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. जून 1991 मध्ये तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग या दोघांनी देशात नव्या आर्थिक धोरणाचा प्रारंभ करण्याच्या दिशेने विचार सुरू केला. आणि 24 जुलै 1991 रोजी केंद्रीय अर्थसंकल्प मांडताना केलेल्या भाषणात अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी आर्थिक उदारीकरणाची द्वाही पुकारली. त्यानंतर भारतामध्ये जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या धोरणाचा प्रारंभ झाला. या धोरणाची फटकाही या चळवळीला बसलेला आहे.[10]

इ.स. 1990 पूर्वीच्या काळात शेतमाल प्रक्रिया व दुग्धोत्पादन या क्षेत्रात सहकारी संस्थांचे जवळपास संपूर्ण वर्चस्व असल्यामुळे तेथील उदयोगांतर्गत लढाई ही सहकार विरूध्द सहकार अशी होती. परिणामी इ.स. 1990 पूर्वीच्या काळात सहकारी चळवळीने आदर्श निर्माण केले. परंतु इ.स. 1991 नंतर मात्र सहकार विरूध्द खाजगी अशी स्पर्धा सुरू झाली. तालुक्यातील अनेक नेत्यांनी ग्रामीण भागात स्वतःच्या दूध संस्था स्थापन केल्या. खाजगी सहकारी सारखर कारखाने स्थापन करण्याच्या दिशेनेही वाटचाल सुरू केली. सहकाराच्या राजकीयकरणामुळे, घराणेशाहीमुळे नवीन उच्चशिक्षीत तरूणांना सहकारी चळवळीचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली नाही तर दुसऱ्या बाजूला

वशिलेबाजीमुळे हुषार, सृजनशील तरूणांना सहकारी चळवळीपासून बाजूला रहावे लागत आहे. परिणामी ही चळवळ कुशल मनुष्यबळापासून वंचित राहताना दिसून येत आहे.

पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीत इ.स. 1990 पर्यंतच्या कालखंडात जो जोश गुणवत्ता आणि दुरदृष्टी होती. ती नंतरच्या काळात लोप पावल्याचे स्पष्टपणे दिसते. आज पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळ तिसऱ्या पिढीकडे आहे. सहजपणे मिळालेल्या संस्था व नेतृत्व गाजविण्या पलीकडे ही पिढी नवीन काही निर्माण करू शकत नाही. तालुक्यात 1911 पासून या चळवळीला सुरूवात झाली असली तरी या चळवळीने संख्यात्मक प्रगती केली. मात्र गुणात्मक वाढ झाली नाही[11]

**समारोप**

एकंदरीत पंढरपूर तालुक्यातील सहकारी चळवळीमुळे तालुक्याचा राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास मोठया प्रमाणावर झालेला आहे. पंढरपूर तालुक्याच्या ग्रामीण भागात सहकारी उद्योगधंदयांचे विकेंद्रीकरण झालेले आहे. तिला लाभलेल्या नेतृत्वामुळेही या चळवळीचा विविधांगी विस्तार झाला आहे. इ. स. 1904 ते 2004 या शंभर वर्षाच्या काळात तालुक्यातील सहकारी संस्थांची व सभासदांची संख्या यात फार मोठी वाढ झाली आहे. एकंदरीतच या चळवळीमध्ये शंभर वर्षाच्या काळात मोठी स्थित्यंतरे झाल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची**

1. कर्वे चितांमण गणेश, जोगळेकर सदाशिव आत्मराम, जोशी यशवंत (संपा), *महराष्ट्र परिचिय–संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश,* प्रसाद प्रकाशन, पुणे, 1954, पृ. 639.
2. नाटेकर अ. वि., *सहकार कायदयाची शतकोत्तर वाटचाल,* फाले कृ.ल. व फाले किशोर (संपा.), *सहकार चळवळ 1904–2004 शतक लेखसंग्रह,* निर्माण प्रकाशन, वर्धा, 2005, पृ.269.
3. कामत गो.स., सहकार : तत्व, व्यवहार व व्यवस्थापन, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, ऑगस्ट 1999, पृ. 109ण
4. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पंढरपूर, जिल्हा सोल्हापूर यांच्या कार्यालयाकडून मिळालेली माहिती.
5. कित्ता
6. दैनिक सकाळ, सोलापूर आवृत्ती, दि. 23 डिसेंबर 2015, पृ.7
7. मुलाखत : बाळासाहेब पाटील, पंढरपूर, दि. 02 मार्च 2022
8. मुलाखत : ज्ञानेश्वर कृष्णा कांबळे, भंडीशेगाव, ता. पंढरपूर, दि. 5 मार्च 2022
9. मुलाखत : उदय उत्पात, पंढरपूर, दि. 06 मार्च 2022
10. शिरसाठ विनोद (संपा.), साप्ताहिक साधना, पुणे, दि. 1 ऑगस्ट 2015, पृ.4
11. दैनिक लोकमत, सोलापूर आवृत्ती, दि. 05 मार्च, 2022, पृ.7

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# १६. महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतदादा पाटील यांचे सहकार धोरण

**Dr. Madhukar Vithoba Jadhav**
Department of History, Y. C. College, Halkarni, Tal-Chandgad, Dist-Kolhapur.
University of Kolhapur.

**प्रस्तावना**

वसंतदादा पाटील हे सहकार चळवळीचे दीपस्तंभ होत. सहकार महर्षी वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातला निर्णायांक वळण देऊन विकास साधला. महाराष्ट्राचे शिल्पकार असणा-या वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी खूप कष्ट घेतले. आधुनिक महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये ज्यांनी ज्यांनी योगदान दिले त्यामध्ये वसंतदादा पाटील यांचे नाव श्रेष्ठतम आहे. अचाट स्मरणशक्ती, कणखर नेतृत्व गुण, अफाट संघटन कौशल्य, श्रेष्ठ आकलन शक्ती, योग्य निर्णय क्षमता, सर्वांगीण समाज मन, शेतकरी, ग्रामीण समाज जीवनाची अचूकता व परिपूर्ण जाणीव इत्यादी. गुणांच्या आधारे त्यांनी महाराष्ट्राचा विकास साधला. त्यांच्या या लोकहितकार कार्याची बीजे त्यांच्या देशभक्तीत होती. त्यांनी महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा देत असताना सर्व सामन्यांचे हित पाहिले. सहकार, उद्योग यातून आर्थिक विकास हे ध्येय कायम ठेविले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, राजस्थानचे माजी राज्यपाल, आधुनिक सांगलीचे भाग्यविधाते असणा-या वसंतदादा पाटील यांचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे. त्यांचे महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीतील योगदान खूप मोठे आहे. आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, राज्यपाल आदी. पदावर कार्य करताना त्यांनी विकासाचे व्हिजन कायम डोळयासमोर ठेवले. आज महाराष्ट्र हे सर्व दृष्टीने प्रगत व विकसित राज्य दिसते आहे. याचे मोठे श्रेय वसंतदादा पाटील यांना दिले जाते. माणसातला मुख्यमंत्री म्हणून वसंतदादा पाटील यांना ओळखले जाते. त्यांच्या भोवती माणसे नाहीत असा एकही दिवस गेला नाही. वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री झाले परंतु त्यांच्या वागण्या, बोलण्यात कधीच फरक पडला नाही. ते शेतक-यांचे,कष्टका-यांचे कैवारी होत. इ. स. १९६५ मध्ये शेतकरी सहकारी कारखान्याची स्थापना झाल्यानंतर वसंतदादा पाटील स्वत: शेतात जावून शेतक-यांना ऊस कसा लावावयाचा याचे प्रशिक्षण देत असत. विकासाचे व्हिजन त्यांनी नेहमी डोळयासमोर ठेविले. महाराष्ट्रातील सहकाराला एक वेगळे व निर्णायक वळण देऊन विकास साधणारे सहकार महर्षि म्हणजे वसंतदादा पाटील होत.

**संशोधनाचे उद्देश**

१. वसंतदादा पाटील यांच्या सहकार विषयक धोरणाची माहिती देणे. २. वसंतदादा पाटील यांचे सहकार चळवळीतील योगदान स्पष्ट करणे.

**गृहीतके**

वसंतदादा पाटील यांचे सहकार विषयक धोरण व त्यांनी त्या संदर्भात घेतलेले निर्णय आजच्या काळात ही प्रेरणा देत आहेत.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. महत्वपूर्ण अशा प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. याचबरोबर वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके या साधनांचाही वापर करण्यात आलेला आहे.

**विषय विवेचन**

सहकार, शिक्षण, शेती, उद्योग या क्षेत्रात वसंतदादा पाटील यांनी केलेले कार्य नवीन पिढीला प्रेरणा देणारे आहे. ते सहकार चळवळीला एक वेगळी दिशा देवून प्रगती साधणारे सहकार महर्षी होत. इ. स. १९५२ च्या पहिल्या

निवडणुकीत ते सांगलीतून आमदार म्हणून निवडून आले. पुढे त्यांनी २५ वर्षे सांगलीचे प्रतिनिधित्व केले. इ. स. १९७२ साली प्रथम मंत्री झाले. इ. स. १९७७ ते १९८५ या काळात त्यांनी चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भूषविले. १९८० साली सांगलीतून खासदार म्हणून निवडून आले. इ. स. १९८५ ते १९८७ या काळात राजस्थानचे राज्यपाल होते. महाराष्ट्र सहकारी बँक, राष्ट्रीय मील मजदूर संघ या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी सांभाळले. विविध अशा २८ संस्थांशी वसंतदादा पाटील कार्य संलग्न होते. यातून त्यांनी महाराष्ट्राच्या विकासाला गती दिली. त्यांच्या चौफेर अशा विधायक दृष्टीने आज महाराष्ट्र सर्वांच्या पुढे धावताना दिसत आहे. समतोल विकास हा प्रगतशील मार्ग आहे हे त्यांच्या विचाराचे मूळ होते.

महाराष्ट्रात सहकारी तत्वावर चालणारा सहकारी साखर कारखाना अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे इ. स. १९४९ मध्ये विठ्ठलराव विखे पाटील यांनी सुरु केला. सहकारी चळवळीतील ही एक अत्यंत महत्त्वाची घटना मानली जाते. हा कारखाना पूर्णपणे सहकारातून चालत असे. येथूनच महाराष्ट्रात सहकारी कारखान्याचे युग सुरु झाले. इ. स. १९५७ साली महाराष्ट्रात १८ सहकारी साखर कारखान्यांची नोंद झाली. आणि महाराष्ट्रात ही संख्या दिवसागणित वाढतच गेली. यातून महाराष्ट्रात साखर उद्योगाच्या क्षेत्रात सर्व श्रेष्ठ बनला. इ. स. १९५१ मध्ये वसंतदादा पाटील यांनी शेतक-यांनी पिकवलेल्या शेत मालाला योग्य आणि रास्त भाव मिळण्यासाठी सांगली मार्केटमध्ये नियंत्रित बाजारपेठ सुरु केली. सहकारी साखर कारखाने, सहकारी सुत गिरण्या, खत कारखाने, तेल गिरण्या, कागद कारखाने, शेतीची अवजारे बनविणारे कारखाने, सिमेंटचे पाईप तयार करणारे कारखाने, कृषी प्रक्रिया उद्योग आदी. उद्योग त्यांनी सहकारी तत्त्वावर महाराष्ट्रात सुरु केले.

वसंतदादा पाटील यांच्या प्रयत्नातून ऊस उत्पादन व साखर यावर संशोधन करणारी डेक्कन शुगर इन्स्टिट्यूट ही संस्था उभारली. पुढे या संस्थेचे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट असे नामांतर करण्यात आले. शेतीची प्रगती, धान्य उत्पादन वाढीस प्रोत्साहन, जमीन सुधारणा धोरण, ग्रामीण भागातील रस्ते बांधणी, शेती क्षेत्रातील वीज ग्राहकांना सवलती, ज्यांना घरे नाहीत त्यांच्यासाठी घरे, रोजगार हमी योजनेला बळ व त्यांचा पाठपुरावा असे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतले. शेतक-यांची परिस्थिती सुधारली पाहिजे, त्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे या विचाराचे ते पाईक होते. शेतक-यांच्या कच्चा मालावर प्रक्रिया करून पक्के झालेले उत्पादन योग्य त्या भावाने विकण्यासाठी सहकाराची नितांत आवश्यकता आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते.

वसंतदादा पाटील यांनी सांगली या ठिकाणी शेतकरी सहकारी साखर कारखाना उभा केला. इ. स. १९५७ साली वसंतदादा पाटील स्वत: चेअरमन झाले. त्यांनी झपाटल्यासारखे काम करून यंत्र सामग्रीचे व बांधकामाचे काम युध्द पातळीवर पूर्ण करून दि. ११ नोव्हेंबर १९५८ रोजी हा कारखाना सुरु केला. कारखान्याच्या संचालक व सभासदांना देशात अनेक ठिकाणी पाठवून नव-नवीन व जास्तीत-जास्त माहिती मिळविण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या. वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याचे कार्य जोमाने सुरु होते. कारखान्याची प्रगती जगभरातील देशांना प्रेरणा देणारी ठरली. त्यावेळी त्यांनी स्वत: शेतीमध्ये जाऊन ऊस कसा लावावयाचा याचे प्रात्यक्षिक शेतक-यांना दिले. थायलंड, जर्मनी, कोरिया, इजिस, इंडोनेशिया, युगोस्लाव्हिया आदी. देशांच्या प्रतिनिधींनी कारखान्याला भेटी दिल्या. वसंतदादा पाटील यांनी साखर कारखान्याला पुरेसा ऊस मिळवण्यासाठी शेतीला मूबलक पाणी पुरवठा करणा-या योजना राबविल्या. वारणा, कृष्णा, येरळा नदीवर पंप बसवून पाणी वितरण केले जाऊ लागले. विहीर खुदाईसाठी व खोली करणासाठी शेतक-यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. अशा अनेक पाणी पुरवठ्याच्या सुविधा उभ्या करून शेती क्षेत्राचा कायापालट केला.

वसंतदादा पाटील यांनी कारखान्याच्या माध्यमातून पूरक व्यवसाय सुरु केले. कारखान्याच्या परिसरात शिक्षण, आरोग्य, इतर उद्योग व मूलभूत सोयी-सुविधा यांचा विकास साधण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे आज कारखान्याला जोडून निर्माण झालेली विकास केंद्रे दिसतात. त्यामुळे इ. स. १९६३ साली मळीपासून अल्कोहोल निर्मिती सुरु केली. दररोज ३५०० गॅलन अल्कोहोल उत्पन्न मिळू लागले. शेतक-यांच्या हितासाठी शेतीबरोबर इतर पूरक व्यवसाय सुरु झाले. इ. स.

१९६४ साली कोंबडी सहकारी संस्था स्थापन केली. ज्या ठिकाणी जमीन पावसावर अवलंबून आहे . त्या भागातील जिराईत शेतक-यांच्या उन्नतीसाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. इ. स. १९६६ सालो 'भारत को-ऑफ स्पिनिंग मिल्स' ची स्थापना करून जिराईत कापूस उत्पादनाला चालना दिली. भुईमुग सारख्या पिकांच्या लागवडीसाठी योजना राबविल्या व शेतक-यांना मदत केली. त्यासाठी त्यांनी दि.ग्राउंडनट प्रोसेसर्स-को-ऑफरेटीव्ह सोसायटी' ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून जवळ-जवळ २४ ठिकाणी तेल गिरण्या सुरु झाल्या.

वसंतदादा पाटील यांनी इ. स. १९६६ साली महाराष्ट्र–को-ऑफरेटीव्ह-फर्टिलायझर्स अॅड केमिकल्स ही संस्था उभारली. यातून शेतक-यांना खते व औषधाचा पुरवठा किफायतशीर दराने होऊ लागला. इ. स. १९६६ साली कोल्हापूर या ठिकाणी 'महाराष्ट्र–को–ऑफ-इंजिनिअरींग सोसायटी' ही संस्था शेतीसाठी अवजारे तयार करण्यासाठी उभी केली. त्यामुळे शेतक-यांना शेती करण्यासाठी अवजारे मिळू लागली. सहकाराच्या माध्यमातून शेतक-यांना प्रत्येक गोष्ट मिळावी असे त्यांचे मत होते. सामान्य जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांनी विविध योजना राबविल्या. त्यामुळे ग्रामीण जीवनामध्ये मोठे परिवर्तन झाले. कोणतीही योजना अंमलात आणण्या अगोदर त्या योजनांचा सर्वांगीण विचार करून त्या राबविल्या आहेत. त्या यशस्वी झाल्या व महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये अग्रेसर ठरल्या. महाराष्ट्राचे नेतृत्व करताना त्यांनी नेहमीच समाजहित साधणारे व विकास उपयोगी निर्णय घेतले. आधुनिक विकासाची गंगा शेतक-यांच्या बांधापर्यंत पोहचविली. रोजगार हमी योजना ठळकपणे राबविण्यासाठी दादांनी मोठे कष्ट घेतले.

मुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी पहिला निर्णय घेतला तो म्हणजे शेतक-यांच्या थकबाक्या रद्द केल्या. पाणीपट्टी दंडाच्या रक्कमा रद्द केल्या. तेल, पेंड, सूतगिरण्या सुरु करणा-या जास्तीत–जास्त योजना सुरु केल्या. वसंतदादा पाटील यांनी सहकारी औद्योगिक वसाहत उभा करून छोटे छोटे कारखाने उभा केले. औद्योगिक प्रशिक्षण केंद्रही उभा केली. त्यातून हजारो लोकांना रोजगार मिळवून दिला. त्यांनी दि. ११ नोव्हेंबर १९७५ रोजी डेक्कन शुगर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. या संस्थेने थोडक्याच कालावधीत संपूर्ण देशात नावलौकिक केला. तळेगाव येथे कारखान्याला लागणा-या सुटे पार्ट उत्पन्नासाठी 'नॅशनल को- ऑपरेटिव्ह हेव्ही इंजिनिअरिंग लिमिटेड ही संस्था उभा केली. शेती, सहकार, उद्योग, पाणी व्यवस्थापन, आधुनिक पिक पद्धत, बँकिंग या उद्योग व्यवसायाची माहिती जाणून घेऊन त्यामध्ये प्रगती साधण्यासाठी त्यांनी जपान, कॅनडा, आशिया, युरोप, अमेरिका आदी. देशांचे अभ्यास दौरे केले. त्यांनी पाणीपुरवठा संस्था उभा करून शेतीचा कायापालट केला. इ. स. १९६० अखेर ४६ योजना कार्यरत होत्या. कळम्मावाडी धरण, जायकवाडी प्रकल्प या पाटबंधारे प्रकल्पाची कामे त्यांच्याच प्रयत्नाने साकारली. रोजगार हमी योजना यशस्वी करण्यामध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. एवढेच नव्हेतर जिल्हा परिषदा, पंचायत समित्या यांच्या वाटचालीत दादांचा मोठा वाटा आहे. ग्रामपंचायतींना पाणी व वीज, वीज उत्पादनात वाढ, शिंचन क्षमता प्रकल्प, ग्रामीण क्षेत्रातील रोजगार वाढीवर भर, ऊसाच्या खरेदी दराची निश्चिती, आर्थिक तुट कमी करण्यासाठी योजना अशा महत्त्वाच्या राबविण्यात आल्या. आज महाराष्ट्रात छोट्या मोठ्या सहकारी पतसंस्थांचे जाळे उभा राहिलेले आहे. त्यामध्ये वसंतदादा पाटील यांचे योगदान मोठे आहे.

वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष, राष्ट्रीय सहकारी कारखाना महासंघाचे संचालक व अध्यक्ष, साखर निर्यात मंडळाचे अध्यक्ष, राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष या विविध पदावर कार्य करून आपला ठसा उमटविला. सहकार क्षेत्रातील त्यांच्या अतुल्य व श्रेष्ठ कार्यामुळे इ.स. १९६७ मध्ये त्यांना पद्मभूषण या पुरस्काराने गौरविण्यात आले.इ.स. १९८४ साली राहुरी कृषी विद्यापीठाने डॉक्टर ऑफ सायन्स हा किताब दिला. पुणे विद्यापीठाने इ. स. १९८७ साली डी. लिट ही मानाची पदवी दिली.

**सारांश**

वसंतदादा पाटील सुधारणावादाचे प्रवर्तक होत. शेतकरी, मजूर, कामगार, कष्टकरी अशा सर्व सामान्य लोकांची परिस्थिती सुधारावयाची असेल तर सहकार चळवळीला पर्याय नाही असे त्यांचे ठाम मत होते. त्यासाठी त्यांनी अनेक

संस्था उभा केल्या. त्यांनी उभा केलेल्या विविध उद्योग व्यवसायातून कायमच्या रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या. गोर-गरीब शेतक-यांची, कष्टक-यांची परिस्थिती सुधारली. महाराष्ट्रातील शेतकरी सुधारला पाहिजे. शेतीसाठी विविध विधायक कार्य करणारे वसंतदादा पाटील शेतक-यांच्या विकासाचे मेरुमणी होत. वसंतदादा पाटील यांचे महाराष्ट्राच्या विकासातील सहकार क्षेत्रातील कार्य श्रेष्ठ असे आहे. सहकार चळवळीला नवे आयाम देऊन महाराष्ट्राच्या विकासाची गती चौपट करणारे सहकार महर्षी म्हणजे वसंतदादा पाटील होत. डॉ. धनंजय गाडगीळ वसंतदादा पाटील यांच्या बद्दल म्हणतात, 'साखर व्यवसायातला, शेतीपासून साखरेची पोती भरण्यापर्यंत पुरेपूर ज्ञान असलेला हा सहकार पुरुषोत्तम आहे' !.

**संदर्भ ग्रंथ**

१. भावे मधुकर, यशवंतराव ते विलासराव, पुणे, २०००.
२. गाडे सोपान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, पुणे, २००८.
३. मेहेंदळे विश्वास, यशवंतराव ते विलासराव, पुणे, २००७.
४. धर्माधिकारी भा. वि, महाराष्ट्राचा महापुरुष वसंतदादा, सातारा, १९८६.
५. पाटील शालिनीताई, वसंतदादा पाटील, विश्वमित्र प्रकाशन, पुणे.
६. शिवणीकर राघव, सातारचा सिंह, पुणे, २०००.
७. राऊत गणेश, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, पुणे, २००१.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# १७. महाराष्ट्रातील रयतवारी पद्धतीचा अभ्यास

**प्रा. डॉ. महादेव शामराव थोरात**
सहाय्यक प्राध्यापक, के. एन. भिसे आर्टस, कॉमर्स अॅन्ड विनायकराव पाटील सायन्स कॉलेज विद्यानगर, भोसरे-कुर्डूवाडी. ता. माढा, जि. सोलापूर.

**प्रस्तावना**

माऊंट स्टुअर्ट एलफिस्टन यांनी सन **1818** मध्ये महाराष्ट्रमध्ये रयतवारी पद्धत सुरू केली. **1795** माऊंट स्टुअर्ट हा कंपनीत कारकून म्हणून कामाला लागला होता. त्यानंतर पुढे **1811** पुणे दरबारात त्याची वकील म्हणून नेमणूक झाली **1818** मध्ये पेशवाई नष्ट झाल्यानंतर महाराष्ट्राचा कारभार पूर्णतः त्याच्या ताब्यात देण्यात आला. अशा प्रकारे यांची राजकीय कारकीर्दीची सुरुवात ब्रिटिश सरकारच्या कंपनी सरकारमध्ये झाली. त्यांनी त्याच्या आयुष्यामध्ये अनेक निर्णय ब्रिटिश सरकारसाठी घेतले आणि त्यातून त्यांनी ब्रिटिश सरकारला फायदा करून दिला. त्यातीलच रयतवारी पद्धत एक महत्त्वाची घटना म्हणून इतिहासामध्ये ओळखली जाते.

**1800** ते **1818** हा काळ म्हणजे मराठ्यांचा उतरता काळ होता. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात महसूल व्यवस्था पूर्णपणे कोलमडली होती. तसेच पेशव्यांची ऐशोआरामात जीवन जगण्याची पद्धत त्यांना आर्थिक धोक्यात घालत होती. खर्च वाढू लागला सततच्या युद्धांमुळे सैन्याची आवश्यकता भासू लागली, त्यांची दयनीय अवस्था झाली आणि सरकारी तिजोरीत काहीच पैसा शिल्लक नव्हता. म्हणून नंतर लिलाव पद्धत सुरू करण्यात आली. या पद्धतीमध्ये पूर्वीप्रमाणे मामलेदार अधिकारी राहिला नव्हता.

जो व्यक्ती निलाव करणार आहे. तोच व्यक्तीपुढे मामलेदार म्हणून ओळखला जाऊ लागला. नंतर काही वर्षांनी मामलेदार मिळेल याची खात्री नसल्याने रयतेवर अत्याचार होऊ लागले. एकदा मामलेदार हातात आल्यानंतर हे सर्व लोक जसे गावचा पाटील, कुलकर्णी यांची विचारविनिमय करून रक्कम ठरवू लागला आणि तेवढी रक्कम मामलेदारला दिल्यावर पाटील, कुलकर्णी महसूल गोळा करीत व त्यातून आपला फायदा कसा होईल याचीच वृत्ती त्यांच्यामध्ये निर्माण झाली. या पद्धतीमध्ये रयतेचा विचार होत नसल्यामुळे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा डोलारा कोसळून बिकट अवस्था निर्माण झाली. **3** जून **1818** मध्ये दुसरा बाजीराव हा कर्तबगार नसल्यामुळे तो इंग्रजांना शरण गेला आणि एलफिस्टनने त्याला विचारात घेऊन संपूर्ण महाराष्ट्र ताब्यात घेतला.

त्यावेळी महाराष्ट्राची आर्थिक स्थिती पाहता या व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी कोणत्या प्रकारचा महसूल लावावा याचा विचार विनिमय झाला आणि त्याच विचारातून महाराष्ट्रात रयतवारी पद्धती जन्मास आली.

**रयतवारी पद्धत सुरु करण्यापाठीमागची कारणे खालीलप्रमाणे**

1. ईस्ट इंडिया कंपनी तिच्या धोरणात वेळोवेळी बदल करत होती. या बदलाचा परिणाम असा झाला की, त्या ठिकाणी असलेले अधिकारी स्वतःच्या फायद्यासाठी सत्तेचा उपयोग करू लागले. भारतातील जमीनदारांच्या हक्कांना आळा घालावा अशी इंग्लंडमधील उदारमतवादी यांचे मत त्या ठिकाणी निर्माण झाले.
2. बंगाल मधील कायमधारा पद्धतीचे अपयश पाहता महाराष्ट्रात रयतवारी पद्धत सर्वांना योग्य वाटू लागली.
3. शेतकऱ्यास मालकीहक्क दिला तरच शेतीची सुधारणा होऊ शकेल.
4. शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य आल्यानंतर शेतीविषयक उद्योगधंदे वाढतील व त्यातून कंपनी सरकारला अधिक महसूल मिळू शकेल.
5. शेतमजुरांची संख्या कमी होईल.

या सर्व गोष्टी एलफिस्टनने सर्वांसमोर मांडून महाराष्ट्रात रयतवारी पद्धत कशी महत्त्वाची आहे हे सर्वांना पटवून दिले आणि ही पद्धत सुरू करावी असे त्यांनी सुचविले, परंतु कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांनी ही योजना अमलात आणताना काही तत्वे समोर ठेवली ती तत्वे खालीलप्रमाणे,

1. लागवडी खालील असलेल्या जमिनीवर शेतसारा आकारला जावा.
2. शेतसारा शेतकरी देऊ शकतील एवढा सारा आकारला जावा असे ठरले.
3. या कायद्यात समानतेला महत्त्व देण्यात आले होते.
4. शेतकऱ्यांवर इतर कोणताही नवीन कर लादला जाऊ नये.
5. जमिनीतून अधिकाधिक उत्पन्न शेतकऱ्यांनी करावे यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात
6. ब्रिटिशांबद्दल अविश्वास निर्माण होऊ नये व त्यांच्याशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित होऊ नये यासाठी काळजी घेतली जावी.
7. जिल्हाधिकाऱ्यांचे स्थान हे प्रमुख असावे.
8. जिल्हाअधिकारी यांच्या खालोखाल मामलेदार याला काही महत्त्वाचे अधिकार देण्यात आले.
9. अधिकाऱ्यांना वेतन निश्चित करण्यात यावी.
10. शेतसारा रोखीने द्यावा असा आग्रह अधिकाऱ्यांनी करू नये जर पैसे नसतील तर काही वेळा तो कर वस्तूच्या रूपानेही देण्यात यावा अशी सवलत देण्यासाठी ठरवले गेले.
11. महसुलाचा दर **30** वर्षासाठी ठरवावा.
12. महाराष्ट्रात जेव्हा रयतवारी पद्धत सुरू करण्यात आली तेव्हा त्यात काही गुण आणि दोष दिसून आले.

**रयतवारीपद्धतीचे गुण**

1. शासन आणि रयत यामध्ये प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होण्यास मदत झाली.
2. जमिनीची उत्पादन क्षमता वाढली.
3. शेतीसुधारणा होऊन उत्पादन वाढले.
4. आर्थिक स्थैर्य निर्माण होण्यास मदत झाली.
5. प्रत्येक शेतकरी आपण कसत असलेली जमीन स्वतःचीच आहे या भावनेने तो अधिकाधिक जमीन लागली लागवड करू लागला आणि त्यामुळे शेतीचा दर्जाही सुधारला.

**रयतवारी पद्धतीचे दोष**

1. रयतवारी पद्धतीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत अनेक दोष निर्माण झाले व यातील महत्त्वाचा दोष म्हणजे गावातील एकी नष्ट झाली.
2. न्यायालयात दाद मागण्यासाठी जाणे हे सर्वांना शक्य होते त्यामुळे एकीकडे गावपंचायत नष्ट झाली व दुसरे म्हणजे लोकांना वैयक्तिक स्वातंत्र्य आल्यामुळे ते स्वतः निर्णय घेऊ लागले.
3. तीस वर्षांनी महसुलाच्या रकमेत बदल होतो हे ठरल्यामुळे कष्टाने उत्पादन क्षमता वाढवलेल्या जमिनीचा कर पुन्हा वाढणार याची काळजी वाढू लागली.
4. जमीन मालक स्वतः शेती करणार या अपेक्षेने ही पद्धत सुरू करण्यात आली. परंतु हे जमीन मालक इतरांना कसण्यात देत असत व स्वतः शहरात राहतो त्यामुळे ग्रामीण व्यवस्थेशी त्यांचे संबंध तुटू लागले.
5. जमीन मालक शहरात राहून गावात राहणाऱ्या मुलांना त्रास देईल व त्यांच्याकडून केव्हाही त्यांच्या जमिनी काढून घेत त्यामुळे गावात राहणारी मुले यांना असुरक्षितता निर्माण झाली.

**समारोप**

अशा प्रकारे महाराष्ट्रात सुरू केलेली ही रयतवारी पद्धत लोकांना गैरसोयीची वाटली त्यात काही सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली. त्याचबरोबर महाराष्ट्रात ही पद्धत सर्वत्र एकाच वेळी लागू करणे शक्य झाले नाही. कारण जमीन मोजणी व महसूल व्यवस्था ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया होती. त्यासाठी जिल्ह्याच्या असिस्टंट रेव्हेन्यु कलेक्टर पिंग्रेल यांच्याकडे कंपनीने शिवनेर व मावळ हे दोन तालुके रयतवारीसाठी दिले. यांनी जमिनीची मोजणी करण्यासाठी काही लोकांना नेमले व त्यानंतर जमिनीचे जिरायत बागायत व भातशेती असे तीन गट पाडले व तिला यामध्ये सामील करून घेण्यात आले. तसेच या तिन्ही गटात कोणत्या प्रकारचे पीक घ्यावे याबद्दल त्याने तज्ज्ञांशी चर्चा सुरू करून लोकांना ते सांगण्यासाठी प्रयत्न सुरू केले. परंतु दुष्काळी परिस्थिती व योजनेबद्दल असलेले अज्ञान यामुळे म्हणावी तितकी ही योजना अमलात आली नाही व यात अनेक अडचणी निर्माण होत गेल्या व इसवी सन **1835** साली गोल्डस्मिथ व विग्नेट यांच्या नेतृत्वाखाली कमिशनने पिंग्रेलची ही पद्धत रद्द केली.

**संदर्भसूची**

1. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास-प्रा.डॉ.सौ.लता अकलूजकर, प्रा.डॉ.सौ.न.भा.काकडे
2. आधुनिक महाराष्ट्र- डॉ.वि.एन. सरदेसाई.

# १८. जगेन तर देशासाठी, मरेल तर देशासाठी'' या लहुजी साळवे यांच्या घोषणेचा मतितार्थ

**डॉ. माणिक सोनावणे**
नेसावि, राज्यशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

**प्रस्तावणा**

भारतीय समाजाला ब्रिटिश वसाहतवादाच्या जोखडाची जाणीव निर्माण करून देण्याच्या महान कार्यात ज्या महापुरूषांचा समावेश होतो त्यामध्ये क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे नाव आग्रक्रमाने घ्यावे लागते. कारण लहुजी वस्ताद साळवे यानी जशी महात्मा फुल्यांच्या समाजसुधारणा विषयक कार्याला पाठबळ मिळवून दिले. तसेच पाठबळ नी देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणार्या क्रांतिवीरांच्या स्वातंत्र लढ्याला दिलेले आहे. याचा अर्थ असा की यांना देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच देशात असलेल्या अनिष्ठ प्रथा परंपराचे निराकरण करावयाचे होते. त्यासाठी त्यांनी देशाचा स्वातंत्र लढा आणि सामाजिक सुधारणा ही दोन्ही कार्ये एकत्रीत चालू ठेवली होती. एकाबाजूला क्रांतिकारकाना युद्ध कलेचे प्रशिक्षण देत होते तर सावित्रीबाई फुले यांच्या स्त्रीउद्धाराच्या आणि शिक्षणविषयक कार्याला पाठबळ आणि ताकद देत होते.

क्रांतिगुरू लहुजी यांचा जन्म 14 नोव्हेंबर 1794 रोजी पुरंदर तालुक्यातील पेठ या गावी झाला. त्यांचे वडील राघोजी साळवे मल्लविद्या व शस्त्रविद्येमध्ये पारगत होते. कुटुंब दांडपट्टा, तलवार, कुऱ्हाड चालवण्यात पटाईत होते. गुप्त बातम्या काढणे व माग काढणे, शत्रूसैन्यात घुसून लढणे आदी कौशल्ये या कुटुंबाकडे होती. त्यामुळे तत्कालीन शिवाजी महाराजांनी त्यांना 'राऊत' ही पदवी देऊन पुरंदरच्या रक्षणाची जबाबदारी सोपवली होती. तेव्हापासून हे कुटुंब पुरंदर किल्ल्याचे रक्षण करीत होते. तेथेच वडिलांच्या मार्गदर्शनाखाली लहुजी साळवे यांनी मलविद्या व शस्त्रविद्येचे धडे घेतले. लहुजींचे वडील राघोजी स्थलांतर करून पुण्यात आले आणि पेशव्यांच्या दरबारात 'शस्त्रागारात' नियुक्त झाले. लहुजी या सर्व घडामोडी बघत होते निरिक्षण करीत होते. 25 नोव्हेबर 1817 रोजी खडकी (पुणे) येथे झालेल्या लढाईत पेशव्याच्या बाजूने इंग्रजांच्या विरुद्ध लढताना राघोजी साळवे यांना वीरमरण प्राप्त झाले. या पेशवे आणि ब्रिटिशामध्ये झालेल्या लाढाईत पेशव्यांचा पराभव झाला आणि इंग्रजांनी शनिवारवाड्यावर युनियन जॅक फडकवला. ही बाब लहुजी साळवेंच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून गेली आणि त्यानी इंग्रजांना देशातून हाकलून लावण्याचा संकल्प केला आणि "जगेन तर देशासाठी, मरेल तर देशासाठी" असा संकल्प सोडला. आशा या क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या योगदानाचा आढावा प्रस्तूत लेखाच्या माध्यमातून आढावा घेण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी पुढील सशोधन प्रश्नाच्या मदतीने लहुजी वस्ताद साळवे यांच्या योगदानाचा परामर्श घेतला आहे, ते प्रश्न पुढिल प्रमाणे-

1. लहुजी साळवे यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत कोणत्या प्रकारचे योगदान दिले आहे?
2. सामजिक सुधारणा चळवळीत लहुजी साळवे यांनी कशा प्रकारचे योगदान दिले आहे?

वरील संशोधन प्रश्नाच्या उत्तरासाठी उपलब्ध असलेल्या दुय्यम साहित्याची मदत घेतली असून लहुजी वस्ताद साळवे यांच्यावर लिहलेल्या विविध पुस्तकांचा आणि लेखाच्या माध्यमातून माहिती मिळविली असून विश्लेषनात्मक आणि एतिहासीक पद्धतीचा अवलंब केला आहे

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक क्रांतिवीरांना घडवणाऱ्या, तसेच लोकमान्य टिळक, ज्योतिबा फुले, क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके आदींना युद्धकलेचे धडे दिले. भारत देश स्वतंत्र व्हावा, यासाठी देशात सशस्त्र क्रांती करून या मुलकाला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी, यांनी अनेक महान क्रांतिकारक तयार करून या देशात क्रांतीचे वादळ सुरू केले. उमाजी नाईक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा फुले, लोकमान्य टिळक अशा हजारो तरुणांना लहुजी वस्ताद आणि राष्ट्रभक्तीचे धडे दिले मार्गदर्शन केले सक्रिय मदत केली. त्यातील अनेक क्रांतिकारकाणी भूमिगत राहून ब्रिटिश सत्तेचा प्रतिकार केला आणि देशासाठी आपले हौतात्म्य पत्करले तसेच अनेक समाजसुधारकांनी देशात समतेवर आधारित व्यवस्था निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. 1857 च्या स्वातंत्र लढ्यात लहुजींच्या अनेक शिष्याचा सशस्त्र सहभाग होता. 1857 च्या बंडात लहुजींचे अनेक शिष्य सामील होते, त्यातील बहुसख्य स्वातंत्र्यासाठी शहीद झाले.

लहुजी साळवे आपल्या शिष्याना मैदानी व मर्दानी खेळ, दानपट्टा, तलवारबाजी, दांडपट्टा, उडी पट्टा, लाठीकाठी, भालाफेक, गोटमार, नेमबाजी, मल्लखांब, घोडदौड व शत्रूचा वेध घेणारी बंदूकबाजी शिकवत होते. तसेच डोंगरदऱ्या, कडीकपारे आणि भिंतीवर चढण्याची कलाही शिकवली जात होती. तोफांचा अपवाद सोडला तर लहुजी कडे सर्वच युद्ध कौशल्याचे प्रशिक्षण दिले जात होते. लहुजींनी 1822 साली पुण्यातील गंजपेठे येथे तालीम सुरू केली होती. या तालमीचे रूपांतर क्रांतिशाळा झाले होते, अनेक क्रांतिकारकानी याच ठिकाणी गणीमी कावा आणि युद्ध कलेलेचे धडे घेतले आणि देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात स्वत:ला झोकूण दिले. लहुजींनी या सर्व तालीमवीराच्या मनात देशाबद्दल प्रेम आणि राष्ट्रभक्ती ओतप्रोत भरली. त्यामुळे या तालमीतून घडलेला प्रत्येक क्रांतीकारक मातृभुमीच्या मुक्तीसाठी देश सेवेला लागला आणि देशसेवा हीच ईश्वर सेवा मानू लागला होता. आशा या तालीमरूपी क्रांतिशाळाचे उद्घाटन सरदार रास्ते यांच्या हास्ते केले होते या प्रसंगी वस्ताद लहुजींनी दांडपट्टयाचे विविध खेळ करून दाखविले. आशा प्रकारे लहुजी वस्ताद तरुणांना आकर्षित करण्यासाठी बंदुकीने नेम धरणे, तलवारबाजी सारखे मर्दाणी खेळ करून दाखवीत. त्यानी हे ओळखले होते की, देश सेवेसाठी लाखो क्रांतिकारकांची आवश्यकता आहे म्हणून जास्तीत जास्त तरूणानी तालमीत यावे, देशसेवेचे धडे घ्यावेत आणि मातृभुमीच्या मुक्तीसाठी स्वातंरत्र्य लढ्यात सहभागी व्हावे त्यासाठी लहुजी वस्ताद लोकांना व तरुणांना तालमीतील प्रशिक्षणासाठी आकर्षित करून घेत. अर्थात लहुजीना इंग्रजांची राजवट उलटून लावायची होती, म्हणून 1980 साली वासुदेव बळवंत फडके यांनी पुकारलेल्या बंडाला लहुजी महत्त्वपूर्ण साथ दिली. पुढे लहुजीनी वासुदेव बळवंत फडके यांची रामोशी टोळयांबरोबर भेट घालून दिली. पुढे वासुदेव बळवंत फडके यांनी लहूजींच्या तालीम-आखाड्याची शाखा सदाशिव पेठेत ब्राह्मण वस्तीत सुरू केली. पुण्यातील नरसोबा देवळाच्या आवारात चालणाऱ्या तलवार दांडपट्टयाच्या आखाड्यात लोकमान्य टिळक जात असत. लहुजींच्याकडून तालीम शिकण्यासाठी व सर्वच समाजांतील युवक या प्रशिक्षण केंद्रात येत होते. त्यात प्रामुख्याने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा जोतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, चापेकर बंधू, क्रांती भाऊ खरे, क्रांतिवीर नाना दरबारे, रावबहाद्दूर सदाशिवराव गोवंडे, नाना मोरोजी, क्रांतिवीर मोरो विठ्ठल बावळेकर, क्रांतिवीर नाना छत्रे, उमाजी नाईक, वाळवेकर आणि परांजपे ईत्यादी देशभक्त लहुजी साळवे यांच्या आखाड्यात प्रशिक्षण घेण्यासाठी येत होते. आशा प्रकारे लहुजी वस्ताद साळवे यानी तालीम उभारून ब्रिटिश सत्तेचा मुकाबला करण्यासाठी व स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यासाठी क्रांतिकारक दिले

अश्या प्रकारे लहुजी साळवे देशभक्त घडविण्याचे महान कार्य केले आणि देश सेवेत मोलाचे योग्दान दिले. गंज पेठेतील तालमीतील कसरती मैदानातील दांडपट्टा आणि डोंगरात बंदूका चालविण्याचे प्रशिक्षण घेऊन हाजारो पट्टे अर्थात चेले तयार केले. त्यांच्यात मातृभूमीविषयी देशभक्ती निर्माण करून इंग्राजांच्या विरुध्द बंडाला सुरुवात झाली. हे क्रांतिकारक अनेक ठिकाणी गुप्तपणे बंड करू लागले. याच काळात उमाजी नाईक यांचेही बंड सुरू होते. एकदा उमाजी नाईकानी एका दरोडयासाठी काही शिष्य अर्थात पट्टे द्यावेत आशी लहुजी वस्ताद यांच्याकडे केली. पण दरोड्यासाठी शिष्य अर्थात पट्टे देण्यास लहुजी वस्ताद यांनी नकार दिला. उमाजी नाईकाना दरोडयासाठी दरोड्यासाठी पट्टे देण्यास नकार देताना लहुजी म्हणतात की, "आमचे काम वेगळे आहे, आमचे शिष्य अर्थात पट्टे इंग्राजांच्या जोखडातून मातृभूमीला सोडविण्यासाठी सज्ज असलेले देशभक्ती आहेत. त्याच्याकडून देशसेवाच घडू द्या, तुम्ही इंग्रजांच्या विरुध्द लढाईला उभे राहा माझ्यासहीत सर्वजण तुमच्याबरोबर असू आणि तुम्ही या मुलकाचे राजे व्हा." आशा प्रकारे त्यानी देश सेवेलाच प्राधान्य दिले आणि दरोड्यासारख्या अनैतिक बाबीकडे दुर्लक्ष केल. याच काळात उमाजी नाईकांनी इंग्राजांच्या विरुध्द बंड करून 'प्रतिसरकार'ची घोषणा केली. काही दिवसांत फुटीरतेमुळे उमाजी नाईक पकडले गेले, तेव्हा लहुजी वस्तादांनी त्यांना सोडविण्याचा आतोनात प्रयत्न केला, पण यश आले नाही

लहुजी साळवे यांच्या तालमीत वेगवेगळया जाती-धर्मातील शिष्य सशस्त्र शिक्षण घेत होते त्यातील अनेकांनी रामोशी उठाव, आदिवासी उठाव, शेतकरी उठावाचे नेतृत्व केले. 1857 च्या उठावात लहुजी साळवे यांच्या तालमीतील अनेक तरुण तात्या टोपे, रंगो बापू यांच्या सैन्यात होते त्यांनी कानपूर मीरत आणि सातारा येथील उठावात लक्षणीय सहभाग घेतला त्यातील अनेकांना ब्रिटिशांनी फाशी दिली होती. लहुजी साळवे यांचे आवडते शिष्य महात्मा फुले यांनी अस्पृश्य व स्त्री शिक्षणासाठी अनेक शाळा स्थापन केल्या लहुजी साळवे आणि आपल्या लहान भावाची मुलगी मुक्ता साळवे हिला ज्योतिराव फुले यांच्या शाळेत पाठवून स्त्री शिक्षणाच्या बाबतीत आग्रही भूमिका घेतली पुढे याच मुक्ता साळवे हिने इयत्ता चौथीच्या वर्गात शिकत असताना मांग - महाराजांच्या दुःखा विषयी निबंध सादर केला. ज्या मुक्ता साळवे येणे त्या निबंधास ब्रिटिश सरकारकडून पहिले पारितोषिक मिळाले होते. त्या निबंधातून मुक्ता साळवे हिने मांग-महार व तत्सम मागास जातीला भोगाव्या लागत असणार्या यातना व दुःखाचे विवेचन करून भारतीय समाज व्यवस्थेचे खरे चित्र समाजासमोर आणले. ज्योतिबा फुलेच्या शैक्षणिक कार्यात लहुजी वस्ताद त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. लहुजींना सर्व समाजातील मुला-मुलिनी शिकले पाहिजे असे वाटत होते. ज्योतिबांनी सुरू केलेल्या शाळेत समाजातील मुला-मुलिनी जावे आसा केवळ उपदेश न करता 1851 साली दलित मुलांसाठी गंजपेठेत सुरू केलेल्या शाळेत त्यांनी त्यांची पुतणी मुक्ता साळवे हिला घातले व इतर मुलानीही शाळेत जावे यासाठी प्रयत्न केले. जे आई-वडील त्याच्या मुला-मुलिना शाळेत पाठवण्यास घाबरत होते त्यांना लहुजी वस्तादानी आधार दिला, शिक्षणाचे महत्व पटवून दिले. एवढेच नाही तर ते स्वत: या दलित मुलाना शाळेत सोडण्यास जात असत आणि शाळा सुटल्यानंतर पुन्हा घरी घेऊन येत असत. गाव गुंड आणि शिक्षणाला विरोध करनार्या लोकांपासून वाचण्यासाठी काहीवेळा तर ते मुलिना पोत्यात भरून घेऊन जात आसत.

समाजातील अनिष्ठ रुढी परंपरेविरुद्ध महात्मा ज्योतिबा फुलेंच्या पावलावर पाऊल टाकून, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्रियांचे अश्रू पुसण्यासाठी व त्यांच्यावर लादलेल्या गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी स्त्री उद्धाराकरीता कार्य केले.समकालीन परिस्थितीत स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर पूर्णत: बंदी होती, त्यांना कुठलेच अधिकार नव्हते. बालविवाह, पतीच्या मृत्युनंतर केशवपन, सती जाणे, पुनर्विवाहबंदी, शिक्षणबंदी, अंधश्रद्धा, अज्ञान इत्यादी अनिष्ट चालीरिती सुरु होता. त्याला विरोध करून सावित्रीबाई फुलें यानी आधारगृहे सुद्धा चालविली. पुण्यातील भीडे

वाड्यात 1884 साली पहिली मुलींची पहिली शाळा काढली. त्या शाळेत सावित्रीबाई या शिक्षिकेचे काम करु लागल्या. शाळेत शिकावयास जात असताना दररोज त्यांच्यावर प्रस्थापितांचे टवाळके शेणमाती, चिखल व दगडधोंडयांचा वर्षाव करुन, टवाळकी, निंदा व करून त्यांचा छळ करीत असत, तथापि हा छळ त्यांनी सहन केला. त्या कधीच डगमगल्या नाहीत, त्यांनी आपले शिक्षणदानाचे काम अविरतपणे मोठया धैर्याने सुरुच ठेवले.

त्यांना होणार्या त्रासाबाबतची बातमी उस्ताद लहुजी साळवे यांना कळली तेव्हा त्यांनी फुले दांपत्याला घरी जाऊन धीर दिला. 'तू घाबरु नकोस बेटी! उद्यापासून मी तुला शाळेत पोहचवून देण्याचे काम करीन, पाहू मग कोण 'लाल' रस्त्यात आडवा येतो, नि अंगाला हात लावतो ते? त्याचे तंगडे तोडून त्याच्याच हातात देईन! तरच लहु साळवे नावाचा'. असा विस्वास सावित्रीबाईना दिला. त्याकाळी शूद्रातिशूद्रांना आणि स्त्रियांना शिक्षण देणे जीकरीचे होते. सावित्रीबाईंनी हिम्मत बाळगून ज्योतिबांची साथ दिली. त्यांच्या या कार्याला लहुजी साळवे यांचा भक्कम पाठिबा होता. आज त्यांच्या बलिदानावर अनेक स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या आहेत. विधवा स्त्रियांचे केशवपन थांबले आहे, सती प्रथेला आळा बसला आहे, विधवाचे पुनर्विवाह होत आहेत. आशा त्यांनी केलेल्या योगदानामुळेच सर्व स्त्रियांचा विकास झालेला आहे व आजही होत आहे. म्हणून आजची स्त्री ताठमानेने उभी आहे. समाजव्यवस्थे सर्व स्थरावर योगदान देत आहे. त्यांच्या हक्काची भाषा बोलत आहे, अन्याय- अत्याचाराचा प्रतिकार करीत आहे. एका अर्थाने महात्मा फुले आणि लहुजी साळवे यांचा भक्क्म आधार मिळाल्यामुळे स्त्री शिक्षणाची मुहुर्त मेढ रोवण्यास हातभार लागला आहे. म्हणून असे म्हणावे लागेल की, लहुजी वस्तादाचे कार्य क्रांतीकारक घडविण्याबरोबरच सामाजिक सुधारणेला चालना देणे व समाज परिवर्तनासाठी कार्य करीत असलेल्या लोकाना आधार देणे असे बहुआयामी ठरलेले आहे.

**संदर्भ**

1. वाघमारे गणपत, आद्य क्रांतिगुरू लहुजी साळवे, साद प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती 2012
2. शिरसागर नाना, वीर लहुजी वस्ताद, सेवा सागर संस्था पुणे, प्रथमावृत्ती 1999
3. खडसे विशाल, क्रांतिगुरू लहुजी साळवे, शब्दाली प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 2018.
4. गोडबोले अनिल स्त्री- शूद्रांचे कैवारी सत्यधर्माचे प्रचारक म. फुले, उन्मेष प्रकाशन पुणे 2002.
5. कुलकर्णी अ. रा. पुण्याचे पेशवे, राजहंस प्रकाशन पुणे 2001
6. जोगळेकर ज.द., इंग्रजांच्या दृष्टिकोनातून 1857 चा प्रस्फोट, नवचैतन्य प्रकाशन, 2007
7. किवळकर ग द व साठे बीड बीड अठराशे सत्तावन चे हुतात्मे विनस प्रकाशन पुणे 19
8. माळी ग. द., महात्मा ज्योतिबा फुले, गोयल राणे प्रकाशन 1967
9. मारवाडी नरेंद्र, क्रांतिसूर्य लहुजी साळवे, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद 2010
10. उगले जी., महात्मा फुले एक मुक्त चिंतन, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, 2000
11. भंडारे आनंद, (संपादित) आद्य क्रांतिवीर लहुजी साळवे, स्मरणिका 2000
12. झांबरे स. द., महान भारतीय क्रांतिकारक, महा.साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई 200
13. तडाके शंकर, क्रांतीपीता लहुजी वस्ताद, प्रतिमा पब्लिकेशन पुणे तृतीय आवृत्ती 2014

14. मोरे दिनकर, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के एस पब्लिकेशन, पुणे 2006
15. पिंगळे वि., क्रांतिगुरू लहुजी साळवे, शब्दही प्रकाशन, पुणे
16. लहुजी साळवे यांच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास सतराशे 1794 ते 1881 अप्रकाशित पीएचडी प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.
17. खडसे खुशाल, क्रांतीगुरू वस्ताद लहुजी साळवे, नेहा प्रकाशन नागपूर, 2009.
18. 'बहुजन संघर्ष'
19. https://www.mpscacademy.com/2016/02/lahuji-salve.html
20. https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/262295/7/07 chapter%201.pdf

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# १९. महाराष्ट्राच्या सहकार चळवळीत मा. यशवंतराव चव्हाण यांचे योगदान एक अभ्यास

**प्रा. डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव**
इतिहास विभाग प्रमुख, सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय, केडगाव. ता. दौंड, जि. पुणे.

## 1. प्रस्तावना

**'सहकार' ही मुळातच समूहवाचक संज्ञा होय. परस्परसहकार्य हा या संकल्पनेचा गाभा. समान उद्दिष्ट असलेल्या सर्वांनी अथवा अनेकांनी एकत्र येऊन, परस्परांच्या क्षमतांचे संवर्धन घडवत त्या उद्दिष्टाच्या परिपूर्तीसाठी केलेल्या संस्थात्मक प्रयत्नांमधूनच 'सहकारी संस्था' अस्तित्वात येते. म्हणजेच, कोणतीही सहकारी संस्था ही सदस्यप्रधान संस्था असते. सर्व सदस्यांच्या समान गरजेची पूर्तता सामुदायिक प्रयत्नांद्वारे करण्याच्या प्रेरणेमधून सहकारी तत्त्वावरील संस्था साकारते. इथे महत्त्वाचा ठरतो तो सहकारी तत्त्वावर संस्था निर्माण करण्यामागील हेतू. अनेक जण एकत्र येऊन संयुक्त भांडवली संस्थाही (जॉईंट स्टॉक कंपनी) स्थापन करतात. परंतु, तेथे आद्य हेतू असतो तो वस्तू अथवा सेवेचे उत्पादन व पुरवठा बाजारपेठेसाठी करण्याचा सहकारी तत्त्वावर उत्पादन करणारी सहकारी साखर कारखान्यासारखी उत्पादन संस्थादेखील आपले उत्पादन बाजारपेठेत विकते.**

**जी गोष्ट सहकारी साखर कारखान्याची तीच बाब सहकारी तत्त्वावर स्थापन करण्यात आलेल्या ग्राहक भांडारांची. नाना प्रकारच्या जिनसांचा पुरवठा आपल्याला रास्त, किफायतशीर बाजारभावाने व्हावा, मालाची गुणवत्ता, शुद्धता आणि वजन यांबाबत आपली फसवणूक होऊ नये, या हेतूंनी अनेक व्यक्तींनी आपापले भांडवल घालून अथवा समभाग विक्रीद्वारे भांडवलसंचय करून सुरू केलेले दुकान म्हणजेच सहकारी तत्त्वावरील ग्राहक भांडार. वस्तुविक्रयाचा लाभ असे सहकारी भांडार, केवळ त्याच्या भागधारक सभासद सदस्यांनाच पुरवू शकते. अशा वस्तुभांडाराच्या सेेवेचा लाभ बिगर सदस्य ग्राहकांनाही खुला करून देणे हे सहकाराच्या तत्त्वाशी विसंगत ठरते. अनेकांनी एकत्र येऊन केवळ एखादी उद्योगव्यवसाय संस्था उभारणे एवढेच सहकाराला अभिप्रेत नाही. सहकारी संस्था या स्वरूपत: 'यूजर्स ऑर्गनायझेशन्स' असतात. प्रवर्तक सदस्यांना सेवा पुरवण्यासाठीच त्या अस्तित्वात येतात अथवा आणल्या जातात.**

## 2. महाराष्ट्रातील सहकार चळवळ व मा. यशवंतराव चव्हाण

**महाराष्ट्राच्या जडणघडणीत स्वत:च्या कर्तृत्वाने भर घालणाऱ्या अग्रगण्य व्यक्तींमध्ये यशवंतराव चव्हाण या दूरदृष्टीच्या नेत्याचा समावेश केला जातो. राजकारणाच्या क्षेत्रातील सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व म्हणून ते परिचित होतेच; तथापि स्वत:च्या कृती-उक्तीचा आदर्श त्यांनी उभा करून दिला. मूल्यांवर विश्वास ठेवणारा, जनतेची नस ओळखणारा, वैचारिक उंची असलेला, साहित्याविषयी आस्था बाळगणारा,**

**राज्याच्या व देशाच्या कल्याणाची स्वप्ने बघणारा धुरंधर नेता अशी त्यांची प्रतिमा सर्वत्र उभी राहिली. महाराष्ट्राला लाभलेले आधुनिकतेचे रूप, कृषी संस्कृतीचा विकास, भेदभावरहित जनकल्याणाचा विचार, सहकार चळवळीचा पुरस्कार अशा दिशेने प्रयत्नशील राहिलेला लोकनेता म्हणून यशवंतरावांची प्रतिमा आजही महाराष्ट्राने जतन करून ठेवली आहे.**

**महाराष्ट्रातलं राजकारण हे सहकाराचं राजकारण म्हटलं जातं. कारण सहकारी चळवळीची, त्यातून उभारल्या गेलेल्या अर्थव्यवस्थेची एक परंपराच महाराष्ट्रात आजही आहे. यशवंतरावांच्या अगोदरच प्रवरासारखे असतील वा अन्य सहकारी तत्वावरचे प्रयोग महाराष्ट्रात यशस्वी झाले होते. पण यशवंतरावांनी या प्रयोगांना कायद्याचे आणि संस्थात्मक बळ दिले. ठरवून काही धोरणं निश्चित केली. त्या धोरणांमुळेच राज्यात सहकारी औद्योगिक वसाहती तयार झाल्या. साखर कारखाने, दूध संघ, कुक्कुटपालन, पतपेढ्या असं एक जाळं कालानुरुप तयार होतं गेलं. केवळ शेती असं स्वरुप न ऋराहता ती उद्योगांची माळ बनली. सहकारी कायद्यानं त्यात लोकशाही पद्धतीही आणली आणि म्हणूनच पंचायत राज्य पद्धतीमधून जसं नवं स्थानिक नेतृत्व तयार होतं, तसंच ते सहकारी उद्योगांच्या पद्धतीतूनही तयार होऊ लागलं. यशवंतरावांच्या मोजक्या काळात अठरा नवे साखर कारखाने सुरु झाले.**

**विसाव्या शतकाच्या मध्यात अस्तित्वात आलेली व संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतरावांनी जोपासलेली सहकार चळवळ पुढील काळात मूठभरांची मक्तेदारी झाली. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, विठ्ठलराव विखे पाटील या सहकार महर्षींनी ज्या ध्येयाने सहकार चळवळीचा महाराष्ट्रात पाया घातला, तिला ९० च्या दशकात हरताळ फासण्यात आला. महाराष्ट्र राज्याची निर्मिती होण्याअगोदरच येथे सामाजिक आर्थिक परिवर्तनाच्या माध्यमातून सहकार चळवळीचा उदय झाला होता. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटलांनी पश्चिम महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना उभा करून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आत्मभान प्राप्त करून दिले होते. त्याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकरी वर्ग एक प्रभावी समाजशक्ती म्हणून प्रतिष्ठित होण्यास सुरुवात झाली. प्रस्थापित भांडवलशाही व्यवस्थेला एक प्रबळ पर्याय ठरेल या प्रमुख उद्देशाने सहकार चळवळीची पायाभरणी झाली होती.**

**1980 पर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणावर-अर्थकारणावर वर्चस्व प्रस्थापित करणारी चळवळ म्हणून सहकार क्षेत्र प्रगतीपथावर होते. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर वसंतदादा पाटील, शरद पवार, या पश्चिम महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांनी सहकार चळवळीला ग्रामीण अर्थकारणाचा एक प्रबळ घटक बनवण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. मात्र 1990 नंतर त्यातील मूळ आशय नष्ट होऊन सहकार चळवळ इथल्या भांडवलशाहीलाच पूरक बनली. पहिल्या टप्प्यात संपूर्णतः शेतकऱ्यांची मालकी असणारी सहकार चळवळ 1980 नंतर शासनाच्या मेहरबानीवर अवलंबून राहिली.**

**3. समारोप**

**महाराष्ट्र राज्याचा साठ वर्षांचा कालखंड एका लेखात उभा करणे हे अशक्यप्राय आहे. नुसता राजकीय इतिहास मांडावयाचा म्हटले तरी ते शक्य होणार नाही. इथे तर महाराष्ट्राच्या सार्वजनिक वाटचालीस अनेक पैलू आहेत. सहकार, लोकशाही संस्थाचे विकेंद्रीकरण, संतुलित विकासाची आश्वासने, कृषी-औद्योगिक समाजरचना, खेड्यांचा विकास, शेती व्यवसायाला बळकटी, बहुजनांसाठी शिक्षण या काही मौलिक विकासाभिमुख कार्यक्रमांना अग्रभागी ठेवून यशवंतरावांनी 'समाजवादाचा पाळणा सर्वप्रथम महाराष्ट्रात हलेल' असे म्हटले होते. मात्र 1990 नंतर सर्वच क्षेत्रात खाजगीकरणाने प्रवेश केल्यामुळे यशवंतरावांच्या लोककल्याणकारी राज्याची निष्ठा पार मोडीत निघाली.**

**सहकाराचे लोकशाहीकरण व लोकशाहीचे विकेंद्रीकरण या तत्त्वाला प्रमाण मानून यशवंतरावांनी राजकीय अर्थशास्त्राचे मॉडेल महाराष्ट्राला दिले होते. यशवंतराव चव्हाणांनी सहकाराच्या माध्यमातून साखर कारखाने, दूधसंघ, सहकारी बँका, ग्रामीण भागात स्थापन केल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी आली. स्थानिक स्वराज्य संस्था पर्यायाने पंचायत राजचा प्रयोग यशस्वी करून ग्रामीण भागातून एक नेतृत्वाची फळी तयार झाली. पुढे वसंतराव नाईक, वसंतदादा, शरद पवार या मुख्यमंत्र्यांनी हा वारसा पुढे चालवत महाराष्ट्राला एक प्रगत राज्य बनवले. 1962 मध्ये झालेल्या महाराष्ट्र उद्योग कायद्यानुसार राज्यात औद्योगिक विकास महामंडळे स्थापन करण्यात आली. त्यातून राज्यात औद्योगिकरणास गती प्राप्त झाली.**

**संदर्भ ग्रंथ**

1. **जोशी रामभाऊ, (1976), "यशवंतराव: इतिहासाचे एक पान", केशरी प्रकाशन, पुणे.**
2. **चव्हाण यशवंतराव, (1992) "सह्याद्रीचे वारे", य. च. प्रतिष्ठान, मुंबई.**
3. **नाईकवाडे अशोक, (संपा), (2009), "आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण", प्रकाशक प्रदीप जबदे, औरंगाबाद.**
4. **सहकार सुगंध, मे 2012, यशवंतराव चव्हाण जन्म शताब्दी विशेषांक (अंक आठवा)**
5. **भावना पाटोळे, (2019), "यशवंतराव चव्हाण", नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली.**

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# २०. सातारा जिल्ह्यातील क्रांतिवीरांगणांचे योगदान

**डॉ. निकम राजश्री दिलीप**
कृष्णा महाविद्यालय, रेठरे ता. कराड, जि. सातारा.

**प्रस्तावना**

15 ऑगस्ट 1947 ला देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यांचे स्वप्न साकार झाले. जे स्वातंत्र्य प्राप्त झाले त्याचा आज आपण अमृत मोहत्सव साजरा करत असताना ते मिळून देणाऱ्या अनेक राष्ट्रीय पुरूष, क्रांतिकारक यांच्या कार्याचे आपल्याला स्मरण होते. या स्वातंत्र्य संग्रामात अनेकानी आपल्या संसाराचा विचार न करता देशप्रेमासाठी बलिदान स्विकारले. त्यांच्या बलिदानातून आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. निस्वार्थभावाने व देशप्रेमाने भारावून गेलेल्या हुतात्म्यांना आपले रक्त सांडावे लागले. असंख्य यातनांना अन्यायाला सामोरे जावे लागले. त्यांच्या कार्याची माहिती आजच्या तरूण पिढीला देवून त्याचे मोल सांगता येते मिळालेले स्वातंत्र्य हे सहजासहजी प्राप्त झाले नसून अनेकांच्या बलिदानातून, कष्टातून, प्रसंगी जिवाची पर्वा न करता अनेक संकटांना सामोरे जावून मिळाले आहे. या लढ्यात पुरूषांच्या बरोबरीने अनेक स्त्रिया सहभागी झाल्या. त्यांच्या सहकार्यातून योगदानातून देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. यामध्ये काही प्रत्यक्ष तर काही अप्रत्यक्षरित्या सहभागी होवून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. प्रस्तुत लेखातून सातारा जिल्ह्यातील या धाडसी क्रांतिवीरांगणांचे थोडक्यात कार्य अभ्यासाचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्ट्ये**

1. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा थोडक्यात आढावा घेणे.
2. या लढ्यात सातारा जिल्ह्यातील स्त्रियांच्या कामगिरीचा आढावा घेणे.
3. या लढ्यातील स्त्रियांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग अभ्यासणे.
4. प्रत्यक्ष सहभागी स्त्रियांच्या कार्यावर विशेष प्रकाश टाकणे.
5. त्यांना लाभलेल्या नेतृत्वांचा थोडक्यात आढावा घेणे.
6. नवीन पिढीसमोर त्यांच्या धाडसी कार्याचा आदर्श निर्माण करणे.

**संशोधन पध्दती**

ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करून प्राथिमक व दुय्यम साधने, मुलाखती द्वारे विषय विवेचन केले आहे.

**प्रतिसरकार चळवळ**

आधुनिक भारताच्या इतिहासात अतिशय दैदिप्यमान व वैभवशाली घटना म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळ होय. या चळवळीमध्ये महात्मा गांधीनी 1930 मध्ये कायदेभंग चळवळ व 1942 स्वातंत्र्य लढा याच्या माध्यमातून देशात चळवळ सुरू केली. या चळवळीत गांधीजींच्या विचाराने भारावून गेलेल्या अनेकानी सक्रीय सहभाग घेतला. यामध्ये साताऱच्या प्रतिसरकार चळवळीने दैदिप्यमान कार्य केले पूर्वीच्या सातारा जिल्हयात खानापूर, तासगाव, सांगली, वाळवा, आष्टा, बुधगाव, मिरज या भागाचा समावेश होता हा भाग प्रतिसरकारच्या चळवळीने गाजला गेला. त्याचे नेतृत्व सातारा जिल्ह्यातील वैचारिक व पुरोगामी विचाराने प्रभावती असलेल्या क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथ आण्णा नायकवडी, किसनवीर जी.डी.लाड, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील धोंडीराम माळी, बर्डे गुरूजी यांनी केला. या सर्व नेते मंडळींच्या खांद्याला खांदा लावून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पणे स्त्रिया सहभागी झाल्या. या प्रतिसरकारमध्ये पोलिस स्टेशन व सरकारी कार्यालयावर प्रचंड संख्येने चढाई करून ती ताब्यात घेणे, रेल्वे टपाल व्यवस्था उध्वस्त करून प्रशासन यंत्रणा पंगू बनविते, सातारा प्रतिसरकार हे एक प्रकारे स्वायत्त, ग्रामसरकारचे संघ राज्य होते. याच्या

माध्यमातून सरकारना खबऱ्या देणाऱ्याला शिक्षा करणे, धंदेवाईक दरोडेखोर, सावकार, यांचा बंदोबस्त करणे दारू, अफू विक्रीवर बंदी घालणे शस्त्रे दारू गोळा निरनिराळ्या ठिकाणाहून गोळा करणे. अंधश्रध्दा नष्ट करणे हे कार्यक्रम राबवले जात.[1]

**चळवळीतील स्त्रियांचा सहभाग**

स्वातंत्र्यांच्या या संग्रामात पुरूषांच्या बरोबरीने निर्भिडपणे अनेक स्त्रिया यात सहभागी झाल्या. बेचाळीसचा लढा, जंगल सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह यामध्ये विठाबाई, बनुबाई, विमलाबाई, बागल लक्ष्मीबाई नायकवडी, इंदूमती पाटणकर, काशीबाई परीट, मसूरच्या पार्वतीबाई भारदरे, कमलाबाई शेंडगे, हौसाताई पाटील, विजयाताई लाड, रूक्मिणी विभूते, राजमाती पाटील यांनी आपले वडील, भाऊ, पती यांनी स्वातंत्र्य चळवळीत खंबीर पाठिंबा दिला. त्यांनी भूमिगताभोवती सुरक्षिततेचे कवच म्हणून उभ्या राहिल्या. शेकडो स्त्रियांनी आपले राजकीय योगदान देवून स्त्री शक्तीचा आदर्श समाजापुढे निर्माण केला.[2]

**तुफान दलातील स्त्रीशाखा**

तुफान दलातील स्त्रीशाखे विषयी क्रांतिसिंह नाना पाटील यांनी मुंबईच्या नरे पार्कमधील भाषणात गौरवउद् गार काढले. "आमच्या भगिनी जर आम्हाला मदत करण्यासाठी खांद्याला खांदा लावून उभ्या राहिल्या. नसत्या वेळेवर आम्हाला भाकर तुकडा खायला दिला नसता. जिवावर उदार होवून वेळेवर आम्हाला आसरा दिला नसता तर आम्हाला यश मिळविणे कठीण होते."

येरवडा जेलमध्ये शिक्षा भोगीत असताना खानदेशामधील लीला पाटील पळून जावून सातारला प्रतिसरकारला मिळाल्या. त्या स्त्रीशाखा प्रमुख होत्या. डोंगर कपारीतील अशिक्षित स्त्रियांना संघटित करणे बंदुका व स्वयंचलित शस्त्रे चालायला शिकवणे, गुप्त बातम्या आखून देणे, धान्याच्या साठ्यात बंदुका अस्त्रे लपविणे, भूमिगतांना लपविणे, संकेत स्थळावर त्यांना कांदा भाकर चटणी पोहचवणे ही कामे यातील स्त्रिया अत्यंत निष्ठेने करत यातील काही महिलांना पोलिसांनी पकडून त्यांचा छळ केला. लक्ष्मीबाई नायकवडी, काशीबाई हणवर यांना या छळाला सामोरे जावे लागलो.[3]

**अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या महिला**

क्रांतिकार्यात अप्रत्यक्षपणे क्रांतिकारकांना मदत करणाऱ्या स्त्रियांमध्ये गीताबाई बावर, सत्याभामाबाई जोशी, तारामती कापरे, शंकुतला रणखांबे, मुक्ताबाई साठे, सुभद्राबाई सावंत, इंदिराबाई देशपांडे, सोनाबाई जगताप, पद्मावती कुलकर्णी, राधाबाई पोळ इत्यादी स्त्रीयांचा उल्लेख करावा लागतो.[4]

**इंदूमती पाटणकर**

सातारा जिल्ह्यातील इंदोली गावी एका शेतकरी कुटूंबात जन्मलेल्या इंदूमती निकम या स्वातंत्र्य सेनानी बाबूजी पाटणकर यांच्या सुविद्य पत्नी होत्या. सासर आणि माहेर दोन्ही घराकडून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय सहभाग घेतला. सेवादलात सहभागी होत्या. मोठ्या धैर्याने त्यांनी ब्रिटीशा विरोधी आपला लढा चालू ठेवला. ताईनी वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतला. राष्ट्रगीत, क्रांतीगीते भरदार आवाजात गात. जिल्हा सोडून इतर भागात चळवळीला दिशा देण्यासाठी सासवडच्या आश्रमात गेल्या. तेथे त्यांची प्रेमकंठक यांच्याशी ओळख झाली. ताईच्या जीवनाला शिस्त, वळण, नियमितपणा, राष्ट्रीय प्रश्न, गांधीजींचे एकादश व्रत, विनोबांचे साम्य योग यावर मार्गदर्शन लाभले. व त्यांच्या व्यक्तिमत्वाला वैचारिकतेची जोड मिळावी. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 1952 मध्ये समाजविघातक शक्तीनी त्यांचे पती बाबूजी पाटणकर यांचा बळी घेतल्याने ताईनवर संकट कोसळले. यातून सावरून आपल्या कुटूंबाला बरोबर घेवून शिक्षिकेची नोकरी करत शेतमजूरांचे प्रश्न, दुष्काळ ग्रस्तांचे प्रश्न आटपाडीतून कृष्णाखोरे समान न्यायी पाणी वाटपाचा लढा, स्त्री मुक्ती चळवळी, अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीत सक्रीय राहिल्या.[5]

**राजमती पाटील**

स्वातंत्र्य संग्रामातील अत्यंत धाडशी व्यक्तिमत्व म्हणून राजमती पाटील यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. सोलापुरातील टिळक चौकात भारतमातेच्या जयघोषात तिरंगा फडकवल्यामुळे त्यांना अटक झाली. सिटी

मॅजिस्ट्रेट गिरमेसाहेब यांनी राजमती पाटील यांना 6 महिने सत्याग्रहाबद्दल व 3 महिने बुलेटिन्स जजच्या समोर ठेवल्या बद्दल शिक्षा केली व कोर्टाचा अपमान केल्याबद्दल 200 रूपये दंड व तो न भरल्यास दोन महिने शिक्षा केली व त्यांची येरवडा तुरूंगात रवानगी केली त्यांच्या धाडसी स्वभावाचे दुसरे एक उदाहरण पाहता गोवा, नाशिक, बेळगाव येथील मिलिटरी कॅम्पमधील काडतुसे, पिस्तुले आणण्यात व ते कांसिकारकांपर्यंत पोहचवण्यात त्या निष्णात होत्या. जी.डी. लाड, नागनाथ नायकवडी यांचे सोबत त्या जाम गोवा सरहद्द पार करत असताना राजमती पाटील यांनी पोलिसांसमोर प्रसंगावधान राखून काडतूसावर पाय ठेवला व त्याचा आवाज आला. तेव्हा आपल्या हातातील बांगडी फोडून पोलिसांचे लक्ष दुसरीकडे वळवले. डोक्यावर जळणाची (लाकडाची) मोळी घेवून वेषांतर करून त्यातून काडतूस लपवून आणून ती क्रांतिकारकांपर्यंत सुखरूप पोहचवत.

शेतकरी, कुणबी वेषधारण करत त्यामुळे त्यांच्यावर पोलीस संशय होत नसत. त्यांनी किसन अहिर, नानसिंग यांना आपल्या वाडयात राहणेस घेवून शस्त्र प्रशिक्षणाचे काम चालवत असत. जेव्हा पोलिसांच्या गोळीबारात हे दोघे ठार झाले. तेव्हा जंगलात अत्यंसंस्कार करून गवताच्या ढिगाऱ्यात हत्यारे लपवून राजमतीस नवरीचा वेष घालून त्यावर बसवून बैलगाडीतून हत्यारे नियोजीत स्थळी पोहचविण्यास क्रांतिकारकांना मदत करण्यात त्यांचे मोलाचे योगदान होते. भूमिगत असताना येसाबाईंच्या घरी सासू सुनेच्या भांडणाचे नाटक केल्याने पोलिसांना बिलकूल संशय आला नाही. तसेच धुळे लुटीचा खजिना सातारला आणण्यात नागनाथ आण्णा व धोंडीराम माळी यांचे समवेत त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.[6]

**लीलाताई पाटील**

सातारच्या प्रतिसरकार तुफान सेनेतील स्त्री सैनिकांची सेनानी म्हणून लीलाताईचे नाव घेतले जाते. नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील सामोरे गावातील घरंदाज घराण्यातील लिलाताईच उत्तमराव पाटील यांचेशी विवाह झाला. 1942 च्या लढ्यात त्यानी सभा घेतली व मार्शल ला मोडण्याचा पराक्रम केल्याने त्यांना साडेसहा वर्षाची शिक्षा सुनावली तुरूंगात असताना पोलिसांच्या मारहाणीत त्यांचा गर्भपात झाला. लीलाताईंना कच्या कैदेत चार महिने काढावे लागले. जिथे केसाला तेल नाही, साबण नाही, गोणपाटाचे नेसणे व कांजी रोटी अशी शिक्षा असे सानेगुरूजींनी त्यांचा उल्लेख करतात एक निर्मळ निष्पाप सरल आणि निर्भय सेवामय त्यागमय स्त्री पाहिली नाही असा उल्लेख केला.[7]

**हौसाताई पाटील**

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कन्या हौसाताई पाटील यांनी बेचाळीसचा लढा जंगल सत्याग्रह झेंडा सत्याग्रहात निर्भिडपणे सहभाग घेतला. क्रांतीकारकांना आश्रय देणे, त्यांच्या जेवणाची व्यवस्था करणे ही कामे त्या धाडसाने करत.[8] स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील त्यांचे योगदान मोलाचे ठरते. आपल्या वडिलांना प्रेरणास्थान मानून पुढील वाटचालीत अनेक गरीब सामान्य लोक शेतकरी यांच्या प्रश्नात प्रत्यक्ष भाग होत. त्यांच्या वय 82 व्या वर्षी त्यांच्याशी झालेल्या मुलाखतीत त्यांनी शेतकऱ्यांची स्थिती कामगारांचे प्रश्न, युवकांची व्यसनधिनता, चंगलवाद, भष्ट्राचार या बद्दल मनात असलेली व्यक्त केली. स्वातंत्र्य लढयाचा आदर्श आजच्या समाजापुढे मांडावा तर नक्कीच क्रांतीद्वारे सुर्योदय होणार याचा त्यांना ठाम विश्वास होता.[9]

कृष्णाबाई कुलकर्णी यांनी दारूबंदी साठी निदर्शन, चंपाताई कळंत्रे खादी चळवळीने क्रांतीचा अंगार फुलवला. आम्ही आमचे सरकार स्थापन करून शकतो. हे तासगावच्या लढ्याने सिध्द केले. खानापुरातील पारे गावच्या सरस्वती यांनी पारे गावी इंग्रज अधिकारी गिलर्ब्ट वेढ्यातून आपल्या जीवाची पर्वा न करता क्रांतिसिंह नानांना वाचवले.

अशा या सातारा जिल्ह्यातील अनेक स्त्रियांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वातंत्र्य चळवळीतील योगदान मोलाचे ठरते. हे नवीन पिढीला आदर्शवत ठरते.

**संदर्भ**

1. पाटील रा. तु. – क्रांतिसिंह नाना पाटील, एक स्वयंभू ग्रामीण क्रांतिकारक, सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, 1948 पान नं. 12.
2. पाटणकर इंदूताई लेख – स्त्रियांचा राजकारणातील सहभाग, बायजा अंक 1984, पृ – 36
3. लोकसत्ता लेख – gawankar. rohini@gamil.com 2013.
4. नलवडे डी.बी. – सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्रियांचा सहभाग, अप्रकाशित एम.फिल प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 1984, पृ. 47.
5. भोसले सचिन लेख – बाबूजी पाटणकर व इंदूमती पाटणकर – सोव्हीनीअर प्रकाशन, एस.जी.एम कॉलेज कराड, 2015, पृ. 47.
6. डॉ. सौ. पद्मजा पाटील, राजमती पाटील बिरनाळो एक क्रांतिकारी, मालती प्रकाशन, कोल्हापूर, 2004, पृ. 12.
7. चव्हाण एस.पी. – लेख लिलाताई पाटील प्रतिसरकार चळवळीतील योगदाने सोव्हीनिअर एस.जी.एम. कॉलेज कराड, 2015, पृ. 211.
8. पाटील दमयंती लेख – संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील माझी आजी, महाराष्ट्र राज्य सुवर्ण मोहत्सव अंक 2010, पृ. 51.
9. पाटील हौसाताई यांची मुलाखत 20/09/2011 स्थळ हणमंत वडिये.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# २१. भारतातील सहकारी पतपुरवठा चळवळीचा अभ्यास

**डॉ. प्रकाश कृष्णा टोणे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.
**निलेशकुमार गुरव**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

**प्रस्तावना**

"विना सहकार नाही उध्दार" व "बहुजन हिताय बहुजन सुखाय" या उक्तीप्रमाणे भारतात सहकारी चळवळ १९०४ च्या कायद्याने सुरू झाली. सुरूवातीच्या काळात अतिशय संथ गतीने सुरू असणाऱ्या सहकारी चळवळीने स्वातंत्रोत्तर काळात लक्षणीय प्रगती केली. पुढे ही चळवळ ग्रामीण विकासाचा केंद्रबिदू बनली. सहकारमार्फत सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या अनेक प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन झाल्या. या संस्था लोकांच्या आणि सभासदांच्या आर्थिक विकासाच्या महत्वाचा स्त्रोत बनल्या आहेत. यामध्ये कृषिला सहाय्य करणाऱ्या संस्थांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी कायद्याने अल्पकालीन व मध्यमकालीन कर्जपुरवठयासाठी त्रिस्तरीय रचना निर्माण केली. त्यामध्ये राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था यांचा समावेश होता. दुसऱ्या बाजूला दिर्घकालीन कर्जपुरवठयासाठी भूविकास बँकाची स्थापना झाली. या बँका शेतीमध्ये कायम स्वरुपाच्या सुधारणा करण्यासाठी कर्जपुरवठा करतात. देशाच्या ग्रामीण भागातील कृषि आणि कृषिपूरक व्यवसायांची नेत्रदिपक प्रगती घडवून आणण्यामध्ये सहकारी पतपुरवठा चळवळीने मोठा हातभार लावला आहे. या संस्थाकडून शेतीसाठी कमी व्याजदरात केला जाणारा पतपुरवठा आणि इतर काही कार्यामुळे शेतकरी सभासदांची आर्थिक प्रगती होऊन ग्रामीण विकासाला मूलभूत स्वरुपाचे साहाय्य झाले आहे. म्हणूनच सहकारी चळवळीला ग्रामीण आणि कृषि विकासातील अतिशय महत्वाची चळवळ मानली जाते.

**संशोधन उदिष्टे**

1. सहकारी चळवळीतील कृषि वित्तपुरवठयाचा अभ्यास करणे.
2. सहकारी चळवळीतील अल्पकालीन व मध्यमकालीन वित्तपुरवठयात सहभागी होणाऱ्या विविध सहकारी बँकांचा अभ्यास करणे.
3. सहकारी चळवळीतील दीर्घकालीन वित्तपुरवठयात सहभागी होणाऱ्या विविध सहकारी बँकांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

सदरचा शोधनिबंध हा दुय्यम तथ्य सामग्रीवर आधारित आहे. यासाठी सहकार संदर्भातील संदर्भग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, मासिके आणि वर्तमानपत्रातील लेख यांचा वापर केला आहे. तसेच NAFSCOB या वेबसाईटासाठी वापर केला आहे.

**विषय संकल्पना स्पष्टीकरण**

भारतातील शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न सोडविण्यासाठी व ग्रामीण भागातील सावकारांकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबविण्यसाठी 1904 च्या सहकारी कायद्याने कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेसाठी चालना मिळाली. अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जपुरवठयासाठी त्रिस्तरीय रचना करण्यात आली आहे. त्यामध्ये प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँका यांचा समावेश होतो.

**अल्पकालीन वित्तपुरवठा**

**प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था**

भारतातील शेतकरी वर्गाला अल्प व मध्यम मुदतीचा वित्तपुरवठा करण्यासाठी प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी व संस्थांचे सभासद असतात. या संस्था भारतातील खेडयातील शेतकरी वर्गात स्वस्त दरात कर्जपुरवठा करतात. या संस्थांची स्थापना सन 1904 मध्ये झाली असली तरी त्यांची प्रगती स्वातंत्र्योत्तर काळातच झाली आहे.

**कोष्टक क्र. 1**

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था प्रगती**

| अ क्र. | तपशिल | वर्षे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९५०-५१ | २०००-०१ | २०१२-१३ | २०१८-१९ |
| १ | संस्था | १.१५ | ९५६३० | ९३४८८ | ९५९९५ |
| २ | सभासद संख्या (लाख) | ५१.४० | ८०१७० | १,२७,४६८ | १,३२,०२९ |
| ३ | ठेवी (कोटी) | ४२८ | ७०३० | ६,१४,९४० | १,३३,०१,०३६ |
| ४ | कर्जपुरवठा (कोटी) | २३ | १७५४० | १२,५९,९२७ | ११,५०,४८,०६ |

स्त्रोत -**NAFSCOB** (www.nafscob.org)

वरील कोष्टक क्र. 1 मध्ये भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची प्रगती दाखविण्यात आली आहे. त्यानुसार सन 1950-51 मध्ये संस्थांची संख्या 1.15 लाख होती तर सन 2018-19 मध्ये 95995 एवढी कमी झाली आहे. सन 2000-01 पासून सन 2018-19 पर्यंत ही संख्या संस्थाच्या पुर्नःसंघटनामुळे घटली आहे. याचकाळात सभासद संख्या 51.40 लाखावरुन 132029 इतकी वाढल्याचे दिसते. सन 1950-51 पासून सभासदांची संख्या सातत्याने वाढत असल्याचे दिसते.

सन 1950-51 मध्ये संस्थांच्या ठेवीचे प्रमाण 428 कोटी होते. यामध्ये सातत्याने वाढ होऊन सन 2018-19 मध्ये हे 13301036 एवढे झाल्याचे दिसते. दरम्यान सदरच्या काळात कर्जपुरवठयाच्या प्रमाणातही लक्षणीय वाढ झाली आहे. जसे सन 1950-51 मध्ये या संस्थांनी 23 कोटी रुपयांचा कर्जपुरवठा केला होता. तर सन 2018-19 मध्ये तो वाढून 11504806 कोटी रुपये एवढा झाला होता.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (DCCB)**

भारतातील कृषि क्षेत्रांच्या अल्पकालीन व मध्यमकालीन कर्जपुरवठयातील मध्यम स्तरावर कार्य करणारी संस्था म्हणजे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक होय. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकानी कृषी वित्तपुरवठयात अतिशय महत्वाची भूमिका बजावली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका जिल्हास्तरावर कार्य करीत असतात. जिल्हायातील प्राथमिक कृषी पतपुरवठा संख्या आणि राज्य सहकारी बँका यांच्यामध्ये दुवा म्हणून काम करतात.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका देशातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना कर्जपुरवठा करतात. जिल्हयातील सभासद व बिगर सभासदांकडून ठेवी स्विकारणे, ग्रामीण भागात बँक व्यवसायाचा विकास करणे इत्यादी कार्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडून केली जातात.

**कोष्टक क्र. 2**

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाची प्रगती**

| अ.क्र | तपशिल | वर्षे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **1950-51** | **2000-01** | **2010-11** | **2018-19** |
| 1 | बँकांची संख्या | 505 | 371 | 371 | 363 |
| 2 | सभासद संख्या (लाख) | 2.7 | 18,37,433 | 31,46,070 | 44,01,390 |
| 3 | कर्जे (कोटी) | 83 | 18,27,605 | 39,10,116 | 2,80,85,412 |
| 4 | ठेवी (कोटी) | 38 | 66,79,721 | 1,61,30,882 | 3,66,98,045 |

स्त्रोत **NAFSCOB** (www.nafscob.org)

कोष्टक क्र. 2 मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाची प्रगती दर्शविली आहे. सन 1950-51 मध्ये या बँकाची संख्या 505 होती त्यामध्ये सातत्याने घट होत आहे. सन 2018-19 मध्ये 363 एवढी कमी झाली आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे एक जिल्हा एक बँक या धोरणानुसार अनेक बँकाचे एकत्रीकरण झाल्यामुळे बँकाची संख्या घटली आहे. याचकाळात सभासद संख्या 2.7 लाखावरुन 44,01,390 एवढी प्रचंड प्रमाणात वाढली आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकानी सन 1950-51 मध्ये फक्त 83 कोटी रुपयांचा कर्जपुरवठा केला होता. हे प्रमाण 2018-19 मध्ये 2,80,85,412 लाख कोटीचा कर्जपुरवठा केला होता. जिल्हा बँका सभासद व बिगर सभासदांकडून ठेवी स्विकारतात. त्याप्रमाणे या बँकानी सन 1950-51 मध्ये 38 कोटी रुपयांच्या ठेवी स्विकारल्या. तर सन 2018-19 मध्ये 3,66,98,045 कोटी रुपयांच्या ठेवी स्विकारल्या होत्या. या ठेवी सन 2000-01 शी तुलना करता नऊ पटीने वाढल्याचे दिसते.

**राज्य सहकारी बँका**

कृषी क्षेत्रात कर्जपुरवठा करणाऱ्या त्रिस्तरीय रचनेतील सर्वोच्च संस्था म्हणून राज्य सहकारी बँकेला ओळखले जाते. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना त्यांच्या गरजेनुसार कर्जपुरवठा करण्याचे कार्य ही बँक करते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया आणि नाबार्ड मार्फत मिळणाऱ्या निधीचा वापर करुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना आर्थिक मदत करताना दिसते. भांडवलाचे एकत्रिकरण करुन विविध क्षेत्रामध्ये आवश्यकतेप्रमाणे निधी देवून तेथील मागासलेपणा दूर करणे, विकासाला चालना देणे आणि संपूर्ण राज्यातील सहकारी क्षेत्राचा विकास घडवून आणणे या उदेशाने ही बँक कार्य करते.

**कोष्टक क्र. 3**

**राज्य सहकारी बँकाची प्रगती**

| अ.क्र | तपशिल | वर्षे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **1950-51** | **2005-06** | **2012-13** | **2019-20** |
| 1 | बँकांची संख्या | 15 | 31 | 31 | 33 |
| 2 | सभासद संख्या (लाख) | - | 1,53,697 | 3,39,896 | 6,75,909 |
| 3 | भांडवल (कोटी) | 190 | 69,140 | 1,70,112 | 20,08,559 |
| 4 | कर्जे (कोटी) | 42 | 45,405 | 93249 | 1,42,42,222 |
| 5 | ठेवी (कोटी) | 21 | 48,260 | 92,593 | 1,26,54,282 |

स्रोत:- **NAFSCOB** (www.nafscob.org)

कोष्टक क्र. 3 राज्य सहकारी बँकाची प्रगती दर्शविले आहे. सन 1950-51 मध्ये बँकाची संख्या 15 होती त्यामध्ये वाढ होऊन ती सन 2019-20 मध्ये 33 एवढी झाली राज्य सहकारी बँकेच्या संख्येबरोबर सभासद संख्या ही 2019-20 मध्ये 6,75,909 इतकी मोठया प्रमाणात वाढली आहे.

राज्य सहकारी बँकाकडे भांडवलाचे प्रमाण सन 1950-51 मध्ये 190 कोटी होते त्यामध्ये सातत्याने वाढ होऊन सन 2019-20 मध्ये 20,08,559 कोटी एवढे झाले आहे. या बँकानी आपल्या कार्यक्षेत्रातील जिल्हा मध्यवर्ती बँका व इतर संस्थाना सन 1950-51 मध्ये 42 कोटी रुपयांचा कर्जपुरवठा केला होता. तर सन 2019-20 मध्ये 142,42,222 एवढया प्रचंड प्रमाणात कर्जपुरवठा केला होता. सन १९५०-५१ मध्ये बँकाकडे २१ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. त्यामध्ये सन २०१९-२० मध्ये प्रचंड वाढ होऊन त्याचे प्रमाण १,२६,५४,२८२ कोटी एवढे झाले.

**दीर्घकालीन वित्तपुरवठा**

स्वातंत्र्यपूर्व काळात देशातील शेतकऱ्यांची दीर्घकालीन मुदतीच्या कर्जाची गरज सावकारांकडून पूर्ण केली जात होती. यासाठी स्वतंत्र अशा स्वरुपाची बँक स्थापन करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. यासाठी देशामध्ये भूविकास बँकाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**भूविकास बँका**

शेतीमध्ये कायम स्वरुपाच्या सुधारणा करण्यासाठी दीर्घकालीन कर्जाची आवश्यकता विचारात घेऊन भूविकास बँका स्थापन झाल्या. या बँका शेतीमध्ये बांध घालणे, जमीन सपाटीकरण करणे, पाणीपुरवठयाच्या सोयी उपलब्ध करुन देणे. कृषी आवजरांची खरेदी करणे इत्यादीसाठी दीर्घकालीन कर्जपुरवठा करणार होत्या. 1920 मध्ये पंजाबमधील झांज या ठिकाणी पहिली भूविकास बँक स्थापन झाली. 1930 मध्ये जमीन तारण बँक कायदा पास करण्यात आला. त्यानुसार या बँकाना जमिनीच्या तारणावर दीर्घकालीन वित्तपुरवठा करण्याचे कायदेशीर अधिकार प्राप्त झाले. बदलत्या परिस्थतीमध्ये या बँकाच्या नावामध्ये बदल करण्यात आला. पूर्वी या बँकाना प्राथमिक भू-विकास बँका आणि राज्य भूविकास बँका असे म्हटले जात होते. पुढे मात्र या बँकाचे नामकरण करुन यांना प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका आणि राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका असे ठेवण्यात आले.

**भूविकास बँकांची रचना**

**1. प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका**

या बँका जिल्हा व तालुका पातळीवर काम करतात. शेतीत कायमस्वरुपी सुधारणा घडवून आणण्यासाठी कर्जपुरवठा करतात. सावकारांकडून घेतलेली अधिक व्याजाची कर्ज फेडण्यासाठी कर्जपुरवठा करतात, शेती व्यवसायासाठी उपुक्त यंत्रे व अवजारे खरेदी करण्यासाठी कर्जपुरवठा करतात. तसेच शेती उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी पतपुरवठा करतात. या बँकाच्या स्थापनेमुळे शेतकÚयांच्या दीर्घकालीन कर्जाची गरज कमी होऊन शेती उत्पादनात वाढ झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत झाली आहे.

**कोष्टक क्र. 4**

**प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची प्रगती**

| अ.क्र | तपशिल | वर्षे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **1950-51** | **2002-03** | **2012-13** | **2019-20** |
| 1 | बँकांची संख्या | 286 | 768 | 714 | 602 |
| 2 | सभासद संख्या (दशलक्ष) | 2.1 | 7.61 | - | - |
| 3 | भाग भांडवल (कोटी) | 0.52 | 891 | 1386 | 1068 |
| 4 | ठेवी (कोटी) | - | 222 | 601 | 1303 |
| 5 | कर्जे (कोटी) | 1.29 | 2951 | 3434 | 15594 |

स्त्रोत

1. **NAFSCOR (**www.nafscob.org**)**
2. **RBI Bulletin Report 2019-20**

कोष्टक क्र. 4 मध्ये प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची प्रगती दर्शविली आहे. या बँकाची संख्या सन 1950-51 मध्ये 286 होती. त्यामध्ये वाढ होऊन ती सन 2012-13 मध्ये 714 इतकी झाली

होती तर सन 2018-19 मध्ये या बँकाच्या संख्येत घट होऊन ती 602 एवढी झाली. सन 1950-51 मध्ये सभासद संख्या 2.1 दशलक्ष झाली. त्यामध्ये वाढ होऊन ती सन 2002-03 मध्ये 7.61 दशलक्ष झाली. ही वाढ साडेसहा पटीपेक्षा जास्त असल्याचे दिसते. प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाचे भांडवल सन 1950-51 मध्ये 0.52 कोटी वरुन सन 2018-19 मध्ये 1068 कोटी एवढे झाल्याचे दिसते. या बँकाचे ठेवी 2002-03 मध्ये 222 कोटी होत्या. यामध्ये वाढ होऊन 2018-19 मध्ये त्या 1303 कोटी एवढया वाढल्या. या बँकाच्या ठेवीचा विचार करता सन 1950-51 मध्ये ठेवीचे प्रमाण 1.29 कोटी होते हे प्रमाण 2018-19 मध्ये 15594 कोटी एवढे वाढल्याचे दिसते.

**राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका**

भारतात राज्य पातळीवर या बँका काम करतात. देशातील हरियाणा, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, ओडीसा, पंजाब आणि राजस्थान या राज्यांमध्ये या बँका आहेत. म्हणजेच या राज्यात राज्य पातळीवर काम करणाऱ्या राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका आणि जिल्हा स्तरावर काम करणाऱ्या प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका असल्याचे दिसते.

राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका या शेतकऱ्यांना शेतीत कायम स्वरुपाचे बदल करण्यासाठी वित्तपुरवठा करतात. राज्यातील सहकारी संस्था, व्यक्ती व इतर संस्था यांच्याकडून दीर्घमुदतीच्या ठेवी स्वीकारतात. प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाच्या मार्फत शेतकऱ्यांना जमिन तारणावर दीर्घकालीन कर्जपुरवठा करतात. इत्यादी कारणांसाठी या बँकाकडून कर्जपुरवठा केला जातो. या बँकानी स्वातंत्र्योत्तर काळात पुढील प्रकारे प्रगती केल्याचे दिसते.

**प्रगती**

**कोष्टक क्र. 5**

**राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची प्रगती**

| अ.क्र | तपशिल | वर्षे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **1950-51** | **2002-03** | **2012-13** | **2019-20** |
| 1- | बँकांची संख्या | 5 | 20 | 20 | 789 |
| 2- | सभासद संख्या | 3.98 | 5-90 | - | - |
| 3- | भाग भांडवल (कोटी) | 0.31 | 7.82 | 1839 | 839 |
| 4- | ठेवी (कोटी) | - | 546 | 1065 | 2434 |
| 5- | कर्जे (कोटी) | 1.33 | 3.934 | 1526 | 20651 |

स्त्रोत

1. **NAFSCOR (**www.nafscob.org**)**
2. RBI Bulletin Report 2019-20

कोष्टक क्र. 5 मध्ये राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकाची प्रगती दर्शविली आहे. त्यानुसार सन 1950-51 मध्ये या बँकाची संख्या फक्त ५ होती. ती सन 2012-13 मध्ये 20 एवढी वाढली. या बँकाच्या कार्याचा विस्तार प्रचंड प्रमाणात वाढल्याने सन 2018-19 मध्ये यांचे प्रमाण 789 एवढे वाढले. भाग भांडवलांचे प्रमाण सन 1950-51 मध्ये 0.31 कोटी होते ते सन 2012-13 मध्ये 1839 कोटी एवढे प्रचंड प्रमाणात वाढले परंतु 2018-19 मध्ये हे प्रमाण 939 कोटी पर्यंत घटले. या बँकाच्या ठेवीचा विचार करता सन 2002-03 मध्ये 546 कोटी रुपयांच्या ठेवी या बँकानी गोळा केल्या होत्या. हे प्रमाण 2018-19 मध्ये 2434 कोटी पर्यंत वाढले आहे. राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकानी आपल्या सभासदांना सन 1950-51 मध्ये 1.33 कोटी रुपयांची कर्जे दिली होती हे प्रमाण सन 2018-19 मध्ये 20651 कोटी एवढे वाढल्याचे दिसते.

**निष्कर्ष**

1. देशाच्या कृषी विकासामध्ये अल्पकालीन व मध्यमकालीन वित्तपुरवठा करणाऱ्या, प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि राज्य सहकारी बँका यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे.
2. भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या पुर्नसंघटनामुळे त्यांची संख्या घटली आहे. परंतु सभासद संख्या, ठेवी, कर्जपुरवठा यांच्या मध्ये लक्षणीय स्वरूपाची प्रगती झाली आहे.
3. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकानी सभासद संख्या, दिलेली कर्जे, ठेवी यांचेप्रमाणे प्रचंड प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे त्यांचा लाभ प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संख्याच्यामार्फत ग्रामीण भागातील शेतकऱ्याना झाला आहे.
4. भारतातील राज्य सहकारी बँकानी स्वांतत्रोत्तर काळात बँकाची संख्या, सभासद संख्या, भांडवल आणि दिल्या जाणाऱ्या कर्जाचे प्रमाण वाढले आहे. त्याचा फायदा देशातील ग्रामीण भागातील शेतकऱ्याना झाला आहे.
5. भारतातील दीर्घकालीन सहकारी पतपुरवठा रचनेतील प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांनी सभासद शेतकर्यांना आवश्यकत्या प्रमाणात दीर्घकालीन पतपुरवठा केला आहे. तसेच त्याची संख्या व सभासद संख्या वाढल्याचे दिसते.
6. राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांनी शेती मध्ये कायमस्वरूपाच्या सुधारणा घडून आण्यासाठी सभासदांना दीर्घकालीन कर्जपुरवठा केला आहे. त्याचा परिणाम मानून शेतकऱ्यांच्या उत्पनात वाढ होण्यास मदत झाली.
7. देशातील सहकारी चळवळीमध्ये वाढता राजकीय हस्तक्षेप, भष्टाचार, अकार्यक्षम व्यवस्थापन, दप्तर दिरंगाई यासारख्या काही समस्या निर्माण झाल्या आहेत.

**समारोप**

भारताच्या कृषी व ग्रामीण विकासामध्ये सहकारी चळवळीतील कृषी वितपुरवठा करणाऱ्या म्हणजेच प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका आणि भूविकास बँकाच्या वाढत्या सहभागामुळे आणि सहकार्याने संबंधित क्षेत्राची प्रगती होण्यास मदत झाली आहे. ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यामध्ये या संस्थांची भूमिका महत्वपूर्ण ठरली आहे. तरीदेखील या संस्थांना काही समस्या जाणवत आहेत. जसे अपुरा भांडवलपुरवठा, वाढता राजकीय हस्तक्षेप इ. हि सहकारी चळवळ यापेक्षा अधिक कार्यक्षम आणि व्यापक स्वरुपात राबविण्यासाठी देशातील केंद्र सरकार, राज्य सरकार यांनी सहकारी चळवळीतील हे अडथळे दूर करण्यासाठी नवीन धोरणे राबविली पाहिजेत कारण सहकारी पतपुरवठा चळवळ कायमस्वरुपी टिकून राहण्यासाठी अशा सरकारी प्रयत्नांची खूपच आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची**

1. मोहन सराफ (1989), सहकार - सी जमनादास साठी कंपनी मुंबई
2. प्रा. रायखेलकर ए आर व अशोक डांगे – (1889) -सहकार तत्वे व्यवहार, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे 30
3. प्रा. सी. जे. जोशी (1989) सहकार आणि तत्वे आणि व्यवहार - फडके प्रकाशन, कोल्हापूर
4. डॉ. रुपा शहा, डॉ. बी. एच. दामजी (2020) सहकाराचा विकास - फडके प्रकाशन, कोल्हापूर
5. शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्र (2018.19) सहकार तत्वे आणि व्यवहार
6. शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्र (2021.22) सहकाराचा विकास
7. Mathur B.S (2001) Co-Operation in India, Saithya Bharan Publication Agra
8. Bedy R.D (1983) Theory, History and Practice of cooperation, International Publication House, Meerut
9. NAFSCOB (www.nafscob.org) website

# २२. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची विकासात्मक भूमिका : विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा

**राजेश मधुकर बाराते**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेश खिंड, पुणे.

## १. प्रस्तावना

सहकार ही मानवी जीवनातील सहज प्रवृत्ती आहे. आदिम कालखंडापासून मानवामध्ये समूह भावना उदयास आली. सदर संकल्पना मानवी समुदायाची सहजप्रवृत्ती आहे. त्यामुळे तिचे स्वरूप खूप गतकालीन आहे. सहकार व सहचर्य यांद्वारे एकमेकांना सहाय्य करण्यात येते आणि त्याद्वारे समाजाची संरचनात्मक प्रक्रियेद्वारे जीवन समृध्द बनण्यास मदत होत असते. "वसुंधे कुटुंबकम" ही संकल्पना भारतीय समाजात रुजली आहे. त्यामुळे सहजीवनातून एकमेकांना मदत व सहाय्य करण्याची वृत्ती जोपासली गेली. त्यामुळे सहकार या संकल्पनेस भारताचा सांस्कृतिक वारसा लाभलेला दिसतो. लोकांचे सामुहीक प्रयत्न व सामुहिक हित जोपासणे हा सहकार या संकल्पनेचा मुख्य आधार आहे. सहजीवन ही स्वाभाविक आणि नैसर्गिक प्रेरणा आहे तसेच सहकार हि सुध्दा स्वाभाविक प्रेरणा आहे. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे व सहकार हे समाजाचे मुळतत्व आहे. गतकलीन मानवी वाटचालीचा इतिहास शोधत असतांना सहकार या तत्वाची बीजे रुजलेली सापडतात. सहकारामुळे मानवी जीवनाची वाटचाल गतिमान झालेली आहे. समाजातील लोकांचे एकमेकांना सहकार्य लाभल्यामुळे कामाची गती व गुणवत्ता वाढवण्यास मदत होते. सहकार या तत्वामुळे सामुदायिक काम करणे शक्य होते. त्यामुळे समुहहिताद्वारे वयक्तिक हित जोपासले जाते. मानवी समुहाद्वारे कार्य विभागनी व श्रमविभाजन केले जाते. स्वयंपुर्ण ग्रामव्यवस्था, वस्तू विनिमय अश्या कृतीतून मानवी व्यवहारातील दडलेल्या सहकाराची भावना प्रकट होते. गतकाळापासून ते आधुनिक युगातील विज्ञाननिष्ठ काळापर्यंत मानवाने आपली सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक प्रगती परस्परांच्या सहकारातुन साधली आहे. म्हणजेच सहकाराची संकल्पना मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये अनुसरली जात होती. परंतु संस्थात्मक व संघटनात्मक तिचे स्वरूप अस्तित्वात नव्हते. मानवाच्या जीवनप्रणालीचा महत्वाचा आधार म्हणुन सहकाराची तत्व समाजात रूजले होते. त्यामुळे सहकार हे मानवी प्रगतीचे महत्त्वाचे साधन आहे.

१८ व्या शतकात औद्योगिक क्रांती घडून आली व भांडवलशाही व्यवस्था विकसित झाली. कारखानदारीचा उदय, वस्तुचे उत्पादन, बाजारपेठांचा विस्तार, बाजारपेठेतील असणारी तीव्र स्पर्धा, नफेखोरी, ग्राहकांचे होणारे शोषण व पिळवणुक, गरीब-श्रीमंत यांच्यातील वाढत जाणारी विषमता त्यातुन मोठ्या प्रमाणावर असंतोष झालं व कलह होण्यास सुरवात झाली. संप व टाळेबंदी यातुन असंतोष निर्माण झाला. त्यातून समाजव्यवस्थेवर दुषपरिणाम होण्यास सुुरवात झाली होती. प्रगत झालेल्या औद्योगिक व भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील शोषण

विरूध्दची जनमत होऊ लागले परिणामी सर्वांच्या हिताची व्यवस्था म्हणुन सहकार ही व्यवस्था आधार घेऊ लागली. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष समाजाला जाणवु लागले. तसा सहकाराचा उदय व विकास मोठया प्रमाणात होऊ लागला. जगामध्ये सहकारला संस्थात्मक आकार येऊ लागला. २० व्या शतकात सहकाराचा विस्तृत प्रमाणात विकास झाला. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात ' सहकार ' ही सामाजिक अधिष्ठान असलेली अर्थव्यवस्था समजण्यात आली.

**२. स्वांतत्र्योत्तर काळातील सहकार चळवळ**

स्वांतत्र्योत्तर कालखंडात जगातील सर्वाधिक गरीबांचा देश म्हणून ओळखला जाणारा भारत २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर विकसनशिल राष्ट्राचे नामाभिमान घेऊन आला होता. आता या राष्ट्रांची तयारी स्वतः विकसीत राष्ट्रे म्हणून ओळख प्रस्थापित करण्याची आहे. भारताच्या गरिब व विकसित अशा गौरवशाली प्रवासात अनेक व्यक्ती, संघटना व चळवळींनी महत्वाची कामगीरी बजावली होती. त्यात सर्वाधिक वाटा सहकार चळवळीचा होता. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत ही चळवळ समर्थपणे तोंड देत सर्वसामान्यांची स्वप्ने साकारत आहे. वैकुठभाई मेहता यांनी पंचवार्षिक योजनेचे निश्चित उद्दिष्ट ठेवले त्यानुसार त्यांनी स्वांतत्र्योत्तर काळात सहकार चळवळींच्या विकासाला मोठ्या प्रमाणात चालना दिली.

**३. महाराष्ट्रातील सहकार चळवळ**

भारतात १९०४ मध्ये को-ऑपरेटिव्ह ॲक्ट, १९०४ हा कायदा तत्कालीन केंद्र सरकारने अंमलात आणून पुढे सहकारी क्षेत्राचा कायदा १९०४ मध्ये बदल करून सहकारी संस्थेचा कायदा अस्तित्वात आला. पुढे हा कायदा अपुरा पडल्यामुळे प्रांतिक स्वायत्तता मंडळाने मुंबई प्रांतासाठी मुंबई सहकारी संस्था कायदा १९२५ मध्ये मंजुर केला. १९१९ मध्ये सहकार हा विषय राज्य सरकारकडे वर्ग झाल्यानंतर वेगवेगळ्या घटकराज्यांनी त्या त्या राज्य परिस्थितीनुसार सहकार कायदे मंजूर करुन सहकार चळवळ विकसित करण्याचा प्रयत्न केला. १९५६ ला भाषावार प्रांत रचना झाली. १ मे १९६० ला स्वंतत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. राज्यात जुनेच सहकारी संस्थांचे कायदे होते. सहकार चळवळ कमी अधिक प्रमाणात विकसित झाली होती. या सर्व बाबींचा विचार करून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा सर्वांगीण व समतोल विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम मंजूर करण्यात आला. या कायद्यात १९६० पासून २५ जून १९९९ पर्यंत ४९ दुरुस्त्या झाल्या. त्यामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ अधिकाधिक लोकाभिमुख व जीवनस्पर्शी झाली आहे.

महाराष्ट्रातील सहकार चळवळ देशात अग्रेसर आहे. सहकारी कृषी पतसंस्था, सहकारी दुग्धसंस्था, सहकारी सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरणी, सहकारी उपसा जलसिंचन योजना, गृहनिर्माण संस्था, सहकारी भांडारगृह, सहकारी बैंक, शैक्षणिक क्षेत्र इ . विविध स्वरूपात विस्तार झालेला आहे. महाराष्ट्रात सहकार चळवळीचा प्रसार झाला व ती खोलवर रूजली नसती तर महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचे चित्र अधिकच ओसाड व भकास दिसले असते. डॉ.धनंजय गाडगीळ, विठ्ठलराव विखे, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील आणि इतर कार्यकर्त्यांनी जे प्रशसनीय प्रयत्न करून ग्रामीण विकासाचा चेहरामोहरा बदलून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या

प्रयत्नातूनच ग्रामीण आर्थिक स्वांवलंबनाचा, ग्रामीण कृषी विकासाचा मार्ग खुला झाला. विखे पाटील, वसंतदादा पाटील, तात्यासाहेब कोरे, यशवंतराव मोहिते, शंकरराव मोहिते, भाऊसाहेब थोरात, धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, भाऊसाहेब हिरे या सर्वांनी महाराष्ट्रात सहकारांच रोपटं लावले आणि त्यामुळे महाराष्ट्रात सहकाराचा उदय झाला. सन १९५०-६० च्या दरम्यान महाराष्ट्रात अनेक सहकारी संस्था निर्माण झाल्या. महाराष्ट्रात सन १९४९ मध्ये किसन वीर यांनी सातारा जिल्हा बँकेची स्थापना केली तर २६ जानेवारी १९५५ साली भाऊसाहेब हिरे यांनी नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक स्थापन केली याप्रमाणे सर्वच जिल्हयात अनेक जिल्हा बैंक स्थापन झाल्या तर लोणीप्रवरा नगर येथे पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरा सहकारी साखर कारखाना विखे.पाटील यांच्या पुढाकाराने ३१ डिसेंबर १९४८ रोजी स्थापन झाला होता.

**४. अहदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळ**

अहमदनगर जिल्ह्याला सहकाराचे केंद्र ठिकाण मानले जाते. सहकार चळवळीच्या विस्ताराने अहमदनगर जिल्हयात उद्योगव्यवसाय भरभराटीस येत आहेत. जिल्ह्यामध्ये सहकारी चळवळ रुजविण्यासाठी विठ्ठलराव विखे पाटील, भाऊसाहेब थोरात, आबासाहेब निंबाळकर, मारूतराव घुले पाटील, शिवाजीराव नागवडे या विभूतींचा मोलाचा वाटा होता. महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना सन १९५० मध्ये विठ्ठलराव विखे पाटील यांनी प्रवरानगर येथे उभारला होता. तसेच सहकारी तत्त्वावर अनेक उद्योग त्या काळात उभारले गेले. प्रवरानगरच्या नंतर संगमनेर, शेवगाव, नेवासा, कोपरगाव, श्रीरामपूर, अकोला, राहुरी, राहता, नगर, कर्जत, श्रीगोंदा, पारनेर येथे सहकारी साखर कारखाने उभारले गेले होते. भारत देशातील साखर उत्पादनाच्या ५ टक्के साखर अहमदनगर जिल्ह्यामध्ये तयार होते. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही राज्यातील सर्वाधिक उलाढाल करणारी बँक समजली जाते.

अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची प्रगती होत होती. या कालावधीतील सन १९९५-९६ ते सन २००७-०८ जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची प्रगती झालेली आहे. जिल्ह्यात सन २००७-०८ मध्ये कृषि पतसंस्थांची संख्या १,२८७, आदिवासी सहकारी संस्था ३८ व इतर सहकारी संस्था कार्यरत होत्या . वरील सहकारी संस्था प्रामुख्यान शेती व शेती क्षेत्रातील उद्योगांना कर्जपुरवठा करत. सन २००७-०८ मध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये बिगर कृषि पतसंस्थामध्ये नागरी सहकारी बँका २३, नागरी सहकारी पतसंस्थांची संख्या संख्या ३०९, कर्मचारी सहकारी पतसंस्था २१५, इतर बिगर कृषी पतसंस्था ६३२ होत्या. तर एकूण बिगर कृषि पतसंस्थांची संख्या १,१७९ एवढी होती. बिगर कृषि पतसंस्था प्रामुख्याने शेतीव्यतिरिक्त इतर लहान उद्योग, व्यापार व्यापार क्षेत्रास कर्जपुरवठा करतात. अहमदनगर जिल्ह्यामध्ये एकूण पणन सहकारी संस्थाची संख्या ६२ एवढी होती. त्यामध्ये जिल्हा पणन सहकारी पतसंस्था १, प्राथमिक पणन सहकारी पतसंस्था १४ व इतर पणन सहकारी संस्थाची संख्या ४७ एवढी होती. पणन सहकारी संस्था प्रामुख्याने कापूस एकाधिकार संस्थाना कापूस खरेदी विक्रीसाठी मदत करतात. सन २००७-०८ मध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये उत्पादक सहकारी संस्था ४,४२३ एवढ्या होत्या. त्यामध्ये सहकारी साखर कारखाने १५, इतर शेतीप्रक्रिया सहकारी पतसंस्था ६, विणकर सहकारी संस्था

औद्योगिक वसाहती सहकारी पतसंस्था ७, इतर औद्योगिक सहकारी संस्था ८४, दुग्ध सहकारी संघ २,७९९, मत्स्य मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था ६१, उपसा जलसिंचन सहकारी पतसंस्था ६१०, इतर उत्पादक सहकारी पतसंस्था ८३८ एवढ्या होत्या. उत्पादक सहकारी संस्थांचा उद्देश उत्पादन क्षेत्रातील मक्तेदारीला लगाम घालणे व सहकारी उद्योग स्थापन करणे हा होता तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला आर्थिक सहकार्य करणे हा होता. सन २००७-०८ मध्ये मध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये सामाजिक सेवा सहकारी संस्थाची संख्या २,५४८ एवढी होती. त्यामध्ये ग्राहक भाडारे ६३, गृहनिर्माण सहकारी संस्था ७२०, कामगार कत्राटद्वारे सहकारी संस्था ८२९ तर इतर सहकारी संस्था ९४४ एवढ्या होत्या. सामाजिक सेवा सहकारी संस्थाचा उद्देश सामाजिक गरजांचे व प्रश्नांचे न्याय्य वाटप केले जावे व सर्वांना सामाजिक सेवा समान न्याय्य पध्दतीने मिळाल्या पाहिजेत ह्या होत्या. वरील विश्लेषणावरून अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची प्रगती समाधानकारक असल्याचे दिसते. जिल्ह्यातील शेती, उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्रातील विकासासाठी सहकारी संस्थांनी मोठ्या प्रमाणात जिल्हयात शाखाविस्तार करून प्रगती करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भसूची**

१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अहमदनगर जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन , मुंबई, १९९० ते २००
२. अहमदनगर जिल्हा दूध संघ,वार्षीक अहवाल, १९९९-२०००.
३. अहमदनगर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था रिपोर्ट, १९९०-२०००.
४. श्रीगोंदा तालुका सहकारी दुध उत्पादक संघ, वार्षीक अहवाल, २००४-२०१
५. प्रादेशिक साखर संघ अहवाल (अहमदनगर), १९९८-९९ .
६. जिल्हा परिषद रिपोर्ट, अहमदनगर, वर्ष १९९०-२०००
७. श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल, १९८५-२०००
८. देशमुख रामचंद्र, आपला अहमदनगर जिल्हा, कल्पना प्रकाशन, नांदेड, सुधारित आवृत्ती, २०११.
९. नेवासकर अशोक, श्रीगोंदा तालुक्याची ऐतिहासिक पाहणी, अहमदनगर, डिसेंबर १९६९.
१०. बिराजदार माधव, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, जून २०१२.
११. अनिरुध्द देवचक्के,( संपा.), ज्ञानदीप गौरव अंक, दैनिक गांवकरी, अहमदनगर आवृत्ती, १९ फेब्रुवारी १९९९.
१२. बोठे बाळ (संपा.) दैनिक सकाळ, अहमदनगर आवृत्ती, २३ ऑगस्ट २००७
१३. देशमुख वसंतराव (संपा.), दैनिक सार्वमत, अहमदनगर आवृत्ती, ०२ ऑक्टो. १९९७ .

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# २३. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भटक्या विमुक्त जमातीचे साहित्यातून जीवन चित्रण : एक ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. राजू लोखंडे**
डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव.

प्रस्तावना

महाराष्ट्रातील समाज समाजातील ऐतिहासिक दृष्टिकोनातून विचार केल्यास स्वातंत्र्योत्तर कालखंडात दलित साहित्याच्या प्रभावातून अन्याय व अत्याचार या विषयी मराठी भाषेमध्ये आत्मचरित्र, कथासंग्रह, स्वकथन, कादंबरी, प्रवास वर्णन, स्मृतिग्रंथ, कवितासंग्रह, कथासंग्रह इत्यादी च्या माध्यमातून दलित आदिवासी या समाजाविषयी मोठ्या प्रमाणात लिखाण जात लेखन झाले लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून या समाजाला जनजागृती केली. याच प्रभावातून स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये समाजातील वंचित घटक म्हणजे भटक्या विमुक्त जाती जमाती यांच्यावरही या लेखनाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. वास्तविक इतिहास लेखनाच्या प्रवाहामध्ये या जाती-जमातींचा कुठेही उल्लेख नाही तसेच यांच्याविषयी ऐतिहासिक लेखन झालेले नाही. हा वर्ग पूर्णपणे समाजापासून अलिप्त भटके जीवन जगत असतो परंतु या समाजास भाषा, संस्कृती, रिती रिवाज परंपरा व उदरनिर्वाहाची साधने या माध्यमातून स्वातंत्र्योत्तर कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजश्री शाहू महाराज, महात्मा फुले , कर्मवीर भाऊराव पाटील, शाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रभावातून एक सुशिक्षित वर्ग निर्माण झाला व त्यांनी आपली व्यथा आणि गाथा लेखणीच्या माध्यमातून मराठी भाषेत मांडली आहे. या मराठी साहित्याचा जर अभ्यास केला तर भटक्या विमुक्त जाती जमातीचे ऐतिहासिक अवलोकन प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आले आहे

भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या साहित्याचे स्वरूप

भटक्या विमुक्त जमाती पैकी काही जमातीचे बाह्यांग दर्शन हे साहित्याच्या माध्यमातून गावकुसाबाहेर कशा राहतात, कशा जगतात त्यांच्या ची वेशभूषा , जीवन जगण्याचे साधन, उघड्यावरचे जीवन, इत्यादी घटकावर या साहित्यामध्ये जास्त प्रमाणात लेखन झालेले दिसून येते. त्यामुळे उपरोक्त लेखना पैकी बऱ्याच लेखन कृतीत भटक्या विमुक्त जमातीच्या जगण्यापेक्षा त्यांच्यातील सामाजिक सांस्कृतिक आर्थिक मानसिक तपशील आपेक्षा रचना तंत्राला अधिक महत्त्व असल्याचे दिसून येते. जीवना अनुभव संवेदनात्मकता अधिक दिसून येते.१ संकल्पनात्मक आणि उपरोधात्मक लेखन शैली चा अभाव हा मूलभूत फरक या साहित्यामध्ये दिसून येतो.

भटक्या विमुक्त जमातीतील लेखकांचे साहित्य मराठी साहित्य 1960 नंतर अधिक व्यापकपणे जीवनवादी बनले. याच काळात दलित साहित्याची सैद्धांतिक मांडणी सुरू झाली२. त्यानिमित्ताने दलित साहित्या संबंधी मोठ्या प्रमाणावर चर्चा होऊ लागली. ग्रामीण साहित्य प्रादेशिक साहित्य मार्क्सवादी साहित्या मध्ये अशा विविध साहित्य प्रवाहाच्या समर्थकांनी आपापली भूमिका मांडण्यास सुरुवात केली.३ पांढरपेशा शहरी जाणिवांच्या पातळीवर निर्माण होणाऱ्या आणि पुराण परंपराच्या गुणवगुणाचे चे वर्णन करणाऱ्या मराठी साहित्य विश्वात उपेक्षित वंचित समाजाच्या विविध साहित्य प्रवाहामुळे विशेषता दलित साहित्य प्रवाहामुळे खळबळ उडाली. डॉ. बाबासाहेब त्यांच्या विचार व कार्यामुळे दलित मध्ये जाणीव जागृती निर्माण झाली. ४ या व्यवस्थेमुळे शेकडो वर्ष आपल्याला समाज दलित साहित्याच्या रुपाने आविष्कृत झाला. नव्या जीवन जाणिवा धर्म व्यवस्थेच्या वर्णव्यवस्थेच्या जोखडातून मुक्त झाल्या. या जाणिवेतूनच नवा आशय व्यक्त होऊ लागला. उपेक्षित वंचित दुर्लक्षित समाजगट लेखन व संशोधन याचे नवे विषय होऊ लागले. स्वातंत्र्य उत्तर कालखंडात भटक्या विमुक्त जमातीतील पहिली पिढी शिक्षण घेऊन न व सुशिक्षित तरुणांनी या जमातीच्या मागासलेपणाची, त्यांच्या आदिम, रानटी जीवनाची, त्यांच्यातील अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा रूढी-परंपरा अस्थिरता व त्यातून वाट्याला आलेली अगतिकता याची जाणीव झाली. ५ यामधूनच विविध जमाती पोटजाती यांच्यात विभागलेला असंघटित व अस्थिर अशा जमातीच्या समस्यांना वाचा फोडावी, त्यांचे प्रश्न एकूण समाज व्यवस्थेने निर्माण केलेले प्रश्न आहेत याची जाणीव अस्थिर समाजाला व बुद्धिजीवी वर्गाला करून द्यावी असे या नऊ सुशिक्षित तरुणांना प्रकर्षाने वाटले. स्वतंत्र भारतात फार मोठ्या समाजगटांना दोन वेळच्या भाकरीसाठी भिक्षा मागावी लागते, चोरी करावी लागते, त्यासाठी लाचार व्हावे लागते. उदरनिर्वाहासाठी गावोगाव भटकावे लागते हे या देशाला व समाजव्यवस्थेला लांच्छनास्पद आहे त्यासाठी आपणच चळवळ केली पाहिजे. या आज्ञा ने रूढीग्रस्त परंपराप्रिय आणि रानटी जीवन जगणाऱ्यांना जागृती निर्माण केली पाहिजे या भूमिकेतून दौलतराव भोसले, बाळकृष्ण रेणके यासारख्या तरुणांनी 1972 साली भटक्या-विमुक्तांची चळवळ सुरू केली.६ भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी चळवळीच्या माध्यमातून विविध ठिकाणी परिषदा, कार्यशाळा, मेळावे मोर्चे आयोजित करण्यात आले. त्यामुळे भटक्या विमुक्त जमातीच्या समस्याकडे स्थिर समाजाचे शासनाचे बुद्धिजीवी यांचे लक्ष वेधले गेले. चाळवळीसाठी पोषक म्हणून चळवळीतील काही कार्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक लेखन केले त्याचे स्वरूप वाङ्मयीन प्रतवारी च्या दृष्टीने फुटकळ असले तरी या लेखनामुळे भटक्या विमुक्त जमातीचे प्रश्न शासन समाज विचारवंत यांच्या समोर आले. यामुळे भटक्या विमुक्त जमातीच्या साहित्य निर्मितीला वातावरण निर्माण झाले भटक्या-विमुक्तांच्या चळवळीतील कार्यकर्त्यांनी लिहिलेले साहित्य व त्यातून या जमाती विषयी स्वकथनातून मांडलेली व्यथा यावरून स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भटक्या विमुक्त जाती जमातीचे ऐतिहासिक जीवनाचा आढावा पहावयास मिळतो.

भटक्या विमुक्त जाती जमाती विषयी मराठी मध्ये प्रथमच श्री. त्रिंबक नारायण आत्रे यांनी 1915 साली प्रकाशित झाले "गाव गाडा" या ग्रंथातील सहाव्या प्रकरणात भटक्या विमुक्त जमाती विषयी लिहिलेले आहे७. भटक्या विमुक्त जमाती विषयी चे प्रश्न त्यांच्या व्यथा वेदना, त्यांच्या जगण्याची रीत याविषयी काही न मारता त्यांनी भट यांना चोर असे संबोधले आहे. पूर्वग्रहदूषित दूषित दृष्टीने भटक्या विमुक्त जमाती कडे पाहताना ते लिहितात" बहुतेकांची मदार भिक्षेवर आणि भिक्षेच्या आडून, फसवेगिरी, दंगल बाजी, चोरीचा चपाटि, यावर तर काहींची व्याभिचार वर देखील असते, वतनदार व उपलाने फिरस्ते नुसती भीक मागून शेकडा दोन-चार शेतमाल हासडून खरडून नेतात"१८ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 25 मे 1917 रोजी पुणे येथील वसंत व्याख्यानमालेत" गुन्हेगार जातीची सुधारणा या विषयावर व्याख्यान दिले. भटक्या विमुक्त जाती मध्ये आलेली गुन्हेगारी, त्यामुळे त्यांची होणारी अधोगती बंद होऊन त्यांच्यामध्ये सुधारणा झाली पाहिजे. ९ अशी भूमिका त्यांनी या व्याख्यानात मांडलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही 26 डिसेंबर 1927 रोजी आपल्या भाषणात गुन्हेगार जमातींना नैतिक म्हणून घेणाऱ्या जातीने आश्रय दिला तरच त्यांना नीतीचे शिक्षण मिळेल अशी परखड भूमिका मांडलेली आहे. १० श्री लालजी पेंडसे यांनी'गुन्हेगार'(१९३४) या ग्रंथात ही गुन्हेगारी जमाती चे जीवन मांडलेली आहे. गुन्हेगार जमाती जगतात कशा, त्यांचा दैनंदिन जीवन व्यवहार या अनुषंगाने या ग्रंथाचे चित्रण केले आहे. ११ मराठी साहित्यामध्ये भटक्या विमुक्त जमाती विषयी झाले ते समाजपरिवर्तनाच्या भूमिकेतून समाज धुरिणांनी केलेले आहे. मराठी साहित्यात आत्मकथा स्वकथन कादंबरी यामधून भटक्या विमुक्त जाती जमातीचे जीवन चित्रण झालेले आहे.

'बळी'(१९५०), 'विभावरी शिरुरकर," बारी (१९५९), "रणजित देसाई" "माकडाची माळ"(१९६३), अण्णाभाऊ साठे "पारधी'', शंकरराव खरात" पणती (१९६९),,महादेव मोरे," कातंण" , उपेक्षितांचे अंतरंग (१९४१) माटे," गाव शिव",'तडीपार, टिटवी चा फेरा, शंकरराव खरात,'नागिन'चारुता सागर, चेहरे (१९६३) बतासी (१९६५) महादेव मोरे,'जॉकी सुरेश घोरप सेक्सी'कल्लोळ'ही रा वाघमारे,'मसनजोगी'उत्तम बंडू तुपे, तीन दगडाची चूल, कोल्हाट्याचं पोर इत्यादी आत्मकथनातून भटक्या विमुक्त जाती जमातींच्या जीवन चित्रण करण्यात आले i आहे.१२

विभावरी शिरुरकर यांनी'बळी'या स्व कथनामध्ये ना मध्ये मटका मांगारूडी जमातीचे तसेच कुंपण आतील जीवन चित्रात केले आहे मराठी साहित्यात भटक्या विमुक्त जमातीचे अस्सल चित्रण बळी च्या माध्यमातून प्रथमच आले आहे. या जमातीमधील बाबा काही वर्ष गांधी बोर्डिंग मध्ये राहतो शिक्षण घेऊन घरात आपल्या समाजात येतो. आपल्या जमातीचे चोरी दरोडा यापासून दूर राहावे काम करून कसे जगावे असे सांगतो १३. आपल्या पोटावर धंद्यावर पाय देणारा आबा आहे. असे समजून इतर लोक त्याला मारून टाकतात. तत्वाने वागणाऱ्या सुधारणा घडवणाऱ्या गुन्हेगारी पासून दूर जाणाऱ्या भटक्या विमुक्ता मधील नऊ मुल्यांचा असा खून होतो. बाबांची शोकांतिका ही या जमातीची शोकांतिका बनते गुन्हेगार जमाती च्या जीवनातील विविध कादंबरीमध्ये येतातमध्ये येतात. रणजित देसाई यांनी बेरड या कादंबरीमध्ये भटक्या

जमाती चे चित्रण केले आहे कर्नाटकातील सूट गटी च्या रानात राहणाऱ्या ज्यांना गुन्हेगार मानले गेले आहे आशा बेरड जमातीच्या जीवनात होणारे बदल रणजित देसाई यांनी मांडले आहेत.१४ अण्णाभाऊ साठे यांनी माकडीचा माळ या कादंबरीत भटक्यांच्या विविध जमातीचे चित्रण केले आहे. डवरी गोसावी, मांग गारुडी, दर्वेश, फासेपारधी, नंदीवाले, शिकलगार, भानामती वाले इत्यादी जमातीचे चित्रंण यामध्ये केले आहे.१५ गावातील प्रस्थापितांनी बरोबर होणारा संघर्ष त्यातून गाव सोडावे लागणे, पोटासाठी लाचार व्हावे लागणे, तरीही हार न मानता जगणे या बाबी यातून ठळक होत जातात. शंकरराव खरात यांनी पारधी कादंबरीमध्ये फासेपारधी या भटक्या जमाती चे चित्रण केले आहे फासेपारधी यांना चोरटी जमत म्हणून प्रस्थापित समाज कधीही जवळ करत नाही याची यामध्ये गात आहे. महादेव मोरे यांच्या पणती या कादंबरीमध्ये माँ गारोडी या जमातीचे जीवन चित्रण केलेले दिसून येते यामध्ये उच्चवर्णीय व भटक्या विमुक्त जमातीतील संघर्ष प्रकर्षाने दिसून येतो १६. वस्ती या कादंबरीमध्ये मांग गारोडी डोंबारी यांचे जीवनमान उदरनिर्वाह या वास्तव जीवनाचे चित्रण केलेले आहे. गिरिष प्रभूने यांच्या पारधी या कादंबरीत पारधी जमातीचे जीवन चित्रण केले आहे. लक्ष्मण माने 'उपरा'(१९८०),'गबाळ' (१९८३) दादासाहेब मोरे,'उचल्या' (१९८५) लक्ष्मण गायकवाड, रान भैरी (१९८६) गुलाब वाघमोडे,'ऐरणीचा घाण' (१९८६) वैजनाथ कळसे, 'बेरड' (१९८७) भीमराव गस्ती, 'तांडा'(१९८९) आत्माराम राठोड,'भटक्या'(१९९२) कचरू गिरे,'कोल्हाट्याचं पोर'(१९९३) किशोर शांताबाई काळे,'दगडफोड्या (२०००) रामचंद्र नलावडे, तीन दगडाची चूल (२०००) विमल मोरे,बिराड (२००१) अशोक पवार, चोरटा, मी एक दगडफोड्या, निवडुंग, अशी एकूण आत्मकथने प्रसिद्ध झालेली आहेत. याशिवाय कथा संग्रह कविता वैचारिक व संशोधनात्मक लेख प्रकाशित झाले आहेत.नवे पर्व(१९९९), तुझा गोंधळ मांडीला(२००५) उत्तम राठोड संकलनात्मक लेखन यामध्ये बंद दरवाजा (१९८२), एक्स गुन्हेगार जमाती(१९८४) मोतीराम राठोड, गोपाळ समाज परंपरा आणि इतिहास (१९८६) भटक्या विमुक्तांचे प्रश्न आणि लढे, भटक्यांचा एल्गार येत आहे बाळकृष्ण रेणके, भटक्यांचे भग्न आणि संस्कृती, पालावरचं जग, विमुक्त यान, तांड्यावर चे दिवस, आम्ही उपेक्षित, पाल आतली माणसं, भटक्या विमुक स्त्री जीवनाचा प्रश्न, इत्यादी लेखन मराठी साहित्यातून भटक्या जाती जमाती विषय उपलब्ध आहे.१७ भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनात आपल्या वाट्याला आले ते जीवन जशीच्यातशी शब्द बंद करावे, त्यातून आपल्या बरोबरच आपल्या जमातीच्या दुःखाचा व्यथा वेदनेचा आलेख मंडावा या भूमिकेतून ही आत्मकथने लिहिली आहेत. भटक्या विमुक्त जमाती मधील कार्यकर्त्यांनी लिहिलेली ही आत्मकथने त्या-त्या जमातीचे प्रतिनिधित्व करतात या आत्मकथनातून व्यक्ति मना बरोबरच समाजाचा जिवंत व ज्वलंत अनुभव अविष्कार घडतो. प्रत्येक आत्मकथनात लेखकाने व्यथा-वेदना अंधश्रद्धा रूढी परंपरा जसेच्या तसे प्रत्येक आरे दर्शन घडवले आहे. १८ तसेच त्याच्या जमातीच्या मर्यादा उनिवा जातपंचायतीकडून होणारी पिळवणूक, जमाती अंतर्गत असणारे संघर्ष याचेही तितकेच प्रत्येकाने चित्रण केले आहे. त्यामुळे या आत्मकथनातून आत्मपरीक्षण ही करण्यात आले आहे. या प्रत्येक आत्मकथनाला सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक शैक्षणिक हे संदर्भ या आत्मकथनाचे अविभाज्य घटक आहेत. भटक्या

विमुक्त जाती जमाती मधील या आत्मकथनातत्या-त्या जमातीची बोलीभाषा यांचेही संदर्भ येतात हे वैशिष्ट्य महत्त्वाचे आहे. मराठी भाषेतील साहित्यातील हा वांग्मय प्रकार वेगळा आहे यामधून भटक्या विमुक्त जाती जमातीचे संवेदना दिसून येतात.. या साहित्य लेखनामुळे भटक्या विमुक्त जाती जमाती वंचित वंचित समाजाचा इतिहास अभ्यास करणे सहज सोपे होते.

**संदर्भ**


1. Thade B L, Report of the officer on special duty for unification of the list vimukta jatis and nodmadic tribes committee report ,196
2. Ambedkar B R, Annikilation of cast ,Third edittion Ambedkar school of thoughts ,Amrutsar ,1945 page 69
3. चव्हाण रामनाथ, भटक्या विमुक्त जमाती आणि जातपंचायत, खंड दुसरा, प्रथमावृत्ती, २००४,पृ.६.
4. फडके य दी , भटके आणि विमुक्त, के सागर प्रकाशन के अंजली पब्लिकेशन पुणे, २००७
5. अत्रे त्रि.न, गाव गाडा, समन्वय प्रकाशन कोल्हापूर, २०१२ ,पृ १२२
6. Ranke B, National commission for denotified nomadic and seminomidic tribes ,2016
7. Annual Administration Reports working of the criminal tribes act in the prounce of Bombay ,1952
8. कदम धोंडीबा, *महाराष्ट्रातील भटके विमुक्त समाज आणि* संस्कृती , साहित्य आणि संस्कृती प्रकाशन पुणे, २०१३,पृ १६
9. भोसले नारायण (संपा), आंबेडकर सामाजिक चिकित्सा, यशोदीप प्रकाशन पुणे, २०१८पृ ४३.
10. चव्हाण बाळासाहेब(संपा), भटके विमुक्त जमाती आत्मकथन एक वाड:मयीन अभ्यास आणि चिकित्सा, २०१६,पृ८६.
11. मोरे दादासाहेब(संपा), भटक्या विमुक्तांचे साहित्य व अंतरंग, फुले-आंबेडकर अध्यासन मुंबई विद्यापीठ, २०१६,पृ६७
12. संस्कृती विकिपीडिया, https//hi………Wikipedia org.
13. राठोड रावजी, मुक्ती नामा, गौर वाणी प्रकाशन औरंगाबाद,२०१०,पृ१७
14. आखाडे विशाखा, गौरवाणी त्रैमासिक, जुलै सप्टेंबर २०१५.
15. उपरोक्त.
16. उपरोक्त.
17. माने लक्ष्मण, विमुक्त यान महाराष्ट्रातील विमुक्त जाती एक चिकित्सक अभ्यास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, १९९७ पृ ४३
18. उपरोक्त.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# २४. माणदेशातील किल्ले : ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. एस.एन. गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली.

**माणदेश नावाची उत्पत्ति**

या परिसराला माणदेश हे नाव कसे पडले यासंबंधी फारसे पुरावे उपलब्ध होत नाहीत. असे असले तरी माणदेश हे नाव प्राचीन कालखंडापासून रूढ असल्याचे दिसते. या प्रदेशातून माण नावाची नदी वाहते. या नदीच्या नावावरून या प्रदेशाला माणदेश हे नाव पडले असावे. या नदीच्या परिसरात मान खडकाची जमीन असल्याचे दिसून येते. या खडकाच्या नावावरून नदीला माण नदी व या नदीच्या नावरून या प्रदेशाला माणदेश हे नाव पडले असावे. राष्ट्रकुट घराण्यात अनेक राजे होऊन गेले पैकी मानाड:क हा एक या घराण्यातील प्रसिद्ध राजा होता. त्यने आपल्या देशाची राजधानी म्हणून माणपूर या ठिकाणाला निचित केले. या राजधानीच्या नावावरूनही माणदेश हे नाव पडले असावे.

**माणदेश भौगोलिक**

माणदेश ७४अंश, २२ मी. ३० सें. ते ७५ अंश. ३० .मी. पूर्व रेखांशावर येते. त्याचा अक्षांश १७अंश उत्तर अक्षांश ते १७अंश ५१ मीटर ४१ से. उत्तर अक्षांश असा आहे. माणदेशाचा पूर्व पश्चिम विस्तार ११६.८ कि. मी. असून दक्षिणोत्तर विस्तार ९१.२ कि. मी. इतका आहे. आज हा प्रदेश सोलापूर, सातारा व सांगली या जिल्ह्यांच्या सीमारेषेवर येतो. माणदेशात आटपाडी व माण हे पूर्ण तालुके येतात. पंढरपूर तालुक्यातील १३ गावे, मंगळवेढा तालुक्यातील २२ गावे, जत तालुक्यातील ३१ गावे, व सांगोला तालुक्यातील ८१ गावांचा समावेश आहे. माणदेशाचे क्षेत्रफळ सुमारे ४८,७०० चौ. कि. मी. असून लोकसंख्या सुमारे १०,००,००० आहे.

**माणदेशातील किल्ले**

आडवाटा चढायचा नाद जडला, की वेगवेगळ्या गडकोटांची वारी सुरु होते. माणदेशात असे अनेक अपरिचित गडकोट दडले आहेत. त्यामध्ये वर्धनगड, महिमानगड, वारुगड, भूपालगड, संतोषगड आणि संगोल्याचा किल्ला इत्यादींचा समावेश होतो. महिमानगडाची वारी तर मनाला तजेला देणारी ठरते. हा किल्ला उपेक्षित असला तरी आजही आपल्या काताळी सौंदर्याने दिमाखात उभा आहे. माणदेशाचा द्वारपाल म्हणून संबोधला जाणारा वर्धनगड ही पाहण्यासारखा आहे.

**वर्धनगड**

सातारा जिल्यातील माणदेश या शब्दाची ओळख, सानिध्य केवळ तसे दुष्काळाशी ! हे नाव उच्चारताच डोळ्यापुढे तो वैरण मुलुखच उभा राहतो. कायम रखरखीत-उजाड, करपलेला असा हा भाग. पण

पाऊस सुरु झाला, की मात्र थोडाफार हिरवा, कोमल बनतो. वर्धनगड, महिमानगड, संतोषगड आणि वारुगड ही या माणदेशाची दुर्गचौकडी इतिहासाची दौलत ! सातार्‍यातून कोरेगाव मार्गे या प्रदेशात शिरले, की वर्धनगडाच्या घाटात यातलाच पहिला शिलेदार आपली वाट अडवतो तो म्हणजे वर्धनगड.

सातारा-पंढरपूर रस्त्यावर सातार्‍याहून ३३ कि.मी. हा किल्ला आहे.[१] सातार्‍याहून पुसेगावकडे जाणारी कोणतीही एसटी बस या गडाकडे जाण्यासाठी सोयीची आहे. या सर्व बस गडाच्या पायथ्याशी असणार्‍या वर्धनगड या गावी थांबतात. या वाटेतील तालुक्याचे कोरेगाव ओलांडले, की लगेचच बागायती हिरवा भाग जाऊन उजाड माळ सुरु होतो. वर्धनगडाजवळ हे चित्र पूर्ण होते आणि माणदेशी आपले पाऊल पडते. सह्याद्रीच्या मुख्य रांगेची एक उपशाखा माणदेशातून फिरते. या रंगेवारच हा माणदेशाचा द्वारपाल उभा आहे. वर्धनगड गावात वळताच वेशीवर मांडलेल्या दोन तोफा दिसतात. त्यामुळे वर्धनगडाचे रूप खुलून दिसते.

या गडाची समुद्रसपाटीपासून उंची १५०० फुट (४५७ मीटर) आहे. गावात शिरताच गडाच्या तटाचा दगड न दगड स्वच्छपणे दिसू लागतो. गावाच्या पूर्व दिशेने एक वाट गडावर जाते. पायर्‍यांच्या या मार्गावर भैरव, मारुती व गणेशाचे दर्शन घडते. मधोमध टेकडी आणि भोवतीने तटालगतची सपाटी अशीगडाची रचना आहे. टेकडीच्या सर्वोच्च स्थानी वर्धीनीमातेचे मंदिर आहे. या गडाची तटबंदी धडधाकट आहे, हेच या गडाचे विशीष्ट आहे. जाड-रुंद बांधकामाचा हा तट आजही सुस्थिती आहे. या गडाची निर्मिती कोणी केली हे इतिहासाला फारसे माहित नाही. पण छत्रपती शिवरायांनी अफझलखान वधानंतर माणदेशातील अन्य किल्ल्याबरोबर हा किल्लाही जिंकून घेतला. १४ ऑक्टोबर १६६१ ते १९ ऑक्टोबर १६६१ या कालावधीत महाराज स्वतः या गडावर मुक्कामी होते. त्यांनीच १६७३-७४ मध्ये या गडाची पुनर्बांधणी केली. औरंगजेबाच्या दक्षिणस्वारीवेळी ६ जून १७०१ त्याने वर्धनगड जिंकला. मात्र अल्पावधीत मराठ्यांनी तो पुन्हा मोगलांकडून जिंकून घेतला. मराठ्यांचा वर्धनगडावरील इतिहास पुढे १८१८ च्या ब्रिटिशांबरोबरच्या शेवटच्या लढाई पर्यंत जागता होता.

**संतोषगड**

सह्याद्रीची मुख्य डोंगररांग प्रतापगडापासून ३ भागांमध्ये विभागली आहे. शंभूमहादेव रांग, बामणोली रांग आणि म्हसोबा रांग. यापैकी म्हसोबा डोंगररांगावर संतोषगड, वारुगड, महिमानगड आणि वर्धनगड हे किल्ले आहेत. हा सर्व परिसर तसा कमी पावसावरचा, मात्र उसाच्या शेतीमुळे सर्व परिसर साधन झालेला आहे. संतोषगडला ताथवडयाचा किल्ला असेही म्हणतात. या किल्ल्याची समुद्रसपाटीपासून उंची २९०० फुट आहे. या गडावर फलटण आणि सातारा या दोन्ही शहरातून जाता येते. ताथवडे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे. याला अनेक मार्गाने पोहचता येते. फलटण ते ताथवडे हे साधारण १९ किमी. चे अंतर आहे. ताथवडे गावात ‘बालसिद्धीचे’ जीर्णोद्धार केलेले मंदिर आहे. मंदिराच्या पायरीवरून

इ.स. १७६२ मध्ये किल्ल्याचा जीर्णोद्धार केल्याचे समजते. किल्ल्यावर महादेवाचे मंदिर असून त्याच्या बाजूला एक चौकोनी विहीर आहे. त्यात बारमाही पाणी असते.

**भूपाळगड**

माणदेशातील हा किल्ला जतच्या वायव्येस २० मैलावर आहे. सांगोला तालुका व जत तालुक्याच्या हद्दीवर आहे. हा किल्ला शिवरायांनी राजा भूपालच्या नावाने बांधला आहे, असे म्हटले जाते. मात्र तो सुस्थितीतील नसल्याने व विजापूरच्या आदिलशहाशी टक्कर देण्यासाठी छ शिवाजी महाराजांनी याची डागडुजी करून तो भक्कम केला.[२] या किल्ल्यात संकटाच्या प्रसंगी खजिना व धन्य ठेवण्याची व्यवस्था त्यांनी केली होती.[३]

या किल्ल्यात शिवरायांच्या जीवनातील एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. शिवरायांचे पुत्र संभाजी राजे मोगलांचा सुभेदार दिलेरखान यास १६७८ मध्ये सामील झाले. त्यामुळे दिलेरखान हा संभाजीसह भूपाळगड जिंकण्यासाठी चालून आला. या किल्ल्यावर स्वराज्यातर्फे फिरंगोजी नरसाळा हा किल्लेदार यावेळी तेथे होता.[४] छत्रपती शिवाजी यावेळी पन्हाळ्यावर होते. दिलेरखानाने संभाजी राजांना आघाडीला ठेवून १७ एप्रिल १६७९ रोजी भूपालागडावर हल्ला केला. दिलेरखानाच्या भीतीने सैनिकांनी किल्ल्याचा आश्रय घेतला. त्यामुळे किल्लेदाराचा नाविलाज झाला. पराक्रमाची इर्षा व साधनाची मुबलकता असूनही किल्लेदाराला किल्ला लढविता येईना. हल्ल्यात संभाजी राजांचे काही बरे-वाईट झाले तर काहीतरी भलतेच घडेल या भीतीने त्याचा नाईलाज झाला. त्यामुळे दिलेरखानाने गड ताब्यात घेतला. परिणामी किल्ल्यावर कैदी बनलेल्या ७०० लोकांचे एक-एक हात कलम करून आपली अघोरी शिक्षा त्याने अंमलात आणली.[५]

भूपालागड दिलेरखानाने घेतल्याची खबर शिवरायांना मिळताच त्यांनी किल्ल्याच्या बचावासाठी १६,००० सैन्य पाठविले. हे सैन्य या किल्ल्यावर पोहोच होण्यापूर्वीच तो किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला होता. या गडाविषयीची माहिती "बसतीनुस्सलातीन" आणि "तारीखे दिल्कुशा" व "मल्हार रामराव चिटणीस बखर" यातून मिळते.

१७३८ मध्ये पेशवा नानासाहेबांच्या काळात हा गड पुन्हा मराठ्यांकडे आला. त्यावेळी बहिर्जी नाईकचा वध या ठिकाणी करण्यात आला.

**महिमानगड**

हा किल्ला माणदेशातील महादेव डोंगररांगेवर येरळा आणि माणगंगा या दोन नद्यांच्या दुष्काळी वातावरणात उमलला आहे. म्हणजेच दुष्काळी वातावरणात उमललेले एक सुंदर डोंगरपुष्प असे वर्णन या गडाचे करता येते. असा हा किल्ला दहिवडी हून अंदाजे १०-१२ कि.मी. अंतरावर आहे. या परिसरातील किल्ले हे मुख्य डोंगररांगेपासून अलग झालेल्या डोंगरावर विराजमान झालेले आहेत.[६] सातारा- पंढरपूर रस्त्यावर महिमानगड नावाचे गाव आहे. या गावाच्या मागे मुख्य डोंगरापासून अलग झालेल्या डोंगरावर असलेला महिमानगड किल्ला, त्याच्या ताशीव कातळ कड्यांमुळे आपले लक्ष वेधून घेतो. दुर्गप्रेमींनी

आवर्जून भेट दयावी असा हा गड आहे. माणसारख्या दुष्काळी प्रदेशात असूनही महिमानागडाची वारी मनाला उत्तेजन देणारी ठरते. पाण्याचे दुर्भिक्ष असूनही गडाचे सेवेकरी वंशपरंपरेने आजही येथे राहतात.[७]

महिमान शाहवली या संतांच्या वास्तव्याने हा गड पावन झाला म्हणून त्याला महिमानगड हे नाव प्राप्त झाले. शिवाजी महाराजांच्या आधीचा हा किल्ला आहे, असे येथील लोक सांगतात. १८१८ मध्ये लढाई न होताच हा किल्ला इंग्रजांच्या हाती आला. या गडाला संपूर्ण तटबंदी असून पूर्वी ७ फुट उंचीचा कमानी दरवाजा होता. सध्या मात्र तो पूर्णपणे भुईसपाट झाला आहे. गडाचे बुरुजच थोडेफार शाबूत आहेत. दरवाजातून गडात प्रवेश करण्यापूर्वी तटाच्या डाव्या अंगास पाण्याची टाकी लागते, ती पूर्णपणे बुजून गेलेली आहे. त्याला लागुनच तटाखाली खडकात चोकोनी गुहा आहे. ती बरीच खोल आहे असे बोलले जाते. दरवाजातून काहीसे वर गेले कि डाव्या बाजूस मारुतीचे मंदिर आहे परंतु त्यावर छत नाही. थोडे पुढे गेले कि मोठा खडडा आहे. खड्याला लागून हौद आहे. त्यात पूर्वी धान्य साठवत असत. हे हौद सध्या मातीने पूर्ण भरलेले आहेत. हौदाच्या दक्षिणेस एक पडझड झालेली इमारत दिसते. त्याबाबत असे बोलले जाते कि, तेथे दगडी तळघर असून त्यात कैद्यांना ठेवत असत. या गडाचे वैशिष्ट्य म्हणजे उत्तर टोकावरील तटबंदीत असणारा गुप्त दरवाजा पाहण्यासारखा आहे.

गडाच्या पूर्वेकडील माचीच्या टोकावर एक बुरुज आहे. त्यास झुंजार महाल म्हणतात. त्याच्या पोटातच लहान महादेवाची पिंड आहे. हा गड त्रिकोणी आकाराचा असून तो पूर्णपणे रुक्ष वाटतो. या गडाच्या पश्चिमेस वर्धनगड, दक्षिणेस भूपाळगड तर उत्तरेस वारुगड आहे.

इ. स. १७१५-१७१६ मध्ये सुलतानजी निंबाळकर व जानोजी निंबाळकर या उभयतांनी भावबंदकीतून या गावात जाळपोळ करून गुरे-ढोरे १००० व मेंढरे २००० नेली. बायकांचा बंदही धरिला. ३ रोज बायकांस नेले. त्यांच्या अंगावरील लुगडी फाडून घेतली. या कृत्यामुळे त्यांची शरम गेली परिणामी ३ बायकांनी आगीमध्ये उडया घेतल्या. या गडाच्या बंदोबस्तासाठी खर्चास माळशिरस व मेडद गावाचे निम्मे उत्पन्न शाहूमहाराजांनी तनखा म्हणून दिले होते.[८] गडाचे मुद्राधिकारी वणगोजी नाईक निंबाळकर होते तर किल्ल्याचा हवालदार कारकून महादजी पतंगराव होते.

**वारुगड**

सातारा जिल्ह्यातील फलटणच्या दक्षिणेस दोन किल्ले उभे आहेत. ते म्हणजे वारुगड आणि संतोषगड होय. संस्थान कालखंडात फलटण संस्थानला या किल्ल्यांचा उपयोग संरक्षक म्हणून होत होता. माण तालुक्यात माणगंगा नदी जिथे उगम पावते त्या सिताबाईच्या डोंगरात डाव्या कुशीवर हा किल्ला आहे. म्हणजेच शंभू महादेवाच्या डोंगर रांगेवर हा गड वसलेला आहे. या डोंगरामुळे फलटण व माण हे दोन तालुके विभागले आहेत. हा किल्ला छ. शिवाजी महाराजांनी बांधला असे सांगितले जाते. मात्र तसा भक्कम ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. दहीवडीच्या ईशान्येस असलेल्या या किल्ल्याचा उपयोग टेहाळणीसाठी केला जात असावा. हा किल्ला गिरिदुर्ग प्रकारात मोडतो. या किल्ल्याची समुद्रसपाटीपासून

उंची ३००० फुट (९१४ मीटर) आहे.[९] फलटण पासून गिरवी पर्यंत बसने जावून तेथून अर्धा तास चालत गेल्यास गडाचा पायथा गाटता येतो, किंवा माण भागातून पालवण या गावी येऊनही या गडावर जाता येते.

सातारच्या राजांच्या वतीने विठ्ठलपंत फडणीस यांनी दुसरा बाजीराव पेशवे यांच्याकडून हा किल्ला १८१८ मध्ये घेतला व नंतर इंग्रजांकडे सुपूर्द केला. हा गड लांबून छोटा वाटतो, परंतु आतील पसारा मोठा आहे. या किल्ल्यापेक्षा येथील डोंगररांगा उंच आहेत. गडाचा दक्षिण दरवाजा व तटबंदी अजून शाबूत आहे. गडाच्या पश्चिमेकडे तुटलेला कडा आहे. वायव्येकडे फलटण दरवाजा आहे. या किल्ल्याला बालेकिल्ला असून त्याचे वरचा व खालचा असे दोन भाग आहेत. बालेकिल्ल्याचा पश्चिम भाग पसरलेला आहे. त्यावर तटसारखी भिंत बांधून हे दोन बालेकिल्ले तयार झाले आहेत. नैऋत्य व वायव्य दिशांना दोन मोठे बुरुज आहेत. बालेकिल्ल्याच्या दरवाजातून आत प्रवेश केला कि डावीकडे सदरेची इमारत, कैदी ठेवण्याची अंधार कोठडी व पाण्याची विहीर आहे. भैरवनाथाचे मंदिर बालेकिल्ल्याच्या खाली माचेवर आहे. माचेवर घोडेवाडी हे लहानसे गाव आहे. येथेच हे मंदिर असल्याने त्याचा जीर्णोद्धार झाला असल्याने ते सुस्थितीत आहे.[१०] येथे चैत्र महिन्यात मोठी यात्रा भरते. देवळासमोरचा पार, त्यावरील झाडे यामुळे हे ठिकाण रम्य वाटते. गडावर आता वीजही आली आहे. बालेकिल्ल्यावर खालच्या बाजूस पश्चिमेकडे एक टांक आहे.

**सांगोल्याचा किल्ला**

सांगोला हे सोलापूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असून ते मिरज-पंढरपूर रस्त्यावर सोलापूर पासून १०० कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी एक भुईकोट किल्ला होता. मात्र सद्या हा किल्ला सद्यस्थितीत पूर्णपणे नामशेष झालेला आहे. १६७९ मध्ये हा किल्ला आदिलशहाच्या ताब्यात होता. त्याचा किल्लेदार बहाद्दुराखन हा होता. मोगलांनी घेतलेला अकलूजचा किल्ला १६७९ मध्ये आदिलशहाच्या ताब्यात आला होता. मोगलांतर्फे या किल्ल्यावर बजाजी निंबाळकर यांनी हल्ला केला. हि बातमी सांगोल्याच्या किल्लेदारास समजताच तो अकलूजच्या किल्लेदाराच्या मदतीसाठी धावून गेला. त्यामुळे बजाजी निंबाळकर याला माघार घ्यावी लागली. संगोल्याचा किल्लेदार बहाद्दुरखानाने त्यास हाकलून लावले. बाजाजीचा पुत्र या लढाईत ठार झाला.[११] खानजहान बहाद्दूर याने मंगळवेढयाचा किल्ला व संगोल्याचा किल्ला मे १६८४ मध्ये मोगलांच्या ताब्यात आणला.[१२]

शाहुनंतर नानासाहेबांच्या प्रयत्नाने ४ जानेवारी १७५० रोजी राजाराम गादीवर आले. त्यामुळे नानासाहेबांनी साताऱ्यात राहून त्याच्यावर आपला प्रभाव पाडला, परिणामी राजाराम पेशव्यांच्या तंत्राने वागू लागला. तेंव्हा ताराबाई व पेशव्यांतील संघर्ष अटळ झाला. नानासाहेब पेशव्यांनी छत्रपतींचे महत्व कमी करून पेशव्यांकडे राज्याचे सर्वाधिकार घेण्याचा घाट घातला. त्यासाठी राज्यकारभाराची नवी व्यवस्था निर्माण करणे, त्याला छत्रपतीची मान्यता घेणे आवश्यक होते. याचवेळी संगोल्याचा संघर्ष निर्माण झाला.

पेशव्यांनी प्रतिनिधीकडील सांगोले मंगळवेढे हि ठाणी मागितली त्यासाठी सांगोल्याहून यमाजीस बोलवूनही घेतले. प्रतिनिधींनी दडपणामुळे हि ठाणी पेशव्यांकडे देण्याचे मान्यही केले. तशी यमाजीस आज्ञा केली, परंतु यमाजींनी सांगितले कि प्रतिनिधी हे छत्रपतींचे सेवक असल्याने त्यांच्या आज्ञेनेच प्रदेशाची देवघेव करता येईल. पेशव्यांचा हुकुम आपण मानणार नाही. यातून पेचप्रसंग निर्माण झाला. लढाई केल्याशिवाय पर्याय नाही, तीही छत्रपतींच्या आज्ञेने हे ओळखून पेशव्यांनी रामराजा व सदाशिव भाऊ यांना प्रचंड फौजेसह सांगोल्याच्या मोहिमेवर पाठविले. १० सप्टेंबर १७५० रोजी सांगोल्याच्या किल्ल्यावर स्वारी केली. यमाजीनी कडवी झुंज दिली. शेवटी २५ सप्टेंबरला यमाजी शरण आला.

या स्वारीत यमाजीस अपयश आल्याने महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारा तह सांगोल्याच्या अंबिकादेवीच्या मंदिरात झाला. या तहानुसार पेशव्यांनी मराठी साम्राज्याची सर्व सत्ता आपल्या हाती घेतली व आपणास एकनिष्ठ असे अष्टप्रधानमंडळ नेमले. या कालखंडात सांगोले राजकीय उलाढालीचे केंद्र बनले. स्वतः रामराजे पेशव्यांचे सेनापती व मुत्सदी सांगोल्याच्या किल्ल्यात राहून काहीकाळ राज्यकारभार पहात

**निष्कर्ष**

माणदेशात वर्धनगड, महिमानगड, वारुगड, भूपालगड, संतोषगड आणि सांगोल्याचा किल्ला इत्यादींचा समावेश होतो. माणदेशाचा द्वारपाल म्हणून संबोधला जाणारा वर्धनगड हा किल्ला ही पाहण्यासारखा आहे. वर्धनगड गावात वळताच वेशीवर मांडलेल्या दोन तोफा दिसतात. त्यामुळे वर्धनगडाचे रूप खुलून दिसते. संतोषगडला ताथवडयाचा किल्ला असेही म्हणतात. या किल्ल्याची समुद्रसपाटीपासून उंची २९०० फुट आहे. भूपाळगड हा किल्ला शिवरायांनी राजा भूपालच्या नावाने बांधला आहे, असे म्हटले जाते. मात्र तो सुस्थितीतील नसल्याने व विजापूरच्या आदिलशहाशी टक्कर देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी याची डागडुजी करून तो भक्कम केला. महिमानगडाची वारी तर मनाला तजेला देणारी ठरते. हा किल्ला उपेक्षित असला तरी आजही आपल्या काताळी सौंदर्याने दिमाखात उभा आहे. महिमानगड या गडाचे वैशिष्ट्य म्हणजे उत्तर टोकावरील तटबंदीत असणारा गुप्त दरवाजा पाहण्यासारखा आहे. वारुगड हा गड लांबून छोटा वाटतो, परंतु आतील पसारा मोठा आहे. या किल्ल्यापेक्षा येथील डोंगररांगा उंच आहेत. गडाचा दक्षिण दरवाजा व तटबंदी अजून शाबूत आहे. गडाच्या पश्चिमेकडे तुटलेला कडा आहे. सांगोला या ठिकाणी एक भुईकोट किल्ला होता. मात्र सद्या हा किल्ला सद्यस्थितीत पूर्णपणे नामशेष झालेला आहे. माणदेशातील हे सर्व किल्ले माणदेशाच्या वैभवात भर टाकतात मात्र त्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने व माणदेशातील जनतेने जनचळवळीच्या माध्यमातून प्रयत्न करण्याची आवशक्यता आहे.

## संदर्भ


१. गायकवाड एस. एन., माणदेशाचा इतिहास, Lulu Publication, 3101 Hillsborough St, Raleigh, NC 27607, United States, 2019, page no. 14.

२. इंगोले कृष्णा जोतीराम, माणदेश : स्वरूप आणि समस्या, माणगंगा प्रकाशन, कमलापूर, सांगोले. १९८८, पृष्ठ क्र.२७.

३. देशपांडे गोपाळ, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, कौशल्या प्रकाशन, सोलापूर, २०१२, पृष्ठ क्र.२६३.

४. देशमुख विजय, शककर्ते शिवराय (उत्तरार्ध), छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपूर, १९८६, पृष्ठ क्र. ९५३.

५. कित्ता.

६. गोवेकर महेंद्र, नकाशातून दुर्गभ्रमंती, स्नेहल प्रकाशन पुणे, पृष्ठ क्र. १६९.

७. देशपांडे द. ग., महाराष्ट्रातील किल्ले, पृष्ठ क्र. ११२.

८. देशपांडे गोपाळ, पूर्वोक्त, पृष्ठ क्र.२७०.

९. गोवेकर महेंद्र, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १६९.

१०. देशपांडे गोपाळ, पूर्वोक्त, पृष्ठ क्र.७३.

११. (संपा.) बेंद्रे वा. सी., बुसातीत-उस-सलतीन (या फारशी ग्रंथाचे नरसिंहराव विठ्ठल पारसनीस कृत मराठी भाषांतर) १९६८, पृष्ठ क्र. ५५४.

१२. kulkarni G. T., The Mugal - Maratha Relations Twenty Five Fteful Years, (1682-1702), Deccan college Pune, 1983, page no. 12.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# २५. स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. संदिप भैरू जाधव**
सहाय्यक प्राध्यापक, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**गोषवारा**

ब्रिटीशांच्या वसाहतवादी धोरणामुळे भारतामध्ये निर्माण झालेल्या जनतेच्या कर्जबाजारीपणावर मात करण्यासाठी शासकीय पुढाकाराने भारतामध्ये सहकारी चळवळीचा उदय झाला. सन १९०४ मध्ये सहकारी कायदा संमत झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये आधुनिक पद्धतीच्या सहकारी सोसायट्यांची स्थापना होण्यास सुरुवात झाली. भारतातील सहकारी चळवळीत महाराष्ट्र प्रथमपासूनच अग्रस्थानी राहिला आणि देशाच्या इतर भागातील सहकार चळवळीसाठी महाराष्ट्र हा प्रेरणास्त्रोत राहिला आहे. जागतिक महामंदीचा काळ वगळता स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती झपाट्याने झाली. ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावण्यात या चळवळीची भूमिका महत्वाची राहिली. अशा या सहकारी चळवळीच्या स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्राच्या विकासातील योगदानावर प्रस्तुत शोधनिबंधामध्ये प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना**

ब्रिटीशांच्या भारतातील वसाहतवादी धोरणामुळे भारतीय जनतेत निर्माण झालेले दुःख व दारिद्र्य आणि त्यातून झालेला उद्रेक यांच्यावर मात करण्यासाठी सरकारने भारतात सहकारी चळवळीची सुरुवात केली. आधीच शेतकऱ्याच्या पाचवीला पूजलेले दारिद्र्य, त्यातून अवर्षण, अतिवृष्टी व दुष्काळ पडले म्हणजे शेतकऱ्यांच्या दुःखाला पारावर राहत नसे. अशा खालावत चाललेल्या परिस्थितीमुळे शेतकरी हा सावकारांच्या कर्जबाजारीपणाच्या विळख्यात सापडत असे. 'कर्जातच जन्म झाला, कर्जातच वाढला आणि कर्जातच मृत्यू झाला' असे भारतीय शेतकऱ्यांचे वर्णन यथार्थपणे केले जात होते. या परिस्थितीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी भारतामध्ये सहकार चळवळीची मुहूर्तमेढ शासकीय पुढाकाराने रोवली गेली. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे जनतेच्या इच्छाशक्तीतून ही चळवळ या देशात उगम पावली नाही. तर तिचे बीज शासकीय पुढाकारात होते.

**उद्दिष्टे**

१. महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा उदय कसा झाला याचा अभ्यास करणे.

२. स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा विकास कसा झाला यावर प्रकाश टाकणे.

३. स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

या शोधनिबंधामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे. यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. त्यामध्ये ग्रंथ, शासकीय कागदपत्रे, अहवाल, लेख यांचा साधन म्हणून वापर केला आहे.

**सहकार चळवळ**

आपले प्रश्न सोडविण्यासाठी अनेक व्यक्तींनी संघटित प्रयत्न करणे म्हणजे सहकार होय. सहकार या संज्ञेचा शब्दशः अर्थ एकमेकांना मदत करणे किंवा सर्वांच्या हितासाठी एकत्रितपणे काम करणे असा होतो.[१] सहकार ही एकत्र काम करण्याची अशी मानसिकता आहे कि, ज्याच्या सहाय्याने आर्थिक सुखसंपन्नता येऊ शकत

औपचारिकपणे सहकार कायदा संमत होण्यापूर्वी भारतात बऱ्याच भागात प्रत्यक्ष व्यवहारात सहकाराचा अवलंब केला जात होता असे दिसून येते.[२] १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपमध्ये जी औद्योगिक क्रांती झाली. तिच्या अनिष्ट परिणामातून सहकाराचा आधुनिक अर्थाने नवा जन्म झाला.

**महाराष्ट्रातील सहकार चळवळीची स्थापना**

ब्रिटीशांच्या वसाहतवादी धोरणामुळे निर्माण झालेल्या जनतेच्या कर्जबाजारीपणावर मात करण्यासाठी शासकीय पुढाकाराने भारतामध्ये सहकारी चळवळीचा उदय झाला. ब्रिटीशांचे वसाहतवादी धोरण आणि भारतावर त्याचे झालेले दूरगामी परिणाम यामुळे शेतकऱ्याला आपल्या उपजीविकेसाठी, जमीनमहसूल भरण्यासाठी कर्ज काढण्याशिवाय पर्याय राहत नसे. त्यामुळे शेतकरी हा कर्जबाजारीपणाच्या विळख्यात सापडत असत. या कर्जबाजारीपणाचा सहकारी पद्धतीने प्रश्न सोडवून भारतात सहकारी चळवळ सुरु करण्यासंबंधी विविध तज्ञांच्या व आयोगांच्या शिफारशीच्या आधारे व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन याने सन १९०४ मध्ये सहकारी कायदा संमत केला.[३]

भारतातील सहकारी चळवळीत महाराष्ट्र प्रथमपासूनच अग्रस्थानी राहिला आणि देशाच्या इतर भागातील सहकार चळवळीसाठी महाराष्ट्र हा प्रेरणास्त्रोत राहिला आहे. महाराष्ट्रातील सहकरी चळवळीला प्रदीर्घ असा इतिहास आहे. सावकारांच्या जुलुम-जबरदस्ती व अन्यायाखाली जे लोक भरडले जात होते. त्यांच्या उद्धारासाठी सहकार चळवळ सर्वप्रथम महाराष्ट्रात उदयास आली. ऐतिहासिकदृष्ट्या सहकारी चळवळीचा उगम दक्षिणेतील १८७५ च्या दख्खन दंगलीतून झाला असे म्हणता येईल. ही दंगल प्रामुख्याने सावकारांविरुद्ध होती. या दंगलीबाबत नेमलेल्या सरकारी समितीने सावकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सहकारी चळवळीचा पर्याय सुचविला होता.[४]

भारत सरकारने बॉम्बे प्रेसिडेन्सीसाठी ३० मे १९०४ रोजी सहकार कायदा लागू केला.[५] रेव्ह. सी. एस. कॅनॉन रिव्हिग्टन, शिवाजी रामचंद्र कुलकर्णी, कांगिनहाळचे सिंदगोंडा पाटील यांच्या मदतीने बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली. महाराष्ट्रात सहकारी चळवळ फोफावण्यात तत्कालीन बॉम्बे प्रेसिडेन्सीचे मंत्री श्री वैकुंठलाल मेहता व त्यांचे वडील श्री लल्लुभाई सामलदास यांची फारच मदत झाली. त्याचप्रमाणे गो. कृ. देवकर, ब. गो. काळे, प्रा. द. गो. कर्वे, प्रा. धनंजयराव गाडगीळ, प्रा. काझी, रावसाहेब खोले, यशवंतराव चव्हाण, गो. कृ. गोखले, विठ्ठलदास ठाकरसी, न. चि. केळकर, चुनीलाल मेहता, रमणभाई सरेय्या, वा. पु.वर्दे, विठ्ठलराव विखे-पाटील, भास्करराव जाधव इ. ची मदत झाली.[६]

इ. स. १९१९ च्या मान्टेक्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानुसार सहकार हा विषय प्रांतीय सरकारांकडे आल्यानंतर बॉम्बे प्रेसिडेन्सी सरकारने याबाबत आघाडी घेऊन ४ डिसेंबर १९२५ रोजी स्वतःचा सहकारी सोसायट्यांचा कायदा लागू केला. अशा प्रकारचा कायदा त्याआधी भारतातील कोणत्याही प्रांतीय सरकारांनी संमत केलेला नव्हता. या कायद्यामुळे सहकारी संस्थांच्या विकासासाठी मदत झाली

महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळीची वाढ मोठ्या प्रमाणावर होऊ लागली होती. सन १९२१-२२ साली बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये ३४११ सहकारी सोसायट्या होत्या. त्यांची संख्या सन १९२९ च्या अखेरीपर्यंत ५७३४ झाली. तर सभासदांची संख्या जवळजवळ अडीच लाखांनी वाढली आणि खेळते भांडवल जवळजवळ तिपटीने वाढले.[८] संस्थानामध्येही सहकारी सोसायट्यांची स्थापना होऊ लागली. एकट्या करवीर संस्थानात सन १९२२ मध्ये ३५ सहकारी सोसायट्या होत्या.[९] सहकारी चळवळीची अशी वाढ होत असली तरी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जवळपास ९०% लोक या सहकारी चळवळीपासून दूरच होते ही वस्तुस्थिती होती. बॉम्बे प्रेसिडेन्सीतील बॅकांसंबंधी

चौकशी करण्यासाठी नेमलेल्या एका समितीच्या अहवालानुसार बॉम्बे प्रेसिडेन्सीतील ग्रामीण जनतेपैकी अवघे साडेदहा टक्क्याहून अधिक लोक सहकारी चळवळीत सहभागी झाले होते.[१०]

बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या तुलनेने मध्यप्रांत-वऱ्हाडातील सहकार चळवळ फारच कमकुवत होती. मध्यप्रांतातील हिंदी व मराठी भाषिक विभागांच्या तुलनेने वऱ्हाडातील सहकारी सोसायट्या चांगल्या स्थितीत होत्या. या प्रांतातील सव्वा कोटीहून अधिक ग्रामीण लोकसंख्येपैकी अडीच टक्क्याहूनही कमी लोकांचा सहकारी संस्थांशी संबंध आलेला होता.[११]

**जागतिक महामंदी आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ**

जागतिक महामंदीपर्यंत महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा प्रसार झपाट्याने झाला. परंतु १९२९ मध्ये आलेल्या जागतिक महामंदीचा फटका महाराष्ट्रातील सहकारी चळवळीलाही बसल्याशिवाय राहिला नाही. जागतिक महामंदीमुळे बहुतांशी कृषी उत्पादनांच्या किंमती सरासरी ४० ते ५० टक्क्यांनी उतरल्यामुळे[१२] शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट झाली. दुसरीकडे कृषी उत्पादनांच्या कमी झालेल्या किंमतींच्या तुलनेत शेतमजुरी आणि इतर खर्च कमी झाले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अतिशय बिकट झाली. याचा परिणाम शेतकऱ्यांकडून कर्जाची परतफेड झाली नाही. शेतकऱ्यांच्याकडून कर्जपरतफेड झाली नसल्यामुळे सहकारी सोसायट्यांची थकबाकी वाढली. सर्वसामान्यपणे महाराष्ट्रातील सहकारी सोसायट्यांवर याचा विपरीत परिणाम झाला. सन १९२९-३० मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये कृषी पतसंस्था ४३१७ होत्या. त्यामध्ये महामंदीच्या काळात घट होऊन त्या सन १९३६-३७ मध्ये ३७१८ झाल्या. तर सन १९२९-३० मध्ये सहकारी सोसायट्यांची सभासदसंख्या २६२५६९ होती ती सन १९३६-३७ मध्ये १९८२०३ पर्यंत खाली आली.[१३] तर बॉम्बे प्रेसिडेन्सीतील एकूण सहकारी सोसायट्यांची संख्या सन १९३१-३२ मध्ये ५८९६ होती. त्यांच्यामध्ये महामंदीच्या काळात घट होऊन सन १९३७-३८ या आर्थिक वर्षात त्या ५०९३ झाल्या. प्रामुख्याने शेतीशी संबंधित असलेल्या सहकारी सोसायट्यांची संख्या घटत गेल्यामुळे बॉम्बे प्रेसिडेन्सीतील सहकारी सोसायट्यांची संख्या कमी झाली होती. सदस्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जाऊ रक्कमेवरील व्याजाचे दरही सहकारी सोसायट्यांनी दोन ते सहा टक्क्यांनी कमी केले. या काळात सहकारी सोसायट्यांच्या थकबाकीचे प्रमाण जसे खूपच वाढले तसेच वादग्रस्त प्रकरण लवादाकडे सोपविण्याचे तसेच सहकारी सोसायट्यांच्या आर्थिक व्यवहारातील भ्रष्टाचाराचे प्रमाणही बरेच वाढले.[१४] सहकार तत्वावर चालविण्यात येणारी विमाविषयक संस्था बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये सन १९३० साली सुरु झाली. ती भारतातील अशा प्रकारची पहिली संस्था होती. मुख्यतः ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या या विमाविषयक संस्थेमार्फत दीडशे रुपयाइतक्या कमी रक्कमेचाही विमा उतरता येत असे.[१५]

सन १९३३ च्या जूनच्या प्रारंभी आयोजित करण्यात आलेल्या एका गोलमेज परिषदेत सहकार क्षेत्रातील समस्यांबद्दल चर्चा करून त्यावर उपाय सुचविण्यात आले. ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणास आळा घालण्यासाठी दहा भूतारण बँका स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यांची शिखर संस्था म्हणून ७ डिसेंबर १९३५ रोजी मुंबई प्रांतिक भूतारण बँकेची स्थापना करण्यात आली. सन १९३६ व १९३७ मध्ये कर्जाची कमाल मर्यादा, थकबाकीची वसुली वगैरेबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने शिफारशी केल्या आणि त्यांच्या अनुशंगाने बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या काँग्रेस मंत्रिमंडळातील मोरारजी देसाई व अण्णासाहेब लठ्ठे या मंत्र्यांनी सहकार खात्याची व ग्रामीण विकासाची सांगड घातली. सहकारी संस्थेतर्फे सहकारी चळवळीचे शिक्षण देण्यासाठी तीन प्रशिक्षण शाळा चालविल्या जात असत. परंतु जागतिक महामंदीमुळे त्या सन १९३६ साली बंद करण्यात आल्या होत्या. त्या पुन्हा १९४४ साली सुरु झाल्या.[१६]

बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या तुलनेने मध्यप्रांत-वऱ्हाडात तसेच हैद्राबाद संस्थानात सहकारी चळवळ फारच बाल्यावस्थेत होती. जागतिक महामंदीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती फार बिकट झाली होती. त्यातच या प्रांतातील कर्ज-तडजोड मंडळाकडे कर्जाची प्रकरण गेल्याने या प्रांतातील कर्ज-तडजोड मंडळामुळे सावकार अग्रिम कर्ज देण्यासाठी

तयार नसल्यामुळे आणि थकबाकीमुळे सहकारी सोसायट्यादेखील कर्ज देण्यास तयार नसल्यामुळे कर्ज मिळविण्यात शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.[१७]

सन १९३९ च्या सप्टेंबरच्या सुरुवातीला दुसरे महायुद्ध सुरु झाल्यानंतर पुन्हा एकदा भरारी घेण्यासाठी सहकार चळवळ सक्षम बनली. जागतिक महायुद्धामुळे कृषी उत्पादनांच्या किंमतीत वाढ होऊ लागल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. त्यामुळे १९४० नंतर सहकारी सोसायट्यांची थकबाकी वसूल होण्यास सुरुवात झाली. थोडक्यात दुसऱ्या महायुद्धामुळे सहकारी चळवळीच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण झाले.

दुसरे महायुद्द सुरु झाल्यानंतर सहकारी सोसायट्यांची परिस्थिती बदलू लागली. शेतीशी संबंधित सहकारी सोसायट्यांबरोबरच शेतीशी संबंध नसलेल्या सहकारी सोसायट्या मोठ्या प्रमाणावर स्थापन होऊ लागल्या. शहरी भागात ग्राहकांच्या सहकारी संस्था तसेच सहकारी तत्वावर घरबांधणी करणाऱ्या गृहनिर्माण संस्था स्थापन होऊ लागल्या. ग्रामीण भागातही केवळ कृषीक्षेत्रात पतपुरवठा करण्यावर १९३९ पर्यंत सहकारी सोसायट्यांचा मुख्यतः भर होता. त्याऐवजी ग्रामीण भागात शेतमालाची खरेदी-विक्री करणाऱ्या सहकारी सोसायट्या स्थापन होऊ लागल्या, तसेच बहुउद्देशीय सोसायट्याही अस्तित्वात येऊ लागल्या. युद्धजन्य परिस्थितीमुळे सहकारी चळवळीत विविधता येऊ लागली. तोपर्यंत सहकारी चळवळीचे स्वरूप फारच एकांगी होते. एवढेच नव्हे तर जागतिक महामंदीमुळे तिची कोंडी झाली होती.[१९] दुसऱ्या महायुद्धानंतरही तिचा झपाट्याने विस्तार होऊ लागला.

**सारांश**

सहकार चळवळीचा कायदा संमत झाल्यापासूनच महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळीचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. जागतिक महामंदीच्या काळात तिची कोंडी होऊन काही प्रमाणात तिची प्रगती खुंटली गेली असली तरी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात व त्यानंतर परत तिने भरारी घेतली.

सहकारी चळवळीमुळे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाला हातभार लागला. ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यात या चळवळीचे योगदान महत्वाचे राहिले. सहकारी चळवळीमुळे सावकारांच्या पिळवणूकीतून शेतकऱ्यांची काही प्रमाणात सुटका झाली.

सहकारी संस्थांनी लोकशिक्षण आणि लोकजागृती ह्या दृष्टीने कार्य केले असून शैक्षणिक आणि नैतिक प्रगती घडवून आणण्यासही हातभार लावला. ग्रामीण भागातील जनतेला कमी व्याजाच्या दराने कर्ज मिळण्याची सोय झाली आणि सावकारांची कर्जपुरवठ्याच्या क्षेत्रातील मक्तेदारी कमी झाल्यामुळे त्यांनाही आपल्या व्याजाच्या दरात कपात करावी लागली. अर्थात सहकारी संस्थाकडून मिळणारे कर्ज गरजेच्या मानाने अपुरे पडत असल्यामुळे सावकारांचे उच्चाटन होऊ शकले नाही.

या चळवळीचा दुसऱ्या बाजूने विचार केल्यास असे म्हणता येईल की, या चळवळीने संख्यात्मक मजल मोठी मारली असली तरी गुणात्मकदृष्ट्या ती कमजोर ठरली हेही वास्तव नाकारून चालणार नाही. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत सहकारी चळवळीचा विकास झाला असला तरी ती यशस्वी झाली आहे असे मानता येत नाही: कारण संस्थांची संख्या वाढली असली तरी कार्यक्षमता वाढली नाही. ज्या सर्वसामान्य माणसांच्या विकासाचे स्वप्न घेऊन ही चळवळ जन्माला आली ती सर्वसामान्य माणसेच या चळवळीपासून दूर राहिली.

भारतातील बहुसंख्य जनता अज्ञानी आणि दरिद्री असल्यामुळे विकासाला पोषक असे वातावरण निर्माण होऊ शकले नाही. सर्वांनी एकत्र येऊन आणि सहकार्याची भावना ठेवून आपले प्रश्न सोडविले पाहिजेत ही जाणीव निर्माण झाली नाही. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात चळवळीची उभारणी भक्कम पायावर होऊ शकली नाही.

सहकारी चळवळीची सुरुवात सरकारने केली आणि सरकारी अधिकाऱ्यांनी तिचा पुरस्कार केला. त्यामुळे ती एक सरकारी चळवळ आहे अशी जनतेची समजूत झाली. त्यामुळे जनतेकडून सहकार्य मिळाले नाही आणि चळवळीबद्दल जनतेत आपुलकी निर्माण झाली नाही.

असे असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात सहकाराची पायाभरणी झाल्यामुळे पुढे स्वातंत्र्यानंतर सहकाराचा वटवृक्ष महाराष्ट्रात फुलला. अर्थात महाराष्ट्राच्या विकासामध्ये सहकार चळवळीचे योगदान महत्वाचे ठरले.

**संदर्भ साधने**

१. चौगुले व्ही. टी., आणि पठाण के. जी., सहकाराची मुलतत्वे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७९, पृ. ०३.

२. Buch Maganlal A., Economic Life in Ancient India, R. S. Publishing House, Allahabad, 1979, Page No. 361.

३. अवघडे भगवान(संपा), शतकोत्तर सहकार, भारतातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे योगदान' सहकारी लोकायन सहकारी प्रकाशन संस्था मर्या,. सातारा, मे. २००४, पान नं. ११.

४. कामत (डॉ.) गो. स., सहकार: तत्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७९, पान नं. १०९

५. Brahme Sulabha and Upadhaya Ashok, Agrarian Structure, Movements & Peasant Organisations in India, Volume II Maharashtra, V. V. Giri National Labour Institute, Noida(U.P.)in association with Manak Publications PVT. Ltd, New Delhi, 2004, Page No. 84.

६. कर्वे चिंतामण गणेश, जोगळेकर सदाशिव आत्माराम, जोशी यशवंत(संपा), महाराष्ट्र परिचय-संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश, प्रसाद प्रकाशन, पुणे,१९५४, पान नं. ६४६.

७. घाणेकर(डॉ)वि.वि., सहकारी चळवळीचे शंभर वर्षाचे अवलोकन व नवे आव्हाने, इन्सिस्टूट आफ डेव्हलेपमेंट अंड एज्युकेशन, पुणे, २००४, पान नं. ९२.

८. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड-३, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर १९९१, पान नं. २८

९. Brahme Sulabha and Upadhaya Ashok, Op-Cit, Page No. 542.

१०. Ibid, Page No. 86.

११. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड-३, उपरोक्त, पान नं. २९-३०.

१२. Catanach I. J., Rural Credit in Western India 1875-1930(Rural Credit and Co-operative Movement in Bombay Presidency), University of California Press,1970, Oxford University Press, Bombay, 1970, Page No. 218.

१३. Report on the administration of the registration department in the Bombay Presidency, 1929-30 Page No. 12, Report on the administration of the registration department in the Bombay Presidency, 1936-37, Page No. 13.

१४. Meera Kosambi(ed.), Intersections Socio-Cultural Trends in Maharashtra, Orient Longman, New Delhi, 2000, Page No.148.

१५. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड-४, श्रीविद्या प्रकाशन,पुणे, जून १९९३, पान नं. ४७.

१६. Meera Kosambi(ed.), Op-Cit, Page No.148.

१७. Season and Crop Report of the Central Provinces and Berar for the year ending the 31st May 1937, Government Printing, Central Provinces, Nagpur, 1938, Page No.12.

१८. Desai S. S. M, Economic History of India, Himalaya Publishing House, Bombay, Sept. 1982, Page No. 212.

१९. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड-४, उपरोक्त, पान नं. ४८.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)** **CC-14**

# २६. शिवकालीन किल्ल्यावरील संरक्षण व जलव्यवस्थापन

**डॉ. बोडखे संजीव सुखलाल**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव. ता. खटाव. जि. सातारा.

**प्रास्ताविक**

किल्ल्याच्या संरक्षणासाठी जसे छत्रपती शिवाजी महाराजांनी लक्ष पुरविले होते. तसेच जलव्यवस्थापनाकडे लक्ष दिलेले दिसून येते. संरक्षण व्यवस्थेत बहिर्गत व अंतर्गत संरक्षण व्यवस्था निर्माण केली होती. त्याचप्रमाणे जलव्यवस्थापनाकडे त्यांनी लक्ष पुरविले होते.पाणी हा घटक मानवी जीवनातील अतिशय महत्वाचा आहे. आजपर्यंतच्या अनेक संस्कृती या नदीकाठी किंवा पाण्याच्या बारमाही सोय होईल अशाच ठिकाणी विकसित झालेल्या आहेत. तर काही लोकांना पाण्याअभावी एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी स्थलांतर करावे लागले आहे. पावसाचे पाणी हे डोंगरद-यातून वाहत ओढे, नाले व नद्या वाहत जाऊन शेवटी समुद्राला जाऊन मिळत असे. पाणी अडविणे हे मध्ययुगीन काळात मोठे आव्हानात्मक काम होते. त्यावर मोठया प्रमाणावर प्रयत्न करून काही ठिकाणी ते पाणी अडविण्याचा प्रयत्न केला गेला. त्याठिकाणी वसाहती निर्माण झाल्या. पुढील काळात नदीचे पात्र बदलल्याने किंवा नैसर्गिक संकटामुळे या संस्कृतीत परिवर्तन झाले. अशा या संस्कृती जगप्रसिद्ध पावलेल्या आहेत. त्या म्हणजे सिंधु संस्कृती व इजिप्त संस्कृती होत. पाणीव्यवस्थापनासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असतो. तसेच या पाण्याचे संतुलन ठेवणे ही सुद्धा काळाची गरज आहे. जो समुदाय या गोष्टीचे तंतोतंत पालन करतो तेव्हा त्यात काहीच बिघाड होत नाही. परंतु ज्यांनी पालन केले नाही त्या संस्कृती काळाच्या ओघात नष्ट पावलेल्या आहेत.[1]

सपाटीच्या जागेवर पाणी अडवून जलव्यवस्थापन करता येणे शक्य आहे. परंतु मराठा काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी हेच पाण्याचे व्यवस्थापन किल्ल्यावर केलेले दिसून येते. त्यामुळे अशक्य असणारी गोष्ट यातून शक्य झाल्याचे स्पष्ट झाले. त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी याचा खोलवर अभ्यास केलेला होता. आणि त्यास अनुसरून ही योजना आखलेली होती. त्यामुळेच कितीही प्रचंड दुष्काळ पडला तरीही किल्ल्यावरील पाण्याची टाकी कधीही आटलेली दिसून येत नाहीत याचे कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यासंबंधी त्याकाळात वापरलेले तंत्रज्ञान होय. याच तंत्रज्ञानाच्या जोरावर बारमाही पाणी टिकविले जात होते. एवढेच नव्हे तर रायगड किल्ल्यावरील तळयावरून हे लक्षात येते की, तळी बनविताना त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याचे दिसते. त्याचप्रमाणे त्यांनी संरक्षण व्यवस्थेबरोबरच किल्ल्यावरील जलव्यवस्थापनाकडे आपले लक्ष पुरविले होते.त्याचीच माहिती या शोधनिबंधामध्ये दिलेली आहे.

**किल्ल्यावरील संरक्षण व्यवस्था**

किल्ल्याच्या संरक्षण व्यवस्थेत बहिर्गत संरक्षण व्यवस्था व अंतर्गत संरक्षण व्यवस्था केलेली होती. बहिर्गत संरक्षण व्यवस्थेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील अगदी शूद्र समजल्या जाणा-या जातीतील लोकांपासून ते उच्च वर्गीयापर्यतच्या लोकांना सामावून घेतले होते. त्यामुळे किल्ले संरक्षणामध्ये या लोकांचा चांगलाच उपयोग झालेला दिसून येतो. रामोशी, मांग, बेरड, भिल्ल, महार यासारख्या काटक जातींना किल्ल्याच्या बाहेरील बाजूने अगदी किल्ल्याच्या पायथ्यापासून ते तटापर्यंत वस्ती करावयास लावून शत्रूचे होणारे आक्रमण थोपविण्यास लावले होते. कारण या लोकांना डोंगरातील द-याखो-यात हिंडणे फिरणे यात आवड होती. तसेच ते काटक व शूर होते. त्याचाच उपयोग त्यांनी या कामी करून घेतलेला दिसून येतो.

किल्ल्यावरील अंतर्गत संरक्षण व्यवस्थेत तीन समान दर्जाचे अधिकारी ठेवून ते एकमेकास जबाबदार राहतील याकडे लक्ष दिले होते. तसेच सर्वांना आपापल्या जातीनुसार कामाची विभागणी केलेली होती. या प्रमुख अधिका-यांच्या हाताखाली पुन्हा दुय्यम दर्जाचे अधिकारी स्वतः छत्रपती शिवाजी महाराज नियुक्त करत असत. याशिवाय किल्ल्यावर सैनिकांची वस्ती केली जात होती. त्यांच्याद्वारेही किल्ल्याचे संरक्षण होत असे. अशाप्रकारे किल्ल्याचे संरक्षण कसे होईल याकडे लक्ष पुरविले जात होते.

**शिवकालीन किल्ल्यावरील जलव्यवस्थापन**

किल्ल्यावरील पाण्याचे जलव्यवस्थापन करताना पावसाळयातील वाहून जाणारे पाणी अडविले जात होते. त्यासाठी किल्ल्यावर तळी बांधून, नाले बांधून, चर खोदले जात असत. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यावरील वस्ती केलेल्या कुटुंबाना व संरक्षणासाठी असणारे सैनिकांना व लोकांना पाणी बारमाही उपलब्ध व्हावे याकडे लक्ष दिलेले दिसून येते. यावरून हे स्पष्ट होते की, छत्रपती शिवाजी महाराजांनी जलसंधारण व जलसंवर्धनाला महत्व दिले होते. यासाठी त्यांनी किल्ल्यावरील व किल्ल्याखालील असणा-या गावातील लोकांनाही याकामी सहभागी करून घेतले होते. या सर्व लोकांना त्यांनी पाण्याचे महत्त्व पटवून सांगितले होते. लोकांनाही या गोष्टीचे महत्त्व पटले होते.त्यामुळे सर्व मराठयांनी याकामी छत्रपती शिवाजी महाराजांना सहकार्य केले होते.

किल्ल्यावर बारा महिने पाणीपुरवठा होईल म्हणजेच किल्ला हा बाराही महिने पाण्याबाबतस्वयंपूर्ण राहिल. याकडे दुर्गस्थापत्य विशारदांना लक्ष देण्यासाठी सांगितले होते. त्या काळात किल्ल्यावरील जलव्यवस्थापनेला फार महत्त्व दिले जात होते. एवढेच नव्हे तर किल्ला बांधण्यापूर्वी संबंधित स्थळी पाणी पाणी उपलब्ध होईल का हे पाहिले जात असे. किल्ल्यावरील तळी खोदण्याचा दुहेरी फायदा होत असे. एक म्हणजे पावसाचे व जमिनीचे अंतर्गत पाणी साठविण्यासाठी खोलगट जागा तयार होत असे. तर दुसरे म्हणजे त्या जागेवरील खोदकाम केलेल्या दगडाचा उपयोग किल्ल्याची तटबंदी वा किल्ल्यावरील वास्तूच्या बांधकामासाठी केला जात होता.या खाणीतून बांधकामासाठी दगड तर उपलब्ध होतोच. सध्यादेखील

जवळजवळ सर्वच किल्ल्यावर अशा प्रकारची सोय आहे. बाराही महिने पाणी पुरेल अशीच पाण्याची व्यवस्था केलेली पाहावयास मिळते. त्यामुळे पिण्यासाठीही या पाण्याचा वापर मोठया प्रमाणावर केलेला पाहावयास मिळतो.[2] किल्ल्यावर पाण्याच्या प्राप्तीसाठी खडकात टाकी खोदली गेली. टाक्यांमध्ये दोन प्रकार प्रकार होते.

1. गुहेतील, कपारीतील टाके,
2. उघडयावर हौद याशिवाय गोल अथवा पाय-यांच्या विहिरी, बांध घातलेली तळी असेही पाणी साठविले जात होते.[3]

महाराष्ट्रातील भूरचनेमध्ये खडकांचे दोन प्रकार आढळतात. या खडकांची रचनाही जलसमृद्ध व जलभेद्य आहेत. यामध्येसरळ तुटलेले कडे आणि तिरकस उताराचे भाग असे हे दोन थर ओळखता येतात. जलभेद्य थराच्या वरच्या भागात आणि जलसमृद्ध भागाच्या तळाशी टाकी खोदली तर त्यात पुरेसे पाणी बराच काळ उपलब्ध होते. हे पाणी त्या खडकातून पाझरत येत असल्यामुळे जमिनीतील क्षार त्यात विरघळतात. तसेच ते थंडही असते. म्हणून महाराष्ट्रातील किल्ल्यांवर असणा-या टाक्यांमधील पाणी थंडगार व चविष्ट असते.किल्ल्यावरील टाक्यामध्ये पाणी साठविले जात असे.[4]

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या किल्ल्यावर पाण्याची व्यवस्था करण्याची पुरेशी काळजी घेतली होती.कारण पाण्याशिवाय प्राणिमात्रांचे जीवन अशक्य आहे. साधारणपणे दगड कापून बनविलेल्या तलांवाची पाणी साठविण्यासाठी व पाणी पुरवठयासाठी उपयोग केला जात असे. आजसुद्धा अनेक किल्ल्यावर असे अनेक तलाव आपणास आढळतात. आजही या अशा किल्ल्यावरून त्याखालील गावांना पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठयाची सोय केलेली दिसून येते.तसेच किल्ल्यावर पाण्याचे हौद बांधले जात होते.[5]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक किल्ल्यावर अस्तित्वात असणा-या पाण्याच्या टाक्यावरून, तळयावरूनही प्रत्यय येतो की, दुर्ग निर्मितीसाठी आवश्यक असणारा पाषाण दुर्गावरच खोदला जात असे. त्या ओबडधोबड खोलगट खोबणीमुळे किल्ल्याच्या नैसर्गिक सौंदर्याला बाधा येते.म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी या साठयाचे सुंदर जलाशयात रूपांतर केले होते. अशा प्रकारचे धोरण आखून छत्रपती शिवाजी महाराजांनी पाण्याची व्यवस्था केली.किल्ल्यावर ज्या ठिकाणी पावसाचे पाणी साठविण्यास उपयुक्त जागा उपलब्ध झाली. त्या ठिकाणी अशा प्रकारचे जलाशय निर्माण केल्याचे दिसते. असे अनेक जलाशय किल्ल्यावर दिसून येतात.[6]

रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रात पुढील ओळी लिहिल्या आहेत. त्यावरून छत्रपती शिवाजी महराजांच्या जलसंवर्धनाचे महत्त्व आपल्याला समजण्यास मदत होते.

"दुर्गावरील पाणी बहुत जतन करावे ।
दुर्गावरील अश्वीउदक पावून दुर्ग बांधावा ।

पाणी नाही, उदक नाही ते स्थळी तो बांधने आवश्यक झाले,
तरी अश्वीखडक फोडून तळी,
टाकी पर्जन्यकाळापर्यंत संपुर्ण दुर्गास पाणी पुरेल ऐसी मजबूत बांधावी ।
दुर्गावरील झराही आहे जैसे तैसे
पाणीही पुरते म्हणून तितक्यावरच निश्चिती न मानता उद्योग करावा की,
निमित्य जुंझामध्ये (लढाई) भांडीयाचे (तोफांचे) आवाजाखाले झरे स्वल्प होतात ।
आणि पाणीयाचा विशेष खर्च लागतो तेव्हा संकट पडते ।
याच करिता तैसे जागा जिकिरीयाचे (दुर्गोपयोगी) पाणी म्हणून दोनचार तळी, टाकी बांधून
त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे ।
दुर्गाचे पाणी बहुत जतन राखावे "[7]

अशाप्रकारे जलसंवर्धनासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरात आणलेल्या कौशल्यपूर्ण रचनांच्या अवशेषावरून आपणास त्यांच्या अभियांत्रिकी उंचीची कल्पना करता येऊ शकते. यामध्ये काही प्रकल्प असे आहेत की ज्यांचा आजही आपण अगदी अल्प गुंतवणुकीत लाभ घेऊ शकतो. गतकालात जलसंवर्धनासाठी जनसमुहांनी जे प्रयत्न ते देशभर सारख्याच प्रकारच्या होते असे गृहीत धरता येणार नाही. कारण भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये ठिकठिकाणी बदलणारा निसर्ग आहे. तसेच भौगोलिक वैचित्र्य आहे. भूगर्भात तफावत आहे.हे सर्व विचारात घेऊन त्या त्या जनसमूहाने आपल्या परिसराला मानवेल अशा रचना निर्माण केल्या.

पाणी आपली समपातळी कायमस्वरूपी टिकवून ठेवते. उंच पातळीवरून कमी उंचीकडे प्रवाहित होते. या गुरूत्वाकर्षणाच्या सिद्धांताचा वापर करून भारतभर उपलब्ध भौगोलिक परिस्थितीवर आधारित अशा शेकडो जलसंधारण व्यवस्था अस्तित्वात आल्या. त्या सर्व भारतभर विखुरल्या गेल्या आहेत. त्या प्रामुख्याने नैसर्गिक परिस्थितीशी मिळत्या असून केवळ पर्जन्य स्त्रोतावर आधारित आहेत. त्यासाठी त्यांनी कोणत्यच प्रकारे पर्यावरणाची हानी होवू दिली नाही.उलट पर्यावरणाचा विकास कसा होईल याचीच त्यांनी काळजी घेतली. यातील काही आजही कार्यरत आहेत. हे महत्वाचे आहे.

**सारांश**

मराठाकाळात किल्ला हे एक लष्कराचे मुख्य ठाणे होते. एक किल्ला ज्याच्या ताब्यात त्याच्या ताब्यात त्या किल्ल्याच्या **20** मैलाचा परिसर मोडत असे. याचाच अर्थ त्या किल्ल्यामुळे **20** मैल परिसराचे संरक्षण होण्यास मदत होते. या किल्ल्यांच्या जोरावरच छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली होती. एवढेच नव्हेतर या स्वराज्यावर आलेली संकटे किल्ल्यांमुळेच टाळता आली होती. या सर्व गोष्टीमुळे किल्ल्यांचे महत्व वाढतच होते. या किल्ल्यांना नैसर्गिकरित्या संरक्षण लाभले होते. किल्ला बांधतानाच त्यासाठी दुर्गम व मोक्याची जागा निवडली जात असे. विशेषतः अशा किल्ल्यामध्ये

गिरीदुर्गाचा समावेश होता. तर काही किल्ल्यांना तटबंदी बांधून संरक्षण केलेले होते. या किल्ल्याच्या सुरक्षिततेसाठी किल्ले बांधताना तशा प्रकारची व्यवस्था केली जात होती. ही व्यवस्था करताना किल्ल्याच्या पायथ्यापासून ते बालेकिल्ल्यापर्यंत सर्व व्यवस्था बारकाईने केली जात होती. जशी किल्ल्याच्या संरक्षणासाठी जशी उपाययोजना केली होती तशीच योजना जलसंवर्धनासाठी केलेली होती. त्यासाठी किल्ल्यावरील जलसंवर्धन हे टाके, तलाव, विहीरी याद्वारे केले जात होते. विशेष म्हणजे ही टाकी टाकी बनविताना पावसाचे पाणी त्यामध्ये कसे साठून राहिल याकडे लक्ष पुरविले जात होते. त्यासाठी जमिनीत पाणी मुरून जावू नये म्हणून मोठा दगड कापून त्यात पाणी साठविले जात होते. तसेच मोठया खडकाचा छेद घेऊन हे पाणी साठविले जात असे. विशेषतः तलावांना अंगचेही पाणी लागत असे. त्यामुळे वर्षभर पाणीपुरवठा व्हावा याद्दष्टिने तयारी केली जात होती.

**संदर्भ**

1. डॉ. मोरवंचीकर रा.श्री., मराठी अनुवाद भलगे प्रदीप, मध्ययुगीन जलसंधारण- जलव्यवस्थापन देवगिरी - दौलताबाद, सुमेरू प्रकाशन, डोबिंवली, पृ.9
2. डॉ. माने ग. का., डॉ.महाडीक एस.जी., शिवकालीन किल्ल्याचा समग्र अभ्यास, पृ. 122
3. पाळंदे आनंद, डोंगरयात्रेत दिसलेल्या दुर्गवास्तू, प्रफुल्लता प्रकाशन, पुणे 15 एप्रिल 2014, पृ.11
4. घाणेकर प्र. के., अथातो दुर्गजिज्ञासा, स्नेहल प्रकाशन, पुणे, 9 एप्रिल 2005, पृ.156
5. प्राचार्य गायकवाड आर.डी.व इतर, शिवाजी महाराजांचे सहा किल्ले, प्रकाशक, प्रा.डॉ.सौ.हेमलता रामचंद्र गायकवाड, सातारा, फेब्रुवारी 2009, पृ. 151, 152
6. डॉ. मोरवंचीकर रा. श्री., भारतीय जलसंस्कृती स्वरूप आणि व्याप्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, 11 जुलै 2006, पृ. 98
7. अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, संपा खरे ग.ह. व भिडे स.रा., पुणे, 1960, पृ. 67.

# २७. महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान

**प्रा. डॉ. कदम संतोष तुकाराम**
इतिहास विभाग प्रमुख, एस. बी. आर कॉलेज, म्हसवड.

**प्रस्तावना**

१९ व्या शतकाच्या अखेरीस व्यक्तीनिष्ठ उठावाची जागा संघटीत क्रांतीकारी चळवळींनी घेतली. ही सुरु झालेली चळवळ भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत वेगवेगळ्या पध्दतीने सुरूच होती. पुढे ती भारतीय स्वातंत्र्य मिळेपर्यंत वेगवेगळ्या पध्दतीने सुरूच होती. पुढे ती भारतीय स्वातंत्र्या आंदोलनाची एक अविभाज्य भाग बनली. याच दरम्यान राष्ट्रसभेतील मवाळवादी गट बाजूला सारून लो. टिळक, बिपीनचंद्र पाल व लाला लजपत राय यांच्या नेतृत्वाखाली जहालवादी गट उदयाला आला.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात क्रांतीकारकांनी शस्त्राचा वापर करून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. महाराष्ट्रामधून वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधु,अनंत कान्हेरे, स्वा.वि.दा. सावरकर व गणेश तथा बाबाराव सावरकर, शिवराम हरी राजगुरू, विष्णु गणेश पिंगळे, तात्या टोपे, व क्रांतिसिंह नाना पाटील इत्यादी क्रांतिकारकांचे योगदान भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात महत्वाचे मानले जाते. प्रस्तुत शोधनिंबधात त्यांच्या कारकिर्दिचा अल्पसा परिचय करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

**वासुदेव बळवंत फडके**

वासुदेव बळवंत फडके यांचा परिचय म्हणजे स्वातंत्र्यासाठी वनवास भोगणारा पहिला राजबंदी, गनिमी काव्याच्या युध्द पध्दतीचा पहिला निर्माता असे ज्याचे वर्णन इतिहासाने मान्य केलेले आहे असा हा पराक्रमी महापुरूष१ यांचे जन्मगाव रायगड जिल्ह्यामधील पनवेल तालुक्यातील शिरढोण मिलेटरी फायनान्स कार्यालयात नोकरीला असतांना त्यांची आई शिरढोणला आजारी पडली. परंतु त्यांना आईला भेटण्यासाठी रजा मिळाली नाही. त्यांच्या आईचे दु:खद निधन झाले. आईची भेट न झाल्यामुळे त्यांच इंग्रजांविरूध्दचा व्देश व्दिगुणित झाला.

त्यांनी पुणे व सातारा जिल्ह्यातील रामोशी, भिल्ल, कोळी लोकांना एकत्र केले. त्यांची सेना उभारली व इंग्रजांच्या विरोधात बऱ्हाड व 'महाराष्ट्रातील सात जिल्ह्यात त्यांनी धुमाकुळ घातला. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यांना पकडून देणाऱ्यास तीन हजारांचे बक्षिस जाहिर केले. उलट गव्हर्नर व कलेक्टर यांची डोके आणणाऱ्याला वासुदेवरावांनी तीन हजारांचे बक्षिस जाहिर केले. नंतर १८७९ रोजी डॅनियल या इंग्रज गुप्त पोलिस प्रमुखाने वासुदेवरावांना विश्वासघाताने पकडले आणि इंग्रजांनी दि. ०५ आक्टोबर १८८० रोजी त्यांना जन्मठेप व काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली.

थोडक्यात वासुदेवरावांची विचारसरणीची तुलना जॉर्ज वॉशिंग्टन, गॅरीबाल्डी यांच्याशीच करावी लागेल. त्यांना दरोडेखोर म्हणून हिणवले गेले असले, तरी त्यांनी गोरगरीबांवर कधी दरोडे घातले नाही. त्यांनी इंग्रज धार्जिन्या सावकारांवर क्रांतिकार्यासाठी दरोडे घातले. इंग्रजांनी त्यांना पकडले तरी दि. १२ ऑक्टोबर १८८२

रोजी ते तुरूंगात पळाले. पुन्हा आपण एकदा स्वातंत्र्य युध्द सुरू करू असा विचार त्यांच्या मनात होता. अखेरीस त्यांना इंग्रजांनी पकडले व सव्वादोन वर्षे अंधारकोठडी व एकांतवास अशी कडक शिक्षा पुढे दिली. इंग्रजांनी तुरुंगात पाशवी, जीवघेणा व अमानुष्य असा त्यांचा छळ केला. त्यात त्यांना झाला. त्यांनी आमरण उपोषण सुरु केले. दि. १८ फेब्रुवारी १८८२ ला त्यांची शुध्द हरपली. दुपारी ४ वाजता त्यांची जीवनज्योत मालवली. थोडक्यात महान व बलवत्तर ब्रिटिश साम्राज्यशाहीला वासुदेवरावांनी धक्का दिला व तयाच क्रांतिकार्यातून भारत मातेला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक क्रांतिकारक आपले बलिदान अर्पण करण्यास सिध्द झाले.

**चाफेकर बंधु**

स्वा. दामोदर चाफेकर, बाळकृष्ण चाफेकर, वासुदेवराव चाफेकर या तिन्ही बंधूच्या मनात वासुदेव बळवंत फडके यांचे चरित्र एकूण क्रांतिचे विचार घुमू लागले. इ.स. १८९४ साली हिंदू—मुसलमान दंगली झाल्या त्यात हिंदूवर अनन्वीत आत्याचार झाले. सदर घटनेचा चाफेकर बंधुच्या मनात खोलवर परिणाम झााला. आणि त्यांनी तरूण मंडळींना क्रांतीचे विचार पटवून देण्यासाठी चाफेकर क्लब सुरू केला. पुढे त्यांनी दि. १६ ऑक्टोबर १८९६ रोजी मुंबई व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्यांवर डांबर ओतूर खेटराची माळ घातली.

थोडक्यात चाफेकर बंधुच्या मनात बालपणासूनच राष्ट्रभक्ती, देशप्रेम ही मूल्ये रुजलेली होती आणि इंग्रजी राजवट्टीबद्दल व्देश होतो. पुण्यामध्ये १८९७ मध्ये प्लेगची साथ होती. प्लेगची साथ आटोक्यात आणण्याची जबाबदारी रॅंड या अधिकाऱ्याकडे होती. त्याने पुण्यातील लोकांना सळो की पळो करून सोडले. अनन्वीत अत्याचार केले. म्हणून दि. २२ जून १८९७ ला चाफेकर बंधूनी आयर्स्ट आणि रॅंडला ठार मारले. कालांतराने इंग्रजांनी चाफेकर बंधूना पकडले. आणि त्यांना दि. १८ एप्रिल १८९७ ला सोमवारी ७ वाजता येरवडा कारागृहात फाशी दिले. चाफेकर बंधुच्या बलिदानाने सर्व हिंदुस्थान रोमांचित झाला. त्यांच्या त्यागातून व बलिदानातून असंख्य तरूण भारत भूमीच्या मुक्ततेसाठी आपल्या प्राणाचे बलिदान करण्यास सज्ज झाले.

**अनंत कान्हेरे**

अनंत कान्हेरे हे सन १९०३ ला औरंगाबादाला सरकारी इंडस्ट्रियल हायस्कूलमध्ये ड्रॉईंगचे शिक्षण घेते होते. नासिकला जॅक्सन नावाच्या कलेक्टरने नासिककरांवर अनन्वित अत्याचार केले. बाबाराव सावरकर यांनी मित्रमेळ्याची पदे छापली. त्याबद्दल त्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. इंग्रजांनी बाबासाहेब खरे यांना देशोधडीला लावले होते. म्हणून अनंत कान्हेरे याने दि. २१ डिसेंबर १९०९ रोजी नासिकच्या जुलमी कलेक्टर जॅक्सन याची विजयानंद नाट्यगृहात शारदा नाटकाच्या वेळी हत्या केली. अनंत कान्हेरे हा युवक धाडसी होतो जॅक्सनची हत्या केल्यानंतर त्याने पळ काढला नाही. त्यांनी वंदे मातरमच्या घोषणा दिल्या. ते इंग्रजांच्या स्वाधिन झाले. दि. १९ एप्रिल १९१० ला अनंत कान्हेरे, बर्वे, देशपांडे हातात भगवत गीतेची प्रत घेवून फाशी गेले. अनंत कान्हेरे हे सर्वात तरुण क्रांतिकारक असतांना त्यांना फाशी दिली. परंतु त्यांनी निर्माण केलेली क्रांतीची ज्योत वेगाने तेवतच राहिली.

**स्वा.वि.दा. सावरकर व गणेश तथा बाबाराव सावरकर**

विनायकराव सावकरांनी वयाच्या १४ व्या वर्षी भारताला स्वातंत्र्य मिळविण्साठी सैनिकी शाळा सुरु केली. त्यांनी १८९९ साली नासिकला 'अभिनव भारत' संस्थेची स्थापना केली व कालांतराने मित्रमेळा संस्था

सुरु केली. त्यांनी १९०८ ला पुण्यात महर्षी कर्वे रोडवर विदेशी कापडांची मिरवणूक काढून होळी पेटवली. लंडनला श्यामची कृष्ण वर्मा यांच्या 'इंडिया हाऊस' मध्ये रहात असतांना क्रांतिकार्य सुरुच ठेवले. मदनलाल त्यांच्यापासून प्रेरणा घेवून दि.१ जुलै १९०६ रोजी कर्नल वायलीची हत्या केली व तो वंदेमातरमची गर्जना करीत फाशी गेला. अनंत कान्हेरेने ज्या ब्राउनिंग पिस्तुलातून जॅक्सनला गोळ्या घातल्या. ते परदेशी पिस्तुल पॅरीसवरून सावरकरांनी पाठवले. म्हणजे भारतातील क्रांतिकार्याच्या मुळाशी विनायक सावरकरच आहे असा इंग्रजांचा पक्का विश्वास बसला. म्हणून इंग्रजांनी लंडन स्टेशनवर त्यांना पकडले. सावरकरांना जहाजातून उडी मारली. परंतु फ्रेंचाच्या भूमीवर इंग्रजांनी त्यांना पकडले. न्यायालयाने दि. २२ मार्च १९१० रोजी त्यांना दोन जन्मठेपेची ५६ वर्षाची शिक्षा ठोठावली आणि त्यांची रवानगी अंदमनच्या तुरूंगात केली.

बाबाराव सावरकर यांनी कवी गोविंद यांच्या पद्यांचे प्रकाशन केल्यामुळे इंग्रजांनी त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप केला व त्यांनाही दि.२८ फेब्रुवारी १९०९ रोजी अंदमानला जन्मठेपेची, काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावली. तेथे त्यांना काथ्या कुटण्याचे काम दिले. इंग्रजांनी त्यांचा तेथे अनन्वित छळ केला. कालांतराने दि. १६ मार्च १९४६ रोजी दुपारी २.१५ ला बाबांचे निधन झाले. थोडक्यात महराष्ट्राच्या इतिहासात स्वातंत्र्यासाठी सर्वस्वावर निखारा ठेवणारे भारतातील एकमेव सावरकर कुटुंब होते. या तिघा भावांच्या त्यागाची तुलना इतिहासात इतरांशी होऊच शकत नाही.

**शिवराम हरी राजगुरू**

दि.१७ नोव्हेंबर १९२८ रोजी लाला लजपतराय यांचा लाठ्ठी हल्ल्यात मृत्यू झाला. त्यांचा सुड घेण्यासाठी जे क्रांतिकारी एकत्र आले त्यात महाराष्ट्राचा हा सुपुत्र होतो. दि. १७ डिसेंबर १९२८ रोजी सॅंडर्सला, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांनी गोळ्या घातल्या. दि. ८ एप्रिल १९२९ रोजी दिल्लीच्या न्यायालयाने असेम्ब्लीमध्ये या तिघांनी बॉम्बस्फोट केला. त्यामुळे इंग्रजांनी तिघांना पकडले दि. ७ आक्टोबर १९३० रोजी या तिघांना फाशीची शिखा सुनावली. व दि. २३ मार्च १९३१ रोजी सायंकाळी साडेसात वा. वंदेमातरच्या घोष करीत हे तिघेही फाशी गेले. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांचे शौर्य, त्याग, राष्ट्रनिष्ठा, देशप्रेम वाखाणण्याजोगे आहे. म्हणून भारतीय इतिहासाला या तिघांच्या बलिदानाची दखल घ्यावीच लागेल.

**विष्णु गणेश पिंगळे**

हे तळेगांव दाभाडे जि. पुणे येथील समर्थ राष्ट्रीय विद्यालयाचे विद्यार्थी होते. कालांतराने ते अमेरिकेत इंजिनिअरिंग चे शिक्षण घेत असताना ते क्रांतिकार्याकडे वळाले. रासबिहारी बोसच्या सल्ल्यानुसार १० स्पोटके घेवून पिंगळे मेरठला आले. तेथे पिंगळे यांना इंग्रजांनी कैद केले. पिंगळेंचा लाहोर कटाशी सहभाग जोडला. दि. १५ नोव्हेंबर १९१६ ला त्यांना फाशीची शिक्षा झाली. ते भगवतगीता हातात घेवून वंदेमात्रमचा घोष करीत फाशी गेले. विष्णु पिंगळे हे पहिल्या समर्थ राष्ट्रीय विद्यालयाचे विद्यार्थी त्यामुळे देशप्रेम त्यांच्या रक्तात, नसानसांत भिनले होते. म्हणून त्यांनीही आपले बलिदान भारतभूमीचया स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. म्हणून आपल्या देशाला फक्त अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य लढ्यातील महाराष्ट्राच्या क्रांतिकारकांचा स्फूर्तिदायक इतिहास, त्याग, शौर्य व देशप्रेम अमर ठेवणे हे प्रत्येक महाराष्ट्र वासियांचे कर्तव्य आहे.

**तात्या टोपे**

तात्या टोपे यांचा जन्म येवला जि. नाशिक येथे सन १८१४ मध्ये झाला. रामचंद्र पांडुरंग टोपे हे त्यांचे मूळ नाव होते. त्यांचे बालपण नानासाहेब पेशवे आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या समवेत गेले. त्यांनी बरेच वर्षे नानांच्या दरबारात कारकुनी काम केले. १८५७ च्या उठावामध्ये ग्वाल्हेरहून आलेल्या सैन्यात मुख्य सेनापती म्हणून तात्यांनीच काम पाहिले. त्यांचया नेतृत्वाचा त्यावेळी कस लागला कारण दिल्ली, लखनौ, जगदिशपूर व कानपूर याठिकाणी झालेल्या उठावाचे ते सूत्रधार होते. तात्यांचा स्वभाव अत्यंत धाडसी, गनिमी कावा तंत्र त्यांना अवगत होते. श्रध्दा आणि स्वामीनिष्ठा त्यांच्या नसानसात भिनलेली होती. कमकुवत सैन्य नियोजनाच्या अडचणी, शस्त्र साहित्य पैसा व इतर साधनांची कमतरता असतांनासुध्दा तलवारीच्या बळावर त्यांनी पराक्रम गाजवला. नानांचा अज्ञातवास व राणी लक्ष्मीबाईचा पराभव अशा अडचणींच्या वेळी एकच महाराष्ट्रीयन मराठी वाघ शत्रुला तोंड देत होता. आपल्या पराक्रमाने इंग्रजांना त्यांनी मेटाकूटीला आणले होते. ते कधीही इंग्रजापुढे झुकले नाहीत. मानसिंगाची फितुरी त्यांना नडली व ते इंग्रजांचे कैदी बनले दि. ७ एप्रिल १८५९ मध्ये आपल्यावरील आरोपाला उत्तर देतांना त्यांच्या चेहऱ्यावर कसलीही भीती व अपराधीपणा नव्हता, दु:ख तर नव्हतेच होता फक्त देशाभिमान, १८५७ च्या स्वातंत्र्ययुध्दात प्राणपणाने लढणाऱ्या तात्यांना इंग्रजांनी दि. १८ एप्रिल १८५९ रोजी शिवपूर येथे फाशी दिली. आज तयाच ठिकाणी त्यांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. आजही तात्यांचे कर्तृत्व पाहिले तर महाराष्ट्राचा अभिमानाने उर भरून येतो.

**क्रांतिसिंह नाना पाटील**

नाना पाटलांचा जन्म दि. ३ ऑगस्ट १९०० रोजी बहे बोरगाव येथे झाला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. प्रतिसरकार हा समांतर शासनाचा एकमेवाव्दितीय प्रयोग राबवणारे लढवय्ये राजकीय कार्यकर्ते म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील होत. लहानपणापासून त्यांना दणकट शरीरयष्टी लाभली. त्यांच्या भारदस्त व्यक्तीमत्वामुळे लोक त्यांच्याकडे आकर्षीत होत. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी काही काळ तलाठी म्हणून नोकरी केली परंतु समाजकारण व राजकारणाची ओढ असलेले नाना नोकरीतून बाहेर पडून १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला. जनतेला गुलामगिरीची जाणीव करून देवून धाडसी बनवण्यासाठी प्रयत्न केला. त्यांच्यावर वारकरी संप्रदायाचा प्रभाव होतो. लोंकांच्या भाषेत भाषणे करण्याची त्यांच्याकडे कला होती. ग्रामीण भागातील लोकांचा स्वाभीमान जागृत करून त्यांना चळवळीत सहभागी करून घेणे हे त्यांचे प्रमुख योगदान होते. भटजी शेटजी व जमीनदार यांच्या शोषणातून संपूर्ण ग्रामीण समाज भरडून निघाला होता या समाजाला एकत्र करून सरकारविरूध्द बंड करण्यासाठी महात्मा फुले व शाहू महाराज यांच्या विचारधारेने त्यांचे कार्य चालू होते. आपण आपला कारभार करू हे सूत्र त्यांनी १९४२ च्या चलेजाव चळवळीत प्रत्यक्ष अंमलात आणले. प्रतिसरकारच्या माध्यमातून लोकन्यायालये, अन्नधान्य पुरवठा बाजारव्यवस्था यासारखी लोकोपयोगी कामे त्यांनी केली १९२० ते १९४२ याकाळात त्यांना ८ ते १० वेळा तुरूंगात जावे लागले. तसेच १९४२ ते १९४६ ते भूमीगत झाले. ब्रिटीशांनी अनेकदा प्रयत्न करूनही ते सापडले नाहीत त्यामुळे त्यांच्यावर जप्ती करून जमीन सरकारजमा करण्यात आली. आईच्या निधनाच्या वेळी त्यांनी आपला जीव धोक्यात घालून उपस्थिती लावली. भारताला स्वातंत्र्य मिळणार हे कळाल्यानंतर १९४६ तध्ये कऱ्हाड तालुक्यात ते प्रकट झाले. त्यांच्यावर

सत्यशोधक विचारांचा व शाहूंचया कार्याचा प्रभाव होता. शिक्षणप्रसार ग्रंथालयाची स्थपणा, अंधश्रध्दा निर्मूलन, ग्रामीण जनतेची व्यसनमुक्ती या माध्यमातून समाज सुधारणचे कार्य त्यांनी केले. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सांगली जिल्हयासह संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे व्यक्तीमत्व प्रेरणादायी होते. अशा सातत्याने प्रकाशात असणाऱ्या क्रांतीसिंहाचे दि. ६ डिसेंबर १९७६ मध्ये वाळवा येथे निधन झाले.

**समारोप**

१८५७ च्या कालखंडापासूनचया स्वातंत्र्याच्या योगदानातील अनेक शूरवीरांच्या कथा व त्यांच्या कामगिरीची दखल घेता येते. यातील आणखी काही महाराष्ट्रीयन सेनानी शेवटपर्यंत इंग्रजांच्या हाती लागलेच नाहीत! त्यामुळे पुढील काळातही त्यांचे विषयी काहीच माहिती नसल्यामुळे १९५७ च्या लढ्यातील गूढता आजही इतिहासकारांमध्ये कायम राहीली! महाराष्ट्रातील विविध ठिकाणी उठाव झाल्याच्या नोंदी इतिहासात असून इतिहासाचे पूनर्लेखन करताना सर्व सामान्य ज्ञात—अज्ञात हुतात्म—स्वातंत्र सेनानींचे जीवन कर्तत्व हळूहळू उजेडात येत आहे. ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट होय!

**संदर्भ सूची**

१. फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड—१ मौजे प्रकाशन, मुंबई १९८९.
२. फडतरे भू. गो., भारतीय स्वातंत्र्य लढ्यात पुणे जिल्हयाचे योगदान, डायमंड प्रका.,पुणे, २०१३.
३. दैनिक केसरी (पुणे), दि. ०८ जोनेवारी १९३२.
४. चौधरी के.के., भारतीय स्वतंत्र्यता संग्राम और महाराष्ट्र, महाराष्ट्र शासन, मुंबई १९८५.
५. जावडेकर श. द., आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९९४.
६. कुंटे भ.ग (संपा), स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोश, शासकिय मुद्र. व ग्रंथकार मुंबई, १९८०
७. खोबरेकर वि. गो. (संपा), दामोदर हरी चाफेकर यांचे आत्मवृत्त, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९७४
८. आंबिके प्रा. र., भारतीय स्वातंत्र्य रणसंग्राम, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे १
९. म. म., हरिदास बाळशास्त्री, भारतीय स्वातंत्र्य समर, कार्य प्रकाशन, पुणे १८३५
१०. शिंदे नवनाथ, स्वातंत्र्याचा वणवा पेटवणारे क्रांतिसिंह नाना पाटील, जिजाई प्रकाशन, सिंदेखेड राजा, २०१२.
११. जोशी सु. ह., क्रांतिकारकांच्या कथा, डायमंड पब्लिकेशन, पुणे २००
१२. केतकर कुमार, कथा स्वातंत्र्याची, महा राज्य पाठ्य पुस्तक निर्मिती मंडळ, पुणे १९८५
१३. प्रधान ग. प्र., भारतीय स्वातंत्र्य संग्राम, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २००६.
१४. अत्रे प्र. के., मराठी माणसे मराठी मने, परचुरे प्रकाशन, मुंबई १९९५.

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# २८. पर्यटन व्यवसायातील स्थित्यंतरे आणि कृषी-पर्यटन

**डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालयं, मलकापूर. ता. शाहुवाडी. जि. कोल्हापूर.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत.

**प्रस्तावना**

भारत प्राचीन काळापासून कृषीप्रधान अर्थव्यवस्था असलेले राष्ट्र आहे.शेती ही आजही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती आणि शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती ही देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करते यामुळेच शेतीपूरक व्यवसायावर भर दिला जातो आहे. जेणेकरून शेतकऱ्याला वर्षभर उत्पन्न मिळत राहील. अन्नधान्य प्रक्रिया उद्योग, पशुपालन, मत्स्यपालन याबरोबरच अलिकडच्या काळात विकसित झालेला नवा प्रवाह म्हणजे "कृषी पर्यटन" होय. पर्यटनाची पारंपारीक संकल्पना बदलत आता जगातील अनेक देशांनी अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी पर्यटनाचा अर्थव्यवस्थावाढीचे माध्यम म्हणून वापर करण्यास सुरुवात कली आहे. बदलत्या संकल्पनेत पर्यटनाची नवीन क्षेत्रे उदयास येत आहेत. त्यापैकी ग्रामीण भागाचा कायापालट करणारा आणि कृषी व्यवसायाशी निगडीत असलेला कृषी पर्यटन हा व्यवसाय शेतीशी नाळ घट्ट करणारा आहे.

**शोध निबंधाचे उद्देश**

१. कृषी पर्यटनाची वैशिष्ट्ये जाणून घेणे
२. कृषी पर्यटनातून शेतकऱ्याच्या विकासाचे महत्त्व अभ्यासणे
३. शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाबरोबरच या नव्या कृषी पर्यटनातून निर्माण होणाऱ्या रोजगाराची आणि आर्थिक स्त्रोताची माहिती अभ्यासणे

**पर्यटन व्याख्या**

एखाद्या व्यक्तीने किंवा एकापेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र येऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजन, अभ्यास, एखादे काम किंवा विशिष्ट हेतूने केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय. मराठीतील पर्यटन हा शब्द Tourism या शब्दाचे भाषांतर होय. लॅटिन भाषेतील Tornus या शब्दापासून Tour हा शब्द विकसित झाला. याचा अर्थ वर्तुळ किंवा वर्तुळाकार असा आहे. यातूनच Tourism म्हणजेच पर्यटन ही संकल्पना विकसित झाली. यामध्ये व्यक्ति किंवा व्यक्ति समूह एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करतो आणि ठराविक काळानंतर आपल्या मूळ ठिकाणी परत येतो. सध्याच्या काळात पर्यटन ही संकल्पना लोकप्रिय होत चाललेली आहे.[१]

**पर्यटनाचे स्वरूप**

पर्यटन हा सेवा स्वरूपाचा उद्योग आहे. येणाऱ्या पर्यटकांना राहणे, जेवण, मार्गदर्शन, वाहतूक इ. सेवा विशिष्ट मोबदला घेऊन उपलब्ध करून दिल्या जातात. पर्यटकांचे मनोरंजन हा प्रमुख उद्देश असतो. तो साध्य होतो तर सेवा पुरविणाऱ्यांना उत्पन्नाचे साधन मिळते. यातून स्थानिक रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. विकसनशील असलेल्या भारताचे पर्यटनाच्या दृष्टीने महत्व अधिक आहे. या उद्योगातून देशाला परकीय चलन मिळते. देशातील पर्यटकाबरोबरच परदेशी पर्यटकांची संख्याही लक्षणीय आहे. भारतातील सुमारे अडीच ते तीन कोटी लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे या उद्योगाशी संबंधित आहेत. [२]

पर्यटनाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोण बदलत गेला. त्यातूनच पर्यटनाचे अनेक प्रकार विकसित झाले उदा. धार्मिक पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, निसर्ग पर्यटन, आरोग्य पर्यटन, वर्षा पर्यटन, जंगल पर्यटन, कृषी पर्यटन इ. यापैकी कृषी पर्यटन हा शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणारा प्रकार आज लोकप्रिय होत आहे.[३]

**कृषी पर्यटन अर्थ आणि स्वरूप**

कृषी पर्यटन ही शेतकऱ्याच्या शेतीवर प्रत्यक्ष भेट देण्याची संकल्पना आहे. ग्रामीण जीवन प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी या केंद्रात पर्यटकांना मिळते. यामधून आनंद मिळविणे, शिक्षण घेणे, कृषीपूरक व्यवसायाबद्दल माहिती घेणे, ग्रामीण जीवन, पारंपारीक सण, खेळ याचा अनुभव येथे घेता येतो. काही कृषी पर्यटन केंद्रामध्ये ट्रॅक्टर राईड, बैलगाडी सवारी, ग्रामीण खेळ, असे अनेकविध उपक्रम राबविले जातात. याशिवाय काही लोकप्रिय गीते, लोकनृत्ये, लावणी, धनगरी गजा, पोवाडे, कोळी नृत्य आणि तमाशा आणि धार्मिक लोकांसाठी दिंडी अशा वैभवशाली संस्कृतीचे दर्शन यातून पर्यटकांना दिले जाते.शेतातच बांबू हाऊस किंवा गवताची झोपडी बांधून त्यामध्ये राहण्याचा आनंदही पर्यटकांना उपलब्ध करून दिला जातो.[४]

ग्रामीण जीवनाचा अनुभव देतानाच खवय्या लोकांना पारंपारीक ग्रामीण पदार्थ खाण्यासाठी उपलब्ध करून दिले जातात. यामध्ये शाकाहारी - मांसाहारी अशा दोन्ही प्रकारच्या पदार्थांचा समावेश असतो. हे पदार्थ चुलीवर, मातीची भांडी वापरुन तयार केले जातात. सांगली जिल्ह्यातील नरवाड येथील शेतकरी प्रदीप प्रदीप खोचगे - पाटील यांनी आपल्या शेतात विसावा कृषी ग्रामीण पर्यटन केंद्र सुरू केले आहे. गेली दोन वर्षापासून सात एकरावरच्या सेंद्रिय शेतीत नव्याने सुरू केलेल्या कृषी पर्यटनामध्ये शेत तलावात मत्स्यपालन, देशी गोपालन, त्यावर आधारित गांडुळ खत निर्मिती, गोबर गॅस संयंत्र, केळी बाग, वर्षभर कोणत्या ना कोणत्या फळाचे उत्पादन यावे यासाठी पपई, चिकू, पेरु, आंबा यांची फळबाग लागवड केली आहे. पर्यटकांना अतिशय सुंदर वातावरण आणि अगदी मन प्रसन्न व्हावे अशी रचना केली आहे. पर्यटकांची मानसिकता ओळखत त्यांनी विविध फळफुलांच्या झाडांची लागवड शेतात केली. या झाडांच्या फळांचा आस्वाद तेथे येणारे पर्यटक मुक्तपणे घेऊ शकतात. इतकेच नाही तर इतर ठिकाणी न मिळणारी

हळदीची भाजी ते जेवणात देतात. पर्यटकांना केळीच्या पानावर जेवण वाढले जाते. प्रसिद्ध शेफ संजीव कपूर यांनीही त्यांच्या कृषी पर्यटन केंद्राला भेट देऊन जेवणाचा आस्वाद घेतला आणि त्यांचे कौतुक केले.[५] अशाप्रकारे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी, वेगवेगळे उपक्रम राबवून पर्यटकांना आकर्षित करून घेण्याची कृषी पर्यटन ही एक संधीचं आहे.

**कृषी पर्यटनाची सुरुवात आणि सरकारी धोरण**

भारतात दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून पर्यटन उद्योगासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली. १९६६ मध्ये भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना झाल्यानंतर खऱ्या अर्थाने याला गती आलेली दिसते.[६] कृषी पर्यटनाची चळवळ सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सन २००५ पासून पुणे येथे कृषी पर्यटन विकास संस्था काम करत असून महाराष्ट्रात ३५० हून अधिक कृषी व ग्रामीण पर्यटन केंद्र शेतकऱ्यांच्या शेतावर सुरू केली आहेत. ग्रामीण पर्यटन केंद्रांची संख्या वाढत असून पर्यटकांचा ओढा याकडे वाढत असल्याचं चित्र दिसत आहे.[७]

पर्यटनाच्या विकासासाठी २० सप्टेंबर हा जागतिक पर्यटन दिवस म्हणून साजरा करण्यात येतो तर जागतिक कृषी पर्यटन दिन दरवर्षी १६ मे रोजी साजरा केला जातो. २०२० मध्ये पर्यटन आणि ग्रामीण विकास ही संकल्पना घेऊन हा दिवस साजरा करण्यात आला. २०२१ मध्ये हा दिवस कृषी पर्यटनाद्वारे ग्रामीण महिलांना शाश्वत उद्योजकतेच्या संधी या विषयाअंतर्गत साजरा केला गेला.[८]

महाराष्ट्र राज्य शासनामार्फत कृषी पर्यटनाला पाठबळ देण्यासाठी एक धोरण ठरविण्यात आले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, महिलांना तसेच बचत गटांना रोजगाराच्या संधी मिळवून देणे, त्यांच्या शेतीतील उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे, ग्रामीण भागात असलेल्या लोककलांना प्रोत्साहित करणे, कृषीपूरक व्यवसायासाठी पाठबळ देणे, गायरान आणि पडीक जमिनी उपयोगात आणणे अशी काही उद्दिष्ट्ये या धोरणात ठेवण्यात आली आहेत.[९] शेतकरी कृषी पर्यटन केंद्र सुरू करण्यासाठी थेट MTDC किंवा महाराष्ट्र पर्यटन विभागाला भेट देऊन परवाना घेऊ शकतात. त्याआधारे केंद्र उभारणीसाठी बँकेकडून कर्ज मिळते आणि कृषी विभागाकडून ग्रीन हाऊस, फळबाग भाजीपाला लागवड यासारख्या योजना उपलब्ध करून दिल्या जातात. प्रशिक्षण आणि मार्गदर्शनही मिळते.[१०]

शेतीपूरक असणारा हा कृषी पर्यटनाचा एक व्यवसाय अर्थार्जनाचा भाग ठरत आहे. शेतीशी निगडीत असलेले हे पर्यटन कृषी पर्यटन म्हणून शेती क्षेत्राला चालना देणारे ठरत आहे. ग्रामीण महिलांना, तरुणांना एक चांगला शेतीपूरक रोजगार गावातल्या गावात आणि आपल्या शेतामध्ये निर्माण होतो आहे. एकूण पर्यटन क्षेत्राचा सकल उत्पन्नात पंधरा टक्के वाटा प्राप्त करण्याचे आणि सन २०२५ पर्यंत एक दशलक्ष रोजगाराची निर्मिती करण्याचे शासनाचे उद्दीष्ट आहे.[११]

**कृषी पर्यटनाचे फायदे**

आजमीतीला फक्त शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनावर अवलंबून राहिल्याने शेतकरी काबाडकष्ट करून देखील फारसं उत्पन्न मिळवू शकलेला नाही. याला अनेक कारणे आहेत. आपली पीक पद्धती ही बेभरवशी निसर्गावर अवलंबून असल्याने बऱ्याचदा अनियमित मोसमी पाऊस, अती पाऊस, अवकाळी पाऊस, दुष्काळ, कीड आणि रोगाचे वाढते प्रमाण यामुळे शेतीतून हुकूमी उत्पन्न मिळेल याची शाश्वती नाही. याला जर शेतीपूरक अशा कृषी पर्यटनाची जोड दिली तर हमखास उत्पन्न मिळेल. प्रामुख्याने शेतकऱ्याच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना तसेच गावातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. पारंपारिक ग्रामीण कृषी संस्कृतीचे जतन आणि संवर्धन यामुळे होऊ शकते. पर्यायाने पर्यावरणाचे रक्षण होते. महिला बचत गटांना त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला गावातच बाजारपेठ उपलब्ध होते. दुर्मिळ आणि नामशेष होत चाललेल्या पारंपारिक देशी बीज संवर्धनाला चालना मिळू शकते. त्या भागातील वाहतुकीचा आणि साधनसंपत्तीचा विकास होतो. पर्यटन हे एक ज्ञान विस्ताराचे सुद्धा साधन आहे. यातून पारंपारिक रूढी, परंपरेची माहिती मिळते. राष्ट्रीय एकात्मकतासुद्धा वाढीस लागते.[१२]

**कृषी पर्यटनातून साध्य होणाऱ्या गोष्टी**

शहरी संस्कृतीत वाढलेल्या लोकांना पर्यटनाबरोबरच ग्रामीण संस्कृतीची ओळख होते. शहरात जन्मलेल्या आणि वाढलेल्या या पिढीला ग्रामीण रिती - परंपरेची ओळख होते. तसेच सध्याच्या धकाधूकीच्या आयुष्यात कृषी पर्यटनाच्या निमित्ताने शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या वेगळा अनुभव मिळतो. शेतकऱ्याला या पूरक व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळू शकते. यातून त्याचे आर्थिक सबलीकरण होऊ शकते. पडीक असलेली जमीन विकसित करून कृषी पर्यटन केंद्र सुरू करता येते.[१३]

**समारोप**

पर्यटन ही प्राचीन संकल्पना आहे. प्राचीन काळापासून मानवाने केलेल्या पर्यटनाचे पुरावे उपलब्ध आहेत. भारताचा विचार करता धार्मिक पर्यटन हे सर्वाधिक लोकप्रिय असलेले दिसते. काळाच्या ओघात या व्यवसायातही अनेक स्थित्यंतरे आली आणि पर्यटनाचे विविध प्रकार विकसित झाले. यापैकी कृषी पर्यटन हा आधुनिक काळात विकसित झालेला प्रकार आहे. गावातून कायमस्वरूपी शहरात स्थलांतरीत झालेली लोकसंख्या, ग्रामीण जीवनापासून पूर्णपणे बाजूला गेलेले लोक ज्यांना आपल्या कृषी ग्रामीण संस्कृतीचा अनुभव घ्यायचा असतो आणि आपल्या मुलांना तो अनुभव द्यायचा असतो अशा लोकांच्या गरजेतून कृषी पर्यटन ही संकल्पना लोकप्रिय झाली. ही संकल्पना स्वतच्या शेतावर राबविणाऱ्या शेतकऱ्यांना उत्पन्न मिळू लागले आहे. आर्थिक फायदा मिळवून देणारा शेतीपूरक व्यवसाय म्हणून आज याकडे पाहिले जात आहे. शेतकऱ्यांनी कल्पकतेने आपल्या शेतीचा वापर करत असे कृषी पर्यटन केंद्र विकसित केले तर निश्चित चांगले उत्पन्न मिळून त्याची आर्थिक उन्नती होऊ शकते. याचबरोबर पारंपारीक चाली- रीती, संस्कृतीचे जतन होऊ शकते.

**संदर्भ**

१. **राजेश शुक्ला, रश्मी शुक्ला, पर्यटन भूगोल, अर्जुन पब्लिशिंग हाऊस दिल्ली, २०११, पान नं १०-११**

२. **मकरंद जोशी, पर्यटन : काल आज उद्या (लेख), दैनिक महाराष्ट्र टाईम्स, २० मार्च २**

३. **अनुपम पान्डेय, पर्यटन का स्वरूप, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस नवी दिल्ली, २००७, पान नं. ५ – ७**

४. **राजेंद्र घोरपडे, कृषी पर्यटनात पर्यटकांना असे करा आकर्षित (लेख), न्यूज पोर्टल, इये मराठीचिये नगरी श्री. अथर्व प्रकाशन, कोल्हापूर, ६ मार्च २०२१.**

५. **मुलाखत - प्रदिप खोचगे – पाटील, संस्थापक विसावा कृषी पर्यटन केंद्र, नरवाड, दिनांक १४ एप्रिल २०२२**

६. **राजेश शुक्ला, रश्मी शुक्ला, उपरोक्त, पान नं. ६५.**


७. **पांडुरंग तावरे, कृषी व ग्रामीण पर्यटन समृद्ध शेतीचा राजमार्ग, कृषी पर्यटन विकास संस्था, शिवाजीनगर, पुणे.**

८. B.S. Badan, Harish Bhatt, Tourism Planning and Development, Commonwealth Publisher, New Delhi, 2007, page no.14.

९. **विश्वजीत पतंगराव कदम, कृषी पर्यटन धोरणातून समृद्धी (लेख), दैनिक लोकसत्ता, २९ मार्च २०२२.**website - https://tourism.gov.in.

१०. **मधुमती सरदेसाई - राठोड, कृषी पर्यटनातून आर्थिक स्थैर्याची संधी (लेख), दैनिक देशदूत, नाशिक आवृत्ती, २१ डिसेंबर २०२१**

११. B.S. Badan, Harish Bhatt, ibid. Paresh Joshi, AGRITOURISM: FOR SUSTAINABLE TOURISM DEVELOPMENT IN KONKAN REGION OF MAHARASHTRA, Golden Research Thoughts Journal, Volume - 6 Issue - 3 September – 2016, Page No 6-7


VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com) CC-14**

# २९. महाराष्ट्राचा ग्रामीण विकास आणि सहकारी चळवळ

**डॉ. विकास येलमार**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.
**डॉ. आर. बी. सातपुते**
कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा.

'सहकार' आर्थिक विकासाचा आणि सामाजिक परिवर्तनाचा लोकशाही व आदर्श असा उत्कृष्ट मार्ग आहे. आज भारतातील सर्व राज्यात सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्राचे स्थान अग्रेसर आहे. सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली आहे. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा जो काही विकास झाला आहे त्यामध्ये सहकारी चळवळीचा हिस्सा मोलाचा आहे. या चळवळीने ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकिय बदल घडवून आणले आहेत. ग्रामीण महाराष्ट्रात कृषी औदयोगिक समाज उभा राहिला आहे. सामान्य शेतकरी, शेतमजूर यांना सहकार चळवळीने विकास प्रक्रियेत सहभागी करून घेतले आहे.

दख्खनच्या शेतकऱ्यांनी सावकारशाहीच्या विरोधात केलेल्या दंगली आणि दुष्काळ निवारणार्थ स्थापन केलेली समिती यामुळे भारतातील सहकारचा जन्म झाला असे म्हणावे लागेल. सर डॅनियल हॅमिल्टन यांनी शेतकऱ्यांसाठी कर्ज पुरवठा करणारी चांगली, शाश्वत यंत्रणा उभी करण्याची गरज प्रतिपादन केली व या समितीच्या निष्कर्षातून सहकारी चळवळीचा जन्म झाला. त्याचप्रमाणे "Deccan Agriculturists Relief Act of 1879" तयार करण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनी शेती व्यवसाय न करणाऱ्या मालकीच्या होण्याला प्रतिबंध घालण्यात आला.[१] त्यापाठोपाठ जमीन सुधारणा कर्ज कायदा १८८३ व शेतकऱ्यांसाठीचा कर्ज कायदा १८८४ हे दोन कायदेही लागू झाले. सर फ्रेडरिक निकोलसन याचा अहवाल आणि श्री. डूपरनेक्स आदी अधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांचे कर्जविषयक प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न याची ब्रिटिश शासनाने जाणीवपूर्वक दखल घेतली आणि त्यावेळचा ब्रिटिश व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याने सर एडवर्थ लॉ याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून (१९०३) तिच्याकडे या देशात सहकारी संस्था स्थापन करण्याविषयी कायदा कशा स्वरूपाचा असावा याबद्दल शिफारशी करण्याचे काम सोपवण्यात आले. पुढे याच समितींच्या शिफारशींच्या अनुरोधाने सहकारी पतपेढयांचा कायदा १९०४ सर्व ब्रिटिश भारतात लागू झाला.[२] जनतेच्या इच्छाशक्तीतून ही चळवळ या देशात उगम पावली नाही. तिचे बीज शासकीय पुढाकारात होते. या देशातील सहकारी चळवळीचे हे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० हा कायदा महाराष्ट्रातील सहकारी सोसायटयांना १९६२ पासून लागू झाला व महाराष्ट्रात सहकारी चळवळीच्या विकासास मोठी गती प्राप्त झाली. १९६० ते १९८० या काळात महाराष्ट्रात सहकार सर्वत्र बहरला. या काळास सहकाराचे सुवर्णयुग म्हणता येईल अशी नेत्रदीपक प्रगती पहायला मिळाली. मात्र १९८० नंतरच्या कालखंडात या कालखंडात या चळवळीस अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

**सहकारी चळवळ आणि कृषी विकास**

सहकारी चळवळीच्या माध्यमातून कृषी पतपुरवठा, शेती, आदिवासी विकास पणनप्रक्रिया, सूतगिरण्या साखर कारखाने दुग्ध व्यवसाय, कुक्कट पालन, रेशीम उद्योग, औद्योगिक प्रक्रिया इत्यादी अनेक क्षेत्रात सहकारी संस्था पोहचल्या आहेत. या चळवळीच्या माध्यमातून राज्यामध्ये विविध ५३ हून जास्त प्रकारच्या २.२४ लाख सहकारी संस्था कार्यरत आहेत. राज्यातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या या सहकारी चळवळीशी निगडीत असून या संस्थांचे ५.५० कोटींहून

जास्तीचे सभासद आहेत. या संस्थाच्या माध्यमातून २० लाखाहून जास्त लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. या सर्व सहकारी संस्थाची वार्षिक उलाढाल २.३७ लाख कोटी रूपयांहन जास्त आहे.[४] विशेषतः राज्याच्या ग्रामीण क्षेत्रात सहकाराने महत्त्वाचे कार्य केले आहे. या चळवळीमुळे ग्रामीण भागातील सावकारशाही मोठ्या प्रमाणात नष्ट झाली आहे. सहकार क्षेत्राने वित्तपुरवठ्यात मक्तेदारी निर्माण केलेली आहे. शेतीसाठी अल्पकालीन, मध्यम व दीर्घ मुदतीचे कर्ज दिले जाते. शेतीच्या विकासात सहकारी चळवळीची भूमिका महत्त्वाची आहे. सहकार चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा मोठा विकास झालेला आहे.

**साखर उदयोग आणि सहकारी चळवळ**

सहकारी चळवळीने महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाचे केलेले महत्त्वाचे कार्य म्हणजे ग्रामीण भागात उभा केलेले साखर कारखाने होत. सहकाराच्या माध्यमातून या साखर कारखान्यांमुळे हजारो गरीब शेतकऱ्यांच्या प्रगतीस चालना मिळाली मुठभर श्रीमंत लोकांची मक्तेदारी निर्माण झाली नाही. महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखना लोणी जि. अहमदनगर येथे प्रवरा सहकारी साखर कारखाना या नावाने १९४८ मध्ये स्थापन केला. व त्याचा पहिला गळीत हंगाम १९५० मध्ये सुरू झाला"[५] २०१२ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रामध्ये सुमारे २०२ नोंदणीकृत सहकारी साखर कारखाने असून त्यापैकी १६८ सहकारी साखर कारखान्यांची उभारणी पूर्ण झालेली आहे."[६]

गेल्या काही वर्षात सहकारी साखर कारखान्यांनी अनेक उत्पादनांचे व कार्याचे विविधीकरण केले आहे. अनेक साखर कारखान्यांनी स्वतःच्या पैशातून कोटयावधी रूपयांच्या उपसा जलसिंचन योजना राबविल्या आहेत. नदयावरील बंधारे पाझर तलाव, रस्ते यावर खर्च केला आहे. त्यामुळे हजारो एकर शेती पाण्याखाली आली आहे. उत्कृष्ट बी- बियाणे, खते, माती प्रशिक्षण प्रयोगशाळा काढून माती परिक्षण करणे, शास्त्रीय शेती साठी व जमीन सुधारणेसाठी सहाय्य करणे इत्यादी विविध योजना राबवून सहकारी साखर कारखान्यांनी ऊस शेतीच्या प्रगतीला महत्त्वाचे योगदान दिले आहे. याशिवाय अनेक साखर कारखान्यांनी टाकाऊ पासून टिकाऊ पदार्थाची निर्मिती केली आहे. उदा मद्य, ॲसिड, कागद, पार्टिकल बोर्ड, मिथेनॉल, जनावरांचे खाद्य, वीजनिर्मिती इ. याशिवाय वाहतूक व्यवसाय, शेतीसाठी यंत्रसामुग्री, रसायन उद्योग, सहकारी बँका इत्यादी अनेक व्यवसायांना सहकारी साखर कारखान्यांनी आधार दिला आहे.[७]

**सहकारी चळवळ आणि दुग्ध व्यवसाय**

प्राचीन काळापासून भारतात दुग्ध व्यवसाय सुपरिचित होता. मात्र या व्यवसायाला अवकाळा आली होती. मात्र सध्या सहकाराच्या माध्यमातून हा व्यवसाय भरभराटीस आला आहे. ग्रामीण भागातील लहान शेतकरी भूमिहीन मजूर यांना उदरनिर्वाहाचे साधन पुरविण्याचे कार्य या व्यवसायाने केले आहे. महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या दुध उत्पादन संस्थांचे वर्गीकरण दोन भागात केले जाते. एक म्हणजे ग्रामीण किंवा तालुक्याच्या पातळीवर काम करणाऱ्या दुग्ध उत्पादन सहकारी संस्था आणि दुसरे म्हणजे जिल्हा पातळीवर कार्यरत असणारे दूध उत्पादक संघ सन १९६१ पासून महाराष्ट्रात ग्रामीण पातळीवरील सहकारी दूध संस्थांचा विकास सातत्याने होत आहे. १९६१ मध्ये या संस्थांची संख्या ४३९ इतकी होती. तर २००१ मध्ये ती २२४६६ इतकी वाढली तर जिल्हा दूध संघाची संख्या १९६१ ते २००१ या काळात १९ वरून ६५ पर्यंत वाढली.[८]

सध्या महाराष्ट्रात गोकुळ, वारणा, कोयना, शिवामृत, लोकमंगल, दूध पंढरी, कृष्णा, कोयना, गोविंद, यासारख्या दूध संघांनी आम्रखंड, श्रीखंड, लस्सी, पेढे, यासारखे उपपदार्थ निर्मिती सुरू केली परिणामी ग्रामीण व शहरी भागातील अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. आज महाराष्ट्रात ६१% महिला दुग्ध व्यवसायात कार्यरत आहेत मात्र बहुतांशी महिला या दुग्ध व्यवसायाच्या शास्त्रीय ज्ञानापासून पूर्णपणे अलिप्त आहेत.'[९]

सहकारी दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून शेतीला जोडधंदा मिळाला. ग्रामीण भागातील दारिद्रय कमी व्हायला मदत झाली. फुड ऑर्गनायझेशन ऑफ इंडियाच्या अहवालानुसार शेतकऱ्यांकडे एक गाय असेल तर १६% आणि एक म्हैस असेल तर २४% दारिद्र कमी होते. सहकाराच्या माध्यमातून झालेल्या धवलक्रांतीचे फायदे संपूर्ण महाराष्ट्राला मिळाले.[१०]

**शिक्षणाचा विकास आणि सहकारी चळवळ**

ग्रामीण भागात शिक्षणाचा विकास करण्यात सहकारी चळवळीचा कार्यभाग मोठा आहे. यात शंका नाही. अनेक साखर कारखान्यांनी व इतर सहकारी संस्थांनी आपल्या क्षेत्रात शाळा, महाविदयालये चालवून ग्रामीण क्षेत्रात शिक्षणाचा प्रसार केला आहे. ही महाविदयालये या कारखान्यांनी चालू केली नसती तर बहुसंख्य ग्रामीण युवक- युवती शिक्षणापासून वंचित राहिली असती."[११] उदा. पश्चिम महाराष्ट्रात जो शैक्षणिक विकास झालेला आहे त्याचे श्रेय सहकार चळवळीस जाते यात शंका नाही.

**सामजिक बांधिलकी आणि सहकारी चळवळ**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने समाजिक बांधिलकी मानून ग्रामीण क्षेत्रात रस्त्यासारख्या मुलभूत सेवा निर्माण केल्या आहेत. उपसा जलसिंचन योजनांना कर्ज पुरवठा केला आहे. सहकारी चळवळ ही एक सामजिक व सार्वत्रिक चळवळ असून तिला नैतिक अधिष्ठान आहे. या चळवळीमुळे व्यक्तीमध्ये एकता, बंधुभाव, सहजीवनाची व सलोख्याची भावना वृध्दीगत होते. व्यक्तीच्या आपआपसातील मतभेदाचे समूळ उच्चाटण करून त्यांचे जीवन सुखी व कल्याणकारी बनविण्यात मदत केली जाते.[१२] अनेकदा सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था आर्थिक विकासाचे काम सहकारी संस्थेकडे सोपवू इच्छितात व त्यांना हे काम करण्यासाठी जरूर ते सहाय्य करतात कर्जपुरवठा करण्याचे काम करणाऱ्या सहकारी संस्था कर्जपुरवठा करताना मागासलेल्या जाती-जमातीच्या व्यक्तींना प्राधान्य देतात. त्यामुळे या संस्था पर्यायाने सामाजिक कल्याणालाच सहाय्य करतात. अनेक सहकारी संस्था शैक्षणिक संस्था चालवणे, आरोग्य व बालकल्याणाची कामे यामध्ये पोषक आहार. कुटुंब नियोजन, आरोग्य तपासणी, दवाखाने स्थापन करणे व चालवणे इ. बाबींचा समावेश होतो. महिला कल्याण यामध्ये साक्षरता, रोजगार मिळवणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे महिलांचे पुर्नवसन इ. बाबींचा समावेश होतो. अपंगांचे कल्याण, कामगार कल्याण, मागासलेल्या जाती जमातीचे कल्याण, सामुदायिक विवाह सोहळे इ. कामे करतात. कोल्हापूर येथील शेतकरी सहकारी संघाचा रक्तपेढी चालवण्यात मोठा सहभाग होता. त्याच प्रमाणे अनेक सहकारी संस्थांनी मुख्यमंत्र्यांच्या दुष्काळ निवारणनिधीला मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य केले आहे.[१३] एकंदरीत महाराष्ट्रातील सहकार चळवळीमुळे महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास झालेला आहे. येथील सहकारी चळवळीच्या विकासामुळे मुंबई, पुणे, नागपूर अशा शहराकडे होणारे ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतर स्थानिक रोजगार मिळाल्यामुळे कमी झाले आहे. समाजामध्ये सहकारामुळे एकात्मता, बंधुता व मेहनतीची जाणीव निर्माण झालेली आहे. गेल्या ५०-६० वर्षात महाराष्ट्रात सहकारी चळवळीची निःसंशय वाढ झाली असून तिचे लोण खेडोपाडी पसरले आहे. सहकाराने नवनवीन क्षेत्रात प्रवेश केला असून त्याच्या कक्षा रुंदावल्या आहेत.

या चळवळीचा दुसऱ्या बाजूने विचार केल्यास असे म्हणता येयील की स्वातंत्र्याच्या वेळी सहकारी चळवळ म्हणजे शेतक-यांची चळवळ असे जे तिचे स्वरूप होते ते आता • बदलेले असून साखर कारखाने व दुग्ध संस्था यांचा अपवाद वगळता ग्रामीण भागातून पीछेहाट होते की काय आणि तिने तिचा मोर्चा शहरी भागाकडे वळवला की काय अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसते. सहकार चळवळीचा केंद्र बिंदू पूर्वी ग्रामीण भाग होता तो आता ढळला असून तिचा कल शहरी भागाकडेच अधिक वळत आहे. असेही चित्र समोर येत आहे. शहरी भागात तिचे स्वागत व्हावेच. मात्र ग्रामीण भागात तिची पीछेहाट होऊ नये यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच सहकारी संस्थांची संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढ होणे गरजेचे आहे .

**संदर्भ**

1. अवघडे भगवान (संपा): शतकोत्तर सहकार; लोकायन सहकारी प्रकाशन संस्था मर्या. सातारा २००४ पृ. १०
2. कित्ता पु. ११
3. भोळे भा.ल व किशोर बेडकिहाळ (संपा) ; बदलता महाराष्ट्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी सातारा २००३ पृ. ७९
4. लोकराज्य सप्टें. २०१२ पृ. १२
5. पाटील (डॉ.) जे. एफ व भालबा विभूते (डॉ.) महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण मूल्यमापन व दिशादर्शन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर नोव्हें. २०११. पृ. २१२
6. लोकराज्य, उपरोक्त पृ. १३
7. नवभारत मे-जून, २०१०, पृ. ३४
8. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ - एका दृष्टीक्षेपात: २००१. सहकार आयुक्त निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
9. पाटील (डॉ.) जे. एफ व भालबा विभूते (डॉ.) उपरोक्त पृ. १६८,
10. कित्ता पृ. १७०
11. भोळे भा. ल. व किशोर बेडकिहाळ (संपा): उपरोक्त पृ. ७८
12. जिल्हा सहकारी परिषद स्मरणिका: कोल्हापूर जिल्हा सहकारी बोर्ड लि कोल्हापूर ९ मार्च २००३ पृ. ८८
13. घाणेकर (डॉ.) वि. वि. सहकारी चळवळीचे शंभर वर्षाचे अवलोकन व नवी आव्हाने: इन्स्टीट्यूट ऑफ डेव्हलपमेंट अॅन्ड एज्युकेशन: पुणे २००४ पृ. ८८